# विधानसभा आश्वासन समिती

(२०२०-२०२१)

(SEEnE´E0 ¨E½E®E¹]i E´EvEExEºE¦EE)

## दुसरा अहवाल

[ºExE 1994 SE {EE½±E +lEºEEò±{E0ªE +EvE´E¶ExE iE ºExE 2015 SªEE nºE-ªEE ({EE´EºEE³/0)

+EvE´E¶ExEEiE0±E =´EE®iE |E±EE¤EiE +E¶´EEºExEEºE¤EvE0SEE +½´EE±E]

(दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला.)

¨E½E®E¹]i E´EvEExE¨Eb³i ºEESE´EE±EªE

Ê´ÉvÉÉxÉ ¦É´ÉxÉ, ¨ÉÖ¤ÉÆ<.

2022.

# महाराष्ट्र विधानसभा

## आश्वासन समिती

(२०२०-२०२१)

(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

# दुसरा अहवाल

[सन १९९४ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनातील उर्वरित प्रलंबित आश्वासनांसंबंधीचा अहवाल)]

## विधानसभा आश्वासन समिती

## (२०१८-२०१९)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. जयप्रकाश मुंदडा, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(३) श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स.

(४) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

(५) श्री. विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स.

(६) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

(७) श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स.

(८) श्री. नागेश पाटील-आष्टीकर, वि.स.स.

(९) श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स.

(१०) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

(११) श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.

(१२) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.

(१३) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

(१४) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(१५) श्री. संजय कदम, वि.स.स.

(१६) श्री. महेश लांडगे, वि.स.स.

(१७) श्री. रवि राणा, वि.स.स.

(१८) श्री. गणपत गायकवाड, वि.स.स.

(१९) श्री. क्षितीज ठाकूर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.),

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव,

(३) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,

(५) श्रीमती नंदिनी सावंत, कक्ष अधिकारी.

## विधानसभा आश्वासन समिती

**(२०२०-२०२१)**

**समिती प्रमुख**

(१) श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. रमेश लटके, वि.स.स.

(३) श्री. संजय पोतनीस, वि.स.स.

(४) श्री. दिलीप लांडे, वि.स.स.

(५) श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स.

(६) श्री. आशुतोष काळे, वि.स.स.

(७) श्री. बाळासाहेब आजबे, वि.स.स.

(८) श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स.

(९) श्री. शिरीषकुमार नाईक, वि.स.स.

(१०) श्री. चंद्रकांत जाधव, वि.स.स.

(११) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

(१२) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.

(१३) श्री. मोहन मते, वि.स.स.

(१४) श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स.

(१५) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१६) श्री. राम सातपुते, वि.स.स.

(१७) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स.

(१८) ॲड. लक्ष्मण पवार, वि.स.स.

(१९) श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव,

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
उप सचिव (विधि) (अति.),

(४) श्रीमती नंदिनी सावंत, कक्ष अधिकारी.

(



## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | |
| १ | विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या .. .. | नऊ-अकरा |
| २ | अभिप्राय व शिफारशी .. .. | तेरा-सोळा |
| | **परिशिष्टे :** | |
| | **परिशिष्ट एक.**—आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | सतरा-५४ |
| | **परिशिष्ट दोन.**—आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके | ५५-५४० |
| | **परिशिष्ट तीन.**—आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण | ५४१-५४४ |
| | **परिशिष्ट चार.**—समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त | ५४५-५८२ |

**प्रस्तावना**

मी, आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन तिच्या वतीने समितीचा **दुसरा** अहवाल सभागृहास सादर करीत आहे. **सन १९९४ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन ते सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी)** अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेली काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

**सन १९९४ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन ते सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी)** अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून विधान सभागृहात देण्यात आलेल्या काही प्रलंबित आश्वासनांच्या संदर्भात आश्वासन समितीचा सदरहू **दुसरा** अहवाल तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट " एक " मध्ये देण्यात आली असून आश्वासनांसदर्भातील शासन निर्णय / परिपत्रके परिशिष्ट " दोन " मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट तीन मध्ये देण्यात आली आहेत व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट " चार " मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवाल दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत विचार करून तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
**दिनांक :** ९ मार्च, २०२२

**कैलास गोरंट्याल,**
समिती प्रमुख,
विधानसभा आश्वासन समिती.

## सन १९९४ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन ते सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशन या कालावधीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या

## अहवाल

सन १९९४ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात शासनाने खालीलप्रमाणे आश्वासने दिली आहेत. सदरच्या आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी त्यासमोर दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**सन १९९४ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलावर ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या,—**

| अ.क्र. | अधिवेशन/वर्ष | आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे पटलावर ठेवल्याचा दिनांक | आश्वासन क्रमांक | आश्वासन संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | सन १९९४ चे पहिले | २६ जुलै २०१६ | १०५८ | १ |
| २. | सन १९९५ चे दुसरे | १८ डिसेंबर २०१४ | ७८७ | १ |
| ३. | सन २००४ चे चौथे | २८ मार्च २०१६ | ३०५ | १ |
| ४. | सन २००५ चे दुसरे | १४ डिसेंबर २०१५ | ९७७ | १ |
| | | २६ जुलै २०१६ | ७८६ | १ |
| ५. | सन २००६ चे तिसरे | २८ मार्च २०१६ | १३३ | १ |
| | | १४ डिसेंबर २०१५ | ८०२ | १ |
| ६. | सन २००७ चे पहिले | १४ डिसेंबर २०२० | ३७१ | १ |
| ७. | सन २००७ चे दुसरे | १९ मार्च २०१८ | १६२३ | १ |
| ८. | सन २००७ चे तिसरे | १९ मार्च २०१८ | २५९६ | १ |
| ९. | सन २००८ चे पहिले | १४ डिसेंबर, २०१७ | ८२५ | १ |
| १०. | सन २०१० चे पहिले | १९ मार्च २०१८ | ५४, ५५, ५६ | ३ |
| ११. | सन २०१० चे दुसरे | २८ जुलै २०१७ | ५१७ | १ |
| | | १९ मार्च २०१८ | ५६१ | १ |
| १२. | सन २०१० चे तिसरे | ७ डिसेंबर २०१६ | ३५१ | १ |
| १३. | सन २०११ चे पहिले | १९ मार्च २०१८ | ६४९ | १ |
| १४. | सन २०१२ चे पहिले | १९ मार्च २०१८ | ८०० | १ |
| १५. | सन २०१२ चे दुसरे | २१ जून २०१९ | २०० | १ |
| १६. | सन २०१३ चे पहिले | ७ डिसेंबर २०१६ | २५५ | १ |
| | | १४ डिसेंबर २०१७ | ५३ | १ |
| | | १९ मार्च २०१८ | ४८१ | १ |
| १७. | सन २०१३ चे दुसरे | १४ डिसेंबर २०१५ | २१२ | १ |
| | | २८ मार्च २०१६ | २६४ | १ |
| | | ७ डिसेंबर २०१६ | २०४ | १ |
| | | २८ जुलै २०१७ | ४९ | १ |
| | | १४ डिसेंबर २०१७ | १४ | १ |
| | | १९ मार्च २०१८ | ३७० | १ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १८. | सन २०१३ चे तिसरे | २७ जुलै २०१५ | १०, ७१, २८१ | ३ |
| | | २८ मार्च २०१६ | २५८ | १ |
| १९. | सन २०१४ चे पहिले | २१ जुलै २०१५ | ३५ | १ |
| २०. | सन २०१४ चे दुसरे | १८ डिसेंबर २०१४ | १७९, १८१, १८३ | ३ |
| | | २१ जुलै २०१५ | १५८, १५९, २२०, २८९, ३७१ | ५ |
| | | २८ मार्च २०१६ | १६२ | १ |
| | | १९ मार्च २०१८ | २५० | १ |
| | | २१ जून २०१९ | ४४७ | १ |
| २१. | सन २०१४ चे चौथे | २१ जुलै २०१५ | ३२६, ३२७, ३२८, ५६८ | ४ |
| | | १४ डिसेंबर २०१५ | २४८, २७७, ३२५, ३२९, ३३०, ३७२, ४६९, ६८५ | ८ |
| | | २६ जुलै २०१६ | ६, २०८, ३१५, ३१७, ३५०, ३५४, ५८०, ५८१, ५८२, ५८३, ५८४ | ११ |
| | | ७ डिसेंबर २०१६ | १८४, १८५, १८६ | ३ |
| | | १७ मार्च २०१७ | २७५ | १ |
| | | १४ डिसेंबर २०१७ | ३५, २१४, ४०३, ४०४, ४४३, ५६२, ६३४, ७०७, ७७८ | ९ |
| | | १९ मार्च २०१८ | ३०६, ४२५, ४२६, ४२७, ४२८, ४२९, ४३०, ४३१, ४३२, ४४१, ४४२, ७७६, ७७७, ७७९, ७९७, ७९८, ८०१, ८०४, ८०५ | १९ |
| | | २६ फेब्रुवारी २०१९ | १२० | १ |
| २२. | सन २०१५ चे पहिले | १४ डिसेंबर २०१५ | ५९६, ६९९, ७०० | ३ |
| | | २८ मार्च २०१६ | ८८२, ११७५ | २ |
| | | २६ जुलै २०१६ | ६५९ | १ |
| | | ७ डिसेंबर २०१६ | ९३१, ९३३ | २ |
| | | १७ मार्च २०१७ | ६९८ | १ |
| | | २८ जुलै २०१७ | ३९७, १०६१ | २ |
| | | १४ डिसेंबर २०१७ | ९०, ८१३, ९४२, ११६२ | ४ |
| | | १९ मार्च २०१८ | ४४० | १ |
| २३. | सन २०१५ चे दुसरे | २८ मार्च २०१६ | ५३७, ५३८, ५३९, ५४०, ६६७ | ५ |
| | | ७ डिसेंबर २०१६ | १६५ | १ |
| | | १४ डिसेंबर २०१७ | ३७५ | १ |
| | | १९ मार्च २०१८ | ८४, २४१, २४४, ६१४, ६३९, ६४०, ६४२, ६४३, ६४४, ६४५ | १० |
| | | १२ जुलै २०१८ | ९० | १ |
| | | २१ जून २०१९ | ४३, ४४, ५१३ | ३ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **पुर्तता होऊन मान्य केलेली आश्वासने** | **१३८** |
| | | | **वगळलेली प्रकरणे** | |
| १. | सन २००५ चे दुसरे | | ४६८ | १ |
| २. | सन २००६ चे पहिले | | १२४९ | १ |
| ३. | सन २००७ चे पहिले | | ३६६ | १ |
| ४. | सन २०१० चे तिसरे | | ५६५ | १ |
| ५. | सन २०११ चे पहिले | | १५१ | १ |
| ६. | सन २०१२ चे पहिले | | १९, २३३ | २ |
| ७. | सन २०१२ चे दुसरे | | १९, ३५६ | २ |
| ८. | सन २०१३ चे दुसरे | | २६६, २६८ | २ |
| ९. | सन २०१४ चे चौथे | | १२४, २२१, ६९३ | ३ |
| १०. | सन २०१५ चे पहिले | | १०२, ९०६, १०४९, ११२२ | ४ |
| ११. | सन २०१५ चे दुसरे | | १८०, २५७ | २ |
| | | | **एकूण** | **१५८** |

## अभिप्राय - शिफारशी

विधानसभा सभागृहात मा.सदस्यांद्वारे विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या बाबींवरील चर्चेला उत्तर देत असताना मा.मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनाच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असल्याची बाब समितीने आपल्या यापूर्वी सादर केलेल्या विविध अहवालांद्वारे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या असूनही त्यामध्ये शासनाकडून आश्वासनांची पूर्तता करण्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही. प्रलंबित आश्वासने विचारात घेता ज्या आश्वासनामध्ये शासन स्तरावर कार्यवाही करणे, त्याची पूर्तता करणे सहज शक्य आहे अशी आश्वासने देखील शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उदासीनतेच्या धोरणामुळे विधानमंडळास सादर करण्यात कमालीचा विलंब होत आहे. ज्या आश्वासनांसंदर्भात विषय न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आहेत अशा आश्वासनांसंदर्भात विलंब होत असल्यास ती बाब समजण्यासारखी आहे. तथापि, जी आश्वासने शासनाच्या स्तरावर वेळीच निपटारा करणे शक्य असतात अशी आश्वासने वेळेत पाठविण्यामध्ये जी दिरंगाई शासनाकडून दाखविली जाते ती अक्षम्य आहे असे समितीचे मत आहे. यासाठी समितीला संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक वाटते, कारण विलंबाने येणाऱ्या आश्वासनांमुळे सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध संसदीय आयुधांवर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या अभिवचन अथवा आश्वासनांची वेळीच पूर्तता झाली नसेल तर सभागृहात जे सन्माननीय सदस्य राज्यातील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचे असलेले विषय उपस्थित करतात, ज्या बाबींसंदर्भात शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत उहापोह केला जातो त्यात सुधारणा अथवा आणखी काही बदल करण्याची मागणी विविध संसदीय आयुधांमार्फत सभागृहात केली जाते व अशी मागणी मा.मंत्री महोदयांच्या माध्यमातून आश्वासनांच्या रुपाने सभागृहात पूर्तता झाल्यानंतरच सदरच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून संबंधित संसदीय आयुध तेवढ्यापुरते सभागृहात थांबविले जाते. याचा अर्थ असा आहे की, जे आश्वासन सभागृहात दिले जाते त्यावर शासनाने सर्वकष कार्यवाही करुन त्याचा पूर्तता अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे अपेक्षित आहे. तद्वतच विधानसभेच्या या समितीकडे सदरच्या आश्वासनपूर्ततेचा परिपूर्ण अहवाल पाठविणे आवश्यक आहे. **तथापि अधिकाऱ्यांद्वारा या बाबींसंदर्भात अक्षम्य विलंब केला जात असल्यामुळे याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करुन त्यासंदर्भात शासनाने कडक धोरण आखून सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ही कोणत्याही परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणात न्यायालयीन अडथळे आहेत अथवा पूर्ततेबाबत काही अडचणी आहेत अशा बाबीदेखील शासनाने समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. म्हणून यासाठी शासनाने एक सर्वकष निर्णय घेऊन या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत संबंधित विभागाचे उप सचिव तथा सह सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन आश्वासन पूर्ततेसंदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई झाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुध्द ठोस कारवाई करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात यावा. तसेच दर तीन महिन्याला संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी म्हणजेच सचिव/प्रधान सचिव यांनी त्यांच्या विभागाच्या संबंधित उप सचिव/सह सचिव यांचेसमवेत आश्वासनांच्या पूर्ततेबाबतच्या आढावा बैठका घेऊन मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासने/अभिवचने संदर्भात जी आश्वासने/अभिवचने सहज पूर्ण करणे शक्य आहे, अशा बाबतीत त्वरेने निर्णय घेऊन त्याबाबतचे विवरणपत्र संसदीय कार्य विभागामार्फत सभागृहाला पाठविण्याची कार्यवाही तत्परतेने व त्वरेने करावी तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही एक मोठी समस्या आहे. यात संसदीय कार्य विभागाने संबंधित विभागाशी संपर्क ठेऊन कोणत्याही परिस्थितीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणारी विवरणपत्रे विहित मुदतीत सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. **सदरची विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने उक्त संसदीय आयुधातील विषय कालबाह्य झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही. परिणामी समितीच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होतो. याबाबीसंदर्भात देखील शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे.**

संसदीय लोकशाही प्रक्रियेमध्ये सभागृहात देण्यात येणाऱ्या आश्वासनांना अनन्य साधारण महत्व आहे. मा.सदस्यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या विषयावर चर्चा उपस्थित करुन संबंधित मंत्री महोदयांना त्यावर लगेच कार्यवाही करणे शक्य होत नसल्याने काही विषयाच्या बाबतीत आश्वासने दिली जातात. अशा आश्वासनांची पूर्तता सुदृढ संसदीय लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण या आश्वासनांचा विविध योजनांच्या माध्यमातून जनतेवर प्रभाव पडत असतो आणि सदरच्या आश्वासनांची वेळीच पूर्तता झाल्यास जनतेमध्ये त्याचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येतो. तथापि, वर्षानुवर्षे आश्वासनांची पूर्तता न झाल्यास जनतेचा शासन व्यवस्थेवरील विश्वास उडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतीय संविधानात विधानमंडळाच्या दोन अधिवेशनामधील कालावधी हा सहा महिन्यांपेक्षा जास्त असू नये अशी तरतूद आहे. या तरतुदीस अनुसरुन आपल्या राज्यातील राज्य विधानमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होत असतात. ज्याला आपण उन्हाळी (अर्थसंकल्पीय), पावसाळी आणि हिवाळी अधिवेशने असे संबोधतो. म्हणूनच सभागृहात देण्यात येणाऱ्या प्रत्येक आश्वासनांच्या पूर्ततेचा कालावधी हा ९० दिवसांचा ठेवण्यात आला आहे. या कालावधीत मा. मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची/अभिवचनाची पूर्तता ज्या अधिवेशनात दिली त्याच्या

पुढच्या अधिवेशनात त्याची पूर्तता व्हावी हा उद्देश आहे. शासनाच्या विविध योजना राबविताना अशा आश्वासनाची पूर्तता करताना शासनाच्या संबंधित विभागास पुरेसा वेळ मिळावा ही या मागील भूमिका आहे. अशा परिस्थितीमध्ये शासनाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे कर्तव्य असते की, **सभागृहात मंत्री महोदयाने आश्वासन दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत आश्वासीत केलेली आश्वासने प्रस्तावित करुन त्यावर निर्णय घेऊन त्यानंतर येणाऱ्या लगतच्या अधिवेशनात आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी. विधानसभेच्या नियमानुसार आश्वासनांच्या पुर्ततेबाबत शासनास ९० दिवस इतक्या कालावधीची मर्यादा घालुन दिली आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केल्यास बहुतांश आश्वासनांची पूर्तता ही वेळेत किंबहूना वेळेच्या आधीदेखील होऊ शकते असे समितीचे ठाम मत आहे. सबब, आश्वासनांचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर विविध कालावधीत ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण आखावे. आश्वासनाची पूर्तता जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे विलंबाने करणाऱ्या संबंधित विभागाच्या उप सचिव/ सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन उक्त अधिकाऱ्यानी त्यांच्या कार्यकाळात त्यासंदर्भात नस्ती प्रस्तावीत करुन आश्वासन पूर्ततेचा पाठपुरावा करुन व तसे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने सर्वंकष निर्णय घेऊन यासंदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीला १ महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांची संसदीय कार्य विभागाकडून विविध विभागाद्वारे पाठविलेली आश्वासने एकत्रित करुन त्या सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. अशा आश्वासनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्यातील वेगवेगळ्या विभागाकडून संसदीय कार्य विभागाकडे पाठविण्यात आलेली आश्वासने याचे एकत्रित संकलन करुन त्याचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते. अशा संकलित केलेल्या आश्वासनांच्या विवरणाच्या प्रती अहवालाच्या माध्यमातून विधानमंडळाला सादर कराव्या लागतात. म्हणून विभागाने आश्वासनांची पूर्तता संसदीय कार्य विभागाकडे करताना विवरणपत्रे "सॉफ्ट कॉपी" मध्ये घेऊन संसदीय कार्य विभागाकडे सादर करावी व संसदीय कार्य विभागाने अशा एकत्रित जमा झालेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता एकत्रित "सॉफ्ट कॉपी" मध्ये घेऊन ती विधानमंडळाकडे सादर करावी व अशा एकत्रित केलेल्या विवरणपत्राची माहिती **शासनामार्फत वेळोवळी पटलावर ठेवण्यात येणाऱ्या वर्षनिहाय व प्रत्येक अधिवेशननिहाय आश्वासनांबाबतच्या पूर्ततेबाबतची कार्यवाही विवरणपत्रासह सादर करावी. आश्वासनांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयीन विभागाकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या विवरणपत्रात आश्वासनांचे विषय, मंत्री/राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेले आश्वासने व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये बऱ्याच वेळेला विसंगती व तफावत आढळून येत असते. आश्वासनांचा विषय व त्याच्या पूर्ततेबाबतदेखील तफावत दिसून येत असते. याचाच अर्थ संबंधित अधिकारी हे वेळ मारुन नेण्यासाठी समितीपुढे हलगर्जीपणाने आश्वासनांची पूर्तता करीत असतात. आश्वासनांची पूर्तता ही विषयाच्या अनुषंगाने सुसंगत व परिपूर्ण असणे आवश्यक आहे. समितीच्या बैठकीत पहिल्या वाचनाच्या वेळी आढळून येणाऱ्या त्रुटींबाबत समिती गांभीर्याने घेत असून यापुढील काळात समितीसमोर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतची विवरणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांशी सुसंगत व आश्वासनांच्या कक्षेत असल्याबाबत खात्री करुनच समितीकडे परिसृत करावीत व यासंदर्भात शासनाने सर्वंकष परिपत्रक त्वरेने निर्गमित करुन यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

## विशेष अभिप्राय व शिफारशी
## नगरविकास विभाग

**विधानसभा आश्वासन क्रमांक १६२३, विधानसभा कामकाज खंड १४७ क्रमांक ५, दिनांक २० जुलै, २००७.**

**"बोरिवली येथील लक्ष्मी छाया टॉवर ही इमारत कोसळल्यामुळे झालेली वित्त व जिवित हानी".** या विषयावरील सर्वश्री गोपाळ शेट्टी व इतर वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मा.नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी **"त्यासाठी डीसीआर आणि मुंबई महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर कोणत्याही परिस्थितीत हे अधिवेशन संपल्यानंतर पुढील अधिवेशनाची वाट न पहाता अध्यादेश काढून जी तरतूद करणे आवश्यक असेल ती केली जाईल",** असे आश्वासन दिले होते.

महाराष्ट्र शासनाच्या दि.१४/०३/२००९ च्या अधिसूचनेन्वये मुंबई महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) १८८८ मध्ये ३५३ (ब) हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले. सदर कलमातील तरतूदीनुसार तीस वर्षावरील अस्तित्वात असलेल्या जुन्या खाजगी इमारतींचे संरचनात्मक लेखी परिक्षण करणे इमारत मालकास बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच अशा सर्व इमारतींचे नोंदणीकृत अनुज्ञापित संरचनात्मक अभियंत्याकडून संरचनात्मक परिरक्षण करून त्यांनी सदर इमारत राहण्यायोग्य असल्याचे प्रमाणित केलेले इमारत स्थैर्यता प्रमाणपत्र महापालिकेच्या संबंधित विभागास सादर करणे सक्तीचे करण्यात आले आहे. वर नमूद तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी व यात हलगर्जीपणा करत असलेल्या इमारत मालकास किंवा खाजगी / सहकारी गृहनिर्माण संस्था/ भोगवटादारास इमारत स्थैर्यतेचे प्रमाणपत्र विशिष्ट कालावधीत सादर करण्यासाठी नोटीशी अन्वये महापालिका फर्मावू शकते. मुंबई महापालिका अधिनियम (सुधारणा) १८८८ मध्ये ३५३ (ब) हे नविन कलम समाविष्ट करण्यात आले आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये कलम ३५३ (ब) हे नवीन कलम अंतर्भूत केले आहे. यामध्ये ३० वर्षापेक्षा जास्त वयोमानाच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे बंधनकारक केले आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेकडून अंमलबजावणी केली जात असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले.

मुंबई महानगरपालिकेने किती इमारतींचे ऑडीट केले त्याची यादी समितीस सादर करण्याबाबत विचारणा केली असता, धोकादायक इमारतींसंबंधी सांगायचे झाल्यास विभाग स्तरावर डेसीग्नेटेड ऑफिसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच इमारत प्रस्तावचे उपप्रमुख अभियंता यांची चेअरमन ऑफ टेक कमिटी म्हणून नियुक्ती केलेली आहे. ३० वर्षे झालेल्या धोकादायक इमारतींचे भाडेकरू आणि मालक यांनी वेगवेगळे स्ट्रक्चरल ऑडिट केल्यानंतर त्या संदर्भातील रिपोर्ट सी-१, सी-२ किंवा सी-२ बी अशा वेगवेगळ्या कॅटेगरीमध्ये येत असतो. त्यामुळे भाडेकरू आणि मालक यांच्यामध्ये वाद निर्माण होतात. त्यानंतर उपप्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव यांच्याकडे या संदर्भात प्रस्ताव सादर केला जातो. त्यांच्या स्तरावर प्रत्यक्ष इमारतीची पाहणी करून सदर इमारतींचा रिपोर्ट सी-१, सी-२ किंवा सी-२ बी पैकी कोणत्या कॅटेगरीतील आहे हे निश्चित करून सदर इमारत रिकामी करण्याची आवश्यकता आहे किंवा नाही याचा निर्णय घेतला जातो.

मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात धोकादायक इमारतींची माहितीसंबंधी विचारणा केली असता, मुंबई महानगरपालिकेमध्ये एकूण १७९६३ इमारती धोकादायक असून ५००० इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. १२००० इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे बाकी असून ५००० इमारतीबाबत कार्यवाही करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

धोकादायक इमारतींबाबत अडचण अशी येते की, जेव्हा इमारतीचा मालक इमारत रिपेअर करीत नाही म्हणून ती इमारत धोकादायक स्थितीत येते व महानगरपालिकेकडून इमारत तोडण्यासाठी नोटीस देण्यात येते. नोटीस आल्यानंतर भाडेकरु स्वत: स्ट्रक्चरल ऑडीट करतात त्यावेळी सदर इमारत रिपेअर करता येऊ शकते असा रिपोर्ट येतो. तर इमारत मालक स्ट्रक्चरल ऑडीट करतात त्यावेळी सदर इमारत धोकादायक आहे असा रिर्पोट येतो. अशावेळी यासंदर्भात समिती निर्णय घेते. त्यानंतर सदर इमारत धोकादायक असल्यामुळे ती डिमॉलिश करण्यात येते. इमारतींचा पुर्नविकास करत असताना कोणते नियम लावले जातात. सदनिकाधारकांना महानगरपालिका संक्रमण शिबिरात स्थलांतरीत करतात का ? तसेच काही वेळेला त्या सदनिकाधारकांना पोलीस बळाचा वापर करुन बाहेर काढण्यात येते. इमारतींचा विकास होत नाही त्यावेळी त्या इमारतीत रहाणा-या लोकांनी कोठे जायचे अशी समितीने विचारणा केली.

समितीने विचारणा केल्यानुसार विभागीय सचिवांनी असे विदित केले की, धोकादायक इमारतीबाबत नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग यांनी विचार करुन यामध्ये ३५३(ब) हे नविन कलम समाविष्ट केले आहे व त्याअनुषंगाने डीसीआर मध्ये बदल केला आहे. तसेच काही गृहनिर्माण सहकारी संस्था पुर्नविकासासाठी पुढे येत असतील तर नियम ३३(७) अ व ब मधील तरतूदी अंतर्गत सहकारी संस्थाना इन्सेन्टिव एफएसआय दिलेला असून त्यानुसार त्या इमारतींचे पुर्नविकास होऊ शकतात. खाजगी इमारतींची जबाबदारी ओनरचीच आहे. मुंबई शहरात १२,३०० सेस इमारती असून ७०-८० वर्षे जुन्या आहेत त्याबाबतचे अकॉमडेशन म्हाडा देते. परंतु खाजगी इमारतींच्या बाबतीत आताच्या नियमाप्रमाणे महानगरपालिका त्या रहिवाशांच्या बाबत अकोमोडॅशन देऊ शकत नाही.

**याबाबत समितीची अशी शिफारस आहे की, एखादी इमारत धोकादायक ठरविल्यानंतर महानगरपालिकेने जर ती इमारत पाडली तर महानगरपालिकेने भाडेकरूंना ज्या दिवसापासून इमारतीतून बाहेर काढले त्या दिवसापासून ते त्या इमारतीला सी.सी. मिळेपर्यंत विकासकाने त्या कालावधीतील भाडे भाडेकरूंना देण्यासंदर्भात डीसीआर मध्ये शासनाने तरतूद करावी. इमारत निष्कासनाचा खर्च जसा विकासकाकडून वसूल केला जातो तशाच प्रकारे रहिवाशांचे भाडे सुध्दा विकासकाकडून वसूल करण्याचा प्रयत्न करावा. ही तरतूद करीत असताना मुंबई रिपेअर बोर्डामध्ये अशा पध्दतीचे धोरण असेल तर ते तपासून स्विकारण्याबाबत महानगरपालिकेने योग्य ती शहानिशा करून याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.**

# परिशिष्ट - एक

(आश्वासनांच्या पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही)

## नगरविकास विभाग

१०५८ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १०१, क्रमांक २४, दिनांक २० एप्रिल १९९४, माननीय राज्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** जळगाव नगरपालिका बरखास्त करण्यासंदर्भात श्री. एकनाथ खडसे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास सूचना.

(३) **आश्वासन.— श्री. अशोक चव्हाण :** नगरपालिकेने महात्मा गांधी व्यापारी संकुलाचे बांधकाम ४१% अबव्ह दिलेले होते. त्याच्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने रुलींग दिलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने जळगाव नगरपालिकेच्या बाजूने निर्णय दिला आहे. अशा प्रकारचा इनसिडंट आहे. त्यामुळे एकंदर जी घटना घडली त्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाचे रुलींग आहे. त्यासंदर्भात निर्णय कसा घेण्यात आला त्याचा सखोल अभ्यास करावा लागेल. परिपत्रकामधील तरतूद व कोर्टाचा निर्णय याचा सखोल अभ्यास झाल्यानंतर पुढील कार्यवाही हे निश्चित केले जाईल या प्रकरणी नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

(४) **सद्यस्थिती—** १. महात्मा गांधी व्यापारी संकुलाच्या बांधकामाचे कंत्राट ४१% जास्तीच्या दराने देण्यास तत्कालीन जळगाव नगरपरिषदेने मान्यता दिली होती.

२. सदर कंत्राटानुसार, कार्यादेश सन १९९२-९३ मध्ये दिले होते. मंजूर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा १०% पेक्षा अधिक रकमेची निविदा प्राप्त झाल्यास, फेरनिविदा काढावी, हे परिपत्रक दिनांक २० ऑक्टोबर, १९९३ चे आहे. मात्र या प्रकरणी त्यापूर्वीच कार्यादेश दिले होते.

३. आश्वासनात नमूद सर्वोच्च न्यायालयीन प्रकरण हे, अन्य व्यापारी संकुलाच्या बांधकामाबाबत होते. तसेच मा. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळतांना कोणतेही विशिष्ट आदेश दिले नाहीत.

४. सदर व्यापारी संकुलात १८० गाळे व १७ रहिवाशी गाळ्यांचे बांधकाम सन १९९६ मध्ये पूर्ण झाले असून, व्यापारी संकुल हे सद्यस्थितीत वापरात आहे. या व्यापारी संकुलाच्या बांधकामासाठीच्या, जास्तीच्या दराबाबत लेखापरीक्षणात आक्षेप आला नसल्याचे महानरगपालिकेने कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

७८७ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १०५, क्रमांक १८, दिनांक २८ जुलै, १९९५, माननीय मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** पिण्याच्या पाणी पुरवण्याबाबतची श्वेतपत्रिका मा. मुख्यमंत्र्याचा प्रस्ताव.

(३) **आश्वासन.— श्री. मनोहर जोशी :** श्री बंड यांना सांगू इच्छतो की हा प्रश्न काहीसा वेळ काढून सोडवावा लागेल. ज्या-ज्या जमिनी आहेत त्या ठिकाणचा हा प्रश्न आहे आणि त्याचा कसा वेगळा विचार करावयाचा यासंबंधी विचार करण्यासाठी मला सवड द्या.

(४) **सद्यस्थिती—** १. १५६ गावे व अंजनगाव व दर्यापूर शहरे सामूहिक पाणीपुरवठा योजना (ता. अंजनगाव, दर्यापूर व भातुकली, जि. अमरावती) सन २००४ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. सदर योजनेत खारपाण पट्ट्यातील १५६ गावे समाविष्ट आहेत.

२. ७९ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (ता. अंजनगाव व दर्यापूर, जि. अमरावती) सन २०१२ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजनेत खारपणा पट्ट्यातील २३ गावे समाविष्ट आहेत.

३. १०५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (ता. चांदुरबाजार, भातुकली, अचलपूर, अमरावती, जि. अमरावती) सन २०१२ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजनेत खारपाण पट्ट्यातील ७१ गावे समाविष्ट आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

३०५ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १३९, क्रमांक ७, दिनांक १४ डिसेंबर, २००४.

(२) **विषय.—** आमदारांच्या रुमवर इंटरनेटची सुविधा उपलब्ध करण्याबाबत श्री. सुधीर मुनगंटीवार यांचा औचित्याचा मुद्दा.

(३) **आश्वासन.— अध्यक्ष :** शासनाने आपल्या सूचनेची नोंद घेतली आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** आमदार निवास इमारतीमध्ये रुमवर इंटरनेट सुविधा पुरविण्याबाबत निर्णय विधानमंडळ सचिवालयामार्फत घेणे अपेक्षित आहे. तरी निवास व्यवस्था समितीच्या निर्णायान्वये सद्यःस्थितीत सर्व आमदार निवासांमध्ये तळमजल्यावर एक संगणक व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महसूल व वन विभाग

९७७ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४१, क्रमांक १०, दिनांक २३ जुलै, २००५.

(२) **विषय.—** राज्यात मराठवाडा व विदर्भात पाऊस न झाल्याबाबत. सर्वश्री विजयराज शिंदे व इतर, वि.स.स. यांनी उपस्थिती केलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— डॉ. राजेंद्र शिंगणे :** या अहवालाबाबत विविध पातळीवर चर्चा करून निश्चित दिशा धोरण आखण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत शासनाने नेमलेल्या इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च या संस्थेने केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १९ डिसेंबर, २००५ अन्वये विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी एक विशेष पॅकेज देण्यात आले असून त्यात शेतकऱ्यांच्या विकासासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## नगरविकास विभाग

७८६ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४१, क्रमांक ९, दिनांक २२ जुलै २००५, माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** नागपूर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या पाणीपुरवठा योजना. सर्वश्री ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. व इतर यांचा ता. प्र.क्र. १६९६६.

(३) **आश्वासन.— श्री. अजित पवार :** निधी उपलब्धतेनुसार नागपूर महानगरपालिकेतर्फे स्वतंत्र स्रोत तयार करण्यात येईल.

(४) **सद्यस्थिती—** कन्हान-कोलार बंधाऱ्याचे काम जलसंपदा विभागाने करण्याचा निर्णय झाला आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने WAPCOS या कंपनीकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेतला असून तो महासंचालक, मेरी, नाशिक यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. त्यांच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येईल असे, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने कळविले आहे.

त्याचप्रमाणे नागपूर महानगरपालिकेने अमृत अभियानांतर्गत मंजूर केलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पात सुधारणा सुचवली असून, त्यामध्ये कन्हान नदीवरून रोहणा येथून पाणी उचलण्यासाठी रुपये ३८.०६ कोटींचा प्रस्ताव समाविष्ट करण्याची विनंती दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० च्या पत्रान्वये केली आहे. महानगरपालिकेचा सदर प्रस्ताव शासनाच्या स्तरावर पुढील एक महिन्याच्या कालावधीत निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## नगरविकास विभाग

१३३ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४५, क्रमांक २, दिनांक ५ डिसेंबर २००६.

(२) **विषय.—** पिंपरी-चिंचवड मनपातील १२ गावे वगळण्याबाबत. सर्वश्री विलास लांडे व इतर वि.स.स. यांनी उपस्थित केलेला अतारांकित प्रश्न क्र. ३८२१०.

(३) **आश्वासन.— श्री. विलासराव देशमुख :** सदर प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. पीसीसी-३०९६/१८०१/सीआर-२६१/नवि-२२, दिनांक ११ सप्टेंबर, १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत १८ गावांचे क्षेत्राचा समावेश केला. त्यानंतर महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, निर्णय क्र. पीसीसी-३०२००३/९८५/प्र.क्र. ८०/२००३/नवि-२२, दिनांक २० फेब्रुवारी, २००४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील ६ गावे पूर्णतः व ५ गावे अंशतः वगळण्यासंबंधी उद्घोषणा प्रसिद्ध केली.

तद्नंतर महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. पीसीसी-३०२००३/९८५/प्र.क्र. ८०/०३/नवि-२२, दिनांक २ एप्रिल, २००७ अन्वये उक्त दिनांक २० फेब्रुवारी, २००४ रोजीची गावे वगळण्यासंबंधीची उद्घोषणा रद्द केली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

८०२ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४५, क्रमांक ९, दिनांक १४ डिसेंबर, २००६, माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** राज्यात विशेष आर्थिक क्षेत्र विकास प्रकल्प विकसित करीत असताना संपादित करण्यात येणारी हजारो एकर सुपीक जमीन सर्वश्री किसन कथोरे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— श्री. अशोक चव्हाण :** SEZ मध्ये येणाऱ्या कंपनीना आपला प्रस्ताव पाठवून त्यातून काहीतरी मार्ग काढण्याचा प्रयत्न करू.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण-२०१३ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये जाहीर करण्यात आले असून, ना-अधिसूचित झालेल्या किंवा प्रस्ताव मागे घेतलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या जमिनीचा वापर; एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यासाठी संकल्पित आहे. त्याकरिता अधिसूचित क्षेत्राच्या किमान ६० टक्के क्षेत्र औद्योगिक विकासासाठी व उर्वरित ४० टक्के क्षेत्र पूरक बाबींच्या विकासासाठी, ज्यामध्ये रहिवासी व वाणिज्यिक वापराचा समावेश असेल यासाठी उपयोगात आणता येईल. असा प्रस्ताव विकासकासमोर ठेवण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

३७१ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४६, क्रमांक ६, दिनांक २३ मार्च, २००७.

(२) **विषय.—** सन २००६-०७ च्या पूरक मागण्यावर चर्चा-सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव नाईक वि.स.स. यांनी शिराळा बायपासबाबत उपस्थित केलेला मुद्दा.

(३) **आश्वासन.— डॉ. राजेंद्र शिंगणे :** या विषयासंदर्भात बैठक घेतली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** शिराळा बायपास रस्त्याचे भूसंपादन करून अंतिम निवाडा दिनांक २९ जानेवारी, २००८ रोजी झाला. दिनांक ५ एप्रिल, २००८ रोजी शिराळा बायपास रस्त्याची कब्जेपट्टी घेण्यात आली आहे. तसेच रस्त्याचे काम माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आले.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## नगरविकास विभाग

१६२३ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४७, क्रमांक ५, दिनांक २० जुलै, २००७.

(२) **विषय.—** बोरीवली येथील लक्ष्मीछाया टॉवर ही इमारत कोसळल्यामुळे झालेली वित्त व जीवित हानी. सर्वश्री गोपाळ शेट्टी व इतर वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(३) **आश्वासन.— श्री. राजेश टोपे :** त्यासाठी डीसीआर आणि मुंबई महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर कोणत्याही परिस्थितीत हे अधिवेशन संपल्यानंतर पुढील अधिवेशनाची वाट न पाहता अध्यादेश काढून जी तरतूद करणे आवश्यक असेल ती केली जाईल.

(४) **सद्यस्थिती—** या विभागाच्या समक्रमांकाच्या दिनांक १४ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये समितीस प्रकरणाची वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे. (प्रत सोबत)

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महसूल व वन विभाग

२५९६ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४८, क्रमांक १०, दिनांक ३० नोव्हेंबर, २००७.

(२) **विषय.—** श्री. रामदास कदम यांनी नियम २९२ अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्तावासंबंधी.

(३) **आश्वासन.— श्री. नारायण राणे :** ज्यांनी एन.ए. परवानगी घेतलेली नाही, कमर्शियल वापर केला जात आहे, परवानगीपेक्षा जास्त वाळू काढली आहे का, हे पाहिले जाईल व संबंधितांस दंड करून कार्यवाही केली जाईल. या संदर्भात आयुक्तांद्वारे चौकशी करून आयुक्त व जिल्हाधिकारी यांना आदेश देण्यात येतील व हे उत्पन्नाचे दाखले काही तासांत मिळावेत, अशी तरतूद करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.

(४) **सद्यस्थिती—** लिलावधारकाने मंजूर परिमाणापेक्षा १२४१ ब्रास जास्त उत्खनन केलेले असल्याने त्यांचे विरुद्ध रु. ३,७२,३०० एवढी दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

राज्यामध्ये सन २०१६ ते २०२० पर्यंत मोक्कांतर्गत १, एमपीडीए १८ व काळ्या यादीत ६ प्रकरणांत कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

८२५ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १४९, क्रमांक २६, दिनांक १७ एप्रिल २००८.

(२) **विषय.—** कुरवळ गावठाण (ता. खेड, जि. रत्नागिरी) ते तिवरे गाव सीमेपर्यंत अंदाजे २.५ किमी. च्या रस्त्याचे बांधकाम अद्याप न झाल्यामुळे दळणवळण करण्यात होत असलेला त्रास, श्री. रामदास कदम, वि.स.स. यांनी उपस्थित केलेला ता. प्र.क्र. ८६७६९.

(३) **आश्वासन.— श्री छगन भुजबळ :** निधीच्या व जागेच्या उपलब्धततेनुसार काम हाती घेऊन पूर्ण करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** आश्वासनात नमूद कुरवळ गावठाण (ता. खेड) (जि. रत्नागिरी) ते तिवरे गाव सीमेपर्यंतचा रस्त्याचे काम निधीच्या व जागेच्या उपलब्धतेनुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रस्तुत रस्ता हा ग्रा.मा. ३८ चा भाग आहे. ग्रा.मा. ३८ ची एकूण लांबी ५ कि.मी. आहे. यापैकी २.९२५ कि.मी. लांबीत रस्ता डांबरी पृष्ठभागाचा व उर्वरित लांबीचा रस्ता खडीचा आहे. या रस्त्यावरून आठमाही वाहतूक चालू असते.

तिवरे गावठाणाचा भाग हा दरडी कोसळण्याच्या शक्यतेमुळे, जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी अन्य ठिकाणी पुनर्वसित करण्याचा निर्णय घेऊन सदर गाव तिवरे कुंभारवाडी रस्ता ग्रा.मा. १४३ च्या लगत पुनर्वसित करण्याचे काम सुरू केले आहे.

तिवरे कुंभारवाडी रस्ता हा ग्रा. मा. १४३ असा आहे. रस्ता जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या अखत्यारीत आहे. रस्त्याची लांबी ३.४०० कि.मी. आहे. यापैकी ३०० मी. लांबी डांबरी, १.०० कि.मी. लांबी मुरुमी व २.१ कि.मी. लांबी खडीच्या पृष्ठभागाची आहे. या रस्त्यावरुन आठमाही वाहतूक सुरू आहे.

रस्त्याच्या कि.मी. ०/५०० मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नाबार्ड योजनेतून पुलाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती (लेखाशीर्ष ३०५४-२४१९) हा विषय २०१२-१३ च्या अर्थसंकल्पापासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सबब, आश्वासनातील रस्ता ग्रामीण मार्ग असल्याने रस्त्याच्या मुरमी व खडीच्या पृष्ठभागाचे डांबरीकरण करण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत होणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषदेला विविध योजनेंतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधीन राहून प्राथम्यक्रमानुसार सदर रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे नियोजन आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## नगरविकास विभाग

५४ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड क्र. १५६, क्रमांक ३, दिनांक २० मार्च, २०१०.

(२) **विषय.—** पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाद्वारे विक्री केलेले भूखंड भाडे कराराऐवजी नावावर करण्याबाबत भूखंडधारकांची असलेली मागणी. सर्वश्री. विलास लांडे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— श्री. अशोक चव्हाण :** यासंदर्भात तपासणी करून मार्ग काढला जाईल.

(४) **सद्यस्थिती—** या प्रकरणी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १ जुलै २०१९ रोजी बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीत अशा जमीनधारकांना ६.२ टक्के एवढी जमीन तसेच २ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करावा असा निर्णय झाला होता. त्या अनुषंगाने प्रस्ताव अंतिम निर्णय घेण्यासाठी मा. मंत्रि मंडळासमोर सादर करण्याची प्रक्रिया सुरू होती.

सद्यस्थितीत याप्रकरणी निर्णय घेण्याच्या दृष्टिकोनातून नस्ती शासनास सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

५५ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड क्र. १५६, क्रमांक ३, दिनांक २० मार्च, २०१०.

(२) **विषय.—** पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाद्वारे विक्री केलेले भूखंड भाडे कराराऐवजी नावावर करण्याबाबत भूखंडधारकांची असलेली मागणी. सर्वश्री. विलास लांडे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. भास्कर जाधव :** या विषयाच्या संदर्भात संबंधितांची एक बैठक आयोजित करून त्यातून मार्ग काढला जाईल असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. ज्या वेळी बैठक आयोजित करण्यात येईल त्याच वेळी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर निश्चितपणे तोडगा काढला जाईल.

(४) **सद्यस्थिती—** या प्रकरणी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १ जुलै २०१९ रोजी बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीत अशा जमीनधारकांना ६.२ टक्के एवढी जमीन तसेच २ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करावा असा निर्णय झाला होता. त्या अनुषंगाने प्रस्ताव अंतिम निर्णय घेण्यासाठी मा. मंत्रि मंडळासमोर सादर करण्याची प्रक्रिया सुरू होती.

सद्यस्थितीत या प्रकरणी निर्णय घेण्याच्या दृष्टिकोनातून नस्ती शासनास सादर करण्यात आली आहे.

(५) **अभिप्राय—** मान्य.

## नगर विकास विभाग

५६ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १५६, क्रमांक ३, दिनांक २० मार्च २०१०.

(२) **विषय.**— पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाद्वारे विक्री केलेले भूखंड भाडे कराराऐवजी नावावर करण्याबाबत भूखंड धारकांची असलेली मागणी, मा. सर्वश्री विलास लांडे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—अध्यक्ष :** माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या विषयाच्या संदर्भात अधिवेशन संपण्यापुर्वी संबंधितांची एक बैठक आयोजित करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

(४) **सद्यस्थिती–** या प्रकरणी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० जुलै, २०१९ रोजी बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीत अशा जमीन धारकांना ६.२ टक्के एवढी जमीन तसेच २ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करावा असा निर्णय झाला होता. त्याअनुषंगाने प्रस्ताव अंतिम निर्णय घेण्यासाठी मा. मंत्री मंडळासमोर सादर करण्याची प्रक्रीया सुरु होती.

सद्यस्थितीत याप्रकरणी निर्णय घेण्याच्या दृष्टीकोनातून नस्ती शासनास सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग

५१७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १५७, क्रमांक १२, दिनांक २७ जुलै २०१०.

(२) **विषय.**—महसूल विभागाच्या कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रवास व दैनिक भत्यामध्ये विमान प्रवास, श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी मांडलेला औचित्यांचा मुद्दा.

(३) **आश्वासन.—श्री. नारायण राणे :** अध्यक्ष महाराज, संबंधित जीआर तपासून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**— शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. संकीर्ण-१००८/प्र. क्र. ६५/सेवा ५, दिनांक २९ जानेवारी २००९ अन्वये लातूर, नांदेड, नाशिक, कोल्हापूर व सोलापूर येथे कार्यरत असणाऱ्या ज्या अधिकाऱ्यांच्या वेतन श्रेणीतील किमान वेतन हे रुपये ८,००० वा त्यापेक्षा अधिक आहे, अशा गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांना त्यांच्या शासकीय कामानिमित्त मुंबईला/मुंबईहून येताना-जाताना कोणत्याही अथवा खाजगी विमान कंपनीच्या विमानाने प्रवास करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. उपरोक्त नमूद ठिकाणी विमानतळ स्थापित झाल्याने व विमान कंपन्यांनी सेवा सुरु केल्याने/करणार असल्याने त्यांना त्याप्रमाणात प्रवासी मिळण्यासाठी सदर मान्यता देण्यात आल्याचे दिसून येते.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. प्रवास १०१०/प्र.क्र. २/सेवा-५, दिनांक ३ मार्च २०१०, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. प्रवास-१०११/प्र.क्र.१/सेवा-५, दिनांक २१ जानेवारी २०११, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. प्रवास-२०११/प्र.क्र. २९/ सेवा-५, दिनांक २१ जानेवारी २०१२, शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग, क्र. प्रवास-२०१३/प्र.क्र. २९/ सेवा-५, दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ अन्वये विमान प्रवास अनुज्ञेयता नागपूर व अमरावती विभागासह राज्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगर विकास विभाग

५६१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १५७, क्रमांक १२, दिनांक २७ जुलै २०१०.

(२) **विषय.**—मुंबई शहराला भेडसावणाऱ्या विविध समस्या. सर्वश्री एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) व इतर, वि.स.स. यांचा प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—श्री. अशोक चव्हाण :** सांडपाण्यावर प्रक्रीया करणारा प्रकल्प मुंबईत आणि राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये सुरु करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—नागरी भागात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया पुनर्चक्रिकरण व पुनर्वापराचे धोरण शासन निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर २०१७ अन्वये निश्चित करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग

३५१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १५८, क्रमांक ९, दिनांक १३ डिसेंबर, २०१०.

(२) **विषय.**—गंगाकेड (जि. परभणी) येथे गुंडगिरी करणाऱ्या ६ गुंडाविरुद्ध कार्यवाही करण्याची आवश्यकता असूनही कार्यवाही न होणे, सर्वश्री सिताराम घनदाट व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी...

(३) **आश्वासन.—श्री. आर. आर. पाटील :** खास बाब म्हणून त्या अधिकाऱ्याची तातडीने बदली करण्याची शिफारस गृह विभागामार्फत करण्यात येईल आणि त्या अधिकाऱ्याची तेथून बदली करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—तत्कालिन उपविभागीय दंडाधिकारी, परभणी श्री. देवेंद्र अंधारे यांचे विरुद्ध आश्वासन होते. श्री. अंधारे यांची शासन आदेश दिनांक १८ मार्च २०११ अन्वये उपविभागीय अधिकारी, परभणी या पदावरुन बदली करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगरविकास विभाग

६४९ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १५९, क्रमांक २०, दिनांक ९ एप्रिल २०११.

(२) **विषय.**— पातूर नगरपरिषदेने (जि. अकोला) ट्रॅक्टर ट्रॉलीच्या भाड्यापोटी खर्च केलेल्या रक्कमेबाबत... सर्वश्री. गोवर्धन शर्मा व इतर वि. स. स. यांनी दिलेला तारांकित प्रश्न क्र. ३५२४६.

(३) **आश्वासन.—श्री. पृथ्वीराज चव्हाण :** या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांचा सखोल चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) **सद्यस्थिती.**—शासन पत्र दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ नुसार आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, यांच्याकडून श्री. टि. डी. कांबळे, तत्कालीन मुख्याधिकारी, यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १० अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली असून, त्यांना दोषारोप बजाविण्यात आले आहेत.

तसेच, श्री. दामोदर पुंडलीक तायडे, लेखापाल व श्री. श्रीकुमार गुलालकारी, स्वास्थ निरीक्षक यांच्याविरुद्ध उक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद पातूर, यांना संचालनालयामार्फत कळविण्यात आले होते. त्यानुसार श्री. दामोदर तायडे, हे दिनांक ३० जून २०१६ रोजी सेवानिवृत्त झालेले असून, सदरचे प्रकरण सन-२०१० मधील असल्याने, त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्यात आलेली नाही. तसेच, श्री. गुलालकारी हे मानधन तत्वावर कार्यरत होते ते सध्या कार्यरत नसल्याने, त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग

८०० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६२, क्रमांक २२, दिनांक १८ एप्रिल २०१२.

(२) **विषय.**— राज्यात बेकायदेशीररित्या सुरु असलेले वाळू उत्खनन व त्यामुळे राज्य शासनाचा लाखो रुपयांचा बुडत असलेला महसूल... सर्वश्री. विवेक पंडीत व इतर वि. स. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(३) **आश्वासन.—श्री. बाळासाहेब थोरात :** महादेव, वाळू काढल्यामुळे शेत जमीन खचते अशी सन्माननीय सदस्यांची तक्रार आहे. यासंदर्भात सर्व गोष्टी तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**— सदर आश्वासनांच्या अनुषंगाने तपासणी केली असता नदीपात्रातून वाळू काढळ्यामुळे शेत जमिन खचण्याची बाब आढळून आली नाही.

(५) **अभिप्राय.**—मान्य.

## गृह विभाग

२०० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६३, क्रमांक ७, दिनांक १७ जुलै २०१२.

(२) **विषय.**— प्रमुख लोकप्रिय वृत्तपत्रांमध्ये मसाज पार्लर, लैंगिक व्यवसायसंबधीच्या प्रकाशित होणाऱ्या जाहिरातीवर तातडीने प्रतिबंध घालवण्याबाबत. श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

(३) **आश्वासन.—श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील :** पुन्हा एकदा प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाशी चर्चा करुन या गोष्टी घडू नयेत. अशा प्रकारची विनंती करण्यात येईल. त्यानंतरही अडचण आली तर कायद्याच्या माध्यमातून जी कार्यवाही करणे गरजेचे आहे. ती करण्यात येईल.

(४) **सद्यस्थिती—**याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग यांचेकजून अहावाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार सन २०१२ ते माहे डिसेंबर, २०२० अखेरच्या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये विविध पोलीस घटकांकडे दाखल गुन्ह्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | घटकाचे नाव | दाखल गुन्हे |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक, सांगली | १ |
| २. | पोलीस अधीक्षक, सातारा | २ |
| ३. | पोलीस अधीक्षक, पालघर | १ |
| ४. | पोलीस आयुक्त, अमरावती. | २ |

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

### आदिवासी विकास विभाग

२५५ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १६५, क्रमांक १३, दिनांक १ एप्रिल २०१३. मा मंत्री श्री. विष्णू सवरा यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**अनुदानाकरिता मागण्या.

(३) **आश्वासन.—श्री. बबनराव पाचपुते :** या संदर्भात सन्माननीय सदस्यांसमवेत व माझ्या अधिकाऱ्यांसमवेत एक बैठक घेऊ त्याकरिता निधी उपलब्ध करुन देऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**मागील शासनाच्या काळात प्रस्तुत आश्वासनाच्या अनुषंगाने बैठक झाल्याचे दिसून येत नाही. तथापि निधी उपलब्धततेच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगर क्षेत्रात २२२ आदिवासी पाडे असून या पाड्यांना विविध सोयी पुरवण्यात येत आहेत. या आदिवासी पाड्यांच्या विकासासाठी खालीलप्रमाणे निधी देण्यात आला आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१२-१३ आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजने (OTSP) करिता मुंबई उपनगरासाठी मंजूर नियतव्यय रुपये ३००.२६ लक्ष पैकी रुपये २८३.३१ लक्ष इतकी तरतूद प्रत्यक्ष प्राप्त झाली होती.

मार्च, २०१३ अखेर रुपये २४७.८७ लक्ष इतका खर्च करण्यात आला. तसेच मुंबई शहरासाठी रुपये ८८.०८ लक्ष इतकी तरतूद प्राप्त झाली असून त्यापैकी माहे मार्च, २०१३ अखेर रुपये ४१.७७ लक्ष इतका खर्च करण्यात आला होता.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१३-१४ आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजने (OTSP) करिता मुंबई उपनगरासाठी मंजूर नियतव्यय रुपये ३४६.८३ लक्ष पैकी रुपये ३४६.८३ लक्ष इतकी तरतूद प्रत्यक्ष तरतूद प्राप्त झाली असून त्यापैकी माहे मार्च, २०१४ अखेर रुपये २९५.२९ लक्ष इतका खर्च करण्यात आला होता. तसेच मुंबई शहरासाठी रुपये १०१.७३ लक्ष इतका मंजूर नियतव्यय तसेच रुपये १०१.७३ लक्ष इतकी तरतूद प्रत्यक्ष प्राप्त असून त्यापैकी माहे मार्च, २०१४ अखेर रुपये ७१.४२ लक्ष इतका खर्च करण्यात आला होता.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१४-१५ आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजने (OTSP) करिता मुंबई उपनगरासाठी मंजूर नियतव्यय ३९९.९७ लक्ष पैकी रुपये ३८३.४४ लक्ष इतकी तरतूद प्रत्यक्ष प्राप्त असून त्यापैकी माहे मार्च, २०१५ अखेर रुपये ३४९.३८ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच मुंबई शहरासाठी रुपये ११७.३२ लक्ष इतका मंजूर नियतव्यय. तसेच रुपये ११७.३२ लाख इतकी प्रत्यक्ष तरतूद प्राप्त असून त्यापैकी माहे मार्च, २०१५ अखेर रुपये ३७.३० लक्ष इतका खर्च करण्यात आला होता.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजने (OTSP) करिता मुंबई उपनगरासाठी रुपये ५९६.३५ लक्ष नियतव्यय मंजूर सदर तरतूद प्राप्त झालेली आहे. माहे मार्च, २०१६ अखेर रुपये ४९३.३३ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच मुंबई शहरासाठी रुपये १४३.११ लक्ष इतका मंजूर नियतव्यय असून प्रत्यक्ष तरतूद ५०.०० लक्ष इतकी प्राप्त असून माहे मार्च, २०१६ अखेर रुपये ४९.२७ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

सन २०१४-१५ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील १६ आदिवासी पाड्यांमध्ये सौर ऊर्जा दिवे बसविण्याकरिता रुपये १ कोटी १२ लक्ष इतक्या निधीची घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**५३** (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १६५, क्रमांक ३, दिनांक १३ मार्च २०१३.

(२) **विषय.—**मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर सतत होणारे अपघात. सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार व इतर वि. स. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. आर. आर. पाटील :** हिंजवडी येथील जो मुद्दा उपस्थित केला आहे ती बाब तपासण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** कात्रज बाह्यवळण रस्त्यावरील वाकड नाका (कि.मी. ८५४/१००) येथे महामार्ग ओलांडून हिंजवडीकडे जाण्यासाठी उड्डाणपूल आस्तित्वात आहे. त्याठिकाणी महामार्गावरील कोंडी टाळण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हिंजेवाडी उड्डाण पूलाच्या दोन्ही बाजूस कात्रज बाह्यवळण रस्त्यावर भुयारी मार्ग व सेवा रस्ते बांधण्यात आलेले आहेत. त्यापैकी कि.मी. ८५४/४६० येथील भुयारी मार्ग जून, २०१५ मध्ये आणि कि.मी. ८५३/८५० येथील भुयारीमार्ग मे, २०१६ मध्ये वाहतुकीसाठी खुला केला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## जलसंपदा विभाग

४८१ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १६५, क्रमांक २३, दिनांक १७ एप्रिल, २०१३.

(२) **विषय.—**विदर्भातील अपूर्ण प्रकल्पांची कामे पूर्ण करणे. प्रा. विरेंन्द्र जगताप व इतर वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(३) **आश्वासन.—श्री. सुनिल तटकरे :** अमरावती येथे जाऊन तेथे बैठक घेऊन अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा या परिसरातील प्रश्न जर काही प्रलंबित असतील तर त्याही प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जाईल.

(४) **सद्यःस्थिती.—**१०२ प्रकल्पापैकी ५५ प्रकल्प पूर्ण झाले असून २ प्रकल्प जलसंधारण विभागास हस्तांतरीत आहेत. सद्यःस्थितीमध्ये ४ जिल्ह्यामध्ये १,६०, ७६६ हे. र.स.तु. भौतिक अनुशेष शिल्लक आहे. सदरचा अनुशेष दूर करण्यासाठी ४५ बांधकामामधील प्रकल्पाद्वारे तयार केलेला सुक्ष्म नियोजनाचा गोषवारा सोबत संलग्न केला आहे.

सदर प्रकरणी दक्षता पथक, अमरावती यांचेमार्फत विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून दोषी अधिकारी, श्री. एस. डी. वानखडे (कार्यकारी अभियंता), श्री. एम. सी. उके (उपविभागीय अभियंता) व श्री. एम. एन. बोंडे (तत्कालीन सहा. अभियंता श्रेणी-२) यांचे विरुद्ध शासनाचे दिनांक ६ फेब्रुवारी २०२० च्या पत्राने शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात आली आहे. (शासनाचे दिनांक ६ फेब्रुवारी २०२० च्या ज्ञापनाच्या प्रती संलग्न).

एकबुर्जी प्रकल्पाचा संकल्पीत पाणीसाठा ११.९७ द.ल.घ.मी. आहे. त्यामध्ये वाशिम शहराकरिता ५.२६ द.ल.घ.मी. पाणीसाठा पिण्याचे पाण्यासाठी आरक्षित आहे. जानेवारी, २०२१ अखेर या प्रकल्पात ६.५० द.ल.घ.मी. पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यापैकी पिण्याचे पाण्यासाठी १.६४ द.ल.घ.मी. पाणीसाठ्याचा वापर झाला असून पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणातील ३.६२ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण शिल्लक आहे. जून, २०२१ पर्यंत वाशिम शहरास पाणीपुरवठ्याची अडचण येणार नाही.

सदरच्या तिन्ही बॅरजेसना सन २००८-०९ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. निधी अभावी बांधकाम सुरू न झाल्याने नव्याने प्रशासकीय मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे. या बॅरेजेसना मा. राज्यपाल महोदयांचे दिनांक १९ मार्च २०२० च्या पत्राने तत्त्वतः मान्यता प्राप्त आहे. या बॅरेजेसच्या प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

डिसेंबर, २०२० अखेर मंडळांतर्गत क.अ./शा.अ./स.अ. श्रेणी-२ व आवश्यक स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :—

| पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| क.अ./शा.अ./सअश्रे-२ | ७१ | ३३ | ३८ |
| स्था.अ.सहा. | ५४ | १५ | ३९ |

(१) शहापूर बृहत ल.पा. प्रकल्पाला दिनांक १८ मार्च २०१७ अन्वये प्रथम सुप्रमा प्राप्त असून द्वितीय सुप्रमा प्रस्ताव त्रिसदस्यीय समितीस सादर करण्यास्तव शासनास सादर केला आहे.

(२) शहापूर ल.पा. प्रकल्पाला दिनांक १८ मार्च २०१७ अन्वये प्रथम सुप्रमा प्राप्त असून द्वितीय सुप्रमा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयाचे दिनांक ११ डिसेंबर २०२० चे पत्रान्वये महामंडळास सादर आहे.

(३) पोपटखेड टप्पा-२ प्रकल्पाला दिनांक ७ एप्रिल २०१६ अन्वये प्रथम सुप्रमा प्राप्त असून दिनांक १४ जुलै २०२० रोजी द्वितीय सुप्रमा प्राप्त आहे.

उमा प्रकल्पाचे कंत्राटदाराने कामाची गती साध्य न केल्यामुळे व कंत्राटासाठीच्या आवश्यक बाबी पूर्ण न केल्याने महामंडळाचे दिनांक १२ मे २०१७ चे निर्देशान्वये सदर करारनामे विखंडीत करण्यात आले आहेत.

काटेपूर्णा बॅरेज मधील निकृष्ठ झालेले काम तोडून टाकण्यात आले असून प्रकल्पाच्या बांधकामाची गुणवत्ता चांगली राखण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत काटेपुर्णा बॅरेज प्रकल्पाचा प्रथम सुप्रमा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाचे अंतिम मान्यतेस्तव सादर करण्यात आला असून सुप्रमा अभावी सन २०१९-२० पासून क्षेत्रिय स्तरावर प्रकल्पाचे काम बंद आहे.

घुंगशी बॅरेज प्रकल्पाचे बॅरेजचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. Express Feeder चे काम विदर्भ जलविद्युत उपसा जलसिंचन विभाग, अकोला या विभागामार्फत सुरू असून सद्यःस्थितीत ९५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे मार्च, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

अकोला पूरसंरक्षण योजनेचा सुप्रमा प्रस्ताव शासनास सादर केला असता शासन पत्र दिनांक ९ ऑक्टोबर २००१ नुसार योजना आर्थिकदृष्ट्या योग्य वाटत नसल्यामुळे व ती सफल होईल याची शाश्वती नसल्यामुळे सुप्रमा प्रदान केलेली नाही. शासनाच्या सुचनेप्रमाणे म.सं.सं. नाशिक यांनी जलशास्त्रीय अभ्यास करून मूळ योजनेला पर्यायी म्हणून उर्ध्वमोर्णा प्रकल्प, मध्यम मोर्णा प्रकल्प, निम्न मोर्णा प्रकल्प, दगडपारवा ल.पा. प्रकल्प या दरम्यानचे पुराकरिता परिचलन करून अकोला शहरातून नियंत्रित विसर्ग सोडण्याकरिता अकोला पुरनियंत्रण योजना प्रस्तावित केलेली होती. त्यानुसार उर्ध्वमोर्णा, मध्य मोर्णा व दगडपारवा प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. निम्न मोर्णा योजना पाटबंधारे प्रकल्प अन्वेषन विभाग, अकोला यांचेकडे सर्वेक्षणाधीन असून प्रकल्पास स्थानिकाचा तीव्र विरोध असल्याने सर्वेक्षण होऊ शकले नाही.

काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचा सुप्रमा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून शासनाचे पत्र दिनांक २८ फेब्रुवारी २०२० अन्वये म.सं.सं. नाशिक यांचेकडून प्रकल्पाच्या संकल्पनाचे Vetting झाल्यानंतरच सुप्रमा प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार प्रकल्पाच्या संकल्पनाचे Vetting चा प्रस्ताव म.सं.सं. नाशिक यांना सादर करण्यात आला आहे.

प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमा प्रस्तावात या दोन K T Weir साठी एकूण रु. ४.६४ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर कामासाठी चतुर्थ सुप्रमा प्रस्तावात एकूण रु. ०.७४ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर कामासाठी चतुर्थ सुप्रमा प्रस्तावात एकूण रु. १२.८७ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रकल्पास चतुर्थ सुप्रमा प्रस्तावानुसार एकूण रु. १५३.०९ कोटी एवढा खर्च (बांधकाम व नागरी सुविधेसाठी - रु. ५३.३७ कोटी, भूसंपादनासाठी - रु. ९१.३८ कोटी तसेच इतर अनुषंगिक कामांसाठी - रु. ८.३४ कोटी) अपेक्षित आहे. सदर प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

दुर्गबोरी प्रकल्पाचे काम भौतिकरित्या जून, २०१९ अखेर पूर्ण करण्यात आले असून सदर प्रकल्पाचा पूर्णत्व अहवाल मा. मु.अ. जसंवि, अमरावती यांचे पत्र जा.क्र. ५१३३/तां-१/पूर्णत्व अहवाल/२०१९, दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ द्वारे मंत्रालयास सादर करण्यात आला आहे.

खडकपूर्णा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी एकूण १४ (९ पूर्णतः ५ अंशतः) गावांची जमीन संपादित केली असून यामध्ये संबंधित संपादन अधिकारी यांनी विविध निवाडे पारित केलेले आहेत. जे कास्तकार न्यायलयात गेलेले नाहीत व ज्यांनी पुनर्वसन अनुदान घेतलेले नाही अशा प्रकल्पग्रस्तांचे वाढीव मोबदला प्रकरणी भूसंपादन अधिकारी यांनी पारित केलेल्या निवाड्यानुसार मोबदला वाटप करण्यात आलेला आहे. ज्या कास्तकारांनी पुनर्वसन अनुदान घेतलेले आहे, तसेच कलम २८ (अ) नुसार वाढीव मोबदल्याची मागणी केलेली आहे, अशा काही कास्तकरांची वाढीव मोबदल्याची रक्कम भूसंपादन अधिकारी यांचेकडे मा. न्यायालयाचे निर्णयानुसार जमा करण्यात आलेली आहे. परंतु पुनर्वसन अनुदान घेतलेल्या कास्तकारांच्या संदर्भात खडकपूर्णा

प्रकल्प विभागाने (विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर) मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे रीट ३०६६/२०२० व ३०६८/२०२० याचिका दाखल केलेली होती. सदर प्रकरणात न्याय निर्णय झाला असून महामंडळाचे कायदे सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार संदर्भीय रीट याचिकेच्या विरुद्ध मा. सुप्रीम कोर्ट, नवी दिल्ली येथे SLP दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. याबाबत सुप्रीम कोर्टाचा न्यायनिर्णय झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत उजवा कालव्यावरील लघुकालवा क्र. ६, ७, १५ व १६, नारायणखेड उपसा सिंचन योजनच्या लघुकालवा क्र. १, २ व ६, अंत्री उप लघुकालवा क्र. १, २ व ४ तसेच दगडवाडी उपसा सिंचन योजनेअंतर्गत असोला लघुकालवा क्र. २ वरील उप लघुकालवा क्र. २ ची एकूण २१.१९ कि.मी. लांबीची ८९३.४ हे. क्षेत्रासाठी वितरीकांची कामे बंद नलिकेद्वारे करण्यात आली आहेत.

उपरोक्त बंद नलिकेद्वारे वितरण प्रणालीचे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी पुरविलेल्या कामांच्या संकल्पनास मा. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांच्याकडून मंजुरी प्राप्त झाली आहे.

चांदी नदी प्रकल्पाच्या मुख्य कालवा कि.मी. ११ ते १५ ची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच टिमटाळा प्रकल्पाच्या धरणाची ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे मार्च, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

बेंबळा प्रकल्प विभाग अधिनस्त प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील पुलाचे काम पूर्ण व एकूण २४ वहिवाट (शेतरस्ते) रस्त्यांपैकी १६ रस्ते पूर्ण व ५ वहिवाट रस्ते जागेअभावी रद्द व उर्वरित ३ वहिवाट रस्त्यांचे काम डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(१) पवनी व भिमडी प्रकल्पाची घळभरणी जून, २०१८ मध्ये पूर्ण झाली आहे.

(२) चारगड प्रकल्प - मौजा खोपडा गावाचे पुनर्वसन मधील नागरी सुविधाचे काम पूर्ण.

पवनी फिडर कालव्याचे कामाकरिता १० हे. चा अंतिम निवाडा झालेला असून मोबदला वाटपाचे काम चालू आहे. घळभरणी जून, २०१८ मध्ये पूर्ण.

भिमडी प्रकल्पाचे वनजमिनीस मान्यता प्राप्त आहे. प्रकल्पाचे जून, २०१८ मध्ये घळभरणी झालेली आहे.

खोपडा गावाचे मुल्यांकनाचा अंतिम निवाडा झालेला आहे. प्रकल्पग्रस्तांचे आक्षेप असल्यामुळे सुधारीत मुल्यांकनाची कार्यवाही चालू आहे.

बोर्डीनाला प्रकल्प, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती या प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक २ मार्च २०१९ ला प्राप्त.

राजुरा प्रकल्प न्यायालयीन प्रकरणामुळे सद्यःस्थितीत बंद आहे. भगाडी प्रकल्पाची घळभरणी पूर्ण झालेली असून पाणीसाठ्याची निर्मिती झालेली आहे. पुर्णा प्रकल्पाचे ईडीऐ चे दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले आहे.

कंत्राटी पद्धतीने अभियंत्याच्या नेमणुका करण्यात आल्या असून कनिष्ठ अभियंता यांचेसुद्धा नेमणुका शासन स्तरावरून करण्यात आलेल्या आहेत.

निम्न पेढी प्रकल्पाला (ता. भातकुली, जि. अमरावती) नियामक मंडळाच्या ६३ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ६३/३ अन्वये प्रस्तावास मंजुरी प्राप्त आहे.

बोर नदी प्रकल्पास साठवण तलाव म्हणून पूर्ण करण्यात आलेला आहे.

चिखलदरा उदंचन जलविद्युत प्रकल्प (२२०० मेगा वॅट) या योजनेस पर्यावरण व वन विभागाची मान्यता मिळणेबाबत ऑनलाईन प्रस्ताव उप वनसंरक्षक (पूर्व मेळघाट) वनविभाग, चिखलदरा यांना पाठविण्यात आलेला होता. परंतु सदर क्षेत्र बफर झोनमध्ये येत असल्यामुळे वनविभागामार्फत प्रस्ताव नाकारण्यात आलेला आहे.

सामदा सौंदडी व वाघाडी बॅरेज प्रकल्पाच्या सुप्रमा प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे.

चंद्रभागा बॅरेजचा सुप्रमा प्रस्ताव प्रगतिपथावर आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील अपूर्ण/पूर्ण जलसिंचन प्रकल्पाबाबत कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे व सदर कृती आराखडा महामंडळामार्फत शासनास सादर झालेला आहे.

परंतु कोळंबी लघु प्रकल्प बांधकामाधीन असल्याने शासनाचे पत्र दिनांक २८ जुलै २०१६ अन्वये विशेष दुरुस्ती योजनेतून वगळण्यात आला आहे.

सदर आराखड्यास शासनाकडून मार्च, २०१६ मध्ये मंजुरी देऊन यवतमाळ पाटबंधारे विभागाकडील सिंचन व्यवस्थापना अंतर्गत असलेल्या प्रकल्पांच्या विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्या अनुषंगाने ३१ प्रकल्पांचे सविस्तर प्रस्ताव जुलै/ऑगस्ट, २०१६ मध्ये शासनास सादर करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सद्यःस्थितीत यवतमाळ पाटबंधारे विभागाकडील कृती आराखड्या अंतर्गत प्रस्तावित ५१ प्रकल्पांपैकी २२ प्रकल्पांचे प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीकरिता शासनास सादर करण्यात आलेले आहेत. या २२ प्रकल्पांपैकी ४ प्रकल्पांना शासनाकडून प्रशासकीय मान्याता प्राप्त झालेली असून उर्वरीत १८ प्रकल्पांचे प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत व उर्वरीत २९ प्रकल्पांच्या प्रस्तावाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

खर्डा ल. पा. योजना, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ प्रकल्पास रु. २९.१६ कोटी करिता प्रमा. प्राप्त आहे. खर्डा प्रकल्पांतर्गत तलांक चुकल्यामुळे सरुळ गावचा पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला होता. त्या अनुषंगाने प्रकल्प रद्द करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले होते. परंतु कास्तकारांच्या वारंवार प्राप्त निवदेनाच्या अनुषंगाने व झालेला खर्च वाया जाऊ नये याकरिता सदर प्रकल्प रद्द न करता प्रकल्पाचे संग्राहक तलावामध्ये रुपांतर करणेस्तव वि.पा.वि.म. नागपूर यांचे पत्र क्र. ११९४/विपाविम/का-तां-३(१)/२२७/१०/२०१९, दिनांक ३१ जानेवारी २०१९ अन्वये नियामक मंडळाची मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार नियंत्रण पातळ्या मध्ये झालेल्या बदलास (सर्वसाधारण आराखड्यास) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. १६०५/तां-१/खर्डा/२०२०, दिनांक २ जुलै २०२० अन्वये मान्यता प्राप्त आहे. तसेच त्यानुसार प्रकल्पाचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव रु. ९८.०८ कोटी करिता तयार करण्यात आला असून राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडून छाननी पूर्ण झाली आहे. तसेच रा.तां.स.स., नाशिक यांचे उपस्थित मुद्यांचे अनुपालन करण्याच्या अनुषंगाने नविन सुधारित सांडव्याचे संकल्पनाचा अंतर्भाव करून सद्यःस्थितीत रु. १५१.८२ कोटी करिता सुप्रमा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयास सादर आहे.

खर्डा ल.पा. योजना, ता. बाभुळगाव या प्रकल्पास रु. २९.१६ कोटी किंमतीस प्र.मा. प्राप्त आहे. प्रकल्पाचा प्रथम सुप्रमा रु. १०५.५५ किमतीचा प्रस्तावित असून सद्यःस्थितीत प्रस्ताव रा.तां.स.स., नाशिक यांचे मुद्यांचे अनुपालनास्तव क्षेत्रीय स्तरावर कार्यवाहीत आहे.

प्रकल्पाच्या प्र.मा. प्राप्त अहवाल सादर करतेवेळी बुडीत क्षेत्राचे चुकीचे सर्वेक्षण झाले असून, प्रकल्पाच्या प्र.मा. प्राप्त अहवालात पूर्ण संचय पातळी २७०.७० मी. नुसार १८६.४७ हे. बुडीत क्षेत्र दर्शविण्यात आले होते, ज्यामध्ये सरुळ गाव व ३९.४५ हे. वनजमीन यांचा समावेश नव्हता. परंतु प्रकल्पाचे बांधकाम सुरू असताना बुडीत क्षेत्र निश्चित करण्याच्या दृष्टीने पूर्ण संचय पातळीचे सर्वेक्षण करून पूर्ण संचय पातळी निश्चित झाल्यानंतर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात तसेच पाणीसाठ्यात बऱ्याच प्रमाणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार ३९.४५ हे. वनजमीन व सरुळ गाव बुडीत क्षेत्रात येते. सदरची बाब प्रथम सुप्रमा प्रस्तावामध्ये अंतर्भूत आहे. प्रस्तावित सुप्रमा सुधारीत सघमी पाणीसाठ्याच्या किमतीत असफल होत आहे.

प्रकल्पावर मार्च, २०१७ पर्यंत एकूण रु. ३५.९३ कोटी खर्च झालेला असून सदर खर्च सुप्रमा किमतीच्या ३४.०४% आहे.

चनाखा कोर्टा उच्च पातळी बंधारा तेलंगणा राज्यामार्फत अंतरराज्यीय कराराप्रमाणे बांधण्यात येत असून पर्यावरण विषयक मंजुरी प्रस्ताव तेलंगणा राज्यामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे व केंद्र शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन तेलंगणा राज्यामार्फत करण्यात येत आहे. निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील जमिनीच्या खरेदी उठवण्याबाबत महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग (म.व.पु.) यांचे पत्र क्र. आरपीए-२०१७/प्र.क्र. ३४/र-१ मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १५ जानेवारी २०१८ अन्वये निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या लाभ/बुडीत क्षेत्रातील जमिनीवरील खरेदी/विक्री व्यवहाराबाबतचे निर्बंध सिद्धशीघ्र गणकाच्या दरानुसार खरेदी/विक्री व्यवहार होण्याच्या अटीवर उठविण्यास शासनाने मान्यता प्रदान केली आहे.

तसेच विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. उपआ/पुनर्व/अ.का./निम्न पैनगंगा/कावी/१३८२/२०१८, दिनांक १२ जुलै २०१८ अन्वये आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

अरुणावती प्रकल्पाचे विविध घटकांचे (विशेष दुरुस्ती अंतर्गत) अंदाजपत्रके रु. ४.७४, ४.७१, ४.४६, १.९९, ३.५८, ४.३८ कोटी नियामक मंडळाची मान्यता प्राप्त आहे.

सद्यःस्थितीत यवतमाळ पाटबंधारे विभागाकडील कृती आराखड्या अंतर्गत प्रस्तावित ५१ प्रकल्पांपैकी २२ प्रकल्पांचे प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीकरिता शासनास सादर करण्यात आलेले आहेत. या २२ प्रकल्पांपैकी ४ प्रकल्पांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून उर्वरीत १८ प्रकल्पांचे प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत व उर्वरीत २९ प्रकल्पांच्या प्रस्तावाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

निर्गुडा नदीवर बॅरेज बांधण्याबाबत प्राथमिक सर्व्हेक्षण करण्यात येईल.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### महसूल व वन विभाग (वने)

२१२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६६, क्र. ९, दिनांक २६ जुलै २०१३.

(२) **विषय.**—नागपूर जिल्ह्यात उमरेड कऱ्हांडला येथे वन्यजीव अभयारण्याची करण्यात आलेली घोषणा. सर्वश्री सुधीर पारवे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—डॉ. पतंगराव कदम :** अध्यक्ष महोदय लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे संबंधित सन्माननीय सदस्य आणि सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या बरोबर मी बैठक घेईल. आपण त्या बैठकीमध्ये याबाबत निर्णय घेऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—नागपूर जिल्ह्यात उमरेड-कऱ्हांडला येथे वन्यजीव अभयारण्य संदर्भात गॅस सिलेंडर पुरवठा व इतर प्रश्नांबाबत मा. मंत्री (वने) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २० जुलै २०१५ रोजी दुपारी ३.३० वाजता दालन क्र. ५०२, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे सन्माननीय सदस्यांसमवेत बैठक संपन्न झालेली आहे. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत बैठकीचे इतिवृत सोबत जोडण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

२६४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६६, क्र. ११, दिनांक ३० जुलै २०१३.

(२) **विषय.**—अमरावती महानगरपालिका क्षेत्रात जमिनीचे परस्पर तुकडे पाडून अनधिकृत भूखंड विक्रीचे गंभीर प्रकर उघडकीस येणे. प्रा विरेंद्र जगताप, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. बाळासाहेब थोरात :** या प्रकरणी कशा प्रकारे कार्यवाही करावयाची याबाबतची संपूर्ण जबाबदारी विभागीय महसूल आयुक्त यांच्यावर सोपविण्यात येईल. त्यांनी या संदर्भात संपूर्ण चौकशी करावी.

(४) **सद्यस्थिती.**—अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत लेआऊट संबंधात तक्रारी प्राप्त झाल्यावरुन विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३ ऑगस्ट २०१३ अन्वये चौकशी समिती नेमलेली होती. सदर समितीमध्ये जिल्हाधिकारी, अमरावती यांचा सदस्य म्हणून समावेश होता. प्राथमिक कार्यवाही दरम्यान संबंधित ९४ भूखंड प्रकरणात अकृषित आकारणी रु. २०,८४,३५१ व दंड रु. १,६७,७६,८९२ आकारण्यात येऊन एकूण रु. १,८८,६१,२४३ एवढी रक्कम वसुली करण्याबाबतचे निर्देश तहसीलदार, अमरावती यांना देण्यात आले होते. एकूण ९४ भूखंडापैकी ५ भूखंड शासन जमा करण्यात आले असून त्याची एकूण किंमत रु. १६,८७,१२२ इतकी आहे. त्यामुळे सदरहू रक्कम वसूल करण्याची आवश्कता वाटत नाही ८९ भूखंडापैकी ५ भूखंडधारकाकडून रु. ९,३७,७७६ इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली असून उर्वरित भूखंडधारकांच्या एकूम ३९ गाव नमुना नं. ७/१२ उताऱ्यावर बोजा चढविण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिका, अमरावती यांचे कार्यालयाकडून संबंधित भूखंडधारकांविरुद्ध प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३. ५४, व ५५ अन्वये दिनांक १८ मार्च २०१३ दिनांक २० मार्च २०१३ व दिनांक २१ मार्च २०१३ रोजी पोलीस स्टेशन, नागपुरी गेट, बडनेरा, गाडगेनगर व फ्रेजरपूरा, अमरावती येथे प्रथम खबरी अहवाल दाखल केले आहेत तसेच एका भूखंडधाराकाविरुद्ध सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ मधील कलम ३ व ४ अन्वये दिनांक ५ फेब्रुवारी २०१३ रोजी गाडगेनगर, पोलीस स्टेशन, अमरावती येथे प्रथम खबरी अहवाल दाखल केला आहे. तसेच उर्वरीत वसुलीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार महसूल वसूली प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी,

अमरावती यांचेकडे सादर केला असून सदरहू प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**आदिवासी विकास विभाग**

२०४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड ६६, क्र. ९, दिनांक २६ जुलै २०१३. मा. मंत्री श्री. मधुकर पिचड यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आदिवासी बांधवांनी सुरू केलेले उपोषण याबाबत पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा.

(३) **आश्वासन.—श्री. मधुकर पिचड :** "सदर प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना योग्य त्या सूचना दिल्या जातील."

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे पत्र क्र. मंत्री (आ.वि.) /नोट/२६१/ २०१३, दिनांक २६ जुलै, २०१३ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सचिव (विशेष), गृह विभाग यांना आदेश दिलेले आहेत. सदर तरतूद प्राप्त झालेली आहे. माहे मार्च, २०१६ अखेर रु. ४९३.३३ लक्ष इतका खर्च करण्यात आले आहे. तसेच मुंबई शहरासाठी रु. १४३.११ लक्ष इतका मंजूर नियतव्यय असून प्रत्यक्ष तरतूद ५०.०० लक्ष इतकी प्राप्त असून माहे मार्च, २०१६ अखेर रु. ४९.२७ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

सन २०१४-१५ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील १६ आदिवासी पाड्यांमध्ये सौर ऊर्जा दिवे बसविण्याकरीता रु. १ कोटी १२ लक्ष. इतक्या निधीची घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**गृह विभाग**

४९ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड ६६, क्र. ४, दिनांक १८ जुलै २०१३. मा. राज्यमंत्री श्री. सुरेश धस यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—डिग्रस (ता. उदगीर जि. लातूर) येथे सुरू असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. १०९९०६.

(३) **आश्वासन.—श्री. सुरेश धस :** त्या विभागाचे उप पोलिस अधिक्षक यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे. ज्यांनी दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे. ज्यांनी दुर्लक्ष केले आहे. त्यांच्यावर शासन कार्यवाही करेल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—दिनांक २० नोव्हेंबर २०१० रोजी श्री. पठाण कनिष्ठ अभियंता ल.पा.जि.प. लातूर यांनी पो.स्टे. वाढवणा, (पोलीस उप अधीक्षक कार्यलय, अहमदपूर अंतर्गत) येथे लोखंडी दारे चोरीस गेल्याबाबत अर्ज दिला तथापि, सध्या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल करू नये, चौकशी करून लोकांकडून दरवाजे परत मिळवून देण्याबाबत सहकार्य करावे, असे श्री. पठाण यांनी लिहून दिले असल्याने पोलीसांनी गुन्हा नोंद केला नाही.

त्यानंतर श्री. नागलगावे, कनिष्ठ अभियंता ल.पा.जि.प. लातूर यांनी दिनांक १३ डिसेंबर २०१४ रोजी पो.स्टे. उदगीर ग्रामीण येथे तिवटघ्याळ बंधाऱ्यावरील ४० लोंखडी दरवाजे चोरल्याबाबत तक्रार दिल्याने पो.स्टे. उदगीर ग्रामीण (पोलीस उप अधीक्षक कार्यालय, उदगीर अंतर्गत) येथे गुरनं. २१३/२०१४ दाखल करण्यात आला. तपासाअंती सदर गुन्ह्यामध्ये साक्षीदार तपासणीअंती ४० लोखंडी दरवाजे चोरी गेले नसल्याने साक्षीदारांनी सांगितल्याने तपासी अधिकाऱ्यांनी गुन्ह्यामध्ये क वर्ग रिपोर्ट पाठविला. तसेच श्री. खादीवाले, पाटबंधारे विभाग, उदगीर यांनी दिनांक २ डिसेंबर २०१४ रोजी हाळी, हंडरगुळी, चौंडी येथील कोल्हापूरी बंधाऱ्यातील १९७ लोखंडी दरवाजे चोरीला गेल्याची फिर्याद पो.स्टे. वाढवणा येथे दिली असल्याने तेथे गुरनं ८४/ २०१४ दाखल करण्यात आला. या गुन्ह्यामध्ये तपासी अंमलदार यांनी तपास करूनही चोरी गेलेला माल मिळून न आल्याने गुन्हा कायम तपासावर ठेवून अ वर्गीकरण करण्यात आलेला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

१४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६६, क्र. ३, दिनांक १७ जुलै २०१३.

(२) **विषय.**—सार्वजनिक बांधकाम विभाग (जि. ठाणे) यांनी भिंवडी येथील पोलिस निवासस्थानाच्या इमारतीच्या बांधकामात केलेला गैरव्यवहार. श्री. एकनाथ खडसे (पाटील) वि.स.स. यांचा ता.प्र.क्र. १०८३६०.

(३) **आश्वासन.—श्री. छगन भुजबळ :**—तक्रारीबाबत सखोल चौकशी करण्याबाबत कार्यवाही चालू असून चौकशीच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—श्री. पांडुरंग बा. बेनके यांनी विविध बांधकाम विभागाच्या कार्यकक्षेत करण्यात आलेल्या कामांसबंधी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दिनांक ४ डिसेंबर २०१५ रोजी सुनावणी झाली असून सदर सुनावणीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामासंबंधी श्री. बेनके यांनी केलेल्या तक्रारी हेतुपुरस्पर व तथ्यहीन असल्याने सर्व तक्रारी बंद करण्याबाबत आदेशित केले आहे. सदर कामांमध्ये भिंवडी, जि. ठाणे येथील पोलीस निवासस्थानांच्या कामांचाही समावेश आहे. तसेच सदर तक्रारीबाबत काही तथ्य नसल्याचे विभागाचे मत आहे. त्यामुळे सदर प्रकरणी आणखी चौकशी करण्याची आवश्यकता नसल्याचे विभागाचे मत आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगर विकास विभाग

३७० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६६, क्र. १४, दिनांक २ ऑगस्ट २०१३.

(२) **विषय.**—मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या चाळी व अनधिकृत इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांचे पुनर्वसन करणे.

(३) **आश्वासन.—श्री. उदय सामंत :** भूखंड हडप केल्याच्या संदर्भातील तक्रार प्रधान सचिवांकडे आलेली आहे. सदर तक्रार तपासून पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—मा. विधानसभा सदस्य यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका व संबंधित विकासक यांची बैठक घेण्यात आली. सदर प्रकरणी नगररचना शाखेच्या अभिप्रायानुसार सुविधा भूखंडाचे ५० टक्के क्षेत्र शाळेकरीता अनुज्ञेय करून उर्वरित ५० टक्के क्षेत्र खुल्या वापरासाठी अनुज्ञेय करण्याबाबतची कार्यवाही नियोजनाच्या दृष्टीने योग्य असल्याने कलम ४५१(१) अन्वये शासनास प्राप्त अधिकारांतर्गत हस्तक्षेप करणे योग्य होणार नसल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना दिनांक २४ जून २०१४ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी येथील सर्व्हे क्र. १०७/१पै, १०८/१, २,३,१०९/२३,२४,२७,२८,११०/५पै या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या एकूण७७८९.०२ चौ.मी. क्षेत्रापैकी २८९०.५१ चौ.मी. क्षेत्रामध्ये शाळेचे बांधकाम करण्यास मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मे. काऊन टाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा. लि. या विकासकास दिलेली बांधकाम परवानगी व विकासकास उक्त क्षेत्र ३० वर्षे भाडेपट्ट्यावर देण्याबाबत महानगरपालिकेने केलेला ठराव योग्य असल्याने शासनाच्या प्राप्त अधिकारांतर्गत हस्तक्षेप करणे योग्य होणार नसल्याचा शासनाने निर्णय घेतला.

तद्नंतर महानगरपालिकेने केलेला करारनामा रद्द करण्याबाबत व शाळेची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेऊन विकसित करण्याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने पारीत केलेला दिनांक १३ जुलै २०१५ रोजीचा ठराव क्र ३२, महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने दिनांक २० जानेवारी २०१६ अन्वये निलंबित करण्यात आला व दिनांक २५ जुलै २०१८ रोजी अंतिमतः विखंडीत करण्यात आलेला आहे.

विकासक यांनी नागरी सुविधा क्षेत्राच्या ५०% च्या मर्यादित जागेमध्ये शाळागृह इमारतीचे बांधकाम दर्शवून बांधकाम परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केला असता, त्यास दिनांक ६ मार्च २०१९ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दिलेली आहे.

सद्यस्तितीत शाळेच्या इमारतीचे बांधकाम जोत्यापर्यंत पूर्ण झाले असल्याचे, मिरा-भाईदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

१० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६७, क्र. २, दिनांक १० डिसेंबर २०१३.

(२) **विषय.**—फुरसुंगी (जि. पुणे) परिसरातील दूषित जलस्त्रोताबाबत. श्री. विजय शिवतारे वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र ६६६६.

(३) **आश्वासन.**—त्याचबरोबर ज्या दोन मागण्या केलेल्या आहेत, त्याबाबत संबंधितांना असे कळविले आहे की, प्रस्ताव तातडीने संबंधित विभागाकडे पाठवावेत, म्हणजे, आम्हाला पाठपुरावा करणे सोपे जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—फुरसुंगी (ता. हवेली जि. पुणे) येथील नळ पाणी पुरवठा योजने संदर्भात मा मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखाली व मा. राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण यांचे उपस्थितीत दिनांक २४ मार्च २०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सांजरी (बु.) व फुरसुंगी व उरूळी देवाची योजनांची पाईपलाईन एकत्रित न करता वेगवेगळी करावी. फुरसुंगी व उरूळी देवाची नळ पाणी पुरवठा योजनेची निविदा प्रक्रिया कार्यवाही स्वतंत्रपणे व तातडीने सुरू करावी. सदर योजनेच्या अंमलबजावणीचे नियोजन म.जी.प्रा. ने तयार करून त्याबाबतचा अहवाल अवलोकानार्थ सादर करण्याच्या सूचना बैठकीमध्ये देण्यात आल्या आहेत.

फुरसुंगी उरुळी देवाची पाणीपुरवठा योजनेस मुख्य अभियंता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पुणे यांनी दिनांक २७ सप्टेंबर २०१६ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली असून दिनांक २८ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार रु. ७२८८.०७ लक्ष (ढोबळ) इतक्या किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे या योजनेसाठी पुणे महानगरपालिकेच्या हिस्सापोटी रक्कम रु. २७१४.८१ लक्ष अदा केली आहे. या योजनेच्या कामाचे आदेस दिनांक ६ मे २०१७ रोजी देण्यात आले आहेत. योजनेची ४५% कामे पूर्ण झाली आहेत. अस्तित्वातील योजनेतील वितरण व्यवस्थेद्वारे जानेवारी, २०१९ अखेर पाणी पुरवठा करणेचे नियोजन असून उर्वरित कामे मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

माजरी पाणीपुरवठा योजनेच्या कामास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी सप्टेंबर, २०१६ मध्ये तांत्रिक मान्यता दिली असून रु. ४१७०.०४ लक्ष (ढोबळ) खर्चाच्या कामास दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. योजनेच्या कामाचे आदेश दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी देण्यात आले असून योजनेच्या उदभवाचे काम पूर्ण झाले असून योजनेची ५०% कामे पूर्ण झाली आहेत. मांजरी पाणी पुरवठा योजना मार्च, २०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## कृषी व पदुम विभाग

७१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६७, क्र. ४, दिनांक १२ डिसेंबर २०१३. माननीय तत्कालीन राज्यमंत्री (कृषी) श्री. संजय सावकारे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—नागपूर विभागात कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत गैरपद्धतीने वाटप झाल्याबाबत सर्वश्री नानाजी शामकुळे व इतर यांचा तारांकित प्रश्न क्र. २४६६.

(३) **आश्वासन.—मा. अध्यक्ष :**—या संस्थाना कोणत्या निकषाच्या आधारे ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. कोणत्या कागदपत्रांची तपासणी केली गेली, अगोदर ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले, कोणत्या कागदपत्रांची तपासणी केली गेली, अगोदर त्यांचा उद्देश काय होता, नंतर लेकापरिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर त्यामध्ये कोणती सुधारणा केली गेली. याबाबतची सर्व चौकशी मंत्री महोदयांनी स्वतः करावी आणि त्याचा अहवाल सभागृहाला सादर करावा.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—माहिती दिनांक ९ एप्रिल २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

२८१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६७, क्र. ९, दिनांक १९ डिसेंबर २०१३.

(२) **विषय.**—कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराचे जतन संवर्धन आणि संरक्षण व्हावे याबाबतचा अहवाल प्रलंबित असल्याबाबत. सर्वश्री. राजेश क्षीरसागर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. १११३०३.

(३) **आश्वासन.—श्री. संजय देवतळे :**—निर्गमीत करावयाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराचे जतन-संवर्धन व्हावे यासाठी स्मारक अंतिम रित्या राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून त्यावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**२५८** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६७, क्रमांक ९, दिनांक १९ डिसेंबर २०१३.

(२) **विषय.**— राज्यात सफाई कामगारांच्या अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत. सर्वश्री रमेश बागवे व इतर वि.स.स. यांचा अतारांकित प्रश्न क्रमांक १०६९३०.

(३) **आश्वासन.— श्री. शिवाजी राव मोघे :**—याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**— सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांना महात्मा फुले विकास महामंडळामार्फत सर्व विविध योजनेअंतर्गत तसेच स्वयं रोजगारासाठी अनुदान कर्ज देण्यात येते. प्रत्येक जात व उपजातींसाठी स्वतंत्र महामंडळे स्थापन करणे उचित ठरणार नाही असा निर्णय वित्त विभागाने पूर्वी दिलेल्या अभिप्रायास अनुसरून विचाराधीन प्रस्तावावर विभागाने घेतला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## सामान्य प्रशासन विभाग

**३५** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६८, क्रमांक ४, दिनांक २८ फेब्रुवारी २०१४.

(२) **विषय.**—राज्यात अनुसूचित जमातीच्या राखीव पदावर कोष्टी जातीच्या उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत, श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा अतारांकित प्रश्न क्रमांक ११७१५१.

(३) **आश्वासन.—श्री. पृथ्वीराज चव्हाण :** या मंत्रीगटाच्या शिफारशी अद्याप अप्राप्त आहेत. मंत्रीगटाच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर शासन त्यावर योग्य निर्णय घेईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**— शासन निर्णय, दिनांक १५ जून १९९५ नुसार अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून १९९५ पूर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जर अवैध ठरले व त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केले तर, त्यांच्या सेवेत संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतले आहे.

दिनांक १५ जून १९९५ नंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांच्या सेवेसही संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी पुढे आली असून या मागणीवर विचार करण्यासाठी मंत्रीगट नियुक्त करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने दिनांक २५ फेब्रुवारी २००९ च्या बैठकीत घेतला आहे. या नुसार शासन निर्णय दिनांक ५ मार्च २००९ नुसार मंत्रीगटाची स्थापना करण्यात आली होती. पुढे निवडणुकीनंतर नवीन सरकार स्थापन झाल्याने, या मंत्रीगटाची पुनर्स्थापना व पुनर्रचना करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २२ मार्च २०१० व दिनांक १६ एप्रिल २०१० निर्गमित करण्यात आले आहेत. शासन निर्णय, क्र. बीसीसी२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब, दिनांक ४ मार्च २०११ अन्वये दिनांक १५ जून १९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याबाबत विचार करून शासनास शिफारस करण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीगटाची स्थापना करण्यात आली आहे.

दिनांक १५ जून १९९५ नंतर दिनांक १७ ऑक्टोबर २००१ पर्यंत या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण देण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्रीगटाच्या अहवालाच्या शिफारशी दिनांक १६ डिसेंबर २०१३ रोजी प्राप्त झाल्या आहेत, सदर शिफारशी मंत्रीमंडळापुढे सादर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

**१७९** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ८, दिनांक १० जून २०१४.

(२) **विषय.**—बोरोळ, ता. देवणी (जि. लातूर) येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामातील गैरव्यवहार. डॉ. शिवाजीराव निलंगेकर पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६४९२

(३) **आश्वासन.—ॲड. दिलीप सोपल :** अध्यक्ष महोदय, होय. निश्चितपणे शासन निर्णय निर्गमित केला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—ग्रामविकास विभागाचे दिनांक १ सप्टेंबर, २०१७ अध्यादेश अन्वये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षपदी सरपंच व सचिव पदी ग्रामसेवक यांना पदसिद्ध नेमणूक देण्याकरिता सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४९ ची सुधारणा करण्यात आली आहे ती खालीलप्रमाणे आहे :-

मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये पोट-कलम (४) मधील परंतुकामध्ये-

(एक) खंड (अ) च्या आधी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:-

" (अ १) सरपंच हा तिचा पदसिद्ध अध्यक्ष असेल;"

(दोन) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(ग) ग्रामसेवक हा तिचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल."

(५) **विभागाचा अभिप्राय.**—मान्य.

**१८१** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ८, दिनांक १० जून २०१४.

(२) **विषय.**—बोरोळ, ता. देवणी (जि. लातूर) येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामातील गैरव्यवहार. डॉ. शिवाजीराव निलंगेकर पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६४९२.

(३) **आश्वासन.—ॲड. दिलीप सोपल :-** अध्यक्ष महोदय, सभागृहाची भावना लक्षात घेता आपण केलेली सूचना जलसमितीच्या संदर्भात निश्चितपणे तातडीने निर्णय घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—ग्रामविकास विभागाचे दिनांक १ सप्टेंबर २०१७ अध्यादेश अन्वये ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षपदी सरपंच व सचिव पदी ग्रामसेवक यांना पदसिद्ध नेमणूक देण्याकरिता सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४९ ची सुधारणा करण्यात आली आहे ती खालीलप्रमाणे आहे :-

मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये पोट-कलम (४) मधील परंतुकामध्ये-

(एक) खंड (अ) च्या आधी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:-

" (अ १) सरपंच हा तिचा पदसिद्ध अध्यक्ष असेल;"

(दोन) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(ग) ग्रामसेवक हा तिचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल."

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**१८३** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ८, दिनांक १० जून २०१४.

(२) **विषय.**— नागपूर जिल्ह्यात पाण्याच्या नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली असता २,२४६ पाण्याचे नमुने दुषित आढळून आल्याबाबत. सर्वश्री दिनानाथ पडोळे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५७३६.

(३) **आश्वासन.—ॲड दिलीप सोपल :** नायट्रेट तपासणी यंत्र खरेदी करण्यासाठी शासन १० लाख रुपये देणार आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या नागपूर विभागीय प्रयोगशाळेत नागपूर जिल्ह्यातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी यु. व्ही. व्हिजीबलस्पेक्ट्रोफोटोमीटर हे सयंत्र उपलब्ध आहे व पाण्याच्या नमुन्यातील नायट्रेट घटकाच्या तपासणीचे काम विभागीय प्रयोगशाळा, नागपूर येथे करण्यात येत असल्यामुळे रुपये १० लाख देण्यात आले नाहीत.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य

## सार्वजनिक आरोग्य विभाग

१५८ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ७, दिनांक ९ जून २०१४.

(२) **विषय.—** जीवनदायी योजनेअंतर्गत निधी प्राप्त होऊन सुद्धा रुग्णांकडून लाखो रुपयांची लूट करण्यात येणे. सर्वश्री. चंद्रशेखर बावनकुळे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. सुरेश शेट्टी :** आपण या संदर्भात लवकरच निर्णय घेऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत विमा कंपनीशी तीन वर्षांचा करार झालेला असल्याने करार कालावधी संपेपर्यंत उपचारपद्धतीचे दर नॅशनल इन्श्युरन्स कंपनीने संमती दिल्याशिवाय वाढविणे शक्य होणार नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

१५९ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ७, दिनांक ९ जून २०१४.

(२) **विषय.—** जीवनदायी योजनेअंतर्गत निधी प्राप्त होऊन सुद्धा रुग्णांकडून लाखो रुपयांची लूट करण्यात येणे. सर्वश्री. चंद्रशेखर बावनकुळे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. सुरेश शेट्टी :** या बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. हे बजेट पास झाल्यानंतर लगेच पेमेंट करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**जीवनदायी आरोग्य योजना राज्यात दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ पासून बंद करण्यात आली आहे. दिनांक १ एप्रिल २०१४ रोजी योजनेतंर्गत समाविष्ट रुग्णालयांची रु. १०१.६२ कोटी एवढी रक्कम प्रलंबित होती. तथापि सदर योजना बंद झाल्याने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात योजनेसाठी फक्त रुपये ३८.५० कोटी एवढीच तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. त्यापैकी ही फक्त ८० टक्के एवढीच रक्कम वितरीत करण्यास मंजुरी दिल्याने रुपये ३०.८० कोटी एवढीच रक्कम वितरीत करण्यात आली आहे. निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा सुरु असून निधी उपलब्ध होताच रुग्णालयांची प्रलंबीत देयके अदा करण्यात येतील.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

२२० (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ८, दिनांक १० जून २०१४.

(२) **विषय.—** सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता मागण्या.

(३) **आश्वासन.—श्री. सुरेश शेट्टी :** हा निधी प्राप्त होताच, महाराष्ट्रामधील जुनी जीवनदायी योजना राबविलेल्या जेवढ्या हॉस्पिटलच्या केसेस शासनाकडे प्रलंबित तो वितरीत करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**जीवनदायी आरोग्य योजना राज्यात दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ पासून बंद करण्यात आली आहे. दिनांक १ एप्रिल २०१४ रोजी योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णालयांची रु. १०१.६२ कोटी एवढी रक्कम

प्रलंबित होती. तथापि सदर योजना बंद झाल्याने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात योजनेसाठी फक्त रुपये ३८.५० कोटी एवढीच तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. त्यापैकी ही फक्त ८० टक्के एवढीच रक्कम वितरीत करण्यास मंजुरी दिल्याने रुपये ३०.८० कोटी एवढीच रक्कम वितरीत करण्यात आली आहे. निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा सुरु असून निधी उपलब्ध होताच रुग्णालयांची प्रलंबीत देयके अदा करण्यात येतील.

(५) **समितीचा अभिप्राय.**——मान्य.

**२८९** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक १०, दिनांक १२ जून २०१४.

(२) **विषय.**— अकोला येथील संत तुकाराम रुग्णालयाची जीवनदायी योजनेंतर्गत कर्करोग रुग्णांवरील उपचारांची देयके शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत. श्री. हरीदास भदे, वि.स.स. यांचा ता.प्र.क्र. ६६५७.

(३) **आश्वासन.—श्री. सुरेश शेट्टी :** सदर रुग्णालयाची प्रलंबित रक्कम सन २०१४-१५ च्या तरतुदीतून निधी उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—जीवनदायी आरोग्य योजना राज्यात दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ पासून बंद करण्यात आली आहे. दिनांक १ एप्रिल २०१४ रोजी योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णालयांची रु. १०१.६२ कोटी एवढी रक्कम प्रलंबित होती. तथापि सदर योजना बंद झाल्याने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात योजनेसाठी फक्त रुपये ३८.५० कोटी एवढीच तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. त्यापैकी ही फक्त ८० टक्के एवढीच रक्कम वितरीत करण्यास मंजुरी दिल्याने रुपये ३०.८० कोटी एवढीच रक्कम वितरीत करण्यात आली आहे. निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा सुरु असून निधी उपलब्ध होताच रुग्णालयांची प्रलंबीत देयके अदा करण्यात येतील.

(५) **समितीचा अभिप्राय.**——मान्य.

## कृषी व पदुम विभाग

**३७१** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ११, दिनांक १३ जून २०१४.

(२) **विषय.**—कृषीप्रधान देशात शेतकरी विविध समस्यांनी ग्रासलेला असताना शेतीसाठी स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प व त्यांना पेन्शन लागू करण्याची निर्माण झालेली निकड. श्री. विजयराज शिंदे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** त्याप्रकारची योजना राज्य सरकार राबविण्यासंबंधी विचार करीत आहे. आपली सूचना चांगली आहे. याबाबत नक्कीच विचार करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**–कृषी हा केवळ व्यवसाय नसून ही एक जीवनपद्धती आहे. आणि हजारो वर्षांपासून मानवी संस्कृतीचे अधिष्ठान आहे. माती, पाणी व वनस्पती यांचे जलसंधारण व संतुलन विकास हा पुर्वीपासूनच जीवन सृष्टीचा आधार राहीला आहे. कृषी विकासाचा राज्याच्या सर्व स्तरांवरील जीवनमानाशी व राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाशी अतिशय जवळचा संबंध असल्यामुळे या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासास सर्वप्राथम्य देण्याची गरज आहे. राज्याचा शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा यासाठी शेतकऱ्याला केंद्रबिंदु मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता विकास कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे. यात पिकसंवर्धन, फलोत्पादन, मृद व जलसंधारण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय, वनसंवर्धन, सामाजिक वनीकरण, गोदामे व वखार, कृषी शिक्षण व संशोधन, वित्त पुरवठा, सहकार व पणन, ऊर्जा, जलसंपदा, कृषीविषयक कायदे अशा वेगवेगळ्या बाबींवर लक्ष्य केंद्रीत करुन समन्वय साधण्याची गरज आहे. महाराष्ट्र राज्याचा स्वतंत्र कृषी अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने कृषीच्या सर्वांगीण विकासासाठी व कृषी व्यतिरिक्त इतर खात्यांमधील कृषी क्षेत्रासाठी उपलब्ध निधी व योजना यांचा योग्य समन्वय करुन आर्थिक विकास दर वाढविणे आवश्यक आहे. यास्तव कृषी अर्थसंकल्प स्वतंत्रपणे मांडण्याची गरज असून कृषीचा स्वतंत्र अर्थसंकल्प मांडण्याची परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आला असता काही मुद्यांबाबतची माहिती अपेक्षिलेली आहे. या अनुषंगाने कृषी व अनुषंगिक संलग्न सेवांकरिता वाढीव आर्थिक तरतूद करण्यासाठी स्वतंत्र्य अर्थसंकल्प सादर करण्याच्या आवश्यकतेबाबत तसेच राज्याचा सकल कृषी उत्पन्नाचा (GSDP) दर ४ टक्के पर्यंत वाढविण्याकरिता आवश्यक कृति कार्यक्रमाचे (Action Plan) पावर पॉईंट सादरीकरण, तसेच महसूल व वने, रो.ह.यो. जसलंधारण, ग्रामविकास विभाग, सहकार व पणन, जलसंपदा

व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभागाकडून स्वतंत्र कृषी अर्थसंकल्पाचा मसुदा तयार करण्याकरिता कृषी व संलग्न क्षेत्रातून राज्य शासनास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर स्वरुपात प्राप्त होणारा महसूल याबाबतची गेल्या तीन वर्षातील माहिती, ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत प्राप्त नियतव्यय, अर्थसंकल्पित तरतूद, खर्च योजनांचे (Chapter) (मराठी व इंग्रजी) इ. माहिती उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच ६० ते ६५ वर्षीय नागरिकांसाठी ग्रामीण भागात विविध योजना अस्तित्वात आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### गृहनिर्माण विभाग

१६२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ७, दिनांक ९ जून २०१४.

(२) **विषय.**—सन २०१४-२०१५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(३) **आश्वासन.—श्री. अजित पवार :** अनुसूचित जातीकरीता असलेली रमाई आवास योजना, अनुसूचित जाती व जमातीसाठी असलेली शबरी घरकुल योजना अत्सित्वात आहे. ही योजना सर्वसाधारण प्रवर्गातील दारिद्र्यरेषेखाली लोकांकरीता ही योजना लागू केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**— या योजनांमध्ये दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांचा समावेश यापूर्वी पासूनच होत आहे. सबब विशिष्ट कार्यवाहीची आवश्यकता नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### महसूल व वन विभाग

२५० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक ९, दिनांक ११ जून २०१४.

(२) **विषय.**—भोकरदन (जिल्हा जालना) तसेच पालम (जिल्हा परभणी) येथून वाहणाऱ्या नद्यांमधून बेसुमार वाळू उपसा सुरू असल्याबाबत, सर्वश्री अस्लम शेख व इतर वि.स.स. यांचा ता.प्र.क्र. ६४४५.

(३) **आश्वासन.—श्री. बाळासाहेब थोरात** :- रस्ते खराब आहे, ही गोष्ट खरी आहे, त्याबाबत सर्व सदस्यांची तक्रार आहे. यामध्ये खनिकर्मामध्ये काढण्यात येणारा निधी हा जास्त काढण्यात यावा याबाबत कार्यवाही केली जाईल.

(४) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### गृह विभाग

४४७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १६९, क्रमांक १२, दिनांक १४ जून २०१४.

(२) **विषय.**—राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्था तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, सर्वश्री. एकनाथराव गणपतराव खडसे व इतर वि.स.स. यांचा प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—श्री. आर. आर. पाटील :** पुढील वर्षी पोलीस भरती प्रक्रियेत ५ कि.मी. लांब चालण्याची अट कमी केली जाणार आहे.

आम्ही ३ कि.मी. पर्यंत चालण्याची अट घालण्याच्या विचारात आहोत. पुढील वर्षी अटींच्या संदर्भात शासनाकडून निश्चितपणे विचार केला जाणार आहे.

(४) **सद्यःस्थिती.**— सन २०१४ ते २०१६ या दरम्यान पोलीस शिपाई पदासाठी पोलीस शिपाई भरती सन २०१४ व पोलीस शिपाई भरती सन २०१५-१६ अशी दोन वेळा घेण्यात आली होती.

सन २०१४ च्या पोलीस भरतीमध्ये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ४(१) (अ) (अ) व नियम ४(१) (ब) (अ) नुसार शारिरीक चाचणीसाठी पुरुष व महिला उमेदवारांना अनुक्रमे ५ कि.मी. व ३ कि.मी. धावणे अशी तरतूद लागू होती.

तर सन २०१५-१६ च्या पोलीस भरतीमध्ये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ मधील नियम २ व नियम ३ नुसार शारिरीक चाचणीसाठी पुरुष व महिला उमेदवारांना अनुक्रमे १६०० मी. व ८०० मी. धावणे अशी तरतुद लागू होती.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महिला व बालविकास विभाग

३२६ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४

(२) **विषय.**—पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गटाचे नाव आणि कागदपत्र वापरून ठेकेदाराने महिलांची केलेली फसवणूक, डॉ. सुधाकर भालेराव व डॉ. मिलिंद माने, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्रीमती पंकजा मुंडे**-अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी केलेल्या सूचनेला मान दिला जाईल.

(४) **सद्य:स्थिती.**—मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशानुसार गरम ताजा आहार व THR पुरवठ्याची निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत हे युनिट गृहित धरून करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासनाने दिनांक ९ ऑगस्ट २०१९ च्या पत्रानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत हे युनिट गृहित धरून प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

तुर्भे-पनवेल प्रकल्पात नवी मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत ठाणे ग्रामीण प्रकल्पात ८४ अंगणवाडी केंद्र व बालविकास प्रकल्प तुर्भे-पनवेल या नागरी प्रकल्पात १४१ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. दिनांक ९ ऑगस्ट २०२० च्या निविदेनुसार ठाणे ग्रामीण प्रकल्पात गरम ताजा आहार पुरवठा करण्यासाठी १० बचतगटांची निवड करण्यात आली असून ५५ अंगणवाड्या देण्यात आल्या आहेत व तुर्भे-पनवेल नागरी प्रकल्पात गरम ताजा आहार पुरवठा करण्यासाठी २० महिला मंडळ/बचतगटांची निवड करण्यात आलेली आहे. THR पुरवठ्यासाठी १५ अंगणवाड्यांसाठी ३ महिला मंडळ/बचतगटांची निवड करण्यात आलेली आहे. उर्वरित अंगणवाड्यांसाठी तिसरी निवड प्रक्रिया सुरू आहे.

पोषण अभियान या कार्यक्रमांतर्गत ILA मॉडेलचे प्रशिक्षण, CBA (ओटी भरण, बाल भोजन), अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना प्रोत्साहन भत्ता, मोबाईल रिजार्ज, CAS प्रशिक्षण, जन आंदोलन या विविध कार्यक्रमासाठी निधी वितरित केला जात आहे व कार्यक्रमाची अंमलबजावणी व्यवस्थित सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महिला व बालविकास विभाग

३२७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४

(२) **विषय.**—पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गटाचे नाव आणि कागदपत्र वापरून ठेकेदाराने महिलांची केलेली फसवणूक, डॉ. सुधाकर भालेराव व डॉ. मिलिंद माने, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्रीमती पंकजा मुंडे**-आपण संबंधित अंगणवाडीच्या संदर्भात माझ्याकडे माहिती दिली तर मी त्या संदर्भात चौकशी करीन.

(४) **सद्य:स्थिती.**—मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशानुसार गरम ताजा आहार व THR पुरवठ्याची निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत हे युनिट गृहित धरून करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासनाने दिनांक ९ ऑगस्ट २०१९ च्या पत्रानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत हे युनिट गृहित धरून प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

तुर्भे-पनवेल प्रकल्पात नवी मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत ठाणे ग्रामीण प्रकल्पात ८४ अंगणवाडी केंद्र व बालविकास प्रकल्प तुर्भे-पनवेल या नागरी प्रकल्पात १४१ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. दिनांक ९ ऑगस्ट २०२० च्या निविदेनुसार ठाणे ग्रामीण प्रकल्पात गरम ताजा आहार पुरवठा करण्यासाठी १० बचतगटांची निवड करण्यात आली असून ५५ अंगणवाड्या देण्यात आलेल्या आहेत व तुर्भे-पनवेल नागरी प्रकल्पात गरम ताजा आहार पुरवठा करण्यासाठी २० महिला मंडळ/बचतगटांची निवड करण्यात आलेली आहे. THR पुरवठ्यासाठी १५ अंगणवाड्यांसाठी ३ महिला मंडळ/बचतगटांची निवड करण्यात आलेली आहे. उर्वरित अंगणवाड्यांसाठी तिसरी निवड प्रक्रिया सुरू आहे.

पोषण अभियान या कार्यक्रमांतर्गत ILA मॉडेलचे प्रशिक्षण, CBA (ओटी भरण, बाल भोजन), अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना प्रोत्साहन भत्ता, मोबाईल रिचार्ज, CAS प्रशिक्षण, जन आंदोलन या विविध कार्यक्रमासाठी निधी वितरित केला जात आहे व कार्यक्रमाची अंमलबजावणी व्यवस्थित सुरू आहे.

मा. श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी शाळेला भेट दिली असता तेथील शिजविलेला आहार कच्चा असल्याचे आढळून आल्याचे चर्चेदरम्यान सांगितले होते. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी), तुर्भे-पनवेल यांचेकडे चौकशी केली असता मा. सदस्यांनी नवी मुंबई प्रकल्पातील कोणत्याही अंगणवाडी केंद्रांना भेट दिली नसल्याचे कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**— मान्य.

## महिला व बालविकास विभाग

३२८ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४

(२) **विषय.—**पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गटाचे नाव आणि कागदपत्र वापरून ठेकेदाराने महिलांची केलेली फसवणूक, डॉ. सुधाकर भालेराव व डॉ. मिलिंद माने, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्रीमती पंकजा मुंडे**-आम्ही येणाऱ्या काळात या संदर्भात निर्णय घेणार आहोत.

(४) **सद्यःस्थिती.—**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशानुसार गरम ताजा आहार व THR पुरवठ्याची निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ पंचायत हे युनिट गृहित धरून करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत निविदा प्रकाशित करण्यात आल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

आहाराची तपासणी करण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०१६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना एकूण अंगणवाडीच्या वार्षिक ५ टक्के अंगणवाड्या मधून गरम ताजा आहार व THR आहाराचे रँडमली सँम्पल घेऊन आहाराची तपासणी करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## कृषि व पदुम विभाग

५६८ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १०, दिनांक १९ डिसेंबर २०१४, मा. मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**विदर्भाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी करावयाची उपाययोजना सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील व इतर वि.स.स. यांचा नियम २९३ अन्वये प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस**-कृषी विद्यापीठाचे विभाजन करून धान उत्पादक क्षेत्राकरिता नवीन विद्यापीठ तयार करण्यासंबंधीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्राप्त झाला आहे. राज्य शासन या संबंधी सकारात्मक आहे. या संबंधी निर्णयाची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या दोन कृषि विद्यापीठांचे विभाजन करून स्वतंत्र कृषि विद्यापीठ देणे आवश्यक आहे का याची तपासणी करून यासंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. वाय.एस.पी. थोरात, माजी अध्यक्ष नाबार्ड यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालावर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने काही आर्थिक तांत्रिक व प्रशासकीय बाबींची माहिती तसेच आवश्यक तपशील प्राप्त करण्याकरिता डॉ. वेंकटेश्वरल्लू कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये समिती नेमण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महसूल व वन विभाग (वने)

२४८ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर २०१४, मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता पूरक मागण्या.

(३) **आश्वासन.—श्री. सुधीर मुनगंटीवार**-अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. यशोमती ठाकूर यांनी एमआयडीसीची जागा वन विभागाला देण्यात आली आणि वन विभागाने ती जागा शेतकऱ्यांना परत करावी, असा मुद्दा मांडलेला आहे. या संदर्भात तुमच्या बरोबर व विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून कायद्याच्या अधीन राहून ती जागा तुमच्या मागणीनुसार जर शेतकऱ्यांना परत करता येत असेल तर त्याचा विचार करू अन्यथा आपण वन विभागाच्या पर्यटनाच्या किंवा इतर दृष्टीकोनातून त्या जागेच्या संदर्भात जो प्रस्ताव द्याल त्याचा आपण निश्चितपणे विचार करू.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**मा. मंत्री (वने) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक १६ जुलै २०१५ रोजी बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आला.

एमआयडीसीची जागा वन विभागास पर्यायी जमीन म्हणून प्राप्त झाली असल्याने व ती कलम ४ अंतर्गत "राखीव वन" म्हणून जाहिर झाल्याने शेतकऱ्यांना परत देणे शक्य नाही. तसेच त्या ठिकाणी वनउद्यान ही करता येत नाही. एम.आय.डी.सी कडून २ ते ५ हे. पर्यंतची जागा घेऊन त्यावर वन उद्यान विकसित करण्याबाबत ठरविण्यात आले. याबाबत अमरावती जिल्ह्यांचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आमदार, जिल्हाधिकारी, उप वनसंरक्षक, अमरावती व एम.आय.डी.सी. यांच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा व त्यामध्ये वन उद्यानाच्या आराखड्यास मान्यता देण्यात यावी. एम.आय.डी.सी. कडून जागा मिळाल्यानंतर डी.पी.सी. मधून अनुदान उपलब्ध करून देण्यात यावे. असे मा. मंत्री (वने) यांनी दूरध्वनी वरून जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

**महसूल व वन विभाग**

२७७ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर २०१४, माननीय राज्यमंत्री श्री. संजय राठोड यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या.

(३) **आश्वासन.—श्री. संजय राठोड**-सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे येथील ७५ एकर जमिनीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला असून त्याची देखील माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**मौजे कळवा, ता.,जि. ठाणे येथील विविध विभागांना प्रशासकीय प्रकल्प राबविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील प्रकल्प मार्गी लावण्यासाठी बैठक आयोजित करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या प्रयोजनासाठी दिलेली जमीन वगळता उर्वरित शासकीय जमिनीवर विभागीय आयुक्त, कोकण यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मदतीने Central Business District चा बृहत आराखडा तयार करून घेण्यास तत्वत : मान्यता देण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

**महिला व बालविकास विभाग**

३२५ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४, मा. मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गटाचे नाव आणि कागदपत्र वापरून पुरवठा ठेकेदाराने महिलांची केलेली फसवणूक, डॉ. सुधाकर भालेराव व डॉ. मिलिंद माने, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— श्रीमती पंकजा मुंडे**-अंगणवाडीमध्ये जो पोषण आहार दिला जातो त्या विषयी जर आपल्या मनात काही शंका असतील तर त्या संदर्भात चौकशी करून येणाऱ्या काळात आम्ही योग्य तो निर्णय घेऊ.

(४) **सद्यःस्थिती.—**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशानुसार गरम ताजा आहार व THR पुरवठ्याची निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत हे युनिट गृहित धरून करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत निविदा प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

आहाराची तपासणी करण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०१६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना एकूण अंगणवाडीच्या वार्षिक ५ टक्के अंगणवाड्या मधून गरम ताजा आहार व THR आहाराचे रँडमली सँम्पल घेऊन आहाराची तपासणी करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महिला व बालविकास विभाग

३२९ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४, मा. मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गटाचे नाव आणि कागदपत्र वापरून पुरवठा ठेकेदाराने महिलांची केलेली फसवणूक, डॉ. सुधाकर भालेराव व डॉ. मिलिंद माने, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्रीमती पंकजा मुंडे :** मुलांना व्यवस्थित आहार मिळतो किंवा नाही यावर माता समिती नियंत्रण ठेवत असते. परंतु, ती समिती नीट काम करते किंवा नाही हे बघण्यासाठी एक थर्ड पार्टी इन्स्पेक्शन व्हावयास पाहिजे, असे मलाही वाटते.

(४) **सद्यःस्थिती.—**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशानुसार गरम ताजा आहार व THR पुरवठ्याची निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत हे युनिट गृहित धरून करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत निविदा प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

आहाराची तपासणी करण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०१६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना एकूण अंगणवाडीच्या वार्षिक ५ टक्के अंगणवाड्या मधून गरम ताजा आहार व THR आहाराचे रँडमली सँम्पल घेऊन आहाराची तपासणी करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महिला व बालविकास विभाग

३३० (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—**पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गटाचे नाव आणि कागदपत्र वापरून पुरवठा ठेकेदाराने महिलांची केलेली फसवणूक, श्री. डॉ. सुधाकर भालेराव व डॉ. मिलिंद माने, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— श्रीमती पंकजा मुंडे**-भविष्यात त्या समित्या प्रभावीपणे काम करतील या संदर्भातील देखील आम्ही निर्णय घेणार आहोत.

(४) **सद्यःस्थिती.—**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशानुसार गरम ताजा आहार व THR पुरवठ्याची निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत हे युनिट गृहित धरून करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत निविदा प्रकाशित करण्यात आल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

आहाराची तपासणी करण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०१६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना एकूण अंगणवाडीच्या वार्षिक ५ टक्के अंगणवाड्यांमधून गरम ताजा आहार व THR आहाराचे रँडमली सँम्पल घेऊन आहाराची तपासणी करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महसूल व वन विभाग (वने)

३७२ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ८, दिनांक १७ डिसेंबर २०१४, मा. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**सातारा जिल्ह्यात सुमारे २८०० हेक्टर असणारे वन विभागाने क्षेत्र महसूल विभागाकडून पुन्हा वन विभागाकडे घेणेबाबत. श्री. शंभुराज देसाई, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २९९३.

(३) **आश्वासन.—श्री. सुधीर मुनगंटीवार.**—पाटण तालुक्यातील अनेक व्यावसायिकांनी कब्जा मिळविला किंवा कसे याबाबत महसूल विभागाकडून खात्री करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—पाटण तालुक्यातील महसूल विभागाच्या ताब्यातील "राखीव वन" क्षेत्र यापूर्वीच वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण झाल्याचे अगर त्यावर कोणत्याही व्यावसायिकांनी कब्जा मिळविला असल्याचे आढळून आलेले नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## गृह विभाग

४६९ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—ठाणे, कळवा, मुंब्रा आणि कल्याण परिसरात छापे टाकून नशेच्या पावडरची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कार्यवाही करण्यासाठी पोलिसांना येत असलेल्या अडचणी.

(३) **आश्वासन.—डॉ. रणजित पाटील :** अध्यक्ष महोदय, विभागीय चौकशी सुरू आहे. याबाबत माहिती घेण्यात येईल आणि योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) **सद्यःस्थिती.**—श्री. अनिल ऊर्फ भानूदास आण्णासाहेब जाधव, तत्कालीन पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोध कक्ष, मुंबई यांच्या विरुद्ध खालापूर पोलीस स्टेशन जि. रायगड येथे गु.र.नं. १५/२०११ दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा मौजे विणेगांव, ता. खालापूर, जि. रायगड येथील रेव्ह पार्टीच्या अनुषंगाने दाखल करण्यात आलेला आहे. या संदर्भात दाखल असलेल्या कोर्ट केस नं. ४/२०१२ अलिबाग कोर्टातून पनवेल कोर्टात सन २०१९ मध्ये वर्ग करण्यात आला आहे. वर्ग करण्यात आलेल्या केसचा नं. १०/२०१९ असा आहे. सदर प्रकरणी आरोपींवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, सदर केसची पुढील सुनावणी दिनांक ११ मार्च २०२१ रोजी आहे.

श्री. जाधव यांच्यावर वरील नमूद गुन्ह्यांव्यतिरिक्त आणखी तीन प्रकरणात गुन्हे दाखल झाले असल्याने त्यांना पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांनी दिनांक ११ नोव्हेंबर २०१९ रोजीच्या आदेशान्वये भारतीय राज्यघटनेमधील अनुच्छेद क्रमांक ३११(२) (ब) नुसार बडतर्फ केले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगरविकास विभाग

६८५ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १२, दिनांक २३ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—मुंबई उपनगरातील दहिसर येथील गणपत पाटील नगर येथे तिवरांच्या झाडांची कत्तल होत असल्याबाबत, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ता.प्र.क्र. ३६५९.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस.**—याकरिता त्या ठिकाणी सेपरेशन करण्यासाठी महानगरपालिकेला योग्य त्या उपाययोजना करण्यास सूचना दिल्या जातील. पुनर्विकास करण्यासंदर्भात सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी मुद्दा उपस्थित केलेला असून तो जरूर तपासून पाहण्यात येईल. यासंदर्भात शासनाकडून नवीन घोषणा केल्या जाणार असून त्या ठिकाणी ते कशा पद्धतीने बसविता येईल याचा देखील विचार केला जाणार आहे. जास्तीत जास्त जागा प्रोटेक्ट करण्यासंदर्भातील निर्णय राज्य शासनाकडून घेतला जाणार आहे.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—कांदळवन व गणपत पाटील नगर झोपडपट्टी यांच्यामध्ये सेपरेशन करण्यासाठी शासनाच्या क्रमांक बीएमसी-८९१४५/प्र.क्र. २४१/नवि-२१, दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, कांदळवनापासून ५० मीटर अंतरावरील अस्तित्वात असलेल्या झोपड्यांवर महानगरपालिकेमार्फत दिनांक १० जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आलेल्या निष्कासनाच्या कार्यवाहीनंतर सदर जागेवर पुनश्च: खारफुटीची तोडणी करून भविष्यात अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणी वन विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत खारफुटीपासून ५० मीटर अंतरावर वाहनांना व रहिवाशांना अटकाव व्हावा म्हणून दिनांक १० जानेवारी २०१५ रोजी व पुन्हा दिनांक १९ मे २०१५ रोजी चर मारण्यात आलेला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

६ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक २, दिनांक ९ डिसेंबर २०१४, माननीय श्री. बबनराव लोणीकर यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—नांदेड व लातूर जिल्ह्यात निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई. सर्वश्री विजय ओटी व इतर वि.स.स. यांचा ता.प्र.क्र. १२४८.

(३) **आश्वासन.—श्री. बबनराव लोणीकर.**—अध्यक्ष महोदय, माहिती घेऊन तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**सदर बाब ही नगरविकास विभागाशी संबंधित असल्यामुळे दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्राने नगरविकास विभागास तसेच दिनांक १९ जुलै २०१९ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे आश्वासन समिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन यांना कळविण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

**नगरविकास विभाग**

२०८ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—**मा. राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस**—एका वर्षापेक्षा जास्त काळापासून चंद्रपूर, कल्याण, खापा, शिर्डी, इगतपुरी, मोपा इत्यादी ठिकाणचे प्रस्ताव मान्यतेअभावी पडून आहेत. या सर्व प्रस्तावांना तातडीने मान्यता देण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत. त्यासंदर्भात येणाऱ्या अडचणी फेस करून त्यातून मार्ग काढण्यात येईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**(१) चंद्रपूर शहराची प्रारूप विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२२१२/५२०(न)/पुनर्बांधणी क्र. ५६/प्र.क्र. १०१/२०१२/नवि-९, दिनांक ३ जानेवारी २०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे.

(२) कल्याण-डोंबिवली शहराच्या सेक्टर ३ ते ७ ची प्रारूप विकास योजना शासनाने भागशः दिनांक ४ एप्रिल २०१२ च्या अधिसूचनेअन्वये मंजूर केली आहे. सेक्टर ३ ते ७ च्या वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना शासनाने नुकतीच मंजूर केलेली असून अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) खापा शहराची प्रारूप विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१२/४०२/प्र.क्र. १९०/२०१२/नवि-९, दिनांक ३ जानेवारी २०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे.

(४) शिर्डी शहराची प्रारुप विकास योजना (वाढीव हद्द) शासन निर्णय क्र. टीपीएस-१६१२/५२२/पुनर्बांधणी क्र. ५८/प्र.क्र. १०३(न)/२०१२/नवि-९, दिनांक २३ जानेवारी २०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे.

(५) इगतपूरी शहराची प्रारूप विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१११५/१८१/प्र.क्र. १११/२०१५/नवि-९, दिनांक ६ जानेवारी २०१६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे.

(६) मोहपा शहराची प्रारूप विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-२४१२/७४/प्र.क्र. ३१/२०१२/नवि-९, दिनांक ३ जानेवारी २०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

**नगरविकास विभाग**

३१५ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—** मुंबईत मुलांना खेळण्याकरिता मैदाने उपलब्ध करण्याबाबत या विषयी तारांकित प्रश्न क्र. १२८५ वर झालेली चर्चा—मुंबई शहरामध्ये सार्वजनिक रुग्णालय, सार्वजनिक निवास व्यवस्था, मेडीकल सेंटर या करिता अनेक आरक्षणे आहेत. या आरक्षित जागेवर प्रस्तावित विकास होईपर्यंत सर्वसामान्य लोकांना खेळण्याकरिता परवानगी देण्याबाबत शासन महापालिकेला निर्देश देणार आहे का ?

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** "तपासून निर्णय घेण्यात येईल"

(४) **सद्य:स्थिती.—**बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २६ जून २०२० रोजीच्या पत्रान्वये खालील माहिती सादर केली आहे :— महानगरपालिकेच्या अखत्यारितील एकूण १०६८ भूखंडापैकी ३१८ इतके भूखंड खेळाची मैदाने/क्रिडांगणासाठी आरक्षित असून सदर भूखंड मुलांकरिता खेळण्यासाठी मोफत उपलब्ध आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संपादित केलेल्या उद्यान/मनोरंजन मैदान/खेळाचे मैदान इत्यादीकरिता आरक्षित असलेल्या बहुतांश जमिनींचा विकास करण्यात आले आहे. काही भूभाग विकास कामाकरिता प्रस्तावित करण्यात आले आहेत. महानगरपालिकेने लिजवर दिलेल्या खेळाचे मैदान/मनोरंजनाचे मैदान करिता आरक्षित भूखंडाची यादीसोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## नगरविकास विभाग

३१७ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—**मुंबईत मुलांना खेळण्याकरिता मैदाने उपलब्ध करण्याबाबत या विषयी तारांकित प्रश्न क्र. १२८५ वर झालेली चर्चा—शासनाने आरक्षित केलेले ओपन प्लॉट विकास होईपर्यंत सर्वसामान्य लोकांना व मुलांना निरनिराळ्या खेळाकरिता खुली करण्यासंबंधीचे आदेश शासन महापालिकेला देणार आहे का ?

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** "तरीही याबाबत तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल"

(४) **सद्यःस्थिती.—**बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २६ जून २०२० रोजीच्या पत्रान्वये खालील माहिती सादर केली आहे :— महानगरपालिकेच्या अखत्यारितील एकूण १०६८ भूखंडापैकी ३१८ इतके भूखंड खेळाची मैदाने/क्रिडांगणासाठी आरक्षित असून सदर भूखंड मुलांकरिता खेळण्यासाठी मोफत उपलब्ध आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संपादित केलेल्या उद्यान/मनोरंजन मैदान/खेळाचे मैदान इत्यादीकरिता आरक्षित असलेल्या बहुतांश जमिनींचा विकास करण्यात आले आहे. काही भूभाग विकास कामाकरिता प्रस्तावित करण्यात आले आहेत. महानगरपालिकेने लिजवर दिलेल्या खेळाचे मैदान/मनोरंजनाचे मैदान करिता आरक्षित भूखंडाची यादीसोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

३५० (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—** सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या.

(३) **आश्वासन.—श्री. राजकुमार बडोले :** सदर जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक तयार करण्याच्या दृष्टीने शासनाकडून सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. तसेच ठाणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाबाबतही सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल."

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**इंदू मिल क्र. ६ येथील जागेवरील प्रस्तावित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारकाच्या विकासासाठी शासनाने यापूर्वीच दिनांक १९ मार्च २०१३ च्या अधिसूचनेन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे.

प्राधिकरणाने सल्लागारांच्या नियुक्तीबाबत प्रक्रिया पार पाडलेली असून श्री. शशी प्रभू यांचा प्रस्ताव अंतिमतः मान्य करणेत आलेला आहे.

संदर्भाधीन जागा राज्य शासनास हस्तांतर होणेकामी केंद्र शासन, महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ यांच्यामध्ये दिनांक ५ एप्रिल २०१५ रोजी नवी दिल्ली येथे त्रिपक्षीय सामंजस्य करार झालेला असून त्याप्रमाणे जागा हस्तांतरणासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. दिनांक ११ ऑक्टोबर २०१५ रोजी सन्माननीय पंतप्रधान महोदय यांचे हस्ते प्रस्तावित स्मारकाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पाडलेला आहे. आश्वासनाची पूर्तता झालेली आहे.

मौजे कळवा, जिल्हा ठाणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या बांधकामाचा कार्यारंभ आदेश निर्गमित झालेला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

३५४ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—** सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या.

(३) **आश्वासन.— डॉ. रणजित पाटील :** राज्यस्तर नगरोत्थानप्रमाणे जिल्हास्तरीय योजनेसाठी २५ टक्के तरतूद करण्याची बाब तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाच्या धर्तीवर जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेचा वित्तीय आकृतीबंध दिनांक १६ मे २०१६ च्या शासन निर्णयानुसार सुधारित करण्यात आला आहे. त्यानुसार ड वर्ग महानगरपालिकांना ७० टक्के, अ वर्ग नगरपालिकांना ७५ टक्के, ब वर्ग नगरपालिकांना ८५ टक्के व क वर्ग नगरपालिका/नगरपंचायतींना ९० टक्के इतके अर्थसहाय्य जिल्हास्तरावरून उपलब्ध करून दिले जाणार आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## नगरविकास विभाग

५८० (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १०, दिनांक १९ डिसेंबर २०१४, माननीय राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** अशुद्ध पाणी पुरवठ्यामुळे मिरज शहराच्या विविध भागात ग्रॅस्टोबाधित रुग्णांची संख्या वाढत असणे. श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन डॉ. रणजित पाटील :** शहरातील ड्रेनेजची मेन लाईन टप्प्याटप्याने बदलण्याचे तसेच चेंबर बदलण्याचे कामही हाती घेऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**मिरज शहरातील गॅस्ट्रोबाधित भागात फार पूर्वीची ड्रेनेज लाईन असल्याने सदरची लाईन वरील चेंबर बाधित झाल्याने सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत नव्हता. सदर ड्रेनेज लाईनवरील सर्व चेंबरमधील गाळ काढून घेण्यात आला असून खराब ड्रेनेज लाईन बदलून नव्याने चेंबर बांधून घेण्यात आलेले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

५८१ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १०, दिनांक १९ डिसेंबर २०१४, माननीय राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** अशुद्ध पाणी पुरवठ्यामुळे मिरज शहराच्या विविध भागात ग्रॅस्टोबाधित रुग्णांची संख्या वाढत असणे. श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—डॉ. रणजित पाटील :** अध्यक्ष महोदय, या शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या योजना भौगोलिक दृष्ट्या वेगवेगळ्या आहे. सध्या तेथे एकत्रित प्रणाली नाही, हे खरे आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या बाबीसंदर्भात शासन विचार करेल आणि योग्य ती पावले उचलेल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगली व कुपवाड शहरासाठी सांगलीतील कृष्णा नदीतील पाणी उचलले जाते व सांगलीतील हिराबाग व माळ बंगला येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्ध करून सांगली व कुपवाड शहराला पाणी पुरवठा केला जातो.

मिरज शहरासाठी मिरज शहरापासून सुमारे ६ कि.मी. अंतरावरून कृष्णा घाट येथील कृष्णा नदीतील पाणी उपसा केला जातो व मिरज येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून मिरज शहराला पाणी पुरवठा केला जातो. मिरज येथील वाढीव क्षेत्राचा विचार करता मिरज पाणीपुरवठा योजनेचा पुढील टप्पा "अमृत" योजनेत समाविष्ट करण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

५८२ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड क्र. १७१, क्रमांक १०, दिनांक १९ डिसेंबर २०१४, माननीय मंत्री श्री. रामदास कदम यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे मिरज शहराच्या विविध भागात **गॅस्ट्रोबाधित** रुग्णांची संख्या वाढत असणे. श्री. अनिल बाबर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— श्री. रामदास कदम :** ते निवेदन सांगलीच्या कुठल्या मंत्री महोदयांकडे दिले होते का किंवा तेथील मंत्र्यांकडे दिले होते का किंवा आणखी कुठल्या मंत्री महोदयांकडे दिले होते, याची चौकशी केली जाईल. तसेच निवेदन दिल्यानंतर तेथील पालकमंत्र्यांनी तेथील आयुक्तांनी त्यासंदर्भात काय कार्यवाही केली, याची चैकशी केली जाईल. त्यानंतर नेमकी पालिकेवर कार्यवाही करायची किंवा त्यावेळच्या पालकमंत्र्यांवर कार्यवाही करायची, त्याबाबत योग्य तो निर्णय शासन घेईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** सन्माननीय नगरसेविका सौ. संगिता अभिजीत हारगे यांनी दिनांक २३ डिसेंबर २०१४ रोजी आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस गॅस्ट्रोबाधीत असलेल्या भागातील ड्रेनेजच्या पाईप लाईन तात्काळ दुरुस्ती करणेबाबत निवेदन देण्यात आले होते. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने तात्काळ गॅस्ट्रोबाधित भागातील ड्रेनज लाईनवरील सर्व चेंबर मधील गाळ काढून घेण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## नगरविकास विभाग

५८३ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड क्र. १७१, क्रमांक १०, दिनांक २९ डिसेंबर २०१४, माननीय मंत्री श्री. रामदास कदम यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे मिरज शहराच्या विविध भागात गॅस्ट्रोबाधित रुग्णांची संख्या वाढत असणे. श्री. अनिल बाबर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— श्री. रामदास कदम :** पाईप लाईन नवीन टाकण्याबाबत किंवा वॉश आऊट करण्याबाबत तसेच त्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याकरिता शासन आवश्यक तो निधी देईल. तसेच यापुढे कुठलेही प्रदूषण होणार नाही, याची दक्षता शासन घेईल. त्यामुळे आपल्याला देखील प्रश्न विचारण्याची संधी मिळणार नाही, याची देखील दक्षता शासन घेईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** गॅस्ट्रो बाधित क्षेत्रातील पाईप लाईन बदलण्याची कामे महानगरपालिकेने पूर्ण केली आहेत. तसेच दूषित पाण्याचा निचरा करण्यासाठी जागोजागी गरजेनुसार महानगरपालिकेने वॉश आऊट व्हॉल्व्ह बसविण्यात आले आहे.

मिरज शहरातील पाणीपुरवठ्याची वितरण व्यवस्था जुनी म्हणजे १९५० सालची असल्याने मिरज शहरातील वितरण नलिका बदलणे, वाढीव मागणीनुसार उंच टाक्या बांधणे, विस्तारित भागांसाठी उंच टाक्या बांधणे व अनुषंगिक कामांचा अमृत योजनेत समावेस करण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

५८४ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड क्र. १७१, क्रमांक १०, दिनांक २९ डिसेंबर २०१४, माननीय राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे मिरज शहराच्या विविध भागात गॅस्ट्रोबाधित रुग्णांची संख्या वाढत असणे. श्री. अनिल बाबर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—डॉ. रणजीत पाटील :** Hon'ble Speaker Sir, suggestion will be taken for the action. लोकप्रतिनिधी व शासनस्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** मा. खासदार श्री. संजय पाटील यांच्या समवेत दिनांक २३ नोव्हेंबर २०१४ रोजी व मा. आमदार श्री. सुधीर गाडगीळ यांच्या उपस्थितीत दिनांक ६ डिसेंबर २०१४ रोजी आयुक्त, उपायुक्त, पाणीपुरवठा विभाग व आरोग्य विभागाकडील संबंधित अधिकारी यांच्याबरोबर गॅस्ट्रो साथीबाबत तात्काळ उपाय योजना करणेबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे. महानगरपालिकेस गॅस्ट्रो बाधित भागातील ड्रनेज लाईन व पाणी पुरवठ्याकरिता पाईप लाईन बदलणेबाबत चर्चा झालेली होती. त्यानुषंगाने महानगरपालिका फंडातून व शासनाकडून प्राप्त झालेल्या १३ व्या वित्त आयोगातून तात्काळ कामगिरी करून घेण्यात आलेल्या आहेत व गॅस्ट्रोची साथ पूर्णतः आटोक्यात आणली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

१८४ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर, २०१४. मा. मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** नागपूर शहरात प्रवेश करणाऱ्या रस्त्यांवरील टोल रद्द करण्याबाबत श्री. बंटी भांगडिया व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. २१३४.

(३) **आश्वासन.— श्री. एकनाथ शिंदे :** अध्यक्ष महोदय, टोल नाक्यावर लोकप्रतिनिधी यांचेशी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वर्तन करीत असतील तर संबंधितांची चौकशी करून सक्त ताकीद देण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** पथकर नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी सर्व वाहनधारकांशी व खास करून लोक प्रतिनिधींशी विनम्रपणे वागण्याबाबत कर्मचाऱ्यांना सक्त सूचना देण्याबाबत संबंधीत ठेकेदारास कळविण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

१८५ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर, २०१४. मा. मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** नागपूर शहरात प्रवेश करणाऱ्या रस्त्यांवरील टोल रद्द करण्याबाबत श्री. बंटी भांगडिया व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. २१३४.

(३) **आश्वासन.— श्री. एकनाथ शिंदे :** महाराष्ट्र टोलमुक्त करण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी श्री. पी. सी. जोशी यांची समिती नियुक्त करण्यात आली असून त्या समितीचा अहवाल दोन महिन्यांत येणार आहे. त्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** श्री. पी. सी. जोशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार राज्यातील १२ टोल नाके पूर्णपणे बंद करण्याचा व ५३ टोल नाक्यांवर पथकरातून कार, जीप, एसटी बसेस व स्कूल बसेसना दिनांक १ जून २०१५ पासून सूट देण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

१८६ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर, २०१४. मा. मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** नागपूर शहरात प्रवेश करणाऱ्या रस्त्यांवरील टोल रद्द करण्याबाबत श्री. बंटी भांगडिया व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. २१३४.

(३) **आश्वासन.— श्री. एकनाथ शिंदे :** यातील अनेक करारनामे आघाडी शासनाने केले आहे. त्यामुळे याबाबत योग्य तो निर्णय लवकरात लवकर घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** राज्यातील १२ टोल नाके पूर्णपणे बंद करण्याचा व ५३ टोल नाक्यांवर पथकरातून कार, जीप, एसटी बसेस व स्कूल बसेसना दिनांक १ जून २०१५ पासून सूट देण्यात आली आहे. तसेच मुंबई प्रवेशद्वार पथकर नाके व मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील पथकराबाबत निर्णय घेण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली असून या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महसूल व वन विभाग

२७५ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर, २०१४. मा. राज्यमंत्री श्री. संजय राठोड यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या.

(३) **आश्वासन.— श्री. संजय राठोड :** सन्माननीय सदस्य ॲड. यशोमती ठाकूर यांनी तिवसा येथे प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण करण्याची मागणी केली. नियोजन विभागाच्या माध्यमातून ही मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** सदर प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून हस्तांतरण प्रक्रिया सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

३५ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ४, दिनांक ११ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—** शासनाने पुणे जिल्ह्यात तुकडे बंदी कायद्यांतर्गत गुंठेवारी पद्धतीवर बंदी घालून खरेदी विक्रिचे व्यवहार नोंद न करण्याबाबत दिलेले आदेश श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४६५.

(३) **आश्वासन.— श्री. एकनाथराव खडसे :** मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्यांचे एकत्रिकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ निरसीत करण्याबाबत अथवा प्रमाणभूत क्षेत्र १ आर करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** सन २०१६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, दिनांक १ जानेवारी, २०१६ च्या **महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार** "महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम" यात सुधारणा करून प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेअंतर्गत निवासी/वाणिज्यिक/औद्योगिक अथवा अन्य कोणत्याही अकृषिक स्वरुपाच्या वापर विभागात दर्शविण्यात आलेल्या शेत जमिनींच्या संदर्भात तुकडेबंदी विषयक निर्बंध कमी करण्यात आले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

**नगरविकास विभाग**

२१४ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ६, दिनांक १५ डिसेंबर, २०१४.

(२) **विषय.—** मा. राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

(३) **आश्वासन.— श्री. देवेंद्र फडणवीस :** पोलिसांना व महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिकांमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना घर देणे ही सरकारची जबाबदारी समजून त्याकरिता अधिकचा एफ.एस.आय. देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे व त्यासंदर्भातील आदेशही निर्गमित करण्यात येतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** शासनाने दिनांक २ सप्टेंबर २०१५ रोजीच्या कलम ३७ (१अअे) (सी) खालील अधिसूचनेन्वये पोलीस, शासन, शासनाची प्राधिकरणे, महानगरपालिका यांच्या कर्मचारी निवासस्थानासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (३) (A) मध्ये फेरबदल मंजूर केलेले आहेत. तसेच शासनाने दिनांक १९ नोव्हेंबर २०१५ रोजी राज्यातील इतर महानगरपालिकेच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) विकास नियंत्रण नियमावलीमध्ये पोलीस, शासन, शासनाची प्राधिकरणे, महानगरपालिका यांच्या कर्मचारी निवासस्थानांबाबत विनिमय अंतर्भूत करणेबाबत कलम ३७ (१अअे) (सी) खालील अधिसूचना निर्गमित केली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

**नगरविकास विभाग**

४०३ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ८, दिनांक १७ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—** साथीच्या आजारांचा वाढता प्रादुर्भाव व नितापॉल कंपनीच्या औषधाबाबत सर्वश्री शशिकांत शिंदे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— डॉ. दिपक सावंत :** सन्माननीय सदस्य सांगतात म्हणून ग्राह्य धरून याबाबत चौकशी करण्यात येईल व यामध्ये जे प्रशासकीय अधिकारी दोषी आढळतील त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांना, दिनांक २२ मार्च २०१३ रोजी मे. नितापॉल कंपनीने तयार केलेले २,५७,००० लिटर्स पायरेथ्रम एक्स्ट्रॅक्ट, दिनांक ६ एप्रिल २०१३ ते दिनांक ५ एप्रिल २०१५ या कालावधीकरिता पुरवठा करण्यासाठी कंत्राट देण्यात आले.

मे. नितापॉल कंपनीने उत्पादित केलेल्या व मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांनी माहे जून २०१३ मध्ये पुरवठा केलेल्या २५,००० लिटर्स पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट किटकनाशकाच्या क्षेत्रिय चाचणी दरम्यान अपेक्षित ८० टक्के पेक्षा जास्त मृत डास न आढळल्यामुळे निविदेतील अटीनुसार २५,००० लिटर्स पायरेथ्रम एक्सट्रॅक्टच्या किंमतीच्या २० टक्के दंड व उशीरा पुरवठा आणि प्रयोगशाळा तपासणी शुल्क यासाठी रु. ५०,८५,५०० असे एकूण रु. ६४,८८,३७५ इतका दंड महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आला.

सदर पुरवठ्यानंतर मे. नितापॉल कंपनीने उत्पादीत केलेल्या व मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांनी पुरवठा केलेल्या पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट किटकनाशकाच्या पुरवठ्यात प्रयोगशाळा व क्षेत्रीय तपासणीत दोष आढळून आलेला नाही.

मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांच्याशी करण्यात आलेल्या करारातील अटीनुसार सदोष पुरवठ्याबाबत प्रथम २० टक्के दंड व दुसऱ्या वेळेस सदोष पुरवठा केल्यास ३ वर्ष काळ्या यादीत टाकण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य कार्यवाही केल्याचे दिसून येते. यास्तव सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली नाही, असे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ३ मार्च २०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

४०४ (१) **संदर्भ व दिनांक.—** विधानसभा कामकाज खंड १७१, क्रमांक ८, दिनांक १७ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—** साथीच्या आजारांचा वाढता प्रादुर्भाव व नितापॉल कंपनीच्या औषधाबाबत सर्वश्री शशिकांत शिंदे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— डॉ. दिपक सावंत :** सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव आणि ॲड. आशिष शेलार यांच्या सूचनेनुसार ज्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्यांना ऑर्डर प्लेस केलेली आहे, त्यांची चौकशी करून त्यांच्यावर निश्चितपणे कडक कार्यवाही केली जाईल. तपासणी करून या संदर्भात कार्यवाही केली जाईल आणि गुन्हा दाखल केला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून मे. युनिनव्हर्सल ऑरगॅनिक्स यांना, दिनांक २२ मार्च २०१३ रोजी मे. नितापॉल कंपनीने तयार केलेले २,५७,००० लिटर्स पायरेथ्रम एक्स्ट्रॅक्ट, दिनांक ६ एप्रिल २०१३ ते दिनांक ५ एप्रिल २०१५ या कालावधीकरिता पुरवठा करण्यासाठी कंत्राट देण्यात आले.

मे. नितापॉल कंपनीने उत्पादित केलेल्या व मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांनी माहे जून २०१३ मध्ये पुरवठा केलेल्या २५,००० लिटर्स पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट किटकनाशकाच्या क्षेत्रिय चाचणी दरम्यान अपेक्षित ८० टक्के पेक्षा जास्त मृत डास न आढळल्यामुळे निविदेतील अटीनुसार २५,००० लिटर्स पायरेथ्रम एक्सट्रॅक्टच्या किंमतीच्या २० टक्के दंड व उशीरा पुरवठा आणि प्रयोग शाळा तपासणी शुल्क यासाठी रु. ५०,८५,५०० असे एकूण रु. ६४,८८,३७५ इतका दंड महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आला.

सदर पुरवठ्यानंतर मे. नितापॉल कंपनीने उत्पादीत केलेल्या व मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांनी पुरवठा केलेल्या पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट किटकनाशकाच्या पुरवठ्यात प्रयोगशाळा व क्षेत्रीय तपासणीत दोष आढळून आलेला नाही.

मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांच्याशी करण्यात आलेल्या करारातील अटीनुसार सदोष पुरवठ्याबाबत प्रथम २० टक्के दंड व दुसऱ्या वेळेस सदोष पुरवठा केल्यास ३ वर्ष काळ्या यादीत टाकण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य कार्यवाही केल्याचे दिसून येते. यास्तव सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली नाही, असे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ३ मार्च २०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य.

## महसूल व वन विभाग

**४४३** (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.—**परांडा तालुक्यातील (जि. उस्मानाबाद) येथील सिना नदीतून वाळू उपसा होत असल्याबाबत. श्री. राहूल मोटे, वि.स.स. यांचा तारांकीत प्रश्न क्रमांक ३९०३.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथ खडसे :** परंतु अप्पर जिल्हाधिकारी किंवा मंत्री महोदयांनी लवकरात लवकर या संदर्भात सुनावणी घेऊन निकाल द्यावा, अशा सूचना करण्यात येतील. सूचनेपेक्षा विनंती करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील प्रकरण-१२, प्रकरण-१३ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल अधिकाऱ्यांची कार्यपद्धती) नियम, १९६७ तसेच महाराष्ट्र जमीन (अपिले, पुनरीक्षण व पुनर्विलोकन) नियम, १९६७ मधील तरतूदीच्या अनुषंगाने अनुसरावयाच्या कार्यपद्धतीविषयक सर्व समावेशक सूचना शासन, निर्णय, क्र.एस-३०/२०१५/प्र.क्र.२९९/ज-१, दिनांक १७ डिसेंबर २०१५ अन्वये निर्गमित केल्या आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## नगरविकास विभाग

५६२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १०, दिनांक १९ डिसेंबर २०१४. मा. मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—विदर्भाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी करावयाची उपाययोजना, सर्वश्री, दिलीप वळसे पाटील व इतर वि.स.स. यांचा २९३ अन्वये प्रस्ताव

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** नागपूर सुधार प्रन्यासला वाढीव वित्तीय अधिकार देऊन नव्याने नागपूर क्षेत्र विकास प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात येईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—दिनांक ४ मार्च २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नागरपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण घोषित करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगर विकास विभाग

६३४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ११, दिनांक २२ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—कृष्णा व पंचगंगा नदीत काविळची साथ पसरल्यामुळे सार्वजनिक आरोग्याची गंभीर परिस्थीती निर्माण होणे.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** ही बाब तपासून त्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—इचलकरंजी शहरास पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने उपलब्ध स्त्रोतांचा अभ्यास करून वारणा नदी उभ्दव विचारात घेऊन पाणी पुरवठा योजना राबविणे किफायतशीर असलेबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी अहवाल सादर केला होता. त्याअनुषंगाने इचलकरंजी शहरास वारणा नदी उभ्दवावरून पाणी पुरवठा करण्यच्या योजनेस अमृत अभियानांतर्गत दिनांक २३ जून २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगर विकास विभाग

७०७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १२, दिनांक २३ डिसेंबर २०१४

(२) **विषय.**—पुणे जिल्ह्यातील भोसरी, मोशी हद्दीतील कचरा डेपोमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून ओला व वाळलेला कचरा कोणतीही प्रक्रिया न करता टाकणे. श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** असा प्रकारे लीज प्रलंबित राहणे योग्य नाही. ही बाब तातडीने तपासून घेऊन सकारात्मक कार्यवाही केली जाईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—देवनार क्षेपमभूमीची जागा खाजगी प्रचालकास प्रकल्पाच्या कामाकरीता देणेकरीता महानगरपालिकेने राज्य शासनास विनंती केली होती. यासंदर्भात राज्य शासनामार्फत गठीत चौकशी समितीच्या अहवालानुसार, मुंबई महानगरपालिकेच्या देवनार येथील क्षेपणभूमीच्या भराव भूमीचे क्षेत्र घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी २५ वर्षाकरीता रु. १ प्रति चौरस मीटर प्रती वर्ष अशा सवलतीच्या दराने संबंधित प्रचालकास मक्त्याने देण्यास शासन मान्यता देऊ शकत नसल्याचे क्रमांक बीएमसी-१४१०/प्र.क्र.१६९/नवि-२१, दिनांक २८ जानेवारी २०१५ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले होते.

देवनार क्षेपणभूमी येथील प्रकल्पाच्या प्रचालकाच्या प्रकल्प उभा करण्याच्या अनावस्थेमुळे महानगरपालिकेने स्थायी समितीच्या मंजूरीने सदर प्रकल्पाचे कंत्राट रद्द केले व दिनांक ३० जानेवारी २०१६ पासून देवनार क्षेपणभूमीचे व्यवस्तापन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगर विकास विभाग

७७८ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—सिडको प्राधिकरणामार्फत नवी मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता. श्रीमती मंदा म्हात्रे व श्री. संदीप नाईक इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीचा विचार करून त्या संदर्भात राज्य शासन पुढील कार्यवाही अत्यंत तातडीने करून त्यांसंदर्भातील अधिसूचना काढणार आहे.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—नवी मुंबई माहापालिका क्षेत्र व सिडकोच्या नवी मुंबई अधिसूचित क्षेत्रातील गावठण व विस्तारीत गावठणात स्थानिक नागरीकांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांच्या नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत पुर्विकासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेसंदर्भात शासनाने क्र.टिपीबी ४३१२/६४३/प्र.क्र.८/२०१४/नवि-११, दिनांक ४ मार्च २०१४ रोजीच्या सूचनेन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अेअे) अन्वये प्रस्तावित केलेल्या फेरबदलासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण झाली आहे. तथापि, जनहित याचिका क्र.६१/२०१४ मधील अंतरित आदेश अंमलात असल्याने अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करता आली नाही. तथापि, त्याअनुषंगाने उच्च न्यायालयाची मान्यता घेवून अंतिम अधिसूचना निर्गमित करावयाची असल्याने शासनाने दिनांक १६ ऑगस्ट २०१६ रोजीचे पत्रान्वये सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग यांना सदर प्रकरणी उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन/नोटीस ऑफ मोशन दाखल करून पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकृत केले आहे.

असा रितीने सदर प्रकरणी आश्वासन पुर्ततेच्या अनुषंगाने शासनाने कार्यवाही केली असून उच्च न्यायालयाचे मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## जलसंपदा विभाग

३०६ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ७, दिनांक १६ डिसेंबर २०१४. मा. मुख्यमंत्री यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—ठाणे जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची करण्यात आलेली कपात. श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३५५१.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** सन्माननीय सदस्यांनी दिलेला प्रस्ताव स्वतंत्रपणे तपासून घेतला जाईल. ५ वर्षात तेथील पाण्याची पातळी किती राहिली आहे. हा दुष्काळ यावर्षी पुरता आहे का, कायमस्वरुपी आहे. अशा गोष्टीचा घ्यावा लागणार आहे. त्या आधारावर निश्चितपणे पुढील कार्यवाही केली जाईल.

(४) **सद्य:स्थिती.**—बारवी धरणातून बदलापूर शहरासाठी ३० दललि/दिन पाणी मागणीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अंबरनाथ यांचेकडून बदलापूर शहराचा सन २०३१ च्या लोकसंख्येनुसार आवश्यक पाणी मागणी प्राप्तकरून घेवून त्या आधारावर बारवी धरणाच्या उंचीवाढीमुळे उपलब्ध झालेल्या अथिरिक्त पाणी साठ्यातून बदलापूर शहरासाठी २६ दललि पाणी जलसंपदा विभाग शा.नि.क्र. बिसिंआ २०१८/(२५१/१८)सिंव्य(धो), दिनांक २६ सप्टेंबर २०१८ मंजूर करण्यात आलेली आहे. उल्हासनदी ही बारमाही नदी नसून सदर नदीमध्ये टाटा यांचे आंध्र धरण व महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ यांचे मालकीचे बारवी धरणातून पाणी उपलब्ध होते.

उल्हास नदीपात्रात पाणी सोडून बदलापूर बॅरेज, जांभूळ व मोहने येथील बंधाऱ्यामध्ये पाणी तात्पुरते साठविले जाते व म.औ.वि.मं. अंबरनाथ, म.जी.प्रा., बदलापूर स्टेम प्राधिकरण, ठाणे, कल्याण-डोंबिवली मपा इत्यादी संस्था पाणी उचलतात.

टाटा यांचेकडील जलविद्युत प्रकल्पातून पूर्वेकडील पाणी पश्चिमेकडे कळविण्यास लवादानुसार मर्यादा आहेत. त्यामुळे दरवर्षी नोव्हेंबर ते जुलै या दरम्यान सुमारे २१३ ते २१५ दलधमी इतके पाणी भिवपूरी विद्युतगृहानंतर उल्हास खोऱ्यात उपलब्ध होते. परंतु दरवर्षी औद्योगिक व शहरांची पाणी मागणी विचारात घेता सुमारे १४ ते १५% इतकी कपात करावी लागते. सन २०१४-१५ मध्ये आंध्र धरणातून मिळणारे पाणी व शहरांच्या पाणी मागणी याचा विचार करता सुमारे १४ टक्के पाणी कपात

सर्व संस्थांना दिनांक १ नोव्हेंबर २०१४ पासून लागू केलेली होती. या प्रमाणे सन २०१४-१५ मध्ये पाण्याचे योग्य नियोजन करून उपलब्ध पाणी वर्षभर पुरविणेच्या दृष्टीने कार्यवाही पूर्ण केली आहे. सन २०१५ च्या पावसाळा काळात २० जून ते ३० जून हा कालावधी वगळता कोकणात सुद्धा पावसाचे पुनरागमन १९ जुलै २०१५ ला झाले. त्यामुळे जर ही कपात वेळीच करून नियोजन केले नसते तर कदाचित पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या झाली असती. ती समस्या या दीर्घकालीन परंतु कमी टक्केवारीच्या कपातीमुळे टाळता आली.)

बारवी धरणाची उंची ४ मीटरने वाढविल्यानंतर बारवी धरणाच्या कामामुळे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात एकूण १२ गावे व तिसऱ्या टप्प्यात ६ गावे व ५ संलग्न पाडे विस्तापित झालेले आहेत त्यांचे पुर्वसनाचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग**

४२५ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** ज्या गावात किंवा शिवारामध्ये वाळू उत्खनन होते, असा गावांना अधिक निधी देण्याच्या संदर्भात सुधारित आदेश राज्य शासनाच्या माध्यमातून निर्गमित केले जातील. वाळू उत्खनन माध्यमातून जमा होणाऱ्या रक्कमेतील मोठा हिस्सा हा त्या गावातील किंवा शिवारासाठी देण्याचा प्रयत्न केला जाईल.

(४) **सद्यःस्थिती.**—शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ सप्टेंबर २०१६ सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग**

४२६ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** माननीय श्री. अजित पवार यांनी केलेली सूचना योग्य आहे. असे जर त्यांना वाटत असेल तर भविष्यात वाटपाचे अधिकार पालकमंत्र्यांना दिले जातील.

(४) **सद्यःस्थिती.**—शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ सप्टेंबर २०१६ सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग**

४२७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** त्यांनी दिलेली माहिती सत्य आहे असे समजून या प्रकरणाची तातडीने आठ दिवसांच्या आत चौकशी करण्याचे आदेश दिले जातील. या प्रकरणी चौकशीअंती संबधित तहसिलदार आणि एसडीओ दोषी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल.

(४) **सद्यःस्थिती.—कार्यवाही पूर्ण**

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग**

४२८ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** अध्यक्ष महोदय, निलंबित करून चौकशी करण्यात येईल. परंतु चौकशीअंती जर ते निर्दोष असल्याचे त्यांना पुन्हा तातडीने कामावर घेतले जाईल.

(४) **सद्यःस्थिती.**—कार्यवाही पूर्ण

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग**

४२९ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** मागील तीन ते चार वर्षापासून नगर जिल्ह्याला मिळालेला नसेल तर त्याची खात्री करून घेण्यात येईल. जर निधी देण्याचे बाकी राहिले असेल तर आता नव्याने नियुक्त झालेल्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली त्या त्या जिल्ह्यास निधी वाटपाचे वितरण केले जाणार आहे.

(४) **सद्यःस्थिती.**—शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ सप्टेंबर २०१६ सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग**

४३० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** खनिकर्म विभागाचा निधी जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून वाटप झाला पाहिजे, असा प्रयत्न करण्यात येईल.

(४) **सद्यःस्थिती.**—शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ सप्टेंबर २०१६ सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

४३१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** जिल्हा नियोजन मंडळाचा सल्ला घेऊन, त्या माध्यमातून निधी वितरीत करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

(४) **सद्यःस्थिती.**—शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ सप्टेंबर २०१६ सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग**

४३२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—बोळेगाव, मौजे सरगोळी व येसगी (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील मांजरा नदीतून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असल्याबाबत. श्री. सुभाष साबने वि.स.स. यांचा ता.प्र.क्र.३६१८.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** सन्माननीय सदस्यांची सूचना योग्य आहे. त्यामुळे यावर विचार करण्यात येईल.

(४) **सद्यःस्थिती.**—शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ सप्टेंबर २०१६ सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### महसूल व वन विभाग

४४१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—परांडा तालुक्यातील (जि. उस्मानाबाद) येथील सिना नदीतून अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत. श्री. राहूल मोटे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३९०३.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** ती पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याकडून वसुलीची कार्यवाही लवकर पूर्ण व्हावी यासाठी प्रयत्न केला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—मौजे शिराळा, कोडगाव व वागेगव्हाण या वाळूगटाच्या लिलाव धारकाने अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत दिनांक २२ मे २०१४ च्या आदेशान्वये आकारण्यात आलेल्या दंडाच्या आदेशाविरुद्ध संबंधित लिलावधारकाने अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्यासमोर अपील दाखल केले होते. सदर अपिलामध्ये अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलकारास सुनावणीची संधी देऊन, यथोचित पुरावे तपासून नव्याने आदेश पारित करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी भूम यांना दिले, उपविभागीय अधिकारी, भूम यांनी सदर आदेशानुसार कार्यवाही करून मौजे शिराळ व कोडगाव या वाळूगटासाठी दिनांक १ जून २०१५ रोजी व मौजे वागेगव्हाण या वाळूगटासाठी दिनांक १४ सप्टेंबर २०१५ रोजी आदेश पारीत केले. सदर आदेशानुसार संबंधित लिलावधारक यांनी अनुक्रमे दिनांक १७ जून २०१५ व दिनांक २८ सप्टेंबर २०१५ रोजी दंडाची रक्कम शासनजमा केली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### महसूल व वन विभाग

४४२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ९, दिनांक १८ डिसेंबर २०१४.

(२) **विषय.**—परांडा तालुक्यातील (जि. उस्मानाबाद) येथील सिना नदीतून अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत. श्री. राहूल मोटे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३९०३.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** सन्माननीय सदस्यांनी ज्या काही उपाययोजना सूचविलेल्या आहेत, त्या करण्याचा राज्य सरकार नक्कीच विचार करेल.

(४) **सद्य:स्थिती.**—शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक २६ डिसेंबर २०१४ सोबत जोडला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### नगरविकास विभाग

७७६ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.

व (२) **विषय.**—सिडको प्राधिकरणामार्फत नवी मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता.

७७७ श्रीमती मंदा म्हात्रे व श्री. संदीप नाईक, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस : आश्वासन क्रमांक ७७६** या संदर्भातील पुढील कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे. **आश्वासन क्रमांक ७७७** यामधील कॅटेगरीमध्ये जे जे प्रस्ताव बसतील त्या त्या हिशोबाने त्यांना २.५ किंवा ३.०० एफएसआय देण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सिडकोने विकसित केलेल्या नोडमधील मोडकळीस आलेल्या/धोकादायक अवस्थेतील इमारतींचे पुनर्विकास जलद गतीने होण्याच्या दृष्टीने अशा पुनर्विकासास २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ४६(३) सह अॅपेंडिक्स-VI मध्ये कलम ३७(१) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करून शासनास मंजुरीसाठी सादर केला होता. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७(२) अन्वये शासन **नगर विभाग अधिसूचना क्र. टिपीबी-३१२/६४३/ प्र.क्र. ९/I/२०१४/नवि-११, दिनांक ४ फेब्रुवारी २०१५** द्वारे सदर विनियम ४६(३) मधील फेरबदल प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे.

तसेच वरील सुधारणा सिडको नियोजन प्राधिकरण असलेल्या नवी मुंबई मधील सिडको नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्राच्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम ३४ सह परिशिष्ट-VII अंतर्भूत करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७ (१अेअे) खालील सूचना दिनांक ४ फेब्रुवारी २०१५ रोजी देण्यात आली आहे. सबब, विधानसभा आश्वासन क्र. ७७६, ७७७, ७७९ ची पूर्तता झाली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगरविकास विभाग

७७९ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.

(२) **विषय.**—सिडको प्राधिकरणामार्फत नवी मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता. श्रीमती मंदा म्हात्रे व श्री. संदीप नाईक, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** या संदर्भात सर्व प्रस्तावांवर मेरीटनुसार विचार करून योग्य त्या सुत्रानुसार एफएसआय दिला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सिडकोने विकसित केलेल्या नोडमधील मोडकळीस आलेल्या/धोकादायक अवस्थेतील इमारतींचे पुर्नविकास जलद गतीने होण्याच्या दृष्टीने अशा पुर्नविकासास २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ४६(३) सह ॲपेंडिक्स-VI मध्ये कलम ३७(१) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करून शासनास मंजुरीसाठी सादर केला होता. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७(२) अन्वये शासन **नगर विभाग अधिसूचना क्र. टिपीबी-३१२/६४३/ प्र.क्र. ९/I/२०१४/नवि-११, दिनांक ४ फेब्रुवारी २०१५** द्वारे सदर विनियम ४६(३) मधील फेरबदल प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे.

तसेच वरील सुधारणा सिडको नियोजन प्राधिकरण असलेल्या नवी मुंबई मधील सिडको नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्राच्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम ३४ सह परिशिष्ट-VII अंतर्भूत करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७ (१अेअे) खालील सूचना दिनांक ४ फेब्रुवारी २०१५ रोजी देण्यात आली आहे. सबब, विधानसभा आश्वासन क्र. ७७६, ७७७, ७७९ ची पूर्तता झाली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग (महसूल)

७९७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.

(२) **विषय.**—राज्यामध्ये विनापरवानगी खाजगी केबल वाहिन्या चालविल्या जात असणे. सर्वश्री रवी राणा व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** अमरावती शहरातच नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करमणूक कर अधिकारी, एसडीओ किंवा तहसीलदार यापैकी जिल्हाधिकारी ज्यांची नेमणूक करतील अशा अधिकाऱ्यांचे स्कॉड नेमण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—दिनांक २६ मार्च २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक (L.C.O.) व बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते.

राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांप्रमाणेच अमरावती तसेच मुंबई शहर जिल्ह्यात करण्यात येणाऱ्या सदर विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये घोषित केबल जोडण्यापेक्षा जास्तीच्या आढळलेल्या केबल जोडण्यासंदर्भात संबंधित केबल चालकांविरुद्ध महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील विहित तरतुदींनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

याशिवाय, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील कलम ५ मध्ये सुधारणा करून करमणूक शुल्क चुकवेगिरीच्या प्रकरणांत दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही करण्यात येते.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग (महसूल)

७९८ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.

(२) **विषय.**—राज्यामध्ये विनापरवानगी खाजगी केबल वाहिन्या चालविल्या जात असणे. सर्वश्री रवी राणा व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** त्याबाबतीत जिल्हाधिकारी याचेमार्फत चौकशी करण्यात येऊन केबल ऑपरेटर दोषी आढळल्यास केबल ऑपरेटरची मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—दिनांक २६ मार्च २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक (L.C.O.) व बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते.

राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांप्रमाणेच अमरावती तसेच मुंबई शहर जिल्ह्यात करण्यात येणाऱ्या सदर विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये घोषित केबल जोडण्यापेक्षा जास्तीच्या आढळलेल्या केबल जोडण्यासंदर्भात संबंधित केबल चालकांविरुद्ध महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील विहित तरतुदींनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

याशिवाय, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील कलम ५ मध्ये सुधारणा करून करमणूक शुल्क चुकवेगिरीच्या प्रकरणांत दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही करण्यात येते.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग (महसूल)**

८०१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.

(२) **विषय.**—राज्यामध्ये विनापरवानगी खाजगी केबल वाहिन्या चालविल्या जात असणे. सर्वश्री रवी राणा व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना दिलेल्या आहेत, या सूचनांचा सरकार नक्की विचार करेल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—दिनांक २६ मार्च २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक (L.C.O.) व बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते.

सदर विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये घोषित केबल जोडण्यापेक्षा जास्तीच्या आढळलेल्या केबल जोडण्यासंदर्भात संबंधित केबल चालकांविरुद्ध महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील विहित तरतुदींनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

याशिवाय, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील कलम ५ मध्ये सुधारणा करून करमणूक शुल्क चुकवेगिरीच्या प्रकरणांत दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही करण्यात येते.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**महसूल व वन विभाग (महसूल)**

८०४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.

(२) **विषय.**—राज्यामध्ये विनापरवानगी खाजगी केबल वाहिन्या चालविल्या जात असणे. सर्वश्री रवी राणा व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** अमरावती व खामगाव येथे प्राधान्याने स्कॉड पाठवून केबल टू केबल चौकशी करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली खाजगी दुरदर्शन वाहिन्यांची संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीकडे प्राप्त तक्रारींची चौकशी पोलीस अधीक्षक, उप विभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी, नायब तहसीलदार यांच्या पथकाद्वारे प्राप्त तक्रारींची पडताळणी करण्यात येते. प्राप्त तक्रारींवर समितीच्या बैठकी घेण्यात येऊन तक्रारींची शहानिशा करून दोषींवर कार्यवाही करण्यात येत आहे. याशिवाय, दिनांक २६ मार्च २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक (L.C.O.) व बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते.

राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांप्रमाणेच अमरावती तसेच बुलढाणा जिल्ह्यात करण्यात येणाऱ्या सदर विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये घोषित करण्यात येणाऱ्या घोषित केबल जोडण्यापेक्षा जास्तीच्या आढळलेल्या केबल जोडण्यासंदर्भात संबंधित केबल चालकांविरुद्ध महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील विहित तरतुदींनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग (महसूल)

८०५ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक १३, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.

(२) **विषय.**—राज्यामध्ये विनापरवानगी खाजगी केबल वाहिन्या चालविल्या जात असणे. सर्वश्री रवी राणा व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** सदर अधिकारी केबल कनेक्शनची मोजणी व गणना करतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—दिनांक २६ मार्च २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक (L.C.O.) व बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते.

राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांप्रमाणेच अमरावती तसेच बुलढाणा जिल्ह्यात करण्यात येणाऱ्या सदर विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये घोषित केबल जोडण्यापेक्षा जास्तीच्या आढळलेल्या केबल जोडण्यासंदर्भात संबंधित केबल चालकांविरुद्ध महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील विहित तरतुदींनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

याशिवाय, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील कलम ५ मध्ये सुधारणा करून करमणूक शुल्क चुकवेगिरीच्या प्रकरणांत दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही करण्यात येते.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## गृह विभाग

१२० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७१, क्रमांक ५, दिनांक १२ डिसेंबर, २०१४. माननीय मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती. सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील व इतर वि.स.स. यांचा २९३ अन्वये प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** त्यामुळे सिटीझन फ्रेंडली पोलीस फोर्स ही संकल्पना आपण राबविणार आहोत. यामध्ये पोलीसांना संन्सेटाईस करण्यात येईल व त्यांना समजावून सांगण्यात येईल की, श्रीमंत असो वा सामान्य माणूस सर्वांना मिळणारी वागणूक ही सारखीच असली पाहिजे.

(४) **सद्य:स्थिती.**—पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक २० डिसेंबर २०१७ च्या परिपत्रकास अनुसरून कम्युनिटी पोलीसिंग योजनेनुसार राज्यात पोलीस स्टेशन स्तरावर सन २०१७ ते २०२० या दरम्यान त्या कालावधीत जातीय सलोखा तसेच पोलीस व जनता यांचे संबंध सौहाद्रापुर्ण होण्याकरिता एकूण ७४१०१ बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

पोलीस मित्र समिती, शांतता समिती व इतर परिणामकारक उपाययोजनामुळे तसेच राज्यात सध्या कोवीड-१९ मुळे उद्‌भवलेल्या आपातकालीन परिस्थिती/टाळेबंदी कालावधीत पोलीस प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता केलेल्या अतुलनिय कामगिरीबाबत जनतेने, विविध सामाजिक संस्था व समाजातील प्रतिष्ठित व्यक्तीने प्रशंसापत्र दिली आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महिला व बाल विकास विभाग

५९६ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७२, क्रमांक १३, दिनांक २५ मार्च, २०१५.

(२) **विषय.**—सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला माननीय वित्त मंत्री यांचे उत्तर.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** महिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून टीएचआर महिला बचत गटांनाच दिल्या जातील.

(४) **सद्य:स्थिती.**—मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रवारी २०१९ च्या आदेशानुसार गरम ताजा आहार व THR पुरवठ्याची निविदा ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ पंचायत हे युनिट गृहित धरून करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत निविदा प्रकाशित करण्यात आल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

आहाराची तपासणी करण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०१६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना एकूण अंगणवाडीच्या वार्षिक ५% अंगणवाड्यांमधून गरम ताजा आहार व THR आहाराचे रँडमली सँम्पल घेऊन आहाराची तपासणी करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### महसूल व वन विभाग

६९९ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७२, क्रमांक १५, दिनांक २७ मार्च, २०१५.

(२) **विषय.**—माजिवडे (ता. जि. ठाणे) येथील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये नियमबाह्यरित्या फेरफार करण्यात आल्याबाबत. श्री. विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १५१६७.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** अध्यक्ष महोदय, संपर्क सहायकाचे नाव देखील माझ्याकडे नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. या संदर्भातील सर्व माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—याबाबतची माहिती दिनांक १० एप्रिल २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

७०० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७२, क्रमांक १५, दिनांक २७ मार्च, २०१५. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—माजिवडे (ता. जि. ठाणे) येथील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये नियमबाह्यरित्या फेरफार करण्यात आल्याबाबत. श्री. विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १५१६७.

(३) **आश्वासन.**—श्री. एकनाथराव खडसे : या संदर्भातील जी माहिती विचारण्यात आली आहे, ती पटलावर ठेवण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—याबाबतची माहिती दिनांक १० एप्रिल २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

८८२ (१) **संदर्भ व दिनांक.**—सन २०१५ चे पहिले (अर्थसंकल्पीय अधिवेशन).

(२) **विषय.**—नांदरुख (तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग) येथील जलस्वराज्य प्रकल्पाचे लेखा परीक्षण प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत.

(३) **आश्वासन.**—श्री.बबनराव लोणीकर :त्यांचेकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर लेखा परीक्षणाची कार्यवाही करण्यात येईल.

(४) **सद्यःस्थिती.**—नांदरुख, ता. मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथील जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेचे लेखा परीक्षण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी त्यांच्या दिनांक ७ जुलै २०१५ च्या पत्रान्वये संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षण संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता.

त्यानुसार सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी दिनांक १४ जानेवारी २०१६ रोजी लेखापरीक्षण अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना सादर केला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

११७५ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज, खंड १७२, क्रमांक २३, दिनांक १० एप्रिल, २०१५.

(२) **विषय.**—सांगली जिल्हा परिषदेमध्ये ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून १० लाख ७८ हजार रुपयांची साहित्याची आवश्यकता नसताना खरेदी केल्याबाबत. सर्वश्री शिवाजीराव नाईक व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. बबनराव लोणीकर :** कामकाजामधील अनियमिततेबाबत सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचा खुलासा घेऊन प्रचलित नियमाप्रमाणे संबंधितावर कार्यवाही करणेत येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**श्री. वाय. एस. गंगथडे, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, सांगली यांचेविरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार कार्यवाही करून त्याची एक वेतनवाढ एक वर्षासाठी पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्यात आली आहे.

श्री. व्ही. एम. शिंदे, शाखा अभियंता (विद्युत) व श्री. एन. एस. जाधव, शाखा अभियंता (यांत्रिकी), ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता. सदर खुलासा प्राप्त न झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी त्यांच्या दिनांक २६ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या आदेशान्वये श्री. शिंदे व श्री. जाधव यांची विभागीय चौकशी सुरू करणेत आली आहे.

तसेच, श्री. सादिगले, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचा खुलासा अमान्य करून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करणेचा प्रस्ताव जिल्हा परिषद, सांगली यांचेमार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविला आहे. त्यानुसार श्री. सादिगले यांचेवरील शिस्तभंगविषयक कार्यवाहीबाबतची प्रक्रिया लवकरात लवकर पुर्ण करणेबाबत प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता यांनी दिनांक १५ डिसेंबर २०१५ रोजीच्या पत्रान्वये सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना निर्देश दिले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

६५९ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज, खंड १७२, क्रमांक १४, दिनांक २६ मार्च, २०१५.

(२) **विषय.—**सन २०१५-१६ च्या अनुदानाकरिता मागण्या.

(३) **आश्वासन.—श्री. गिरीष बापट :** एपीएल धारकांना धान्य देण्याचा विचार नजिकच्या काळात या शासनाकडून घेतला जाईल, असे मी या ठिकाणी आपल्याला आश्वासित करू इच्छितो.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**राज्यातील शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या परंतु लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पूर्वी लाभ घेत असलेल्या १७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असा शासन निर्णय, दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## महसूल व वन विभाग

९३१ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १७२, क्र. १९, दिनांक ६ एप्रिल २०१५. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**मौजे घोडबंदर, भाईंदर, पेणकरपाडा या जमिनीच्या ७/१२ वर शेतकऱ्यांना कोणतीही सूचना न देता मूळ मालक म्हणून द इस्टेट इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. या कंपनीच्या नावे नोंद करण्यात येणे. श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** सनन्मानीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे याची संपूर्णपणे चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती करून त्यांना सूचना देण्यात येतील.

(४) **सद्यःस्थिती.—**मौजे भाईंदर, मिरा व घोडबंदर, ता. जि. ठाणे या गावातील दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या जमिनीबाबत उपस्थित मुद्यांच्या/आक्षेपांच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश शासनपत्र क्र. लवेसू-२७१५/प्र.क्र.८०/ज-४, दिनांक २५ मे २०१५ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांना देण्यात आले होते. त्यानुषंगाने दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या मिळकतीसंदर्भातील जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक ५ सप्टेंबर २००८ च्या आदेशास विभागीय आयुक्त, कोकण यांनी

पुनरिक्षणात घेऊन दिनांक ७ जुलै २०१५ च्या आदेशान्वये स्थगिती दिली आहे. सदर स्थगिती आदेशामुळे दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीचे नाव कब्जेदारी सदरी दाखल करणेपूर्वीची स्थिती ठेवण्याबाबत गावी अभिलेखात नोंदी घेण्यात आल्या. त्या कार्यवाहीने व्यथीत होऊन दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा. लि. यांनी विभागीय आयुक्त, कोकण यांच्या सदर आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ६७५१/२०१५ दाखल केली असून सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६ जुलै २०१५ च्या आदेशान्वये "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश पारित केले आहेत. त्यामुळे सदर जमिनीबाबत जिल्हाधिकारी, ठाणे, तसेच इतर प्राधिकरणाकडून कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येत नसल्याने सदर याचिकेत विविध नागरिकांनी विविध सिव्हील अप्लिकेशन दाखल केले होते.

सदर दाव्यांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १२ डिसेंबर २०१७ व दिनांक २० डिसेंबर २०१७ रोजी आदेश पारित करून अर्जदार यांच्या अर्जावर गुणवत्तेवर निर्णय घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३ फेब्रुवारी २०१८ च्या पत्रान्वये तहसिलदार, ठाणे यांना कळविले आहे.

अधिकार अभिलेखित दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी अशी नोंद दाखल असलेल्या जमीन मिळकतीबाबत दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी वरिष्ठ धारक असल्याने नोंदणीकृत दस्तान्वये अधिकार अभिलेखात कोणतेही बदल करताना, तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४२ब मधील तरतूदीनुसार रुपांतरीत कर व अकृषिक आकारणी करताना दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी सदर प्रकरणी ना हरकत प्रमाणपत्र किंवा हक्कसोड पत्र दिलेले असल्यास अधिकार अभिलेखात नोंदी घेण्याबाबत तहसिल कार्यालयामार्फत गुणवत्तेनुसार कार्यवाही करण्यात येते.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

९३३ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२, क्र. १९, दिनांक ६ एप्रिल २०१५. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—मौजे घोडबंदर, भाईंदर, पेणकरपाडा या जमिनीच्या ७/१२ वर शेतकऱ्यांना कोणतीही सूचना न देता मूळ मालक म्हणून द इस्टेट इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. या कंपनीच्या नावे नोंद करण्यात येणे. श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** अध्यक्ष महोदय, शाहीद बलवॉ या कंपनीचे डॉयरेक्टर आहेत का? याची माहिती आता माझ्याकडे नाही. याबाबतची माहिती मी आज ताबडतोब मिळवून उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवेल. अन्यथा अधिवेशन संपवण्यापूर्वी या प्रकरणाशी संबंधित सर्व माहिती, डायरेक्टर्स यांची नावे पटलावर ठेवण्याचा प्रयत्न करेल.

(४) **सद्य:स्थिती.**—याबाबतची माहिती दिनांक ३१ जुलै २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**— मान्य.

## महसूल व वन विभाग

६९८ (१) **संदर्भ व दिनांक.**—सन २०१५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन.

(२) **विषय.**—माजिवडे (ता. जि. ठाणे) येथील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये नियमबाह्यरित्या फेरफार करण्यात आल्याबाबत. श्री. विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स. यांचा ता.प्र.क्र. १५१६७.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :** अध्यक्ष महोदय, होय. या संदर्भात चौकशी करून कार्यवाही केली जाईल.

(४) **सद्य:स्थिती.**—प्रस्तुत प्रकरणी झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने लाच लुचपत प्रतिबंधक विभामार्फत उघड चौकशी होऊन तत्कालीन तलाठी, मंडळ अधिकारी, तसेच संबंधित विकासकाचे संपर्क सहायक यांच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ४६५ व इतर सह ला.लु.प्रति.का. कलम १३(१)(ड) व १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट असून सुनावणीची पुढील तारीख १७ नोव्हेंबर २०१८ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

३९७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२, क्रमांक ११ दिनांक २३ मार्च २०१५.

(२) **विषय.**—अमरावती महानगरपालिकेकडून महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित पाणीपुरवठा व स्वच्छता योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधी अखर्चित राहिल्याबाबत. डॉ. सुनिल देशमुख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. १०२८८.

(३) **आश्वासन.—श्री. बबनराव लोणीकर:** सदर योजनेसाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीपैकी अल्प प्रमाणात खर्च झाला असल्याने अमरावती महानगरपालिकेकडून खुलासा मागविण्यात आला असून सदर खुलाश्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) **सद्यःस्थिती.**—महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित पाणीपुरवठा व स्वच्छता योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडणीसाठी व वैयक्तिक शौचलय बांधकामासाठी अमरावती महानगरपालिकेस या विभागाच्या दिनांक ९ मे २०१३ च्या शासन निर्णयान्वये रु. ८२५.२४ लक्ष इतके अनुदान वितरीत केले आहे. एकूण वितरीत निधीपैकी रु. ८,२४,९३,३९४ इतका खर्च झालेला आहे व रु. ३०,६०६ इतकी रक्कम शिल्लक राहिली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग

१०६१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२ क्रमांक २१ दिनांक ८ एप्रिल २०१५ माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवस्थानात गत पन्नास वर्षात कोट्यवधीचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येणे. सर्वश्री. राजेश क्षीरसागर व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री देवेंद्र फडणवीस :** आपण जी सूचना केली आहे, तिचा अभ्यास करण्यात येईल आणि यातून काय मार्ग काढता येऊ शकतो, त्याचा विचार सरकार करेल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—देवस्थान इनाम जमिनिबाबत शिफारस करण्याकरीता तत्कालीन मा. राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समितीने सादर केलेला अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. देवस्थान जमिनीसंदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.१००/ज-१, दिनांक २३ मार्च २०१६ अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील शासनाने स्विकृत केलेल्या शिफारशींनुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## नगर विकास विभाग

९० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२, क्र. ४, दिनांक १२ मार्च २०१५.

(२) **विषय.**—राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** हरकती सूचना आल्यानंतर एक कमिटी तयार केली जाईल. ही कमिटी हरकती व सूचनांच्या संदर्भात निर्णय घेईल. त्या नंतर ते महासभेसमोर मांडले जाईल. महासभेने मंजूरी दिल्यानंतर ते राज्य शासनाकडे पाठवले जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—बृहन्मुंबई महापालिकेने प्रारुप विकास आराखडा (२०३४) हा कलम २६ (१) अन्वये दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ रोजी प्रसिद्ध केला होता.

सदर आराखडा प्रसिद्ध झाल्यानंतर झालेल्या जनतेच्या तीव्र असंतोषाच्या अनुषंगाने शासन नगर विकास विभागाने, शासन निर्णय क्र. विसप्रस्ताव/२०१५/नवि-११, दिनांक २३ एप्रिल २०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ नुसार “बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ रोजी शासन **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केलेल्या

प्रारुप विकास योजनेमधील चुकांची सखोल शहानिशा करून सगळ्या चुकांची जागेवरील परिस्थितीनुसार, गुणवत्तेनुसार, नियोजनाचे दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून त्यानुरूप दुरूस्ती करून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील प्रकरणी तीनच्या तरतुदींचे पालन करून प्रारूप विकास योजना कलम २६ अन्वये महासभेच्या पूर्वमान्यतेने चार महिन्यांच्या मुदतीमध्ये नागरिकांच्या सूचना/ हरकतींसाठी पुर्नःप्रसिद्ध करावी.” असे निर्देश दिले. सदर कालावधीस शासनाच्या आदेशानुसार प्रथमतः दिनांक २२ फेब्रुवारी २०१६ पर्यंत आणि त्यानंतर दिनांक ३१ मे २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २७ मे २०१६ च्या ठराव क्र. ३०७ अन्वये म.प्रा. व न.र. अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रारुप विकास आराखडा (२०३४) प्रसिद्ध करण्यास मंजुरी दिली. त्यानुसार कलम २६ अन्वये दिनांक २७ मे २०१६ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेसंबंधी हरकती/सूचना मागविण्यात आल्या असून प्राप्त होणाऱ्या हरकत/सूचना पत्रांवर संबंधिताना कलम २८(२) अन्वये गठीत नियोजन समितीमार्फत सुनावणी देऊन अधिनियमाचे कलम २८(३) अन्वये महापालिकेस अहवाल/प्रस्ताव सादर करणे अभिप्रेत आहे. नियोजन प्राधिकरण/बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे तरतुदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करून कलम ३० अन्वये विकास योजनेचा मसुदा शासनास मंजूरीसाठी सादर केल्यावर त्यावर कलम ३१ अन्वये शासनाने निर्णय घेण्याची अधिनियमात तरतूद आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने कलम २६(१) अन्वये प्रारुप विकास आराखडा दिनांक २७ मे २०१६ रोजी प्रसिद्ध केला असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार वैधानिक कार्यवाही होत आहे. सदरहू आश्वासन हे अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल या अनुषंगानेच दिले असल्याने व त्यानुसार कार्यवाही होत असल्याने आश्वासनाची पूर्तता होत आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**नगर विकास विभाग**

८१३ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२ क्रमांक १६ दिनांक ३० मार्च २०१५ माननीय मंत्री राज्यमंत्री श्री. रणजित पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—पाचोरा (जि. जळघाव) नगरपालिका कर्मचाऱ्यांना नियमित वेतन आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करण्याबाबत श्री. किशोर पाटील, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

(३) **आश्वासन.—डॉ. रणजित पाटील :** अध्यक्ष महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—पाचोरा नगरपरिषदेस दिनांक १८ नोव्हेंबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये रु. ३०००००० दिनांक ३१ मार्च २०१६ च्या शासन निर्णयान्वये रु. ५०००००० व दिनांक २४ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये रु. ३०००००० इतके वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत अनुदान दिलेले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

**नगर विकास विभाग**

९४२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२, क्र. १९, दिनांक ६ एप्रिल २०१५.

(२) **विषय.**—मुंबई व नवी मुंबईला भेडसावणाऱ्या समस्या तातडीने दूर करण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना. सर्वश्री राज पुरोहित व इतर वि.स.स. यांचा नियम २९३ अन्वये प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :** नवीन प्लानमध्ये कोळीवाड्यांच्या विकासाकरिता विशेषतः तरतूद केली जाईल. हा मूळ मुंबईचा रहिवाशी आहे. जो विकासापासून दूर आहे. त्याला विकासाकडे नेण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेतला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—शासनाकडील दिनांक ८ मे २०१२ रोजीच्या अधिसूनेप्रमाणे कोळीवाड्यांसाठी गावठाणाप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणेत आलेला आहे. कोळीवाड्यांच्या हद्दी निश्चित नसल्याने सदर निर्णयांची अंमलबजावणी होणेस अडचणी येत आहेत. त्यामुळे सुधारित प्रारुप विकास योजनेमध्ये कोळीवाड्यांच्या अचूक हद्दी दर्शविणेबाबत आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ८ डिसेंबर २०१५ रोजी आदेश दिलेले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### नगर विकास विभाग

११६२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२, क्र. २३, दिनांक १० एप्रिल २०१५ मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**—उरण (जि. रायगड) येथे जे.एन.पी.टी बंदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन राज्य शासनाकडून जेएनपीटीला उपलब्ध करून देण्याबाबत. श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. देवेद्र फडणवीस :** नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा या गावांच्या पुनर्वसनाच्या ठिकाणी वाळवीचा प्रादुर्भाव झाल्याने तेथील प्रकल्पग्रस्तांना अन्य ठाकणी पुनर्वसन प्रकरणाबाबत विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—प्रकल्पग्रस्त गावांच्या पुनर्वसना बाबत विभागीय आयुक्त, कोकण, सिडको, नवी मुंबई व अध्यक्ष, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांनी सादर केलेला अहवाल विचारत घेऊन (१) नवीन शेवा गावाचे पुनर्वसन करण्यासाठी त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या जमिनीपैकी जमीन सिडको महामंडळाने द्यावी. (२) हनुमान कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनासाठी जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी जमीन उपलब्ध करून द्यावी व पुनर्वसनाची कार्यवाही करावी तसेच सध्याची जमीन जे.एन.पी.टी. ने ताब्यात घेऊन योग्य वापर करावा अशा सूचना दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ च्या पत्रानुसार देण्यात आल्या आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### नगर विकास विभाग

४४० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७२, क्र. १२, दिनांक २४ मार्च २०१५.

(२) **विषय.**—लोणावळा नगरपालिकेने भूमिगत गटारी बांधण्याचे कामाबाबत केलेला करार डावलून आगाऊ रक्कम ठेकेदाराला दिल्याबाबत श्री. संजय सावकारे, विधानसभा सदस्य यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८५७६.

(३) **आश्वासन.—श्री. देवेद्र फडणवीस :** जिल्हाधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत लोणावळा नगरपरिषदेस मंजूर भुयारी गटार प्रकल्पाच्या अनुषंगाने वित्तीय अनियमितता झालेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. शासनास प्राप्त झालेल्या अहवालानुसार जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. (दिनांक ६ मार्च २०१७) संबधित ठेकेदाराला काळ्या यादीमध्ये टाकणेबाबत दिनांक ३१ जुलै २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

### महिला व बालविकास विभाग

५३७ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्र. १४, दिनांक ३१ जुलै २०१५.

५३८ (२) **विषय.**—अहमदनगर जिल्ह्यातील अंगणवाडीतील बालकांना पुरविण्यात आलेली राजगिरा चिक्की माती मिश्रित असल्याबाबत.

५३९ श्री. भरतशेठ गोगावले वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. २६५०१.

आणि (३) **आश्वासन.—श्रीमती पंकजा मुंडे : आश्वासन क्रमांक ५३७** सदर प्रकरणी चौकशी सुरू असून चौकशीअंती योग्य
५४० ती कार्यवाही करण्यात येईल. **आश्वासन ३५८** श्रीमती पंकजा मुंडे यामध्ये दोन रिपोर्ट वेगळे आल्यामुळे आम्ही तिसरा रिपोर्ट पंचनामा करून दिलेला आहे आणि त्याचा रिपोर्ट अजून प्राप्त झालेला नाही ही घटना न्यायप्रविष्ठ आहे. यामध्ये ०.०.३८ वाळूचे कण आढळून आल्याने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. **आश्वासन ५३९** श्रीमती पंकजा मुंडे त्या मुलांच्या तब्येतीची आणि आहाराची काळजी घेण्यात येईल. **आश्वासन ५४०** श्रीमती पंकडा मुंडे यांची माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(४) **सद्यःस्थिती.—**राजगिरा चिक्कीचे सॅम्पल रेफरल लॅबकडे पाठविण्यात आले होते व रेफरल लॅब च्या अहवालानुसार सॅम्पल खाण्यास योग्य असल्याबाबत अहवाल प्राप्त झाला आहे. तथापि सद्यःस्थितीत संबंधित संस्थेचे राजगिरा चिक्कीचे पेमेंट अदा करण्यात मा. उच्च न्यायालयाची स्थगिती असल्याने पेमेंट अदा करण्यात आलेले नाही सदर केसची सुनावणी दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ रोजी आहे. मा. न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

६६७ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १७३, क्र. १४, दिनांक ३१ जुलै २०१५.

(२) **विषय.—**राज्य शासनातील विविध विभागांच्या मंत्र्याकडून नियमबाह्य कामे करून भ्रष्टाचार करण्यात येत असल्यामुळे जनमानसात शासनाविरुद्ध निर्माण झालेला असंतोष या विषयावर शासनाने करावयाची कार्यवाही सर्वश्री. राधाकृष्ण विखे पाटील व इतर वि.स.स. यांचा अंतिम आठवडा प्रस्ताव

(३) **आश्वासन.—श्रीमती पंकजा मुंडे :** या चिक्कीचा दर्जा खराब असल्यास त्याबाबत आम्ही नक्कीच कार्यवाही करू. रेट कॉन्ट्रॅक्ट तपासणे, यापूर्वी त्यांनी काम केले आहे की नाही, लाभार्थ्यांपर्यंत ते पोहोचते की नाही, त्याचा दर्जा तपासणे त्यातही काही निघाले तर त्या संदर्भात कडक ॲक्शन घेणे, तसे काही असल्यास आम्ही कडक ॲक्शन घेऊ.

(४) **सद्यःस्थिती.—**राजगिरा चिक्कीचे सॅम्पल रेफरल लॅबकडे पाठविण्यात आले होते व रेफरल लॅब च्या अहवालानुसार सॅम्पल खाण्यास योग्य असल्याबाबत अहवाल प्राप्त झाला आहे. तथापि सद्यःस्थितीत संबंधित संस्थेचे राजगिरा चिक्कीचे पेमेंट अदा करण्यास मा. उच्च न्यायालयाची स्थगिती असल्याने पेमेंट अदा करण्यात आलेले नाही सदर केसची सुनावणी दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ रोजी आहे. मा. न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

१६५ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १७३, क्र. ४, दिनांक १६ जुलै २०१५.

(२) **विषय.—**कुळगांव बदलापूर (ता. अंबरनाथ, जि. ठाणे) येथील महिला व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यास दहशतीबाबत. सर्वश्री. किसन कथोरे (मुरबाड) व जितेंद्र आव्हाड (मुंब्रा, कळवा) वि.स.स. यांचा अतारांकित प्रश्न क्र. ७२४१.

(३) **आश्वासन.—श्रीमती पंकजा मुंडे :** चौकशी अंती चौकशी अहवालानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) **सद्यःस्थिती.—**शासन आदेश क्र. मबाआ-२०१५/प्र.क्र.१७४ (भाग-१)/का-७ दिनांक २९ नोव्हेंबर २०१७ अन्वये श्रीमती बागुल यांचे विरुद्ध विभागीय चौकशी करण्याकरिता प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत विभागीय चौकशी अधिकाऱ्याकडून चौकशी अहवाल शासनास अद्यापही अप्राप्त आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**३७५** (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक ९, दिनांक २३ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ मधील अभियंत्यांनी केलेल्या अपहाराची चौकशी करण्याबाबत. सर्वश्री हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २६७८०.

(३) **आश्वासन.—श्री. चंद्रकांत पाटील :–** या प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी सुरू असून चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी चौकशी अहवालामध्ये या प्रकरणी प्राप्त तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही असे निष्कर्ष नमूद केले आहेत. चौकशी अहवालातील सदर निष्कर्ष मान्य करण्यात आले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## महसूल व वन विभाग

८४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक ३, दिनांक १५ जुलै २०१५.

(२) **विषय.**—जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक सन २०१५ चे वि.स.वि क्रमांक ३०. सर्वश्री श्री. विजय वडेट्टिवार व इतर वि.स.स. यांचा प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :**–जेथे अशा वाहतुकीमुळे रस्ते खराब झालेले आहेत, अशा ठिकाणी गौण खनिजाचे पैसे प्राधान्याने देण्याबाबत राज्य सरकार विचार करणार आहे. येत्या १-२ महिन्यात याबाबत निर्णय घेतला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**— केंद्रीय खाण मंत्रालयाने शासन अधिसूचना दिनांक २७ मार्च २०१५ अन्वये खाण व खनिजे (विकास व विनियमन) (सुधारणा), अधिनियम, २०१५ प्रसिद्ध केला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९(ब), नुसार राज्य शासनाने खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करावयाचे आहे. त्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ प्रसिद्ध केला आहे. सदर नियमांतर्गत वाळूच्या लिलाव धारकाकडून लिलावाच्या रकमेवर १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास निधी करीता घेण्यात येणार आहे. सदर निधीमधून खनिज बाधित क्षेत्रातील भौतिक पायाभूत सुविधा (रस्ते, पूल, रेल्वे व जलवाहतूक प्रकल्प) निर्माण करण्यात येणार आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

२४१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक ६, दिनांक २० जुलै २०१५.

(२) **विषय.**—डोंबिवली ते कल्याण गट नं. ९ परिसरात खाडी किनारी अवैध रेती उपसा होत असल्याबाबत. सर्वश्री श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २०२९७.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :**– अध्यक्ष महोदय, मा. उच्च न्यायालयाचे आदेश तपासून पाहण्यात येतील. त्यानुसार हा निधी जिल्हा पातळीवर वितरीत करण्यात येत असले तर त्यासंदर्भात तसेच हे शक्य नसल्याचा उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अडथळा येत नसेल तर मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा करून यासंदर्भातील मा. मुख्यमंत्र्यांकडील अधिकार मा. पालक मंत्र्यांना देण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**— केंद्रीय खाण मंत्रालयाने शासन अधिसूचना दिनांक २७ मार्च २०१५ अन्वये खाण व खनिजे (विकास व विनियमन) (सुधारणा), अधिनियम, २०१५ प्रसिद्ध केला आहे. सदर अधिनियमाच्या कलम (९ब) नुसार राज्य शासनाने खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करावयाचे आहे. त्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ प्रसिद्ध केला आहे. सदर नियमात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा खनिज प्रतिष्ठान व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियामक परिषद गठीत करण्यात आली आहे.

(५) **विभागाचा अभिप्राय.**—मान्य.

## महसूल व वन विभाग

२४४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक ६, दिनांक २० जुलै २०१५.

(२) **विषय.**—दोडामार्ग (जि. सावंतवाडी) तालुक्यात गौण खनिज उत्खनननाला पूर्ण बंदी असतानाही मोठ्याप्रमाणात उत्खनन केले जात असल्याबाबत. सर्वश्री श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २५९८२.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :-** अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी वाळू घाट आहेत. जेथे लिलाव होतो. त्या ठिकाणी प्राधान्याये असा निधी वितरीत करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात येतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** केंद्रीय खाण मंत्रालयाने शासन अधिसूचना दिनांक २७ मार्च २०१५ अन्वये खाण व खनिजे (विकास व विनियमन) (सुधारणा), अधिनियम, २०१५ प्रसिद्ध केला आहे. सदर अधिनियमाच्या कलम (९ब) नुसार राज्य शासनाने खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करावयाचे आहे. त्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान करीता गौण खनिजाच्या १० टक्के रक्कम अंशदान म्हणून घेण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर नियमात प्रत्यक्ष बाधित क्षेत्रामध्ये किमान २/३ रक्कम वापरण्याची तरतूद केली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## नगर विकास विभाग

६१४ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५.

(२) **विषय.—** ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये अनेक जुन्या व धोकादायक इमारती अथवा चाळींबाबत राज्य शासनाने धोरण निश्चित करणे. सर्वश्री श्री. प्रताप सरनाईक व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. देवेंद्र फडणवीस :-** अध्यक्ष महोदय, नागपूर अधिवेशनापूर्वी या संदर्भातील अभ्यास पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करू. शासनाने निर्णय घेतल्यानंतर शासन महापालिकेला कळवेल. या नंतर महापालिका या संदर्बात उचित संविधानिक कार्यवाही करेल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**बृहन्मुंबई महानगरपालिकेचा प्रारूप विकास आराखडा-२०३४ व प्रारुप विकास नियंत्रण नियमावली-२०३४ ही कलम २६(१) अन्वये प्रथमतः दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, सदर प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत मोठ्याप्रमाणात मुलभूत चुका झाल्याचे दिसून आल्याने शासन नगरविकास विभागाने शासन निर्णय दिनांक २३ एप्रिल २०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम १५४ अन्वये सदर विकास आराखडा पुनर्प्रसिद्ध करण्याचे निदेश देण्यात आले. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ रोजी **शासन राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेमधील चुकांची सखोल शहानिशा करून सगळ्या चुकांची जागेवरील परिस्थितीनुसीर, गुणवत्तेनुसार, नियोजनाच्या दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून त्यानुरुप दुरूस्ती करून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील प्रकरण तीनच्या तरतुदींचे पालन करून प्रारूप विकास योजना कलम २६ अन्वये महासभेच्या पूर्व मान्यतेने चार महिन्याचे मुदतीमध्ये नागरीकांच्या सूचना /हरकतीसाठी पुनर्प्रसिद्ध करावी, असे शासनाने निर्देश दिले. सदर कालावधीस शासनाने दिनांक ३१ मे २०१६ पर्यंत मुदतवाढ दिली. त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महारनगरपालिकेने पुढील कार्यवाही करून प्रारूप विकास आराखडा २०३४ सह प्रारूप विकास नियंत्रण नियमावली-२०३४ ही कलम २६ अन्वये दिनांक २७ मे २०१६ रोजी प्रसिद्ध केली. त्यानुसार महापालिकेस प्राप्त झालेल्या हरकती/सूचना पत्रांवर नियोजन समितीने सुनावणीची कार्यवाही पूर्ण करून कलम २८(३) अन्वये समितीचा अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला आहे. विकास योजना कलम ३० नुसार शासनास सादर करणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या विनंतीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीचे पत्रान्वये दिनांक १९ मे २०१७ पर्यंत मुदतवाढ दिली असून सदरचे कालावधीत वाढ करणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुन्हा संचालनालयास विनंती केली आहे. त्यानुसार मुदतवाढ प्रस्तावित आहे. अशा रितीने सुधारित विकास योजनेसह सुधारित विकास नियंत्रण नियमावली संबंधी संवैधानिक कार्यवाही महापालिकेचे स्तरावर पूर्ण करून कलम ३० अन्वये विकास योजना शासनास सादर झाली आहे. त्यानुसार आश्वासनाची पुर्तता झाली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य

## महसूल व वन विभाग

६३९ (१) **संदर्भ व दिनांक.—**विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** आदिवासींच्या जमिनींवर विकासकांमार्फत मोठ्याप्रमाणावर अनधिकृत बांधकामामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर आळा घालण्याची निर्माण झालेली गरज श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :–** या संदर्भात मा. मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर, आवश्यक असल्यास संबंधित अधिनियम/नियमात आवश्यक ते बदल करण्याचे इतर तदनुषंगिक कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(४) **सद्य:स्थिती.**—आदिवासी व्यक्तिंच्या जमिनींचे बिगर आदिवासी व्यक्तिंना होणाऱ्या हस्तांतरणा संदर्भात, इतर राज्यात अस्तित्वात असलेल्या कायद्यांची तपासणी करून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारसी सुचविण्याकरिता शा.नि., आदिवासी विकास विभाग, क्र. जजाप-२०१४/प्र.क्र. ७७/का-१४, दिनांक ११ जून २०१४ अन्वये तत्कालिन अ.मु.स. (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने त्यांच्या शिफारशींचा अहवाल दिनांक १८ मे २०१५ रोजी आपल्या विभागाकडे सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशी शासनाने स्वीकारल्या असल्यास त्याचा तपशील आणि सदर अहवालाची अंतिम प्रत या विभागास तात्काळ पाठविण्याबाबत आदिवासी विकास विभागास या कार्यासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०२१ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

६४० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** आदिवासींच्या जमिनींवर विकासकांमार्फत मोठ्याप्रमाणावर अनधिकृत बांधकामामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर आळा घालण्याची निर्माण झालेली गरज श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :–** त्यांच्या शिफारशी येईपर्यंत आणि त्या मान्य होईपर्यंत अशा प्रकारचा निर्णय सरकारला योग्य वाटला तर, राज्य सरकारच्या अधिकारानूसार अनर्जित रक्कम भरुन आदिवासींची जमीन विकण्यास राज्य सरकार परवानगी देईल.

(४) **सद्य:स्थिती.**—आदिवासी व्यक्तिंच्या जमीनींचे बिगर आदिवासी व्यक्तिंना होणाऱ्या हस्तांतरणा संदर्भात, इतर राज्यात अस्तित्वात असलेल्या कायद्यांची तपासणी करून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारसी सुचविण्याकरिता शा.नि., आदिवासी विकास विभाग, क्र. जजाप-२०१४/प्र.क्र. ७७/का-१४, दिनांक ११ जून २०१४ अन्वये तत्कालिन अ.मु.स. (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने त्यांच्या शिफारशींचा अहवाल दिनांक १८ मे २०१५ रोजी आपल्या विभागाकडे सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशी शासनाने स्वीकारल्या असल्यास त्याचा तपशील आणि सदर अहवालाची अंतिम प्रत या विभागास तात्काळ पाठविण्याबाबत आदिवासी विकास विभागास या कार्यासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०२१ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

६४१ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—** आदिवासींच्या जमिनीवर विकासकांमार्फत मोठ्याप्रमाणावर अनधिकृत बांधकामामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर आळा घालण्याची निर्माण झालेली गरज श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री श्री. एकनाथराव खडसे :–** आदिवासींची कोणतीही जमीन बेकायदेशीरपणे कोणाच्या ताब्यात असल्यास ती जमीन काढून घेऊन मूळ आदिवासी व्यक्तीला परत देण्याच्या संदर्भात राज्य शासन कार्यवाही करील. परंतु या संदर्भात उच्च न्यायालयाचे आदेश तपासून पाहिले जातील.

(४) **सद्य:स्थिती.**—सदर आश्वासनाची पूर्तता झालेली असल्याने, सदर आश्वासनावरील शासकीय कार्यवाही संबंधीच्या विवरणपत्राची प्रत या कार्यासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०१८ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास पाठविण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

६४२ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**— आदिवासींच्या जमिनींवर विकासकांमार्फत मोठ्याप्रमाणावर अनधिकृत बांधकामामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर आळा घालण्याची निर्माण झालेली गरज श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :–** असे झाले असेल तर राज्य शासन आदिवासींच्या पाठीशी उभे राहील. अशा स्वरूपाच्या इमारती असल्यास त्या आदिवासींना दिल्या जातील.

(४) **सद्यःस्थिती.**—सदर आश्वासनाची पूर्तता झालेली असल्याने, सदर आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबंधीच्या विवरणपत्राची प्रत या कार्यासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०१८ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास पाठविण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

६४३ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**— आदिवासींच्या जमिनींवर विकासकांमार्फत मोठ्याप्रमाणावर अनधिकृत बांधकामामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर आळा घालण्याची निर्माण झालेली गरज श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :–** कोणत्याही स्थितीत, कोणी काहीही केले तरी आदिवासींच्या जमिनी बेकायदेशीरपणे घेतली गेली असेल तर त्यांना त्या परत देण्याची भूमिका राज्य शासन घेईल.

(४) **सद्यःस्थिती.**—सदर आश्वासनाची पूर्तता झालेली असल्याने, सदर आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबंधीच्या विवरणपत्राची प्रत या कार्यासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०१८ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास पाठविण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

६४४ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**— आदिवासींच्या जमिनींवर विकासकांमार्फत मोठ्याप्रमाणावर अनधिकृत बांधकामामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर आळा घालण्याची निर्माण झालेली गरज श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :–** आदिवासींची, वक्फ बोर्डाची जमीन यापुढे विकता येणार नाही, या संदर्भात वेगळ्या स्वरुपाची तरतूद केली जाणार आहे. या जमिनी विकता येणार नाहीत. हा निर्णय न्यायालयाकडे पाठवला जाणार आहे. या संदर्भात त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले जाणार आहे.

(४) **सद्यःस्थिती.**—सदर आश्वासनाची पूर्तता झालेली असल्याने, सदर आश्वासनावरील शासकीय कार्यवाही संबंधीच्या विवरणपत्राची प्रत या कार्यासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०१८ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास पाठविण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

६४५ (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**— आदिवासींच्या जमिनींवर विकासकांमार्फत मोठ्याप्रमाणावर अनधिकृत बांधकामामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर आळा घालण्याची निर्माण झालेली गरज श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(३) **आश्वासन.—श्री. एकनाथराव खडसे :–** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा शासन जरूर विचार करेल. योग्य मार्ग काढण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न करु.

(४) **सद्यःस्थिती.**—सदर आश्वासनाची पूर्तता झालेली असल्याने, सदर आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबंधीच्या विवरणपत्राची प्रत या कार्यासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०१८ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास पाठविण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

९० (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक ४, दिनांक १६ जुलै २०१५.

(२) **विषय.**— वाडा (जिल्हा पालघर) तालुक्यातील वाडा देवगाव रस्त्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार सर्वश्री. श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) व इतर वि.स.स. यांचा तारांकीत प्रश्न क्रमांक २१७७२.

(३) **आश्वासन.—श्री. प्रविण पोटे-पाटील :–** सन्माननीय सदस्य म्हणत असल्यास पुन्हा एकदा तपासून पाहू.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**वाडा तालुक्यातील देवगाव रस्त्याच्या कामाची तपासणी अधीक्षक अभियंता, दक्षता गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्यामार्फत दिनांक ३ नोव्हेंबर २०१७ रोजी करण्यात आली आहे. या चौकशी संदर्भातील प्राथमिक अहवालानुसार देवगाव रस्त्याच्या कामात काम न करता कंत्राटदारांना देयक अदा केल्याची बाब दिसून आलेली नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

**गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)**

४३ (१) **संदर्भ, दिनांक व मुळ विषय.—**मालाड मालवणी परिसरात गावठी दारु प्राशन केल्याने मृत्यू. सर्वश्री श्री. विजय वडेट्टिवार व इतर वि.स.स. यांची नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.

(२) **आश्वासन.—** निश्चितपणे याची जबाबदारी पोलीस विभाग व एक्साईज डिपार्टमेंट यांच्यावर टाकलीच पाहिजे. अशा प्रकारची नोटीस राज्य शासनाकडून देण्यात येईल.

(३) **सद्यःस्थिती.—**मुंबई शहरातील मालवणी, मालाड परिसरात गावठी दारू प्राशन केल्यामुळे नागरिकांचा झालेल्या मृत्यू प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागातील १ निरीक्षक, १ दुय्यम निरीक्षक व २ जवानांना निलंबित करण्यात आले होते. संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात आली असून विभागीय चौकशीअंती सर्व अपचारी अधिकारी/कर्मचारी यांची पुढील वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात एक वर्ष कालावधीकरिता रोखण्यात यावी, अशी शिक्षा देण्याचा आदेश २७ नोव्हेंबर २०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

(४) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

४४ (१) **संदर्भ, दिनांक व मुळ विषय.—**मालाड मालवणी परिसरात गावठी दारू प्राशन केल्याने मृत्यू. सर्वश्री श्री. विजय वडेट्टिवार व इतर वि.स.स. यांनी नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.

(२) **आश्वासन.—** अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या असून शासन त्याचा अवलंब करेल.

(४) **सद्यःस्थिती.—**(१) राज्यात अवैध मद्यनिर्मिती/विक्री व वाहतुकीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून खालीलप्रमाणे गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

| वर्ष | एकूण गुन्हे | जप्त मुद्येमाल किंमत (कोटी) |
|---|---|---|
| २०१५-१६ | ४२६६० | ७६.०३ |
| २०१६-१७ | ४४८९७ | ८१.४५ |
| २०१७-१८ | ४५३३२ | ९०.६२ |
| २०१८-१९ | ४४०८२ | ९४.०४ |
| २०१९-२० | ४६६४८ | ११५.०७ |
| २०२० (माहे नाव्हेंबरपर्यंत) | २९८५० | ६५.२९ |

(२) राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधीत गुन्हे उघडकीस आणण्यासाठी गुप्त माहिती देणाऱ्या खबऱ्यांना व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गुन्हा अन्वेषण कामी प्रात्साहन मिळावे यासाठी बक्षीस देण्याबाबत दि. ९ ऑक्टोबर २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

राज्यतील अवैध धंद्यांची माहिती मिळावी म्हणून आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. जनतेला तक्रारी करण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८०० ८३३३ ३३३ व व्हॉट्स अप क्रमांक ८४२२० ०१११३ उपलब्ध करून दिलेला आहे. तसेच ग्रामक्षक दलाच्या माध्यमातून अवैध मद्यनिर्मिती व विक्रीच्या धंद्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग प्रयत्नशील आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**५१३** (१) **संदर्भ व दिनांक.**—विधानसभा कामकाज खंड १७३, क्रमांक १४, दिनांक ३१ जुलै २०१५. मा. मंत्री श्री. दिपक सावंत यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.**— मराठवाडा विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष आर्थिक तरतूद करणे सर्वश्री प्रशांत बंब व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम १९३ अन्वये प्रस्ताव

(३) **आश्वासन.**— **डॉ. दिपक सावंत :** हे काम पीडब्ल्यूडीच्या अखत्यारीत आहे. पीडब्ल्यूडी यासंबंधीचे एजन्सी फिक्सिंगचे काम करीत असते. तरीही शासनाच्या माध्यमातून यामध्ये लक्ष घालण्यात येईल, असे मी आश्वासन देतो.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.**—इमारत पूर्ण झालेली असून हस्तांतर ताबा पावती उपभोक्ता खात्यास सादर केलेली आहे. उपभोक्ता खात्याने अद्याप हस्तांतरीत करून घेतली नाही. परंतु सद्य:स्थितीत जुलै २०१४ पासून इमारत वापरात आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.**—मान्य.

# परिशिष्ट - दोन

## (आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय व परिपत्रके)

आश्वासन क्रमांक ९७७

**राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या**
**६ जिल्हयांसाठी विशेष पॅकेज.**

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/ म-७
दिनांक:- १९ डिसेंबर, २००५.

**प्रास्ताविक**

गत काही वर्षात राज्यातील शेतक-यांच्या होत असलेल्या आत्महत्या हा शासनासाठी एक चिंतेचा विषय होता. या आत्महत्येपैकी ज्या आत्महत्या नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करु शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे घडल्या असल्यास, अशा प्रकरणी, एक सहानुभूतीची बाब म्हणून, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून योग्य ती मदत देण्यात येत असे. तथापि, आत्महत्येच्या मुलभूत कारणांचा शोध घेवून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज होती. यासाठी शेतक-यांच्या आत्महत्यांच्या सामाजिक, आर्थिक व मनोवैज्ञानिक अध्ययनासाठी शासनाने इंदिरा गांधी इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. या संस्थेने आपला अहवाल नुकताच शासनाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालाची सखोल समीक्षा करणे व आत्महत्यांचे प्रमाण कमी करणे इत्यादी यांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने तयार केलेल्या प्रस्तावावर विचार करुन, विदर्भातील आत्महत्येचे प्रमाण जास्त असलेल्या सहा जिल्हयासाठी खालीलप्रमाणे एक विशेष पॅकेज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर पॅकेजमध्ये शेतक-यांच्या विकासासाठी व कल्याणासाठी त्रिविध उपाययोजना अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत.

**शासन निर्णय**

सदर पॅकेजच्या तरतूदी विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम व वर्धा या सहा जिल्हयांसाठी लागू राहतील. तथापि, काही तरतूदी, त्या त्या परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार राज्यातील इतर भागासही लागू राहतील.

रोटा/एच-1361(1,500-12-2005)-1

**२. तातडीची मदत.**

राज्यातील कोणत्याही जिल्हयात शेतक-यांची आत्महत्या झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर लगेचच संबंधित उप विभागीय आधिकारी / तहसिलदार, तालुका कृषि अधिकारी तसेच पोलिस ठाणे अधिकारी चौकशी करतील व जिल्हाधिकारी यांच्याकडे अहवाल सादर करतील. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी, जिल्हास्तरीय संबंधित अधिकारी, सेवाभावी संस्था इत्यादींची समिती गठीत करण्यात यावी. या समितीने आत्महत्यांच्या कारणांची तपासणी करावी व ज्या प्रकरणी नापिकी, राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करु शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे घडल्या असल्यास, संबंधित शेतक-यांच्या वारसांना रु. १ लाख मदत देण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे सामाजिक सुरक्षा व कल्याण या लेखाशिर्षाखाली पुरेशी रक्कम ठेवण्यात यावी.

**३. कर्जाची पुनर्बांधणी.**

अ) सदर सहा जिल्हयातील शेतक-यांनी ३० नोव्हेंबर, २००५ अखेर राष्ट्रीयकृत व सहकारी बँकेकडून घेतलेल्या रु.२५,०००/- पर्यंतचे थकित कर्ज व त्यावरील व्याज यांचे, आवश्यकता असल्यास नाबार्डच्या सहमतीने, पुनर्गठन (Rescheduling) करण्यात यावे. या कर्जावरील पुनर्गठनापर्यंतचे देय व्याज शासन अदा करील. अशा पुनर्रचित मुद्दलांच्या वसुलीवर दोन वर्षे बंदी ( Moratorium ) राहील व त्या पुढील तीन वर्षात तीन समान हप्त्यात सदर मुद्दल वसूल करण्यात येईल.

ब) पुनर्गठनानंतर (Rescheduling) वित्तीय संस्थेला कर्जाच्या एकूण रकमेवर अधिकतम ९ टक्के व्याजदर आकारता येईल. संबंधित शेतक-यांनी पुनर्बांधणी कर्जाचे हप्ते मुदतीत परतफेड केल्यास त्यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि सहाय्य योजनेअंतर्गत ४ टक्के व्याज सवलत उपलब्ध होईल. तसेच Moratorium च्या कालावधीमध्ये संबंधित शेतक-यांने स्वतःहून कर्जाची रक्कम व्याजासह परतफेड केल्यास त्यास व्याजामध्ये आणखी दोन टक्के सवलत शासनाकडून देण्यात यावी.

**४. सावकारी कर्जाचे आवश्यक नियमन.**

राज्यातील सर्वच जिल्हयातील मान्यताप्राप्त नसलेल्या सावकारांकडून घेण्यात आलेली सर्व कर्जे बेकायदेशीर असल्याने त्या कर्जाची परतफेड करणे, संबंधित शेतक-यांवर बंधनकारक असणार नाही. सदर कर्जातून सर्व शेतक-यांना पूर्णपणे मुक्त समजण्यात यावे. या कर्जमुक्तीला आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी. परवानाधारक सावकारांमार्फत दिलेल्या कर्जावरसुध्दा सावकारी कायद्याप्रमाणे ठरवून दिलेला व्याजदर लागू राहील. याबाबतची सखोल तपासणी संबंधित विभागाने करावी.

**५. दामदुपटीचा नियम सर्व सहकारी कर्जाला लागू.**

शेतक-यांनी सहकारी बँकेतून घेतलेले अल्प, मध्यम व दीर्घ मुदत कर्जाला दामदुपटीचा नियम लागू केला जाईल, जेणेकरुन शेतक-याला द्यावे लागणारे व्याज मुद्दलापेक्षा जास्त होणार नाही.

**६. शेतक-यांच्या स्वयंसहायता गटामार्फत कर्जवाटप.**

अ) राज्यात अनेक ठिकाणी स्वयंसहायता गटामार्फत झालेल्या कर्जपुरवठयाचा चांगला उपयोग होऊन उत्पन्नात तसेच कर्ज परतफेडीच्या प्रमाणात झालेली वाढ लक्षात घेता, सदर सहा जिल्हयात शेतक-यांचे स्वयंसहायता गट तयार करुन त्यांच्यामार्फत राष्ट्रीयकृत, खाजगी व सहकारी बँकाकडून शेतीकर्ज पुरवठा वाढविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात.

ब) मागणीनुसार सर्व शेतक-यांना आवश्यक पतपुरवठा होईल. यासाठी विविध वित्तीय संस्थांना प्रोत्साहन देण्यात यावे.

**७. पतपुरवठा व्यवस्थांचे पुनरुज्जीवन.**

अ) सदर जिल्हयातील कर्ज पुनर्रचित झालेल्या शेतक-यांना पुढील हंगामात शेती उत्पादन खर्च व इतर अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी जास्तीत जास्त २५ हजार रुपयांची पतमर्यादा, आवश्यकते प्रमाणे नाबार्ड / भारतीय रिजर्व बँकेची परवानगी घेऊन, किसान क्रेडीट कार्डच्या माध्यमातून ९ टक्के दरसाल व्याज दराने देण्यात यावी.

ब) या पत मर्यादेतून शेतक-याला आवश्यक वाटेल, त्या त्या वेळी पैसे उचलून शेती व अनुषंगिक खर्च भागवता येईल. उचललेल्या रकमांवर प्रत्यक्ष उचल केलेल्या तारखांपासून व्याज आकारले जावे. परतफेड मुदतीत केल्यास व्याजाच्या दरात ४ टक्के सवलत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि सहाय्य योजनेतून देण्यात यावी. म्हणजेच शेतक-यांना दरसाल प्रत्यक्ष ५ टक्केच व्याज द्यावे लागेल.

क) सदर कर्जासाठी कुठल्याही प्रकारचे तारण द्यावे लागणार नाही.

**८. पीक विमा योजनेच्या विमा हप्त्यात सवलत.**

सदर सहा जिल्हयात केंद्र शासनाची पीक विमा योजना अस्तित्वात आहे. या योजनेमध्ये ८० टक्के जोखीम स्तरासाठी खालीलप्रमाणे विमा हप्त्याचा भार शासनाने सोसावा.

| | | |
|---|---|---|
| कापूस | अल्प, अत्यल्प भूधारक | ७५ टक्के |
| | इतर भूधारक | ५० टक्के |
| इतर पिके | अल्प, अत्यल्प भूधारक | ५० टक्के |

**९. उत्पादन वाढीसाठी शेतक-यांना आर्थिक मदत.**

आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या सहा जिल्हयातील एकूण ६० हजार शेतक-यांना पुढील तीन वर्षात उत्तम शेती करता यावी, यासाठी जमीन सुधारणा, मूळस्थानी जलसंधारण, सेंद्रीय शेती पध्दतीचा वापर, बियाणे, जैविक खते, जैविक औषधे खतांचा एकात्मिक वापर यासारख्या घटकांसाठी प्रत्येक शेतक-याला एकूण रु. २५ हजार पर्यंतची (तीन वर्षाच्या कालावधीत) मदत देण्यात यावी. या योजनेखालील जिल्हानिहाय लाभार्थी लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित केले जाईल.

**१०. शेती संलग्न व्यवसायाला चालना.**

अ) सदर सहा जिल्हयात शेतक-यांच्या स्वयंसहायता गटाला शेती संलग्न जोडधंद्यासाठी उदा. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगकरीता बँक कर्ज व अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे.

.५.

ब) सदर सहा जिल्हयात दरवर्षी एकूण तीन हजार स्वयंसहायता गटामार्फत एकूण ६० हजार शेतक-यांना अनुदान व कर्ज देवून हे जोडधंदे उभारण्यात यावेत.

क) प्रत्येक स्वयंसहायता गटाला रु. १ लक्ष अर्थसहाय्य वाटप करण्याचे उद्दिष्ट असेल. या योजनेखालील जिल्हानिहाय लाभार्थी लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित केले जातील.

**११. कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना.**

सदर सहा जिल्हयात सहकारी क्षेत्रामध्ये शेतमालावर आधारित कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना मिळावी यासाठी सहकारी तत्वावर उभारण्यात येणाऱ्या प्रक्रिया उद्योगांना १ : ५ या प्रमाणात भाग-भांडवल उपलब्ध करुन देण्यात यावे.

**१२. कापसाच्या संयुक्त शेतीला प्रोत्साहन देणे.**

अ) सदर सहा जिल्हयात कापसाच्या संयुक्त शेतीकरीता टेक्सटाईल मिल्स व जिनिंग व प्रेसिंग मिल यांच्याशी शेतकऱ्यांना थेट जोडून त्यांना लागणाऱ्या उच्च प्रतीच्या कापूस उत्पादनाचे प्रकल्प हाती घेण्यात यावेत.

ब) या संयुक्त प्रकल्पात कापसाची उत्पादकता वाढविण्याकरीता शेतकरी, कृषी विभाग व टेक्स्टाईल मिल यांच्यात संयुक्त शेतीपध्दत अवलंब करण्यास सामंजस्य करारनामा एमओयू करण्यात यावा.

**१३. मुलीच्या लग्नासाठी सामुहिक विवाह योजना.**

सदर सहा जिल्हयांतील शेतकरी त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी कर्जबाजारी होऊ नये, म्हणून सामुहिक विवाहाच्या संकल्पनेला प्रोत्साहन देण्यात यावे व त्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी रु. १ कोटीची वार्षिक तरतुद करण्यात यावी.

**१४. भांडवल उभारणी निधीची परतफेड.**

मागील काही वर्षांपासून राज्य सरकारच्या भूमिकेत फक्त सेवा देण्याऐवजी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणारा (facilitator) असा बदल झाला आहे. राज्यात गुंतवणूक आकर्षित करण्याकरीता राज्य सरकार गुंतवणूक प्रोत्साहने व सोयी-सुविधांची माहिती गुंतवणूकदारांना देण्याच्या दृष्टीकोनातून अधिक प्रयत्न करीत आहे. उद्योजकाला एक खिडकी योजनेअंतर्गत सरकारच्या विविध संस्थांचे परवाने एकाच ठिकाणी मिळण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये उद्योग सेतूची स्थापना करण्यात आली आहे. या अंतर्गत एक खिडकी पोर्टल तसेच महा-ई-बीझ सुरु होण्याच्या मार्गावर आहेत. या सर्व प्रयत्नांनंतर सुध्दा गुंतवणूकदारांना सोयी-सुविधा व मदतीसाठी एक स्वतंत्र कक्ष असणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्याकरीता राज्य सरकारने खालील बाबी तसेच इतर अनुषंगिक बाबींवर विचार करण्यासाठी प्रधान सचिव (उद्योग) यांचे अधिपत्याखाली एकात्मिक कक्ष स्थापन करण्याचे योजिले आहे.

- गुंतवणूकीत वाढ, तसेच गुंतवणूक वाढीसाठी कार्यक्रमांचे नियोजन व सहभाग आणि या प्रयोजनार्थ परिपूर्ण माहितीच्या निर्मिती व प्रचार.
- मार्गदर्शक सेवेच्या (Escort Services) माध्यमातून मदत, वेब बेस्ड पोर्टलचे व्यवस्थापन, विविध शासकीय विभागांबरोबर समन्वय
- प्रकल्प सल्लागार सेवा
- गुंतवणूक वाढीसाठी कक्ष.
- प्रकल्प सल्लागार सेवा
- गुंतवणूकी नंतरच्या सेवासाठी कक्ष.
- विदेशी गुंतवणूकदारांसाठी कक्ष.
- अर्थ व सांख्यिकी माहिती कक्ष.

वरील कक्षांच्या उभारणीसाठी शासनाकडून आवश्यक मदत पुरविण्यात येईल.

### ६.२ महा-ई-बीज पोर्टलची ऑन लाईन सेवा :

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परिपूर्ण व सर्वसमावेशक होण्याच्या दृष्टीकोनातून नवीन डिजीटल इन्व्हेस्टर पोर्टल विकसित केले आहे. गुंतवणूकदारांना एकत्रित माहिती, सेवा, परवाने एकत्रितरित्या संगणकावर पुरविणे(One Stop Portal) हा या पोर्टलचा उद्देश आहे. लवकरच महा-ई-बीझद्वारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व उद्योग संचालनालय यांचेकडून पुरविल्या जाणाऱ्या पूर्णपणे स्वयंचलीत ४५ सेवासह २०५ पेक्षा जास्त् सेवा आणि राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या विविध विभागांकडून नॉन ऑटोमेटेड १६० सेवा पुरविल्या जातील. या सेवांची वर्गवारी विविध क्षेत्र आणि उद्योगांमध्ये करण्यात आली आहे. गुंतवणूकदार , भूखंडधारक तसेच भावी गुंतवणूकदारांच्या लाभासाठी या सेवांची वर्गवारी राज्य तसेच केंद्र शासनाच्या विविध विभागांमध्ये करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत, या पोर्टलद्वारे ४५ पूर्णपणे स्वयंचलीत सेवांद्वारे विविध मंजूऱ्या उद्योजक प्राप्त करुन घेऊ शकतील.

एक खिडकी योजना अधिक प्रभावी करण्याकरीता शासन वरील बाबींबरोबर खालील नवीन गोष्टींचाही समावेश करील.

एक) एसएमएस सुविधा.
दोन) प्रदानांसाठी सुविधा.
तीन) बारकोड ट्रॅकिंग सेवा.
चार) बॅक एंड प्रोसेसिंग थ्रु इआरपी.
पाच) कामगार व महावितरण यांची उद्योग विभागासोबत जोडणी.
सहा) महाराष्ट्र औद्योगिक विकास क्षेत्राबाहेर अग्निशमन सेवेची उपलब्धता.

या पोर्टलची सेवा ही सिंगल विंडो पोर्टल म्हणून विस्तारीत होणार असून त्याद्वारे औद्योगिक वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून उद्योग विभाग त्याचप्रमाणे उद्योगाच्या अनुषंगाने संबंध येणारे शासनाच्या विविध स्तरावरील इतर विभाग / संस्था याद्वारे दिले जाणारे आवश्यक ते परवाने, मंजूऱ्या, विवरणपत्र सादर करणे, इत्यादी सुविधा पुरविण्यात येतील.

### ६.३ महाराष्ट्राचा ब्रँड तयार करणे : 'मॅग्नेटिक महाराष्ट्र, अॅट्रॅक्शन्स अनलिमिटेड'

प्रमुख आर्थिक उलाढालींकरीता महाराष्ट्र हे भारतातील तसेच जगातील महत्वाचे ठिकाण आहे. गुणवत्तापूर्ण उत्पादन, नवीन तंत्रज्ञान, सुरक्षा व उच्च दर्जाच्या औद्योगिक पायाभूत सुविधांमुळे आकर्षक गुंतवणूकीसाठी सर्वाधिक पसंतीचे ठिकाण म्हणून महाराष्ट्राच्या ब्रँडची उभारणी करावयाचे शासनाचे ध्येय

आहे. याशिवाय, गुंतवणूकदारांना जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधां उपलब्ध करुन देणे, व्यवसाय करण्यासाठी सुकरता, कुशल मनुष्यबळ आणि सर्वात महत्वाचे म्हणजेच " मॅग्नेटिक महाराष्ट्र" मध्ये अविरत आकर्षण असल्याचा विश्वास निर्माण करणे यासाठी शासन वचनबध्द आहे.

राज्यातील उत्पादन हे उच्च गुणवत्तेचे, पर्यावरणपूरक व किंमतीच्या दृष्टीने स्पर्धात्मक राहील असा विश्वास ब्रँड महाराष्ट्र जगाला देईल. या औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून औद्योगिक विकासाच्या तंत्राद्वारे महाराष्ट्राचा दर्जा उंचावतांना, सुक्ष्म उद्योगांपासून विशाल प्रकल्पा पर्यंतच्या सर्व उद्योगांचा सर्वांगीण विकास होईल, मोठया प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, कुशल मनुष्यबळाच्या कमतरतेची पूर्तता होईल आणि विशेष महत्वाचे म्हणजे राज्यातील प्रादेशिक विकासात समतोल राखण्यात येईल अश्या पध्दतीने " **ब्रँड** " निर्मीतीस प्रोत्साहन देण्यात येईल.

**६.४ प्रशासकीय कार्यपध्दतीचे सुलभीकरण :**

**अ) बहुविध करांसाठी सिंगल इंटरफेस.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक क्षेत्रे ही महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती अशा विविध स्थानिक प्राधिकरणांच्या अधिपत्याखाली येतात. या विविध प्राधिकरणे व त्यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या करांमुळे गुंतवणूकदारासाठी परवाने मंजूरीची प्रक्रिया ही गुंतागुंतीची व खर्चिक होते. हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडून पुर्नविलोकन करण्यात येऊन एक खिडकी (सिंगल इंटरफेस ) उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यकतेनुसार संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

**ब) कामगार ना-हरकत प्रमाणपत्र :**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील जागेच्या हस्तांतरणाकरीता कामगार विभागाकडून मिळवावयाच्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या,लेबर सेस आणि कामगार विभागाशी संबधीत इतर बाबीच्या प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात येईल.

**क) संगणकीकरण :**

संपूर्ण सामुहिक प्रोत्साहन योजनेचे संगणकीकरण करण्याचे काम राज्य शासनाने सुरु केले आहे. एकत्रित संगणकप्रणाली तयार करण्यात येत असून ती लवकरच कार्यान्वित करण्यात येईल. अर्जाचे सादरीकरण, त्यावरील प्रक्रिया, सद्यस्थितीची पडताळणी, पात्रता प्रमाणपत्राची संगणकीकृत पोचपावती, औद्योगिक प्रोत्साहन अनुदान तसेच इतर दाव्यांची मंजूरी, पाठपुरावा अहवाल सादर करणे, इत्यादी बाबी संगणकीकरणाद्वारे होणार आहेत.

**ड) व्यवसायातील कार्यपध्दतीमध्ये सुधारणा**

याव्यतिरिक्त उद्योगांना दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवा, मंजुऱ्या व परवान्यांशी संबंधित कार्यपध्दतीचा आढावा शासनाकडून घेतला जाईल.

**७) कुशलता विकास**

औद्योगिक उत्पादनासाठी कुशल मनुष्यबळाची कमतरता हा एक मोठा भेडसावणारा प्रश्न आहे. त्याचे निराकरण करण्यासाठी राष्ट्रीय कुशलता विकास धोरण तयार करण्यासाठी मा. पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली कुशलता विकासासाठी राष्ट्रीय परिषद गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार, राष्ट्रीय परिषदेने अतिरिक्त ५० कोटींचे कुशल मनुष्यबळ राष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन देण्याचे ध्येय ठेवले आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने सन २०२२ पर्यंत ४.५० कोटी कुशल मनुष्यबळ निर्मितीचे लक्ष्य ठेवले आहे. या राष्ट्रीय परिषदेअंतर्गत राज्य शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत राज्य स्तरावर तसेच

विभागीय स्तरावर कुशलता विकासासाठी व्यवस्थापन समितीची स्थापना केली आहे. या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या समित्या तसेच संबंधित उद्योग यांनी समन्वयाने विशिष्ट कुशल तंत्रज्ञानाची गरज, त्याची मागणी व पुरवठा यातील तूट निश्चित करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच औद्योगिक संघटना यांचेमध्ये समन्वय साधण्यासाठी शासन प्रधान सचिव (उद्योग) यांचे अधिपत्याखाली ) "कौशल्य विकास आणि वृध्दी कक्ष"Skill Development and Enhancement Cell ( ची स्थापना करणार आहे.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यास औद्योगिक घटकाच्या मागणीनुसार प्रशिक्षण देण्यासंदर्भात महत्वाची भूमिका बजावण्यासाठी अधिक मजबूत करण्यात येईल. औद्योगिक प्रशिक्षण संस्था व इतर व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांनाही कामगारांची कौशल्य तूट निश्चित करण्याकामी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त, औद्योगिक संघटनांनाही उद्योग घटकांमध्ये औद्योगिक घटकांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यासाठी उद्युक्त करण्यात येणार आहे. याकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मदतीने उद्योग विभागामार्फत ठोस पावले उचलली जातील.

## ८) विशाल व मोठया उद्‍योगांना प्रोत्साहन देणे

### १) विशाल प्रकल्प

विशाल प्रकल्पांमुळे मिळणारे बहुविध फायदे लक्षात घेऊन तशा स्वरुपाची गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी या प्रकल्पांना विवक्षित एकत्रित प्रोत्साहने (Customised Package) देण्याचे ठरविण्यात आले आहे. उद्योगांचे राज्याच्या सर्व विभागात विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

खालील तक्ता -१ मध्ये दर्शविलेल्या किमान मर्यादांनुसार स्थिर भांडवली गुंतवणूक असलेले किंवा प्रत्यक्ष नियमित रोजगार निर्माण करणारे उत्पादक घटक अतिविशाल किंवा विशाल प्रकल्प म्हणून संबोधण्यात येतील.

**तक्ता - १**

| घटकांचे प्रकार | तालुका / क्षेत्र निहाय वर्गवारी | किमान स्थिर भांडवली गुंतवणूक (रु. कोटीत) | किमान प्रत्यक्ष रोजंदारी निर्मिती (व्यक्ती संख्या) |
|---|---|---|---|
| विशाल औद्‍योगिक घटक (मेगा इंडस्ट्रीयल युनिट ) | अ आणि ब | ७५० | १,५०० |
| | क | ५०० | १००० |
| | ड आणि ड+ | २५० | ५०० |
| | विना उद्योग जिल्हे आणि नक्षलग्रस्त क्षेत्र | १०० | २५० |
| अति विशाल औद्‍योगिक घटक (अल्ट्रा मेगा इंडस्ट्रीयल युनिट) | संपूर्ण राज्यात | १५०० | ३००० |

अ) विशाल प्रकल्पांसाठी तालुक्याच्या वर्गवारीनुसार वरील तक्त्यात दर्शविलेल्या रोजगार निर्मितीच्या किमान मर्यादेपेक्षा दुप्पट रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांना अतिरिक्त प्रोत्साहने देण्यात येतील.

ब) शासन निर्णय क्रमांक आयडीएल-१००५/प्र.क्र.११९/उद्योग-८, दिनांक २ जून, २००५ अन्वये मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली उच्चाधिकार समिती विशाल प्रकल्पांना / अतिविशाल प्रकल्पांना द्यावयाच्या प्रकरणनिहाय विवक्षित एकत्रित प्रोत्साहनांना (कस्टमाईझड पॅकेज) मान्यता देईल. तसेच शासन निर्णय क्रमांक आयडीएल - १०९७/(१३४७८)/उद्योग ८ दिनांक १८ जानेवारी १९९८ अन्वये

स्थापन करण्यात आलेली व आयडीएल-१००४/प्र.क्र. ३१८/उद्योग-८, दिनांक २४ डिसेंबर, २००४ अन्वये पुनर्रचीत करण्यात आलेली मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील उद्योगांकरिता मंत्रीमंडळ उपसमिती (कॅबिनेट सब कमिटी ऑन इंडस्ट्रि) विशाल प्रकल्पांना /अतिविशाल प्रकल्पांना अधिकच्या सवलती व प्रोत्साहने तसेच अटी / शर्तींमध्ये सूट, इ. देण्यास मान्यता देवू शकेल.

**२) मोठे उद्योग :**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अधिनियम-२००६ नुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या गुंतवणूक मर्यादेपेक्षा जास्त गुंतवणूक असणा-या उद्योगांची गणना मोठे उद्योग म्हणून करण्यात आली आहे. औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित असलेल्या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास मदत होण्याच्या दृष्टीकोनातून अशा मोठया उद्योग घटकांना खालील प्रोत्साहने देण्यात येतील.

मोठया उद्योगांना देण्यात येणा-या सर्व प्रोत्साहनाची (Basket of Incentives) एकूण मर्यादा खालील तक्त्यातील मर्यादेत व पुढील अटी व शर्तींनुसार राहील.

**तक्ता-२**

| तालुका/क्षेत्र निहाय वर्गीकरण | अनुज्ञेय भांडवली गुंतवणूकीच्या टक्केवारीत प्रोत्साहनांची आर्थिक मर्यादा (%) | पात्रता कालावधी (वर्षे) |
|---|---|---|
| अ | -- | ७ |
| ब | -- | ७ |
| क | ३० | ७ |
| ड | ४० | ७ |
| ड+ | ५० | ७ |
| विना उद्योग जिल्हे | ७० | ७ |
| नक्षलग्रस्त क्षेत्र | ८० | ७ |

टिप- दरवर्षी देण्यात येणारी प्रोत्साहने ही एकूण प्रोत्साहने व पात्रता कालावधी यांच्या प्रमाणात असतील.

अ) राज्यातील अ व ब तालुके वगळता, इतर भागातील पात्र उद्योग घटकांना त्यांनी उत्पादन केलेल्या पात्र उत्पादनांवर (फिनिशड प्रोडक्ट) स्थानिक विक्रीवरील ६० ते १०० टक्के मूल्यवर्धीत कर वजा इनपुट टॅक्स क्रेडीट किंवा शून्य यापैकी जे जास्त असेल तेवढा मूल्यवर्धीत कर अधिक केंद्रीय विक्रीकर इतक्या मर्यादेपर्यंत औद्योगिक विकास अनुदान दरवर्षी दिले जाईल.

ब) राज्यातील अ व ब वर्ग तालुके वगळता इतर भागातील अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देण्याच्या दृष्टीकोनातून वरील तक्त्यात दर्शवलेल्या भांडवली गुंतवणुकीच्या टक्केवारीत द्यावयाच्या प्रोत्साहनाच्या आर्थिक मर्यादेपेक्षा अतिरिक्त 10 टक्के औद्योगिक विकास अनुदान देण्यात येईल आणि पात्रता कालावधीत 1 वर्षाची वाढ करण्यात येईल.

क) राज्यातील पात्र घटकांच्या ऊर्जा लेखा परीक्षण (ऑडिट) आणि पाणी लेखा परीक्षणासाठी (ऑडीट) झालेल्या एकूण खर्चाच्या 75 टक्के व जास्तीत जास्त अनुक्रमे रु.2 लाख आणि रु.1 लाख इतका परतावा अनुज्ञेय राहील. हे लेखा परीक्षण निवड केलेल्या यादीतील संस्थांकडून करण्यात येईल. तसेच वीज आणि पाणी बचत करण्याच्या संदर्भात उद्योग घटकाने खरेदी केलेल्या यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या 50 टक्के व जास्तीत जास्त प्रत्येकी रु.5 लाख इतक्या मर्यादेपर्यंत परतावा अनुदान अनुज्ञेय राहिल व या अनुदानाचा समावेश एकूण पात्र प्रोत्साहन रकमेच्या आर्थिक मर्यादेत असेल.

ड ) वरील प्रोत्साहनांव्यतिरिक्त अ व ब वर्गीकृत क्षेत्रे वगळता इतर क्षेत्रातील पात्र मोठया उद्योगांना गुंतवणूक कालावधीत जमीन संपादन करण्यासाठी(असाईनमेंट लीज व विक्री प्रमाणपत्रासह) व मुदत कर्जासाठी मुद्रांक शुल्कातून 100 टक्के सूट देण्यात येईल. मात्र अ व ब क्षेत्रातील फक्त माहिती तंत्रज्ञान व जैव तंत्रज्ञान उद्यानातील व माहिती तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान पात्र घटकांना मुद्रांक शुल्क सूट देण्यात येईल. तसेच सामुहिक प्रोत्साहन योजना 2007 अंतर्गत पात्र ठरविलेल्या घटकांना सदर योजनेत स्पष्ट केल्याप्रमाणे गुंतवणूक कालावधीत मुद्रांक शुल्क सूट देण्यात येईल.

इ) वरील प्रोत्साहनांव्यतिरिक्त अ व ब वर्गिकृत क्षेत्रे वगळता इतर क्षेत्रातील पात्र नवीन उद्योग घटकांना पात्रता कालावधीकरिता विद्युत शुल्क देण्यापासून सूट देण्यात येईल. मात्र अ व ब क्षेत्रातील पात्र १००% मोठे निर्यातक्षम उद्योग, पात्र मोठे माहिती तंत्रज्ञान घटक आणि जैव तंत्रज्ञान घटकांना विद्युत शुल्कातून सात वर्षे सूट देण्यात येईल.

## ९) सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना पाठिंबा

### ९.१ समूह विकास- नवीन योजनांतर्गत योजना

वैयक्तिक सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम यशस्वी करण्यासाठी आणि त्यांचा विकास करण्यासाठी आर्थिक बचत, व्यवहारांच्या खर्चातील कपात, माहितीचा प्रसार, बाजारपेठेचा विकास, स्थिर किंमतीने कच्च्या मालाचा पुरेसा पुरवठा, तांत्रिक माहिती आणि आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता समूह विकास योजनेमुळे होत असल्यामुळे त्याद्वारे या उपक्रमांची स्पर्धात्मक क्षमता सुधारण्यास मदत होते.

भारत सरकारच्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालयातर्फे सामायिक सुविधा केंद्रासाठी (कॉमन फॅसिलिटी सेंटर-सीएफसी) आर्थिक सहाय्य देण्यात येते. शासन निर्णय एसएमई २००९/(२२९)/उद्योग-७ दि. ९.६.२०१० आणि एसएमई २०१०/(१०१७)/उद्योग-७, दि. २२.१०.२०१० नुसार देय असलेले सहाय्य अशा घटकांना यापुढे चालु ठेवण्याचे प्रस्तावित आहे. राज्यातील औद्योगिक दृष्ट्या अविकसित क्षेत्रातील छोट्या समुहांनादेखील ही संकल्पना लागू करण्याची गरज आहे.

या संबंधात मान्यताप्राप्त सामायिक सुविधा केंद्रांना संयंत्र व यंत्रसामग्रीवरील खर्चाच्या ७० टक्के इतके आर्थिक सहाय्य राज्य शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात देण्यात येईल. १०० टक्के सुक्ष्म उपक्रम असणा-या उपक्रमांकरीता किंवा किमान ५० टक्के महिला-प्रचालित उपक्रमांकरिता, हे अनुदान ८० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येईल. सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी आणि सामायिक सुविधा केंद्र उभारण्यासाठी मिळणारे अनुदान प्रति समुह जास्तीत जास्त रु. ५ कोटी इतके मर्यादित राखण्यात येईल. (प्रकल्प खर्चात जमिन, इमारत, संयंत्र आणि यंत्रसामुग्री व कार्यान्वयन-पूर्व खर्चाचा समावेश असेल.)

या प्रयोजनासाठी गठीत करण्यात आलेल्या विशेष हेतु संस्थांना ( Special Purpose Vehicle) सहाय्य देण्यात येईल. सामुहिक प्रोत्साहन योजना अंतर्गत निश्चित केल्याप्रमाणे ड ड + क्षेत्र, विना उद्योग जिल्हे आणि नक्षलग्रस्त भागात स्थापित करण्यात येणारी सामाईक सुविधा केंद्रे नवीन राज्य सामाईक सुविध सहाय्य योजनेंतर्गत राज्याचे सहाय्य मिळण्यास पात्र राहतील.

### ९.२ स्पर्धात्मकता वाढीसाठी कार्यक्रम

राष्ट्रीय उत्पादन स्पर्धात्मक कार्यक्रम (एनएमसीपी) खाली सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये स्पर्धात्मक होण्यासाठी पाठिंबा देण्याकरिता सन २००५ मध्ये राष्ट्रीय उत्पादन स्पर्धात्मकता परिषद स्थापन करण्यात आली.

एनएमसीपी ला पूरक म्हणून आणि महाराष्ट्रातील औद्योगिक दृष्ट्या अविकसीत भागात असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांपर्यंत पोहचण्यासाठी, राज्य शासनातर्फे राज्य उत्पादन स्पर्धात्मकता कार्यक्रम (एसएमसीपी) सुरु करण्यात येईल.

एसएमसीपी अंतर्गत खालील माध्यमातून मदत देण्यात देईल:- विक्री मदत योजना, कौशल्य विकास योजना, उत्पादन वाढविण्यासाठी तसेच डिझाईन मदत योजना.

अ) **विक्री मदत योजना:-** सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्रीत वाढ करण्यासाठी त्यांची स्पर्धात्मकता वाढविण्याकरिता, राज्य शासन पॅकेजिंग पध्दतीत व तंत्रज्ञानात श्रेणीवाढ करण्यासाठी तसेच राज्य/जिल्हा स्तरावर प्रदर्शनां मध्ये भाग घेण्यासाठी मदत करेल.

ब) **कुशलता विकास योजना:-** सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांवरील पंतप्रधान कार्यबल समितीच्या निष्कर्षांनुसार देशांमध्ये जरी मोठया प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध असले तरी उत्पादन क्षेत्राला कुशल मनुष्यबळ मिळणे आणि त्यांनी सारख्या नोकऱ्या बदलणे या दोन भेडसावणाऱ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी, राज्य शासनाने गरजेवर आधारीत कुशलता विकास कार्यक्रम तयार करुन कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित केले आहे.

क) **उत्पादन वाढविण्यासाठी मदत योजना:-** ही योजना, सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना अपव्यय कमी करण्यासाठी, उप्तादकता वाढविण्यासाठी, नवनवीन प्रथा सुरु करण्यासाठी आणि चांगली व्यवस्थापन यंत्रणा पुन्हा: सुरु करण्यासाठी, लागू करण्यात येईल. उत्पादन वाढविणारी तंत्रे कार्यान्वित करण्यासाठी सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना पाठिंबा देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे, ज्यामुळे त्यांना अधिक चांगले मनुष्यबळ व्यवस्थापन, जागेचा सुधारित वापर, उत्कृष्ट खरेदी व्यवस्थापन, सुधारित प्रक्रिया याव्दारे उत्पादन खर्च कमी करणे तसेच त्यांची उत्पादन खर्चातील स्पर्धात्मकता वाढविण्यास मदत होईल.

ड) **डिझाईन मदत योजना:-** डिझाईन मदत योजना ही सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमध्ये डिझाईन आणि नाविन्यपूर्णता आणण्यासाठी विकसित करण्यात आली आहे. डिझाईन मध्ये सुधारणा करुन सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम त्यांच्या उत्पादनांचे मुल्यवर्धन करुन त्याव्दारे अधिक स्पर्धाक्षम होतील.

हा कार्यक्रम सामाईक सुविधा केंद्रे, उद्योग संघटना आणि नामवंत निर्यातदार संघटना व संस्था उभारण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष हेतू वाहन संस्थांच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात येईल. या संबंधात सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत राज्य स्तरीय समितीकडून सविस्तर घटक-निहाय कार्यपध्दती आणि धोरण आखण्यात येईल.

**९.३ सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना आर्थिक सवलती :**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत म्हणून सामुहिक प्रोत्साहन योजना अंतर्गत एकत्रित आर्थिक सवलती देण्यात येतील ज्यामुळे अशा घटकांना प्राथमिक अवस्थेत सक्षम होण्यास मदत होईल. सदर योजनेअंतर्गत सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक राज्यातील अविकसित भागांमध्ये स्थापन करण्यास उत्तेजन मिळेल या दृष्टीकोनातून प्रोत्साहने देण्यात आली आहेत. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना देण्यात येणा-या सर्व प्रोत्साहनाची (Basket of Incentives) एकूण मर्यादा खालील तक्त्यातील मर्यादेत व पुढील अटी व शर्तीनुसार राहील.

तक्ता-३

| तालुका/क्षेत्र निहाय वर्गीकरण | अनुज्ञेय भांडवली गुंतवणूकीच्या टक्केवारीत प्रोत्साहनांची आर्थिक मर्यादा | पात्रता कालावधी (वर्षे) |
|---|---|---|
| अ | - | ७ |
| ब | २० | ७ |
| क | ४० | ७ |
| ड | ७० | १० |
| ड+ | ८० | १० |
| विना उद्योग जिल्हे | ९० | १० |
| नक्षलग्रस्त क्षेत्र | १०० | १० |

टिप- दरवर्षी देण्यात येणारी प्रोत्साहने ही एकूण प्रोत्साहने व पात्रता कालावधी यांच्या प्रमाणात असतील.

अ) राज्यातील अ तालुके वगळता, इतर भागातील पात्र घटकांना त्यांनी उत्पादन केलेल्या पात्र उत्पादनांवर (फिनिशड प्रोडक्ट) स्थानिक विक्रीवरील मूल्यर्धीत कर वजा इनपुट टॅक्स क्रेडीट किंवा शून्य यापैकी जे जास्त असेल तेवढा मूल्यवर्धीत कर अधिक केंद्रीय विक्रीकर अधिक इनपुट टॅक्स क्रेडीटच्या २० टक्के ते १०० टक्के इतक्या मर्यादेपर्यंत औद्योगिक विकास अनुदान दरवर्षी दिले जाईल.

ब) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या भागातील व कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयातील ( 'अ' वर्गीकृत तालुके वगळता ) नवीन पात्र उद्योग घटकांना विद्युत देयकापोटी रु. १/- प्रति युनिट व राज्याच्या इतर भागात ( अ वर्गीकृत तालुके वगळून) रु. ०.५० प्रति युनिट या दराने उत्पादनाच्या दिनांकापासून तीन वर्षासाठी अनुदान देणे अनुज्ञेय राहील.

क) राज्यातील अ व ब तालुके वगळता, इतर भागातील पात्र घटकांना, पात्रता कालावधींसाठी त्यांनी स्थिर भांडवली मालमत्ता संपादन करण्याकरिता घेतलेल्या मुदत कर्जावर ५ टक्के पर्यंत व्याज अनुदान संबंधित पात्र घटकाने त्या त्या वर्षासाठी वापरलेल्या व भरलेल्या वीज देयकांच्या रक्कमेच्या मर्यादेपर्यंत दिले जाईल.

ड) राज्यातील अ वर्ग तालुके वगळता इतर भागातील अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देण्याच्या दृष्टीकोनातून वरील तक्त्यात दर्शवलेल्या भांडवली गुंतवणुकीच्या टक्केवारीत द्यावयाच्या प्रोत्साहनाच्या आर्थिक मर्यादेपेक्षा अतिरिक्त 10 टक्के औद्योगिक विकास अनुदान देण्यात येईल आणि पात्रता कालावधीत 1 वर्षाची वाढ करण्यात येईल.

इ) राज्यातील पात्र घटकांच्या ऊर्जा लेखा परीक्षण (ऑडिट) आणि पाणी लेखा परीक्षणासाठी (ऑडीट) झालेल्या एकूण खर्चाच्या 75 टक्के व जास्तीत जास्त अनुक्रमे रु.2 लाख आणि रु.1 लाख इतका परतावा अनुज्ञेय राहील. हे लेखा परीक्षण निवड केलेल्या यादीतील संस्थांकडून करण्यात येईल. तसेच वीज आणि पाणी बचत करण्याच्या संदर्भात उद्योग घटकाने खरेदी केलेल्या यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या 50 टक्के व जास्तीत जास्त प्रत्येकी रु.5 लाख इतक्या मर्यादेपर्यंत परतावा अनुदान अनुज्ञेय राहिल व या अनुदानाचा समावेश एकूण पात्र प्रोत्साहन रकमेच्या आर्थिक मर्यादेत असेल.

फ) सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचा दर्जा वाढ व स्पर्धात्मकतेसाठी गुणवत्ता प्रमाणपत्र, संशोधन व विकास कार्यक्रम, तंत्रज्ञान वृध्दी, प्रदूषणमुक्त-उत्पादन उपाययोजना व पेटंट रजिस्ट्रेशन, इत्यादीसाठी देय असलेली प्रोत्साहने सुधारीत करुन पुढे चालू ठेवण्यात येतील.

ग) वरील प्रोत्साहनांव्यतिरिक्त अ व ब वर्गीकृत तालुके वगळता इतर तालुक्यातील पात्र सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना गुंतवणूक कालावधीत जमीन संपादन करण्यासाठी (असाईनमेंट लीज व विक्री प्रमाणपत्रासह ) व मुदत कर्जासाठी मुद्रांक शुल्कातून 100 टक्के सूट देण्यात येईल. मात्र अ व ब क्षेत्रातील फक्त माहिती तंत्रज्ञान व जैव तंत्रज्ञान उद्यानातील पात्र घटकांना 100 टक्के मुद्रांक शुल्कातून सूट देण्यात येईल. तसेच सामुहिक प्रोत्साहन योजना 2007 अंतर्गत पात्र ठरविलेल्या घटकांना सदर योजनेत स्पष्ट केल्याप्रमाणे गुंतवणूक कालावधीत मुद्रांक शुल्क सूट देण्यात येईल.

ह) या व्यतिरिक्त (अ व ब वर्गिकृत क्षेत्रे वगळता इतर क्षेत्रातील) पात्र नवीन सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना पात्रता कालावधीकरिता विद्युत शुल्क देण्यापासून सूट देण्यात येईल. मात्र अ व ब क्षेत्रातील १००% निर्यातक्षम सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आणि पात्र माहिती तंत्रज्ञान व जैव तंत्रज्ञान घटकांना विद्युत शुल्कातून सात वर्षासाठी सूट देण्यात येईल.

च) सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या अस्तित्वासाठी आणि त्यांच्या वाढीसाठी वेळेवर व पुरेसे आणि माफक दराने आर्थिक सहाय्य उपलब्ध होणे आवश्यक आहे. स्वतंत्रपणे केलेल्या पत निर्धारणामुळे वित्तीय संस्थांना सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची पतपात्रता ठरविण्यास मदत होईल. त्यासाठी शासनाकडून सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना पत निर्धारणाकरीता आर्थिक प्रोत्साहने देण्यासाठी, स्वतंत्र योजना आखण्यात येईल.

**९.४ बीज भांडवल योजनेमध्ये सुधारणा**

राज्य शासनातर्फे स्वयं रोजगार पुरविणारे लहान उपक्रम स्थापन करण्यास चालना देणे हा उद्योजकता वाढविण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांपैकी एक महत्वाचा उपक्रम आहे. राज्य शासनाच्या बीज भांडवल आणि जिल्हा उद्योग केंद्राची कर्ज योजना या योजना स्वयं-रोजगार पुरविण्याऱ्या उपक्रमांकरिता राबविण्यात येत आहेत. या योजनांखाली सीमांतिक रक्कम (मार्जिन मनी) अल्पमुदतीच्या कर्जाच्या (सॉफ्ट लोन) स्वरुपात देण्यात येते. भारत सरकारच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत (पीएमईजीपी) सीमांतिक रक्कम (मार्जिन मनी) ही बॅक एण्ड सबसिडी म्हणून देण्यात येते. ही योजना जिल्हा उद्योग केंद्रांकडून देखील राबविण्यात येते. तथापि मर्यादित लक्ष्यांक/निधी मुळे या योजनेखालील लाभार्थ्यांचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे भारत सरकारच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या धर्तीवर वरील दोन योजनांचे एकत्रिकरण तसेच त्यात सुधारणा करुन नवीन योजना राबविण्याचे संकल्पित आहे.

**९.५ आजारी उद्योग घटकांचे पुनर्वसन करणे -**

रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सुत्रानुसार **पुनरुज्जीवनक्षम** आजारी घटकांना जर संबंधित वित्तीय संस्थेनी त्यांचे पुर्नवसन करण्यास सुरुवात केली असेल तर त्यांनी शासनाला देय असलेल्या रकमेच्या परतफेडीसाठी पुढील पाच वर्षाकरिता फेर-आखणी करण्यात येईल आणि त्यावर दरवर्षी ७ टक्के दराने सरळ व्याज आकारण्यात येईल. ही सध्याची योजना पुढेही चालू ठेवण्यात येईल.

**१०) पर्यावरणपूरक आणि तंत्रज्ञानांची श्रेणीवाढ करण्यास प्रोत्साहन देणे -**

वाढत्या औद्योगिक विकासामुळे आणि जागतिकीकरणामुळे जगातील देश आता पर्यावरणाबाबत अधिकाधिक जागरुक होऊन या संबंधात शाश्वत विकास करण्यावर भर देऊ लागले आहेत. महाराष्ट्र शासन देखील हरित आणि कार्बन उत्सर्जनमुक्त तंत्रज्ञान, नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन, किमान अपव्यय आणि पुनर्वापर इ. माध्यमातून पर्यावरणाभिमुख विकासास चालना देण्यावर भर देत आहे. एमआयडीसीने अनेक पर्यावरणभिमुख पुढाकार जसे सांडपाणी प्रक्रिया सुविधा, कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट, पाण्यावर

प्रक्रिया करुन पुनर्वापर, पावसाळी पाण्याची साठवणूक आणि ऊर्जा बचतीच्या तंत्रज्ञान व उपाययोजनांना चालना देणे, यासारखे कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे.

या औद्योगिक धोरणातून हरित आणि शाश्वत विकासाला ऊर्जा बचत आणि ऊर्जा लेखा परिक्षण करण्यासाठी पुढाकार, यासारख्या उपाययोजनांव्दारे चालना देण्यात आली आहे. ऊर्जा बचत आणि संवर्धनामुळे त्या प्रमाणात इंधन, खनिज, वाहतूक आणि विद्युत प्रकल्प उभारणीसाठी लागणाऱ्या जागेमध्ये होणारी बचत यामुळे देखील ऊर्जा बचत होते व त्यामुळे वातावरणातील प्रदूषण कमी होण्यास मदत होते. राज्य उत्पादनातील स्पर्धात्मकता वाढविण्याच्या कार्यक्रमाचा (एसएमसीपी) एक भाग म्हणून उद्योग घटक व उद्योग समूह यांनी उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान स्वीकारण्यास या धोरणाव्दारे चालना देण्यात आली आहे. यामुळे कच्च्या मालाचा होणारा अपव्यय किमान पातळीवर ठेवण्यास घटकांना मदत होईल. लघु व मध्यम उपक्रमांना पाण्याची बचत, सांडपाण्यावर प्रक्रिया आणि लेखापरिक्षण करण्यासाठी प्रोत्साहने देण्यात येत आहेत.

**११) उद्योग दिवस -**

उद्योगांना, विशेषत: सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांना, त्यांची उत्पादने व क्षमता दाखविण्यासाठी सामाईक व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याकरिता राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात एक वार्षिक उद्योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव आहे. या उद्योग दिवसाच्या सोहळयात प्रदर्शने, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांना पुरस्कार देणे, यासारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येतील. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सल्लागार समिती या कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणीसाठी समन्वय आणि संनियंत्रण करेल. या सोहळयात जिल्ह्याची औद्योगिक क्षमता व औद्योगिक विकासासाठी येणाऱ्या संधी दाखविण्याचा आणि संपूर्ण उद्योग समूहास एका समान व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करण्यात येईल. जिल्ह्याची आर्थिक प्रगती करण्यासाठी स्वयं-रोजगाराच्या संधी व योजना उपलब्ध करुन देणे हा देखील या कार्यक्रमाचा एक महत्वाचा भाग राहील. सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा पुरस्कार योजनेमध्ये आवश्यक ते बदल करण्यात येतील.

**१२) जिल्हा उद्योग केंद्रांचे सबलीकरण -**

सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांना चालना देण्यासाठी जिल्हा-स्तरावर जिल्हा उद्योग केंद्र महत्वाची भूमिका बजावते. जिल्हा उद्योग केंद्रांना धोरण आणि योजनासंबंधीची परिपूर्ण माहिती देणे शक्य व्हावे यासाठी तसेच सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांना त्यांच्या उत्पादनांची विक्री, कुशलता विकास, उद्योजकता विकास करण्यासाठी आणि आजारी सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांचे पुर्नवसन आणि/किंवा सुलभ निर्गमन करण्यास मदत करणे शक्य व्हावे यासाठी, मा. पंतप्रधानांच्या कार्यबलाने समितीत जिल्हा उद्योग केंद्रांचे सबलीकरण करण्याची गरज असल्याचे नमूद केले आहे. याकरिता पायाभूत सुविधांमध्ये (माहिती तंत्रज्ञान पायाभूत सुविधांसह) सुधारणा करुन आणि मनुष्यबळाच्या क्षमता वाढीसाठी आवश्यक उपाय हाती घेवून जिल्हा उद्योग केंद्रे सबल करण्यात येतील. मा.पंतप्रधानांच्या कार्यबलाने समितीत जिल्हा उद्योग केंद्रांचे सबलीकरण करण्यासाठी राज्यांना मदत करण्याचे प्रस्तावित केले आहे. यासाठी भारत सरकारने उपलब्ध केलेल्या तरतुदी इतके अनुदान राज्य शासनाकडून देखील उपलब्ध करुन देण्यात येईल.

**१३) अन्य पुढाकार**

**१३.१ नक्षलग्रस्त तालुक्यातील उद्योगांकरीता विशेष सहाय्य :**

नक्षलवादाच्या समस्येवर औद्योगिक विकासाचा मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिणाम होतो, याची राज्य शासनास जाणीव आहे. राज्यातील नक्षलग्रस्त तालुक्यातील औद्योगिक विकास अधिक जलदगतीने व्हावा याकरीता, सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ अंतर्गत पात्र होणाऱ्या नक्षलग्रस्त तालुक्यातील सुक्ष्म,लघु, मध्यम, मोठे उद्योग व विशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने देय करण्यात येतील.

**१३.२ पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी अभय योजना :**

पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांची जमीनीसकटची स्थिर मालमत्ता वापरात येणे अत्यंत जरुरीचे आहे. त्यामुळे जे उद्योग खालील निकष पूर्ण करतील अशा उद्योगांना विशेष अभय योजनेव्दारे सुलभ निर्गमन पर्याय (एक्झिट ऑप्शन) उपलब्ध करुन देण्यात येईल.
अ) एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी बंद असलेला किंवा न्यायालयाकडून कर्जबाजारी म्हणून घोषित घटक.
ब) रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूत्रांनुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेला घटक.
क) घटकाच्या व्यवस्थापनात बदल होऊन घटक पुढे यशस्वीरित्या चालू रहावे.

या योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या घटकाने राज्य शासनाची सर्व मुददलाची रक्कम एक रकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ केले जाईल. सदर योजना ही शासनाची सर्व प्रकारची देणी तसेच निमशासकीय संस्था, कंपनी व मंडळे यांच्याकडील थकीत देण्यांसाठी देखील लागू राहील. सदर योजना १ वर्षाच्या कालावधीसाठी राहील व योग्य वाटल्यास या योजनेला मुदतवाढ देण्यात येईल.

**१३.३ मुंबई कुळवहिवाट आणि कृषि जमीन अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा**

मुंबई कुळवहिवाट आणि कृषि जमीन अधिनियम, १९४८ चे शासन पुर्नविलोकन करेल व त्यामध्ये खालील सुधारणा करण्यात येतील :-

- संपादन केलेल्या जमीनाचा ज्या कालावधीत खराखुरा औद्योगिक वापर करावयाचा आहे तो कालावधी १५ वर्षे ऐवजी ५ वर्षे इतका करण्यात येईल.
- सदर अधिनियमा खाली विकास आयुक्त (उद्योग) यांच्या परवानगीशिवाय खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी जमिनीचा क्षेत्राची कमाल मर्यादा १० हेक्टर ऐवजी ५ हेक्टर इतके राहील.

**१३.४ मुंबई महानगर प्रदेश औद्योगिक स्थान निश्चयन (लोकेशन पॉलिसी) धोरण**

मुंबई महानगर प्रदेश औद्योगिक स्थान निश्चयन धोरणात अनुसूची -१ मध्ये मुंबई महानगर प्रदेशामध्ये परवानगी दिलेल्या प्रदूषण न करणाऱ्या, उच्च तंत्रज्ञान किंवा उच्च मुल्यवर्धित उद्योगांची यादी देण्यात आली आहे. या धोरणात मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील उपक्रमांच्या बदलत्या गरजा विचारात घेवून त्यामध्ये त्याचे पुर्नविलोकन करुन योग्य त्या सुधारणा करण्यात येतील.

**१३.५ बंद घटकांकडून यथा प्रमाण वसूली**

सामुहिक प्रोत्साहन योजनेखाली ज्या घटकांनी प्रोत्साहनांचा लाभ घेतला आहे आणि जे घटक पात्रता प्रमाणपत्र कालावधी / कार्य कालावधीमध्ये बंद पडले आहेत त्यांच्याकडून बंद असलेला कालावधी व एकुण कालावधीच्या (पात्रता प्रमाणपत्र कालावधी अधिक कार्य कालावधी ) प्रमाणात प्रोत्साहनांची वसूली करण्याचे प्रस्तावित आहे.

**१३.६ स्वामित्व धन आणि बिगर कृषि करातून सूट**

औद्योगिक क्षेत्रातील जमीनीच्या विकासाकरिता गौण खनिजांच्या उत्खननावरील स्वामित्व धनातून सूट आणि बिगर कृषी करातून सूट यापुढेही चालू ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

**१४) उद्योगाशी संबंधित राज्याचे क्षेत्र-विशेष धोरण**

राज्य शासनाने माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान इ. वेगवेगळया क्षेत्रांसाठी धोरणे आखली असून त्यात सुधारणाही केल्या आहेत. औद्योगिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित राज्य शासनाची प्रचलित धोरणे खालीलप्रमाणे आहेत:-

**(एक) माहिती तंत्रज्ञान धोरण:** माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व या क्षेत्रातील आपले अग्रस्थान टिकविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण - २००९ जाहिर केले आहे. या धोरणामुळे माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रात मोठया प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली असून त्याच्या परिणामस्वरुप पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नवी मुंबई माहिती तंत्रज्ञान केंद्रे म्हणून पुढे आली आहेत. माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ पर्यंत वैध आहे.

**(दोन) जैव तंत्रज्ञान धोरण:** जैव तंत्रज्ञान धोरण २००१ मध्ये शेतकऱ्यापासून जैव तंत्रज्ञान उद्योग गृहांपर्यंत एक संपूर्ण मुल्य साखळी विकसित करण्याचे अभिप्रेत असून त्यासाठी पायाभूत सुविधा, सुकरता प्रोत्साहने इ. उपलब्ध करुन देण्यात येतील. जैव तंत्रज्ञान धोरणामध्ये खाजगी जैव तंत्रज्ञान उद्योगांना अनेक प्रोत्साहने देण्यात आली आहेत.

**(तीन) द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण:** राज्य शासनाने संबंध राज्यात मद्यार्क उद्यानाकरिता द्राक्ष उत्पादन आणि पायाभूत सुविधांना पाठिंबा देण्यासाठी द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण तयार केले आहे.

**(चार) अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांव्दारे वीज निर्मिती धोरण -२००८:** या धोरणाखाली, २००० मेगा वॅट पेक्षा अधिक क्षमतेचे पवन ऊर्जा निर्मिती प्रकल्प, १००० मेगा वॅट क्षमतेचे सहवीजनिर्मिती प्रकल्प, ४०० मेगा वॅट क्षमतेचे बायोमास वर आधारित वीज निर्मिती प्रकल्प आणि १०० मेगा वॅट क्षमतेचे लघु जल-विद्युत प्रकल्प उभारण्याची तरतूद या धोरणात आहे.

**(पाच)** ५०० मेगा वॅट आणि त्यावरील क्षमतेची भर घालण्यासाठी विद्युत निर्मिती क्षेत्रात गुंतवणूकीकरिता धोरण आखण्यात आले आहे.

**(सहा)** वस्त्रोद्योग धोरण — २०१२

खाजगी-सार्वजनिक-भागीदारी (पीपीपी), कृषि प्रक्रिया, हस्तकला, आणि कामगार क्षेत्रात देखील राज्य शासनाकडून सुधारणा करण्यासाठी धोरणे आखण्याची प्रक्रिया चालू आहे.

१५) **संनियंत्रण आणि पुर्नविलोकनासाठी समिती -**

या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि आवश्यक ते स्पष्टीकरण, अर्थनिश्चिती आणि अंमलबजावणीच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली वित्त, नियोजन आणि कामगार विभाग यांच्या सदस्यांसह, मुख्य कार्यकारी अधिकारी (एमआयडीसी) आणि विकास आयुक्त (उद्योग) यांची समिती स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

* * * * * * *

## अनुसूची - अ

## "एकात्मिक औद्योगीक क्षेत्रे" विकसीत करण्या संबंधी धोरण

केंद्र सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ व विशेष आर्थिक क्षेत्र नियम, २००६ लागू केले असून, त्या अंतर्गत काही विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचित केलेली आहेत. बाजारपेठेमध्ये असलेली प्रतिकूल परिस्थिती तसेच अशा विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी विविध करांमध्ये कमी करण्यात आलेल्या प्रोत्साहनात्मक बाबीमुळे महाराष्ट्र राज्यात मंजूर करण्यात आलेले / अधिसूचित करण्यात आलेली विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचना रद्द अथवा मागे घेण्यात आली आहेत. भविष्यात आणखी काही विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्ताव अधिसूचना रद्द अथवा मागे घेण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये राज्य शासन अशा निर्णयाप्रत आले आहे की, या भागांचा नियोजनबद्ध विकास आणि औद्योगिकरणास चालना देण्यासाठी एक योग्य असे निर्गमन धोरण (Exit Policy) तयार करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन अधिसूचना रद्द केलेल्या / प्रस्ताव मागे घेण्यात आलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांच्या जमीनीचा वापर कसा करता येईल याबाबतच्या धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.आयआयपॉलिसी-२०१०/प्र.क्र.७६८/२०१०/उद्योग-२, दि.२०.७.२०१२ नुसार संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. समितीने सर्व संबंधितांशी सखोल चर्चा करुन तसेच समितीच्या बैठकांमध्ये विविध विषयांवर अभ्यास करुन उक्त विषयासंबंधीचा अहवाल शासनास दि.२३.११.२०१२ रोजी सादर केला आहे. या समितीच्या शिफारशी तपासून घेतल्यानंतर सदर अहवाल काही बदलांसह स्वीकारला आहे. अंतिमत: स्वीकारण्यात आलेले धोरण खालीलप्रमाणे आहे.

१. महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाच्या स्वत:च्या जागेवर जी विशेष आर्थिक क्षेत्रे असतील अशा क्षेत्रांची अधिसूचना रदद झाल्यावर त्यांचा विकास महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार करण्यात येईल.

२. सिडकोच्या जागेवरील व सिडकोच्या सहभागाने स्थापन केलेली विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचना रद्द झाल्यावर ही क्षेत्रे "एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे" म्हणून विकसीत होण्यास पात्र राहतील व या क्षेत्रांसाठी सिडको हे विशेष नियोजन प्राधिकारी राहील. या "एकात्मिक औद्योगिक क्षेत्रां" साठी विशेष विकास नियंत्रण नियमावली सिडको तयार करेल व त्यास शासनाच्या नगर विकास विभागाची मंजूरी घेईल.

३. माहिती तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान ची विशेष आर्थिक क्षेत्रे ज्यांचे क्षेत्रफळ ४० हे. पेक्षा कमी आहे अशी विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचना रदद झाल्यावर त्याखालील जमिनींचा विकास हा शासनाच्या प्रचलित माहिती तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान च्या धोरणांनुसार करता येईल.

४. अ) भूसंपादन अधिनियिम १८९४ किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत संपादित न केलेल्या खाजगी जमिनी आणि,

(ब) महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने किंवा सिडकोने भूसंपादन अधिनियम-१८९४ अंतर्गत केवळ संयुक्त उपक्रम विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी संपादित केलेल्या जमीनी,

या पैकी ज्या जमिनीचे क्षेत्र किमान ४० हे. आहे अश्या जमीनी सदर धोरण संबंधित विशेष नियोजन प्राधिका-याच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना

अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अअ) नुसार जाहीर सुचना प्रसिध्द करण्याच्या तारखेपर्यंत (नियत दिनांक) तसेच वरील वर्गवरीतील जे विशेष आर्थिक क्षेत्र सदर नियत दिनांकानंतर ६ महिन्यांच्या आत ना-अधिसूचीत किंवा औपचारिक मंजूरीनंतर मागे घेण्यात येतील अशी क्षेत्रे "एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे" म्हणून विकसीत करण्यास पात्र राहतील. अशा क्षेत्रांसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ / सिडको हे विशेष नियोजन प्राधिकरण राहील. खाजगी जमीनी व संयुक्त उपक्रम "विशेष आर्थिक क्षेत्रे" स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ अंतर्गत संपादित केलेल्या जमीनींचे बाबतीत "एकात्मिक औद्योगिक क्षेत्रां" ची अधिसूचना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रसिद्ध करेल. ज्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ मध्ये योग्य ती तरतुद करण्यात येईल. वर नमूद केलेल्या नियत दिनांकापासून सहा महिन्याचे आत कोणत्याही विशेष आर्थिक क्षेत्राच्या अधिसूचना रद्द करण्याच्या प्रस्तावास राज्य शासनाची सहमती असल्याचे गृहीत धरले जाईल. वर जरी काही नमूद केले असेल तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ किंवा सिडको यांच्या बरोबर असलेल्या संयुक्त उपक्रम विशेष आर्थिक क्षेत्रांना मंत्रीमंडळाची मान्यता घेतली असल्यास अशा क्षेत्रांवर "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" अधिसूचीत करण्यापुर्वी मंत्रीमंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

५. एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांचे नियोजन प्रस्ताव संबंधित विशेष नियोजन प्राधिकरणाकडून तयार केले जातील व त्यास उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११५(३) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांची (शासनाचे अधिकार त्यांना प्रदत्त असल्याने) मंजूरी घेणे आवश्यक राहील. तथापि एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील वैयक्तिक भूखंडावरील बांधकाम आराखड्यास मंजूरी देण्याचे अधिकार विशेष नियोजन प्राधिकरणास असतील.

६. या धोरणांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांचा विकास हा १० वर्षामध्ये होणे आवश्यक असून विकसीत झाल्यानंतर अशा क्षेत्रांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ फ अन्वये औद्योगिक नगरे म्हणून घोषित करण्यात येईल.

७. **"एकात्मिक औद्योगीक क्षेत्रे"** विकसीत करण्यासाठीच्या विकास नियंत्रण नियमावली मध्ये अन्य बाबींसह खालील ठळक वैशिष्ट्यांचा समावेश असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदार | संबंधित जमीनमालक किंवा त्यांनी नियुक्त केलेला विकासक किंवा जमीन मालकांनी कुठल्याही विकासकासोबत स्थापन केलेला संयुक्त उपक्रम (Joint Venture Company) यांना प्रस्तावित "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" विकसित करणेसाठी अर्ज करता येईल. |
| २ | आवश्यक किमान क्षेत्रफळ | "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित होण्यास पात्र ठरण्यासाठी ना-अधिसूचीत झालेल्या / माघारी घेतलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांना त्याखालील सलगतेने उपलब्ध होणारे किमान क्षेत्रफळ ४० हेक्टर (१०० एकर) असावे, ते भारविरहित, सलग असावे व त्यास किमान २४ मी. रुंदीचा प्रवेश रस्ता उपलब्ध असावा. |
| ३ | अधिसूचीत करण्याची पध्दत | अर्जदाराकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर खाजगी जमिनी आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ अंतर्गत संयुक्त उपक्रम विशेष आर्थिक |

| | | |
|---|---|---|
| | | क्षेत्रे स्थापन्यासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमीनीवर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या क्षेत्रास, "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून अधिसूचित करेल. विकास योजनेच्या किंवा प्रादेशिक योजनेच्या तरतूदीमध्ये काहीही असले तरी, अशा क्षेत्रातील जमिनीचा विकास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने या कारणासाठी तयार केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार करण्यात येईल. असे क्षेत्र घोषित करण्यासाठी किंवा अशा क्षेत्राचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २०, संलग्न कलम १८ नुसार स्वतंत्र कार्यवाही करण्याची आवश्यकता राहाणार नाही. |
| ४ | **अनुज्ञेय जमीन वापर** | एकूण अधिसूचित क्षेत्राच्या किमान ६०% क्षेत्र हे औद्योगिक विकासासाठी आणि उर्वरीत ४०% क्षेत्र हे पूरक बाबीच्या विकासासाठी ज्यामध्ये रहिवासी व वाणिज्यिक वापराचा समावेश असेल यासाठी उपयोगात आणता येईल.<br>पुरक बाबीसाठी असलेल्या एकूण क्षेत्रांपैकी एक चतुर्थांश क्षेत्र हे निव्वळ वाणिज्यिक / आर्थिक कार्यासाठी आणि उर्वरीत तीनचतुर्थांश क्षेत्र हे रहिवासी आणि इतर बिगर रहिवासी वापरासाठी जसे की, रहिवासी, शैक्षणिक, आरोग्य सुविधा, सुखसोईंसाठी जागा, सार्वजनिक उपयुक्ततेसाठी, बागबगीचे/खेळाचे मैदान इ.साठी वापरता येईल.<br>मात्र वाणिज्यिक, रहिवासी आणि बिगर रहिवासी कार्यासाठी विकास करण्याची परवानगी ही औद्योगिक विकासासाठी राखुन ठेवलेल्या जमीनीवर मुलभूत सुविधा (Infrastructure) पूर्ण झाल्यानंतर आणि औद्योगिक विकासासाठी ठेवलेल्या क्षेत्रांपैकी १/३ क्षेत्र वाटप केल्यावरच देण्यात येईल. |
| ५ | **अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक** | अधिसूचित एकात्मिक औद्योगिक क्षेत्रासाठी अनुज्ञेय कमाल चटई निर्देशांक हा जमीन वापर विभागानुसार (land use zone) खालीलप्रमाणे राहील:-<br>i) रहिवासी आणि औद्योगिक विभागात - १.००<br>ii) कृषी / ना-विकास विभाग /रहिवासीकरण होऊ शकणा-या विभागात (Urbanisable Zone) - ०.५०<br>मात्र ना-विकास (No Development) क्षेत्रामध्ये शासनाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे अधिमूल्य भरल्यास चटई निर्देशांक हा ०.५० वरून १.०० पर्यंत वाढविता येईल.<br>औद्योगिक वापरासाठीच्या क्षेत्रावरून पुरक बाबींच्या क्षेत्रात किंवा त्याऊलट, तरता चटई क्षेत्र निर्देशांक (floating FSI) आणणे अनुज्ञेय नसेल परंतु औद्योगिक विकास क्षेत्रात किंवा पुरक बाबींच्या क्षेत्रात त्या त्या क्षेत्राच्या हद्दीतच चटई क्षेत्र निर्देशांक तरता राहू शकेल. |

| | | |
|---|---|---|
| ६ | नियोजन प्राधिकरण | i) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४०(१) (ब) अन्वये खाजगी जागांवरील, आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ चे कलम ४० (१) (अ) नुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने, संयुक्त उपक्रमाद्वारे विशेष आर्थिक क्षेत्र स्थापित करण्यासाठी संपादीत केलेल्या जागांवरील, 'एकात्मिक औद्योगिक क्षेत्रां' साठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले जाईल.<br>ii) सिडकोने भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार संयुक्त उपक्रम (Joint Venture) विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी संपादित केलेल्या जमिनीवरील एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४०(१) (ब) अन्वये सिडको हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले जाईल. |
| ७ | विकास नियंत्रण नियमावली | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ किंवा सिडको विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रात अनुक्रमे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची किंवा सिडकोची अस्तित्वातील विकास नियंत्रण नियमावली आहे तशीच, एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांसाठी खास करुन तयार केलेल्या विशेष नियमांव्यतिरिक्त इतर सर्व बाबींकरीता लागू राहील. |
| ८ | पर्यावरण विभागाची मंजुरी | केंद्रीय पर्यावरण विभागाची अधिसूचना क्र. एस.ओ.८०१(ई), दि.७.७.२००४ मध्ये नमूद केल्यानुसार व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या बदलानुसार मंजूरी घ्यावी लागेल. |
| ९ | विकास प्रस्तावांना अंतिम मंजुरी / बृहत आराखडयास मंजूरी | संपूर्ण एकात्मिक औद्योगिक क्षेत्राच्या नियोजन प्रस्तावास संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४०(३) व ११५ मधील पद्धतीचा अवलंब करून सदर अधिनियमातील कलम-११५ अन्वये मंजूरी देण्यात येईल. |
| १० | इमारत बांधकाम नकाशे मंजूरी | सविस्तर इमारत आराखड्यांना मंजूरी देण्यास विशेष नियोजन प्राधिकरण सक्षम असेल. |
| ११ | अपील | विशेष नियोजन प्राधिकरणाने पारित केलेल्या आदेशामुळे व्यथीत व्यक्ती असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ४० दिवसाचे आत शासनाच्या नगर विकास विभागाकडे अपिल दाखल करू शकेल. |
| १२ | विशेष सवलती | i) कुठलेही क्षेत्र एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून अधिसूचित झाल्यास अ-कृषक परवानगी आपोआप मिळाल्याचे समजण्यात येईल. वेगळी बिगर शेती परवानगी आवश्यक राहणार नाही.<br>ii) एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील विकास प्रस्तावांना महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून छाननी शुल्क अंशत: |

| | | |
|---|---|---|
| | | माफ केले जाईल. |
| १३ | अंमलबजावणी व पूर्णत्वाचा कालावधी | एकात्मिक औद्योगिक क्षेत्राच्या ले-आऊट प्लॅनच्या अंतिम मंजूरीच्या तारखेपासून १० वर्षांचे आत अधिसूचित झालेल्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्राचा विकास पूर्ण करावा लागेल. |
| १४ | स्थानिक स्वराज्य संस्था | एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर व विकसीत झालेले क्षेत्र महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरे अधिनियम-१९६५ मधील कलम ३४१ फ नुसार औद्योगिक नगरी म्हणून अधिसूचित करण्यात येईल आणि त्यानुसार सदर प्राधिकरणामार्फत त्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर क्षेत्रावर स्थानिक प्रशासन करण्यात येईल. |
| १५ | पायाभूत सुविधा | प्रस्तावित एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांसाठी महाराष्ट्र नगरपंचायत व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ च्या कलम ३४१ फ नुसार औद्योगिक नगरी स्थापन होईपर्यंत सर्व पायाभूत सुविधांची निर्मिती व देखभाल विकासकाने करावयाची आहे. तथापि, प्रस्तावित एकात्मिक औद्योगिक क्षेत्राच्या एकूण क्षेत्रापैकी ७५% क्षेत्रावर पायाभूत सोयी-सुविधांचा विकास संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नियोजन प्रस्तावांना अंतिम मान्यता दिल्यानंतर ३ वर्षांमध्ये विकासकाने करणे अनिवार्य राहील. अन्यथा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी 'एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केलेली कार्यवाही व्यपगत ठरेल. |
| १६ | अर्थनिश्चिती व स्पष्टीकरण (Interpretation ) | प्रस्तावित एकात्मिक औद्योगिक क्षेत्रासंबंधीच्या नियमावली संदर्भात प्रश्न अथवा वाद निर्माण झाल्यास त्या विषयी शासनाकडे संदर्भ करणे आवश्यक राहील. |
| १७ | अपवाद / व्यावृत्ति (Saving ) | ही नियमावली अस्तित्वात येण्यापूर्वी, ज्या विशेष आर्थिक क्षेत्रांची अधिसूचना रद्द झाली आहे अशा विशेष आर्थिक क्षेत्रांसंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या नियमावलीनुसार देण्यात आलेली कुठलीही परवानगी किंवा त्यासंबंधीतील कृती ही विशिष्टपणे अन्यथा नमुद न केल्यास वैध समजण्यात येईल आणि वैध राहील. |
| १८ | मनुष्यबळ व साधनसामग्रीचे बळकटीकरण (Strengthening of manpower and machinery) | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सद्य:स्थितीत त्यांच्या कार्यक्षेत्रात, नियोजन व विकास करण्यासाठी उपलब्ध कर्मचारी वर्गाकडे यासंबंधी नवीन जबाबदा-या पडल्यास, तो अपुरा ठरू शकतो. त्यामुळे नियोजित एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांची अतिरिक्त जबाबदारी पार पाडण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात अतिरिक्त साधन सामुग्री व मनुष्यबळाची तरतुद करण्यात येईल. |

-------

**आश्वासन क्रमांक ३७१**

**कवजेपट्टी** दिनांक - ५/४/२००८

आम्ही खाली सहया करणारे पंच लोक राहणार मौजे शिराळा / बिउर तालूका शिराळा लिहून देतो कबजेपट्टी पंचनामा की ,आम्हा पंचास गां.का. तलाठी शिराळा / बिउर व मं.अ.वि.भू.सं.७, सांगली ,महसूल भवन , मिरज यांनी बोलावून सांगिलले की,

मौजे शिराळा / बिउर ता शिराळा येथील खालील जमिनी शिराळा गावा बाहेरील वळण रस्त्याकरिता संपादन करणेत आल्या असून सदर संपादन जमिनीची नुकसान भरपाई रक्कम सदर खातेदारांना आदा करणेत आली आहे. आता या जमिनीची कब्जा संपादन मंडळास देणेचा आहे असे सांगितले वरून आम्ही पंच गा. का. तलाठी , मं .अ . वि. भू. सं. ७ यांचे समवेत जावून संपादन जमिनीचा कब्जा मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम ( पश्चिम ) विभाग सांगली याचे तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. [illegible] यांना दिला , त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर जमिनीचा संपादन प्रस्ताव मे. विशेष भूमि संपादन अधिकारी , क्र ७ सांगली, महसूल भवन, मिरज यांचेकडील क्र.वि.भू.स.अ.७ / एस आर ४९९ दिनांक २९ / १ / २००८ चे अंतिम निवाडयाप्रमाणे कब्जा दिला

| अ.क्र. | स.न/ गट नंबर | संपादीत क्षेत्र हेक्टर-आर | आकार रुपये-पैसे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ९९पै | ०-५१ | ५-०२ | शिराळा हद्द |
| २ | १०० अ पै | ०-६५ | ५-७२ | |
| ३ | ७९/२ पै | ०-४६ | १-६५ | |
| ४ | ३८९ पै | ०-१७ | ०-२१ | बिऊर हद्द |
| ५ | ५५२ पै | ०-०७ | ०-०५ | |
| ६ | ५७३ पै | ०-०६ | ०-०४ | |
| ७ | ५८८ पै | ०-२२ | ०-५६ | |
| ८ | ५८९ पै | ०-१७ | ०-३३ | |
| ९ | ५९० पै | ०-०१.५० | ०-०४ | |
| | एकूण | २-३२.५० | १३-६२ | |

येणेप्रमाणे जमिनीचा कब्जा मो. र. नं. ३२३ मधील संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे व मोजणी नकाशा प्रमाणे दिला .

समोर-

मंडळ अधिकारी
वि. भू . सं क्र.७ सांगली

गाव कामगार तलाठी
मौजे गांव शिराळा ता शिराळा

विश्वास बळवंत कदम

२) सुरेश म्हादेव पाटील

कृपया मागे पहा

गाव कामगार तलाठी
मौजे बिऊर ता. शिराळा

अधीक्षक अभियंता, सा-बां मंडळ, कोल्हापूर

Scanned with CamScanner

# कबजेपट्टी

दिनांक - ५ /४ /२००८

आम्ही खाली सह्या करणारे पंच लोक राहणार मौजे शिराळा / कापरी तालूका शिराळा लिहून देतो कबजेपट्टी पंचनामा की ,आम्हा पंचास गां.का. तलाठी शिराळा / कापरी व मं.अ.वि.भू.सं.७, सांगली ,महसूल भवन , मिरज यांनी बोलावून सांगितले की,

मौजे शिराळा / कापरी ता शिराळा येथील खालील जमिनी शिराळा गावा बाहेरील वळण रस्त्याकरिता संपादन करणेत आल्या असून सदर संपादन जमिनीची नुकसान भरपाई रक्कम सदर खातेदारांना आदा करणेत आली आहे. आता या जमिनीची कब्जा संपादन मंडळास देणेचा आहे असे सांगितले वरून आम्ही पंच गा. का. तलाठी , मं .अ . वि. भू. स. ७ यांचे समवेत जावून संपादन जमिनीचा कब्जा मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम ( पश्चिम ) विभाग सांगली याचे तर्फे त्यांचे प्रतिनिधी
श्री. यु. आर. शिकन (शाखा अभियंता) यांना दिला . त्याचा [illegible]शील खालील [illegible]माणे सदर जमिनीचा संपादन प्रस्ताव मे. विशेष भूमि संपादन अधिकारी , क ७ सांगली, म[illegible]ल भवन, मिरज यांचेकडील क्र.वि.भू.स.अ.७ / एस आर ४७८ दिनांक २९ / १ / २००८ चे अंतिम निवाडया[illegible]णे कब्जा दिला

| अ.क्र. | स.न/ गट नंबर | संपादीत क्षेत्र हेक्टर-आर | आकार रुपये-पैसे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १४/१अ पै | ०-२२ | ०-५४ | शिराळा हद्द |
| २ | १४/१अ पै | ०-२२ | ०-५४ | |
| ३ | १४/१अ पै | ०-१९ | ०-४७ | |
| ४ | ३८/१ पै | ०-०४ | ०-२६ | |
| ५ | ३९/२ पै | ०-१५ | ०-७४ | |
| ६ | ४१ पै | ०-२५ | १-२५ | |
| ७ | ४३ पै | ०-२५ | ०-७४ | |
| ८ | ४४/१ प्लॉट नं १७पै | २५ चौ.मी. | | |
| ९ | ४४/१ प्लॉट नं १८पै | १००चौ.मी. | | |
| १० | ४४/१ प्लॉट नं १९पै | १५०चौ.मी. | | |
| ११ | ४४/१ प्लॉट नं २०पै | २६८चौ.मी. | | |
| १२ | ४४/१ प्लॉट नं ३५पै | ५६चौ.मी. | | |
| १३ | ४४/१ प्लॉट नं ३६पै | १२५चौ.मी. | | |
| १४ | ४४/१ प्लॉट नं ३७पै | १८०चौ.मी. | | |
| १५ | ४४/१ प्लॉट नं ३८पै | १८०चौ.मी. | | |
| १६ | ४४/१ प्लॉट नं ३९पै | १७६चौ.मी. | | |
| १७ | ४४/१ प्लॉट नं ५२पै | ९०चौ.मी. | | |
| १८ | ४४/१ प्लॉट नं ५३पै | १२०चौ.मी. | | |
| १९ | ४४/१ प्लॉट नं ५४पै | १८०चौ.मी. | | |
| २० | ४४/१ प्लॉट नं ५५पै | १८०चौ.मी. | | |
| २१ | ४४/१ प्लॉट नं ५६पै | १४४चौ.मी. | | |
| २२ | ४४/१ प्लॉट नं ५७पै | ५४चौ.मी. | | |
| २३ | ४४/१ प्लॉट नं ५८पै | २५चौ.मी. | | |
| २४ | ४४/१ प्लॉट नं ५९पै | १५३चौ.मी. | | |
| २५ | ४४/१ प्लॉट नं ६०पै | ५६चौ.मी. | | |
| २६ | ४४/१ प्लॉट नं ६१पै | १५चौ.मी. | | |

कृपया मागे पहा..

Scanned with CamScanner

का. अ., सा. बां. मंडळ, कोल्हापूर

**आश्वासन क्रमांक १६२३**

**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग, मंत्रालय,
४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
nirmal.chaudhari@gov.in

क्रमांक :- विसआ-४३१७/२००७(२)/आ.क्र.१६२३/प्र.क्र. २२६/२०१७/नवि-११. दिनांक :-१४/१२/२०२०

प्रति,
मा.समिती प्रमुख,
महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समिती,
विधान भवन, मुंबई - ३२

विषय :- सन २००७ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानसभा आश्वासन क्र.१६२३

महोदय,

संदर्भ : मविस पत्र क्र. ७६४४४/म.वि.स./विलआदा/इ.७४, दि.२८/११/२०२०

सन २००७ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानसभा आश्वासन क्र.१६२३ च्या आश्वासन पूर्तीच्या विहित नमून्यातील विवरणपत्र यापूर्वीच दि.६/०१/२०१८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आले आहे.

तसेच सदर आश्वासनाबाबत दि.२/१२/२०२० रोजी संपन्न झालेल्या विधानसभा आश्वासन समितीच्या वाचनाचे बैठकीमध्ये मा. समिती प्रमुखांनी परत साक्ष घेण्यात यावी. त्याचप्रमाणे बृहन्मुंबईतील धोकादायक इमारतींची वॉर्डनिहाय यादी सादर करण्याबाबत निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दि.०८.१२.२०२० रोजी ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या वॉर्डनिहाय यादीची प्रत सोबत माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

आपला,

का०क्र०

(निर्मलकुमार पं. चौधरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत : कक्ष अधिकारी नवि-६, नगर विकास विभाग, मंत्रालय.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## विधानसभा सन 2007 च्या दुस-या पावसाळी अधिवेशनातील आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीसंबंधी विवरण

| आश्वासन क्र | संदर्भ व दिनांक | विषय | आश्वासन | आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई | आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले त्याबाबतचे आदेश निर्णय इ.चा दिनांक | आश्वासनाची पूर्ती केल्याचा दिनांक | आश्वासनपूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी | आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे | विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यांवर केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६२३ | विधानसभा कामकाज – १४७ खंड-५ दिनांक २०.७. ०७ | बोरीवली येथील 'लक्ष्मीछाया टॉवर' ही इमारत कोसळल्यामुळे झालेली वित्त जिवित हानी.<br><br>सर्वश्री गोपाळ शेट्टी व इतर वि.स.स. यांनी उपस्थित केलेली आपत्कालिन चर्चा. | श्री.राजेश टोपे – त्यासाठी डीसीआर आणि मुंबई महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर कोणत्याही परिस्थितीत हे अधिवेशन संपल्यानंतर पुढील अधिवेशनाची वाट न पाहता अध्यादेश काढून जी तरतूद करणे आवश्यक असेल ती केली जाईल. | महाराष्ट्र शासनाच्या दि.14.03.2009 च्या अधिसूचनेन्वये मुंबई महानगरपालिका अधिनियम (सुधारित) 1888 मध्ये 353(ब) हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले. सदर कलमातील तरतुदीनुसार 30 वर्षांवरील अस्तित्वात असलेल्या जुन्या खाजगी इमारतींचे संरचनात्मक लेखा परिक्षण करणे इमारत मालकास बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच अशा सर्व इमारतींचे नोंदणीकृत अनुज्ञापित संरचनात्मक अभियंत्यांकडून संरचनात्मक परिक्षण करुन सदर इमारत राहण्यायोग्य | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | असल्याचे प्रमाणित केलेले इमारत स्थैर्यता प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) महापालिकेच्या संबंधित विभागास सादर करणे सक्तीचे करण्यात आले आहे. वर नमूद तरतुदींचे काटेकोर पालन करण्यासाठी व यात हलगर्जीपण करत असलेल्या इमारत मालकास किंवा खाजगी / सहकारी गृहनिर्माण संस्था / भोगवटादारास इमारत स्थैर्यतेचे प्रमाणपत्र विशिष्ट कालावधीत सादर करण्याचे नोटीसीअन्वये महापालिका फर्मावू शकते. या कलमानुसार योग्य त्या कार्यवाहीची अंमलबजावणी काटेकोरपणे विभाग स्तरावर करण्यात येत आहे.<br>तसेच ३० वर्षापेक्षा जुन्या व संरचनात्मकपणे नादुरुस्त असलेल्या अधिकृत इमारतींचे पुनर्विकास सुलभ होण्याकरीता विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली 2034 | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मधील अनुक्रमे विनियम ३३(७)(ब) व ३३(७)(अ) अन्वये तरतुदी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. आश्वासन समितीच्या दि.02.12.2020 रोजी झालेल्या बैठकीमध्ये विचारलेल्या उपप्रश्नानुसार, मुंबई महापालिका अधिनियम (सुधारित) 1888 मधील कलम 353(ब) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक लेखा परिक्षण केलेल्या इमारतींबाबतची माहिती सोबत जोडली आहे. (पृ.क्र. सी/११) | | | | | |

प्रस्तुत अहवाल हा तपासण्यात आला असून माहिती वस्तुस्थितीवर आधारित आहे.

04/12/2020
(मल्लेशाम रा. कुंटा)
**उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.-२**

(विनोद प्र. चिठोरे)
**प्रमुख अभियंता (विकास नियोजन)**
**व संचालक ( अ.से. व प्र.)**

(इ. सिं. चहल)
**महानगरपालिका आयुक्त**

C:\Users\mcgm\Desktop\आश्वासन क्र 1623 -सुधारित अहवाल.doc

**MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI**

Details of Notices u/s 353(B) of MMC Act-1888 upto 30th Nov 2020

| Ward Name | No. of Notices served u/s 353(B) of MMC Act-1888 | No. of Structural Audit reports submitted against Notices issued | No. of Buildings Repaired | No. of Buildings Demolished / to be Demolished | No. of Court Orders Restraining Demolition | No. of Cases referred to TAC | Nos of Structural Audit Report not submitted (2-3) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| A | 280 | 137 | 57 | 4/4 | 3 | 0 | 143 |
| B | 1131 | 75 | 7 | 2 | 1 | 0 | 1056 |
| C | 1580 | 20 | 45 | 3 | 3 | 0 | 1560 |
| D | 975 | 779 | 512 | 3/2 | 3 | 0 | 196 |
| E | 504 | 67 | 13 | 7 | 1 | 2 | 437 |
| F/S | 242 | 116 | 64 | 0/1 | 1 | 1 | 126 |
| F/N | 45 | 19 | 0 | 1/25 | 0 | 0 | 26 |
| G/S | 252 | 93 | 38 | 7/9 | 0 | 0 | 159 |
| G/N | 408 | 195 | 167 | 8 | 3 | 4 | 213 |
| H/E | 583 | 107 | 8 | 28 | 10 | 1 | 476 |
| H/W | 3031 | 833 | 33 | 11/16 | 10 | 34 | 2198 |
| K/E | 853 | 248 | 187 | 39/7 | 11 | 4 | 605 |
| K/W | 3077 | 404 | 16 | 44 | 9 | 4 | 2673 |
| P/S | 860 | 178 | 21 | 55/14 | 2 | 1 | 682 |
| P/N | 654 | 242 | 86 | 25/29 | 7 | 0 | 412 |
| R/S | 553 | 164 | 42 | 25/14 | 8 | 15 | 389 |
| R/C | 511 | 383 | 87 | 32 | 9 | 0 | 128 |
| R/N | 433 | 147 | 57 | 8/6 | 2 | 0 | 286 |
| L | 279 | 85 | 44 | 2/3 | 3 | 1 | 194 |
| M/E | 108 | 97 | 52 | 1/1 | 1 | 1 | 11 |
| M/W | 863 | 336 | 146 | 34 | 4 | 7 | 527 |
| N | 396 | 121 | 8 | 9 | 17 | 0 | 275 |
| S | 93 | 29 | 6 | 7 | 2 | 0 | 64 |
| T | 252 | 128 | 15 | 27/24 | 17 | 0 | 124 |
| TOTAL | 17963 | 5003 | 1711 | 382/131 | 127 | 75 | 12960 |

**आश्वासन क्रमांक ५४**

महाराष्ट्र शासन

**बैठक/इतिवृत्त**

dilip.vanire@nic.in

क्र.पीसीएन-३०१४/प्र.क्र.३८९ (भाग-२)/नवि-२२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०१९

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
निगडी, पुणे.

**विषय** : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात संबंधित शेतकऱ्यांना १२.५ % जमीन परतावासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.०७.२०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**संदर्भ** :- १) मा.मुख्यमंत्री महोदयांचे उप सचिव यांचे दि.२९.०६.२०१९ चे पत्र.
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.२९.०६.२०१९ चे पत्र.

महोदय,

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात सन १९८४ पूर्वीच्या जमीन संपादित झालेल्या शेतकऱ्यांना १२.५ % जमीन परतावासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,
( दिलीप आ. वणिरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरिलप्रमाणे

प्रत,

१. मा.श्री.लक्ष्मण जगताप, विधानसभा सदस्य, पुणे
२. मा.ॲड.गौतम चाबुकस्वार, विधानसभा सदस्य, पुणे
३. मा.श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य, पुणे
४. श्री.सदाशिव खाडे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे.
५. मा.मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री, महसूल तथा पालकमंत्री, पुणे यांचे खाजगी सचिव.
७. मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सह सचिव (नवि-२२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (नवि-२२)

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१.०७.२०१९ रोजी सायं. ०५.०० वाजता मा.मुख्यमंत्र्यांचे समिती कक्ष, विधान भवन, मुंबई येथे खालील विषयावर बैठक संपन्न झाली :-

**"पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९७२ ते सन १९८३ पर्यंत संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात संबंधित शेतकऱ्यांना १२.५% जमीन परतावा देण्याबाबत"**

सदर बैठकीस मा.श्री.लक्ष्मण जगताप, विधानसभा सदस्य, पुणे, मा.ॲड.गौतम चाबुकस्वार, विधानसभा सदस्य, पुणे, मा.श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य, पुणे, तसेच श्री.सदाशिव खाडे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त :-

| अ.क्र. | मुद्दा | मा.मुख्यमंत्री महोदयांचे निदेश |
|---|---|---|
| १ | यापूर्वी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत अशा शेतकऱ्यांपैकी ज्यांच्या जमिनी सन १९८४ पासून संपादित केलेल्या आहेत अशा जमीनधारकांना संपादित क्षेत्राच्या १२.५% एवढी जमीन वाटप करण्याचा निर्णय दि.१५.०९.१९९३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता.<br>त्यापैकी प्राधिकरणाच्या स्थापनेपासून म्हणजेच सन १९७२ ते सन १९८३ पर्यंत ज्या जमीनधारकांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत त्यांना संपादित क्षेत्राच्या १२.५% एवढी जमीन परतावा करण्याचा निर्णय घेऊन त्याची तातडीने अंमलबजावणी करावी. | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकासासाठी प्राधिकरणाने सन १९७२ पासून सन १९८३ पर्यंत ज्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत अशा जमीनधारकांना त्यांच्या संपादित क्षेत्राच्या १२.५% जमीन परतावा करण्यासाठी पुरेसे क्षेत्र प्राधिकरणाकडे उपलब्ध नाही, त्यामुळे त्यांच्या संपादित क्षेत्राच्या ६.२% एवढी जमीन तिच्या मालकास प्राधिकरणाच्या अटीच्या अधीन राहून वाटप करण्यात यावी. अशा जमिनीचा परतावा करताना २ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात यावा.<br>त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. |

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

******

**आश्वासन क्रमांक ५६**

महाराष्ट्र शासन

**बैठक/इतिवृत्त**

dilip.vanire@nic.in

क्र.पीसीएन-३०१४/प्र.क्र.३८९ (भाग-२)/नवि-२२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०१९

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
निगडी, पुणे.

**विषय** : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात संबंधित शेतकऱ्यांना १२.५ % जमीन परतावासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.०७.२०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**संदर्भ** :- १) मा.मुख्यमंत्री महोदयांचे उप सचिव यांचे दि.२९.०६.२०१९ चे पत्र.
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.२९.०६.२०१९ चे पत्र.

**महोदय,**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात सन १९८४ पूर्वीच्या जमीन संपादित झालेल्या शेतकऱ्यांना १२.५ % जमीन परतावासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

**( दिलीप आ. वणिरे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत :- वरिलप्रमाणे**

प्रत,

१. मा.श्री.लक्ष्मण जगताप, विधानसभा सदस्य, पुणे
२. मा.ॲड.गौतम चाबुकस्वार, विधानसभा सदस्य, पुणे
३. मा.श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य, पुणे
४. श्री.सदाशिव खाडे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे.
५. मा.मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री, महसूल तथा पालकमंत्री, पुणे यांचे खाजगी सचिव.
७. मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सह सचिव (नवि-२२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (नवि-२२)

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१.०७.२०१९ रोजी सायं. ०५.०० वाजता मा.मुख्यमंत्र्यांचे समिती कक्ष, विधान भवन, मुंबई येथे खालील विषयावर बैठक संपन्न झाली :-

**"पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९७२ ते सन १९८३ पर्यंत संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात संबंधित शेतकऱ्यांना १२.५% जमीन परतावा देण्याबाबत"**

सदर बैठकीस मा.श्री.लक्ष्मण जगताप, विधानसभा सदस्य, पुणे, मा.ॲड.गौतम चाबुकस्वार, विधानसभा सदस्य, पुणे, मा.श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य, पुणे, तसेच श्री.सदाशिव खाडे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त :-

| अ.क्र. | मुद्दा | मा.मुख्यमंत्री महोदयांचे निदेश |
|---|---|---|
| १ | यापूर्वी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत अशा शेतकऱ्यांपैकी ज्यांच्या जमिनी सन १९८४ पासून संपादित केलेल्या आहेत अशा जमीनधारकांना संपादित क्षेत्राच्या १२.५% एवढी जमीन वाटप करण्याचा निर्णय दि.१५.०९.१९९३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता.<br>त्यापैकी प्राधिकरणाच्या स्थापनेपासून म्हणजेच सन १९७२ ते सन १९८३ पर्यंत ज्या जमीनधारकांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत त्यांना संपादित क्षेत्राच्या १२.५% एवढी जमीन परतावा करण्याचा निर्णय घेऊन त्याची तातडीने अंमलबजावणी करावी. | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकासासाठी प्राधिकरणाने सन १९७२ पासून सन १९८३ पर्यंत ज्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत अशा जमीनधारकांना त्यांच्या संपादित क्षेत्राच्या १२.५% जमीन परतावा करण्यासाठी पुरेसे क्षेत्र प्राधिकरणाकडे उपलब्ध नाही, त्यामुळे त्यांच्या संपादित क्षेत्राच्या ६.२% एवढी जमीन तिच्या मालकास प्राधिकरणाच्या अटींच्या अधीन राहून वाटप करण्यात यावी. अशा जमिनीचा परतावा करताना २ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात यावा.<br>त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. |

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

******

**आश्वासन क्रमांक ५१७**

जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना विमानप्रवास सवलत अनुज्ञेय करणेबाबत....

## महाराष्ट्र शासन

वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक:प्रवास-२०११/प्र.क्र.२९/सेवा-५
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक:२१ जानेवारी,२०१२

**प्रस्तावना-**

शासनाच्या ध्येय धोरणांचा व योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा,व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातूनच घेण्यात यावा,अशा सूचना सर्व प्रशासकीय विभागांना निर्गमित झालेल्या आहेत.परंतु तातडीच्या शासकीय कामकाजासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना मुंबई येथे उपस्थित रहावे लागते. सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना विमानप्रवास अनुज्ञेय नसल्यामुळे यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते. सदर प्रक्रियेमध्ये विलंब होत असल्यामुळे शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय-**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेवून शासनाने असा निर्णय घेतला आहे की,राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना तातडीच्या शासकीय कामकाजासाठी अन्य साधनाने विहीत वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास संबंधित महसूल विभागीय आयुक्तांच्या पूर्वपरवानगीने मुंबई येथे येण्यासाठी व परतीसाठी इकॉनॉमी क्लासने विमानप्रवास अनुज्ञेय राहील.

सदर तरतूदी हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून,त्याचा संकेतांक २०१२०१२१०७०१५३१५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स.अ.मु.नकवी)
उप सचिव,वित्त विभाग

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट ,मुंबई-२१

**महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.**
**महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर**
**संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.**
**अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,**
**निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.**
**जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,**
**सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.**
**शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८**
**निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-५)**

एचबी ०३३९-२०अ

**आश्वासन क्रमांक ५६१**

नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२५९/नवि-३३
मंत्रालय, मुंबई
तारीख: ३० नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना -

गेल्या काही काळात निसर्गातील सततच्या बदलामुळे राज्यातील पर्जन्यमान अनियमित बनले असल्याने राज्याला वारंवार अवर्षण परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. त्याचा विपरीत परिणाम सिंचन व पिण्याच्या पाणीपुरवठ्यावर होत आहे. या बदललेल्या परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंबाचे संवर्धन व नियोजनपूर्वक वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे.

जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम कलम २४ नुसार नागरी भागामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

जलसंपदा विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात प्रतिवर्षी घरगुती कारणासाठी १६४ टीएमसी व औद्योगिक कारणासाठी २२ टीएमसी इतक्या पाण्याचा वापर होतो. त्यापैकी सर्वसाधारणपणे घरगुती वापराच्या ८० टक्के व औद्योगिक वापराच्या ९७.५ टक्के इतके सांडपाणी निर्माण होते. या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची निश्चिती करण्यासाठी नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

राज्याच्या नागरी भागातील सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण (Recycle and Reuse) याबाबतचे राज्याचे धोरण खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

१. **प्राथमिक कर्तव्य :-** राज्यातील नागरी भागात तयार होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासोबतच पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करणे हे संबंधित नागरी स्थानिक स्वराज संस्थेचे प्राथमिक कर्तव्य राहील. त्यानुसार सांडपाणी व्यवस्थापन क्षमता निर्माण करून त्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करणेबाबत आराखडा तयार करून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित नागरी स्थानिक स्वराज संस्थेची राहील.

२. **सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर नियोजन:-**

२.१ शासनाच्या विविध योजनामधून किंवा नागरी स्थानिक स्वराज संस्थांच्या निधीमधून शहरामध्ये स्थापित असलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या मलप्रक्रिया प्रकल्पांच्या बाबतीत सदर धोरण लागू झाल्यापासून एक वर्षाच्या आत सदर मलप्रक्रिया क्षमतेतून निर्माण होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याचा शास्त्रोक्त पध्दतीने पुनर्वापर करणेबाबतचा कृति आराखडा तयार करण्यात यावा व सदर कृति आराखडयानुसार प्रकल्पांची अंमलबजावणी निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात यावी.

२.२ शासनाच्या विविध योजनामधून किंवा नागरी स्थानिक स्वराज संस्थांच्या निधीमधून भविष्यामध्ये स्थापित होणाऱ्या मलप्रक्रिया क्षमतेतून निर्माण होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याचा शास्त्रोक्त पध्दतीने पुनर्वापर करण्याबाबतचा कृति आराखडा प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी तयार करून सदर कृति आराखडयानुसार प्रकल्पांची अंमलबजावणी निधीच्या उपलब्धतेनसार करण्यात यावी.

२.३ राज्यामध्ये नमामि चंद्रभागे सारखी विशेष क्षेत्रे, तीर्थक्षेत्रे अशी क्षेत्रे निश्चित करण्यात यावीत. अशा ठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया प्रकल्प प्राधान्याने राबवून सदर प्रक्रियायुक्त पाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करणेबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात.

३. **पारंपारिक व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर :-** शहरामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर द्वितीय व तृतीयस्तरीय प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने करावयाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करताना पारंपारिक तंत्रज्ञानाबरोबरच आय.आय.टी. / निरी यांच्यामार्फत विकसित केलेल्या नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानांचा उपयोग प्राधान्याने करण्यात यावा.

४. **मलनिस्सारण प्रकल्पांची अंमलबजावणी :-** मलनिस्सारण प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी निधीची मर्यादा असल्याने मलनिस्सारण प्रकल्पांची अंमलबजावणी ही निधीच्या उपलब्धतेनुसार टप्पानिहाय करण्यात यावी .

१. प्रथम टप्प्यामध्ये भविष्यातील गरजेनुसार मलप्रक्रिया व्यवस्था (Treatment Capacity) निर्माण करून सध्या निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्राधान्याने प्रक्रिया करण्यात यावी.

- संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी करण्यासाठी आवश्यक असलेली सांडपाणी प्रक्रिया क्षमता (STP) पहिल्या टप्प्यात निर्माण (१००% treatment Capacity) करण्यात यावी. यामध्ये ट्रंकमेन, पंपिंग स्टेशन, मलशुध्दीकरण केंद्र व नालाबंध यांचा समावेश असेल.
- त्यासोबत त्या शहरातील एकूण वेगवेगळया प्रभागापैकी काही प्रभागातील सांडपाणी गोळा करण्याची व्यवस्था (Collection System) देखील घेण्यात यावी.
- उर्वरीत प्रभागाकरिता मुख्य वाहिनीद्वारे (Trunk Main) सांडपाणी एका नाल्यात एकत्रित करण्यात यावे व असा नाला मलशुध्दीकरण केंद्राजवळ (STP) अडवून (Nala Interception) त्याठिकाणी असे सांडपाणी मुलशुध्दीकरण केंद्रामध्ये घेऊन त्यावर प्रक्रिया करण्यात यावी.

२. दुसऱ्या टप्प्यामध्ये मलवाहिन्यांची व्यवस्था निर्माण करण्यात येऊन प्रथम टप्प्यामध्ये निर्माण केलेल्या मलप्रक्रिया व्यवस्थेस जोडण्यात यावी. या टप्प्यात द्वितीयस्तरीय मलवाहिन्यांचा समावेश असेल.

५. **सांडपाणी पुनर्वापर प्राधान्य (Priority of Reuse) :-** नागरी स्थानिक स्वराज संस्थांनी स्थापित केलेल्या व भविष्यात स्थापित होणाऱ्या सांडपाणी प्रक्रिया क्षमतेतून निर्माण होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर करण्याचा प्राथम्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१. औष्णिक विद्युत केंद्रांना प्रक्रियायुक्त पाणी पुरविणेसाठी पुनर्वापर.
२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत औद्योगिक क्षेत्रांना प्रक्रियायुक्त पाणी पुरविण्यासाठी पुनर्वापर
३. रेल्वे किंवा अन्य बल्क बायर्सना प्रक्रियायुक्त पाणी पुरविण्यासाठी पुनर्वापर
४. कृषि प्रयोजनार्थ पाणी पुनर्वापर
५. पिण्यायोग्य नसलेल्या (Non-Potable) घटकांसाठी पाण्याचा पुनर्वापर (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार)

६. **प्रक्रियायुक्त पाणी वापर बंधनकारक**

**६.१ औष्णिक विद्युत केंद्रे**

१. केंद्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या धोरणानुसार औष्णिक विद्युत केंद्रांना त्यांच्या सभोवतालच्या ५० कि.मी परिघातील मलनिस्सारण प्रकल्पातील प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरणे बंधनकारक करण्याचे धोरण राज्यातील ऊर्जा प्रकल्पांना लागू करण्यात येत आहे.

२. तसेच राज्यातील ऊर्जा प्रकल्पांना १०० कि.मी. परिघातील प्रक्रियायुक्त पाणी वापरण्याचा सुध्दा विकल्प राहील.

**६.२ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

३. औष्णिक विद्युत केंद्रांना प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर बंधनकारक केल्याच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिक्षेत्रातील उद्योगांना त्यांच्या सभोवतालच्या ५० कि.मी परिघातील उपलब्ध प्रक्रियायुक्त सांडपाणी प्राधान्याने वापरणे बंधनकारक करण्यात येत आहे.

७. **प्रकल्प अंमलबजावणी निधी उपलब्धता :-** नागरी भागातील सांडपाण्यावर प्रक्रिया व पुनर्वापर करण्याच्या अनुषंगाने निर्माण करावयाच्या पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेला निधी हा केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनातून किंवा पीपीपी च्या माध्यमातून उभारण्यात यावा.

८. **पथदर्शी प्रकल्प :-** नवी मुंबई महानगरपालिकेने तृतीयस्तरीय प्रक्रिया केलेले पाणी एमआयडीसीच्या परिक्षेत्रातील उद्योगांना उपलब्ध करून देण्याचा व त्यामुळे बचत होणारे पाणी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला देण्याचा पथदर्शी प्रकल्प केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियानांअंतर्गत मंजूर करण्यात आला आहे. हा प्रकल्प या धोरणानुसार पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात यावा.

९. **यंत्रणेमार्फत सांडपाणी पुनर्वापर केल्यानंतर त्यांच्याकडून वापरण्यात येणाऱ्या चांगल्या (Fresh Water) चा विनियोग :-** मलनिःस्सारण प्रकल्पातील प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर संबंधित यंत्रणेने सुरु केल्यानंतर संबंधित यंत्रणेकडे उपलब्ध असलेले चांगल्या पाण्याचे (Fresh Water) चे आरक्षण आपोआप रद्द समजण्यात येईल.

१०. **सदर धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने औष्णिक विद्युत केंद्रे/ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी करावयाचे नियोजनः-**

१. प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराच्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळानी आस्थापनेच्या ५० कि.मी. परिसरातील मलनिस्सारण प्रकल्पातील प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याच्या पुनर्वापराचे नियोजन करावे.

२. सदर <u>धोरण अंमलात आल्यापासून ३ वर्षाचे आत</u> अशा सांडपाण्याचा पुनर्वापर सूरू करावा.

३. अशा उपलब्ध होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याच्या प्रमाणात या आस्थापनांचे नैसर्गिक पाण्याच्या पुरवठ्याचे आरक्षण <u>धोरण मंजूर झाल्यापासून तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर</u> (पासून २०१७ नोव्हेंबर) तात्काळ (पर्यंत २०२० नोव्हेंबर) रद्द करण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाने करावी.

४. नव्याने अस्तित्वात येणारी औष्णिक विद्युत केंद्रे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत उद्योगांची स्थापना करतानाच (Simultaneously) प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर करण्याची उपाययोजना करणे बंधनकारक राहील.

११. **सांडपाणी पुनर्वापर वित्तिय हक्क :-** सदर धोरणानुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज संस्थांमार्फत प्रक्रिया करण्यात आलेले पाणी नैसर्गिक स्त्रोतांमध्ये सोडल्यास व सदर स्त्रोताच्या काठावर शहराच्या खालच्या बाजूस असलेली अन्य गावे /शहरे / शासकीय विभाग/यंत्रणा सदर पाण्यापासून व्यापारी तत्वावर नफा कमवित असल्यास सदर नफ्याच्या पूर्ण रकमेवर प्रक्रिया करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज संस्थेचा वित्तिय हक्क असेल.

**१२. सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्प व्यवहार्यता समिती:-**

१२.१ राज्य शासनाचे सदर धोरण निश्चित झाल्यानंतर भविष्यामध्ये सांडपाणी पुनर्वापर धोरणाच्या अनुषंगाने नवीन प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यापूर्वी सदर प्रकल्पांची व्यवहार्यता व

आर्थिकदृष्टया छाननी करण्याच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. अपर मुख्य सचिव (वित्त) | - अध्यक्ष |
| २. अपर मुख्य सचिव (उद्योग) (उद्योगांशी संबंधित प्रस्तावाबाबत) | - सदस्य |
| ३. प्रधान सचिव (उर्जा) (उर्जा प्रकल्पांशी संबंधित प्रस्तावाबाबत) | - सदस्य |
| ४. प्रधान सचिव (जलसंपदा) | - सदस्य |
| ५. प्रधान सचिव (नवि-२) | - सदस्य सचिव |
| ६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - सदस्य |
| ७. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | - सदस्य |
| ८. संबधीत महानगरपालिकेचे आयुक्त/ न.प. मुख्याधिकारी | - सदस्य |

१२.२ सदरची समिती प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यापूर्वी प्रकल्पाची व्यवहार्यता (Feasibility), प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता (Cost Effective Model), प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराची दरनिश्चिती व अन्य अनुषंगिक बाबींची छाननी करेल.

१२.३ सदर समितीने असे प्रस्ताव सादर झाल्यावर त्याबाबत एक महिन्यात निर्णय घ्यावा.

१२.४ जेथे संबंधित स्थानिक स्वराज संस्था १०० टक्के खर्च करणार असेल तेथे या समितीमार्फत छाननीची आवश्यकता राहणार नाही.

१३. हा शासन निर्णय ऊर्जा विभाग, उदयेग विभाग, जलसंपदा विभाग व वित्त विभागाकडून प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन त्यावाबतच्या मंत्रीमंडळ निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११३०१५०१४०३७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc15db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18.if8e09b3c7eace65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2017.12.02 17:21:47 +05'30'

(पां.जो.जाधव)

सहसचिव,नगर विकास विभाग

प्रत,

१. मा.महालेखापाल महाराष्ट्र-१, मुंबई.
२. मा.महालेखापाल महाराष्ट्र-२, नागपूर.
३. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा. मंत्री/ राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. सर्व सन्माननीय संसद सदस्य/ विधानसभा/विधानपरिषद सदस्य
७. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**आश्वासन क्रमांक ३५१**

Sep. 05 2011 04:56PM P 1

<u>प्रतिनियुक्तीने नियुक्ती</u>
श्री.देवेंद्र अंधारे, उपजिल्हाधिकारी यांची अतिरिक्त मुख्य भू व सर्वेक्षण अधिकारी, सिडको, मुख्यालय बेलापूर या पदावर ...

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्रमांकः टिआरएफ-११/२०११/प्र.क्र.२०५/ई-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ५ सप्टेंबर, २०११

**संदर्भ : शासन आदेश, महसूल व वन** विभाग, क्रमांक : टिआरएफ -११/२०११/प्र.क्र.२३/ई-१, दि.१८.३.२०११.

**<u>शासन आदेश</u>** :-

उपरोक्त संदर्भाधीन शासन आदेशात अंशतः बदल करुन आता श्री.देवेंद्र अंधारे, उपजिल्हाधिकारी यांची अतिरिक्त मुख्य भू व सर्वेक्षण अधिकारी, सिडको, मुख्यालय बेलापूर या पदावर श्री.टी.डी.निकुंभ, उपजिल्हाधिकारी यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदावर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे) नियम १९८१ च्या परिशिष्ट-२ मध्ये विहित अटी व शर्तींना अधीन राहून प्रथमतः एका वर्षासाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. अतिरिक्त मुख्य भू व सर्वेक्षण अधिकारी, सिडको या पदावर प्रतिनियुक्तीसाठी श्री.देवेंद्र अंधारे यांच्या सेवा प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहेत. श्री.अंधारे यांनी पुढील सूचनांसाठी प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे हजर व्हावे. श्री.अंधारे यांचे गोपनीय अहवाल पुनर्विलोकनानंतर प्रधान सचिव (महसूल) यांचेकडे सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)
**(मिलिंद कुळकर्णी)**
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

**प्रति,**

प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

**प्रतिलिपी :**

जिल्हाधिकारी, हिंगोली/परभणी
महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नगपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली/परभणी
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
श्री.देवेंद्र अंधारे, उपजिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेमार्फत)
प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
का.अ.ई-२/ई-३/ई-४ कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती, ई-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**आश्वासन क्रमांक २१२**

**मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर जिल्हयात उमरेड-कऱ्हांडला येथे वन्यजीव अभयारण्याची करण्यात आलेल्या घोषणेबाबत दिनांक २०/०७/२०१५ रोजी दुपारी ३.३० वाजता दालन क्रमांक ५०२, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत**

सदर सभेत खालील प्रमाणे मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

१) मा. ना. श्री. सुधीर मुनगंटीवार, मंत्री, वित्त आणि नियोजन, वने

२) मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री, उदयोग उर्जा विभाग.

३) मा. आ. श्री. सुधीर पारवे, उमरेड विधान सभा सदस्य,

४) मा. श्री. विकास खारगे, सचिव वने

५) मा. श्री. सर्जन भगत, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर

६) मा. श्री. मेईपोकीम अय्यर, भावसे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर

७) श्री. एम. एस. रेड्डी, भावसे, मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर

८) मा. श्री. अरविंद आपटे, विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग

सभेचे सुरवातीस उपस्थित सर्व मान्यवर व अधिकारी यांचे अध्यक्षांनी स्वागत करुन सभेस सुरुवात करुन खालील प्रमाणे चर्चा करण्यात आली.

| अ. क्र. | तपशिल | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ | मा. आमदार श्री. सुधीर पारवे, विधान सभा सदस्य यांनी प्रश्न उपस्थित केला की, उमरेड-कऱ्हांडला अभयारण्य घोषित झाल्यापासुन तेथील स्थानिक लोकांना तेंदू पत्ता तोडण्यास तसेच त्यांचे पाळीव जनावरे व शेळी, मेढयांना चराईसाठी परवानगी देण्यात यावी.<br>त्यावरती मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने यांनी सूचित केले की, अभयारण्य, राष्ट्रीय उद्यांनात गौण वनोपज गोळा करणे व पाळीव जनावरांना चराईची परवानगी देणे अधिनियमातील तरतुदीनुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक १४/०२/२००० च्या आदेशान्वये बंदी असल्याने अशी परवानगी देणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानता व कायद्याचे उल्लंघन ठरते. सबब तेंदूपता संकलन केंद्रे सुरु करता येणे शक्य नाही तसेच पाळीव जनावरांना चराईस परवानगी देणे शक्य होणार नाही. सदर क्षेत्रामध्ये चराई करिता बंदी हटविण्याकरिता सर्वप्रथम मा. सर्वोच्च न्यायालयाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु लोकांची वन्यजीव अभयारण्यातील चराईकरिता अवलंबत्व कमी करण्यासाठी भाकड पाळीव जनावरांची संख्या कमी करुन दुभत्या उच्च प्रतीच्या दुध देणारे गाईंचा व वळुंचा सवलतीच्या दराने पुरवठा करणे | मुख्य वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक/प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर | ३१.१०.२०१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | करिता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सूचित करण्यात आले. | | |
| २ | अभयारण्याच्या हद्दीपासुन १ किमी. चे आत असलेल्या गावातील लोकांना शासनाकडुन एल.पी.जी. गॅस पुरवठा करण्यात येतो. परंतु १ किमी. ऐवजी १० किमी. चे आत असलेल्या गावामध्ये सुध्दा एल.पी.जी. गॅस देण्यात यावे असे मा. सुधीर पारवे, आमदार यांनी विनंती केली.<br>मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने यांनी सुचविले की, शासनाचे धोरणानुसार अभयारण्याचे १ ते २ किमी. आतील गावामध्ये ग्रामपरिस्थितीय विकास समिती (EDC) स्थापन करुन त्यानुसार तेथील स्थानिक गावकऱ्यांना एल.पी.जी. वाटप करण्यात येते. २ ते १० किमी. अंतरावर असलेल्या गावातील हद्दीमध्ये वन जमिन असेल आणि सदर गावामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समिती असेल तर प्रादेशिक वन विभाग यांचे मार्फत एल.पी.जी. गॅस वाटप प्रस्तावित करण्यात येतील. परंतु ज्या ठिकाणी एल.पी.जी. गॅस वाटप करावयाची आहे. त्या ठिकाणी लोकांचा सहभाग असणे आवश्यक आहे असे सांगितले.<br>मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांनी प्रादेशिक वन विभागाशी समन्वय साधून एल.पी.जी. गॅस वाटपाबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. | मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर. | ३१.१०.२०१५ |
| ३ | उमरेड-कऱ्हांडला अभयारण्याचे आंत मौजा रानबोडी हे गांव असून त्या गावाचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रति कुटुंब रु. १०.०० लाख तसेच शेतीसाठी वेगळयाने ३ (तिन पट) रक्कम देण्यात यावी अशी मागणी मा. सुधीर पारवे, आमदार, उमरेड विधान सभा सदस्य यांनी केली.<br>त्यावर मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने यांनी अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने तथा अन्य वन प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या कुटुंबाचे पुनर्वसनाबाबतचे शासन निर्णय दि. ३/११/२०१२ मध्ये देण्यात आलेल्या मोबदल्यानुसारच मोबदला देण्यात येईल असे सांगितले.<br>मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांनी चौकशी अधिकाऱ्याच्या चौकशी अहवालानुसार पुनर्वसन करणे आवश्यक असल्यास तसा प्रस्ताव तयार करावा. | मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | ३१.१०.२०१५ |
| ४ | उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात वाघांची संख्या दिवसेंनदिवस वाढत असल्याने तेथे निसर्ग पर्यटन सुरु करण्याबबात मागणी केली.<br>उमरेड-कऱ्हांडला अभयारण्याचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन त्यात Nature trail, Tree trail, Home stay इ. बाबी प्रस्तावात अंतर्भुत करावे व प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना आदेश देण्यात आले. | मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | ३०.११.२०१५ |

सभे अंती उपस्थित सर्वाचे आभार मानून सभा संपल्याचे अध्यक्षांनी जाहिर केले.

--------

**आश्वासन क्रमांक २०४**

क्र मंत्री (आ.वि.)/नोट/ 2-49 /२०13

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
आदिवासी विकास
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 26 JUL 2013

" इगतपूरी तालुक्यातील (जि. नाशिक) येथील वाडीव-हे (घोटी) येथील आदिवासी लोकांच्या घरावर बुलडोझर चालवून उध्वस्त करणे, आदिवासी महिलांवर दरोड्याच्या केसेस दाखल करुन त्यांना तुरुंगात बेकायदेशिररित्या डांबणे, बिल्डरच्या संगनमताने आदिवासींवर गुन्हे दाखल करणे, यामुळे आदिवासी जनतेमध्ये असंतोष निर्माण होणे, परिणामी सुमारे २०० आदिवासी महिला व पुरुष यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणे, या प्रकरणी रस्तारोको करुनही सरकारी अधिका-यांनी कोणतीच दखल न घेणे, वाडीव-हे येथील श्री. चौधरी या पोलीस अधिका-यावर आदिवासी अत्याचार विरोधी खटला दाखल करणे, या प्रकरणी शासनाने केलेल्या अन्यायाप्रती असलेले असंतोषाचे वातावरण, या बाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही ."

या विषयावर विधानसभा सदस्य डॉ. नामदेव उसेंडी यांनी विधानसभा सभागृहामध्ये औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला होता. त्यावर विधानसभा उपाध्यक्ष मा. वसंतराव पुरके यांनी संबंधित पोलीस अधिका-यावर आदिवासी अत्याचार विरोधी खटला (ॲट्रॉसिटी) दाखल करुन त्याची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात यावी असे स्पष्ट आदेश दिलेले असून केलेल्या कारवाईबाबत सोमवार दि. २९/७/२०१३ रोजी सभागृहास अवगत करावे असे निर्देश दिलेले आहेत.

तरी त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल तात्काळ सादर करावा.

(मधुकरराव पिचड)

प्रति,
सचिव (विशेष),
[illegible]
मंत्रालय, मुंबई ३२.

एचबी ०३३९-२१अ

**आश्वासन क्रमांक १४**

| मुख्य अभियंता स्तरावरील चौकशी प्रकरणे (तक्रारदार श्री. बेनके) | | | |
|---|---|---|---|
| अनु. क्र. | तक्रारीचा विषय | मु.अभि.कार्यालय पत्राचा संदर्भ | शेरा |
| १ | श्री. रमेश आगवणे, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, ठाणे व श्री. धनंजय देशपांडे, शा.अभि.श्रे-१, यांनी भिवंडी येथील २४०/२८० निवासस्थाने या इमारतीच्या दुरुस्तीच्या नावाखाली सन २००९-१० व २०१०-११ मध्ये दिड कोटी रुपयांची कामे केलेली दाखवून लाखो रुपयांचा भ्रष्ट्राचार केला याची चौकशी होऊन संबंधितांवर निलंबनाची कारवाई करणेबाबत.<br>नस्ती क्र.४६ (२०१३)<br>नस्ती क्र.६० (२०१३)<br>नस्ती क्र.६२ (२०१३)<br>श्री.पांडुरंग बाबुराव बेनके यांची दि.१२/४/२०१३ रोजीची तक्रार | मुअ(मुं)/का-६(१)/ प्र.क्र.४६(२०१३)/ ६०(२०१३)/ ६२(२०१३)/४८७७ दि. २२.०८.२०१३ | |
| २ | श्री. अनिल बोरसे व त्यांचे सर्व शाखा अभियंता यांनी संघटीतपणे बांद्रा शासकिय वसाहतीच्या दुरुस्तीच्या कामांमध्ये करोडो रुपायांच्या केलेल्या भ्रष्टाचाराची योग्य त्या यंत्रणेमार्फत चौकशी करुन निलंबनाची कारवाई करणेबाबत.<br>श्री.पांडुरंग बाबुराव बेनके यांची दि.३०/७/२०१३ रोजीची तक्रार. | मुअ(मुं)/का-६(१)/ प्र.क्र.१४३(२०१३)/ ४९८४दि. २८.०८.२०१३ | |
| ३ | श्री.ए.के.पालवे,उप-अभियंता,बांधकाम उपविभाग क्र.१,वरळी,मुंबई व त्यांचे शाखाअभियंता यांनी संगनमताने, विसावा, शासकीय विश्रामगृह वरळी ह्या इमारतीच्या दुरुस्तीच्या नावाखाली काढली १ कोटी ८० लाख रुपयांची बोगस बिले. ह्या केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन या अभियंत्यांना निलंबीत करणेबाबत.<br>श्री.पांडुरंग बा.बेनके यांची दि.११/१२/२०१३ रोजीची तक्रार. | मुअ(मुं)/का-६(१)/ प्र.क्र २११ २०१२)/७१३० दि.२४.१२.२०१३. | |
| ४ | खाजगीकरणांतर्गत चिंचोटी कामन अंजुरफाटा ते मानकोली या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याच्या कामात न केलेली कामेसुद्धा केलेली दाखवुन करोडो रुपयांच्या केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करणेबवत.<br>श्री.पांडुरंग बा.बेनके यांची दि.१२/१२/२०१३ रोजीची तक्रार. | मुअ(मुं)/का-६(१)/ प्र.क्र १८६ (२०१२)/७१६३ दि.३०.१२.२०१३. | |

| मुख्य अभियंता स्तरावरील चौकशी प्रकरणे (तक्रारदार श्री. बेनके) | | | |
|---|---|---|---|
| अनु. क्र. | तक्रारीचा विषय | मु.अभि.कार्यालय पत्राचा संदर्भ | शेरा |
| ५ | सा.बां.उपविभाग विक्रमगड जि.ठाणे या उपविभागातील उप-अभियंता/ शाखा अभियंते यांनी सन २००९-१०,२०१०-११ व २०११-१२ या तीन दरवर्षी ३.५० कोटी रुपयांची चौकशी करुन संबंधितांना निलंबित करण्याची कारवाई करणेबाबत.<br>श्री.पांडुरंग बा.बेनके यांचा दि.२६/१२/२०१३ रोजीचा तक्रार अर्ज. | मुअ(मुं)/का-६(१)/ प्र.क्र १८२ (२०१२)/ ११७ दि.८.१.२०१४. | |
| ६ | तक्रार अर्ज/तक्रार पत्रे यामधील मुद्द्यांच्या अनुषंगाने तक्रार प्रविष्ट कामांची प्रत्यक्ष पाहणी/तपासणी करुन त्याबाबतचा मुद्देनिहाय चौकशी अहवाल सादर करणेबा[illegible] एकुण ८ तक्रारी.<br>श्री.पांडुरंग बेनके यांचा दि.२४/६/२०१३ रोजीचा तक्रार अर्ज. | मा.मु.अ.(मुं)/का ६(१)/प्र.क्र.९५,९९,११४, १४३,१४४,१४५,१४६, १४७,१४८,१५०,१५१, १५२,१५५,१५६,१५८, १७५,२६५(२०१३) दि.१७/१/२०१४ | |
| ७ | श्री. हेमंत सावंत, व्यवस्थापक (उपअभियंता) बी.डी.डी.चाळ, वरळी, मुंबई यांनी त्यांच्या शाखा अभियंत्यांसह वरळी येथील चाळीच्या ड्रेनेज लाईन व लादीकरण/जमिनींची दुरुस्तीच्या ह्या कामांमध्ये दरवर्षी केलेल्या करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून निलंबनाची कारवाई करणेबाबत.<br>(श्री.पांडुरंग बेनके यांनी दि.१५.१.२०१४ रोजी केलेली तक्रार.) | मु.अ.(मुं)/का.६(१)/ प्र.क्र.१९४(२०१२)/११९ ६ दि.१८/०२/२०१४. | |
| ८ | श्री.जे.के.उमाळे,उपविभागीय अभियंता, बांधकाम उपविभाग क्र.२,वरळी,मुंबई यांनी त्यांचे शाखा अभियंता यांचे सहभागाने पेटीट मील,ताडदेव आवारातील इमारतीच्या दुरुस्तीच्या कामात कोट्यावधी चा भ्रष्टाचार केला.सत्यप्रतिज्ञापत्राद्वारे केलेल्या ह्या तक्रारीची चौकशी करुन कारवाई करणेबाबत.<br>(श्री. पांडुरंग बेनके यांनी दि.१९.११.२०१२ रोजी केलेली तक्रार.) | मु.अ.(मुं)/का.६(१)/ प्र.क्र.१९६(२०१२)/ १२६९ दि.२५/०२/२०१४. | |
| ९ | सा.बां. उपविभाग,मोखाडा, जि.ठाणे अंतर्गत कार्यरत असलेल्या उप अभियंता/शाखा अभियंत्यांनी मागील तीन वर्षात दरवर्षी खड्डे भरण्याच्या कामात रु.३.५० कोटींची बोगस बिले काढल्याबद्दल चौकशी करुन कारवाई करणेबाबत.<br>(श्री.पांडुरंग बेनके यांनी दि.२५.१०.१२ रोजी केलेली तक्रार.) | मु.अ.(मुं)/का.६(१)/ प्र.क्र.१७७(२०१२)/ १३८९ दि.०३/०३/२०१४. | |

# OFFICE OF THE LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTA

| Date (1) | Note, Order, Direction or Statement (2) | Next Date and Remarks (3) |
|---|---|---|
| | NOs.ULA/COM/1726/2013(T-15),ULA/COM/2008/2013(T-15) ULA/COM/2070/2013(T-15),ULA/COM/2599/2013(T-15) ULA/COM/2600/2013(T-15),ULA/COM/2601/2013(T-15) ULA/COM/2803/2013(T-15),ULA/COM/2862/2013(T-15) ULA/COM/3801/2013(T-15),ULA/COM/3858/2013(T-15) ULA/COM/3859/2013(T-15),ULA/COM/4090/2013(T-15) ULA/COM/4091/2013(T-15),ULA/COM/4092/2013(T-15) ULA/COM/4093/2013(T-15),ULA/COM/4124/2013(T-15) ULA/COM/675/2014(T-15),ULA/COM/766/2014(T-15) ULA/COM/767/2014(T-15),ULA/COM/1/2014(T-15) ULA/COM/20/2014(T-15),ULA/COM/67/2014(T-15) ULA/COM/107/2015(T-15),ULA/COM/108/2015(T-15) ULA/COM/127/2015(T-15),ULA/COM/191/2014(T-15) ULA/COM/192/2014(T-15),ULA/COM/285/2015(T-15) ULA/COM/322/2015(T-15),ULA/COM/369/2015(T-15) ULA/COM/499/2015(T-15),ULA/COM/582/2015(T-15) ULA/COM/689/2015(T-15),ULA/COM/1180/2015(T-15) ULA/COM/1230/2015(T-15),ULA/COM/1536/2015(T-15) ULA/COM/1906/2015(T-15),ULA/COM/3078/2015(T-15), ULA/COM/3079/2015(T-15),ULA/COM/31[illegible]8/2015(T-15), ULA/COM/3241/2015(T-15),ULA/COM/3263/2015(T-15), ULA/COM/3292/2015(T-15),ULA/COM/3293/2015(T-15), ULA/COM/3377/2015(T-15),ULA/COM/3406/2015(T-15), ULA/COM/3455/2015(T-15),ULA/COM/3456/2015(T-15), ULA/COM/3468/2015(T-15),ULA/COM/4003/2015(T-16) | |
| | <u>04.12.2015</u> | |
| | I have gone through the detailed report dated 19.10.2015 received from the Secretary to the Government of Maharashtra (Roads), P.W.D., Mantralaya, Mumbai. | |
| | 2. It appears from the report, that Shri Pandurang Baburao Benake is in habit of filing complaints with ulterior motives and his complaints are not *bona fide*. This is already observed by me while disposing of his complaint | |

| Date (1) | Note, Order, Direction or Statement (2) | Next Date and Remarks (3) |
|---|---|---|
| | No.ULA/COM/2022/2015(T-15). Since all the complaints appear to have been made with *mala fide* intentions and there is serious lack of *bona fides*, the contention of the Secretary to the Government of Maharashtra (Roads), P.W.D., Mantralya, Mumbai; that the enquiry of such complaints will result in waste of human resources and Government machinery, appears to be acceptable. | |
| | 3. In view of the earlier observations of the Lokayukta which are fortified by the report of the Secretary to the Government of Maharashtra (Roads), P.W.D., all the complaints of Shri Pandurang Baburao Benake made against the P.W.D. need to be closed and he shall be intimated accordingly. | |
| | 4. In this regard, it may be mentioned here, that Shri Benake himself was working as a contractor with the P.W.D. for about 15 years. He did not make any complaint during the period when he was working as a contractor. Now he is suffering from paralysis and he is unable to undertake any contract. | |
| | He was unable to explain as to why did he fail to make any complaints against the department when he himself was working as a contractor. He claims to have bribed certain officers while he was working as a contractor. Still he did not | |

OFFIC. LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTA

| Date (1) | Note, Order, Direction or Statement (2) | Next Date and Remarks (3) |
|---|---|---|
| | make any complaints. Therefore, his *bona fides* in the present complaints are highly questionable. | |
| | It is, therefore, ordered that all the complaints of Shri Pandurang Baburao Benake made against the P.W.D. shall be closed. He shall be intimated accordingly. | |
| | The Secretary to the Government of Maharashtra (Roads), P.W.D., Mantralaya, Mumbai shall be intimated that the complaints made by Shri Benake against the P.W.D. have been closed and any enquiry or investigation initiated by the department on the directions of the Lokayukta or Upa-Lokayukta shall stand closed and shall be filed. Intimation in that regard shall be given to this office by the concerned secretary. | |
| | 6. It is further ordered that henceforth any complaints of Shri Pandurang Baburao Benake against the P.W.D., Thane shall not be registered without specific orders in this regard from the Lokayukta. All the concerned Clerks and Assistant Registrars shall be intimated accordingly. | |
| | (M.L.Tahaliyani), Lokayukta 04.12.2015 | |

**आश्वासन क्रमांक ३७०**

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने दि.१३ जुलै, २०१५ रोजी पारीत केलेला ठराव क्र.३२, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (३) अन्वये <u>अंतिमत: विखंडीत करण्याबाबत</u>.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-१११५/२०४१/प्र.क्र.६९/१५/नवि-२८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- २४ जुलै, २०१८

**<u>संदर्भ:</u>**- १. शासन निर्णय समक्रमांक दि.२०.०१.२०१६.
२. शासन अ.शा.पत्र समक्रमांक दि.२०.०१.२०१६.
३. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र.मिभा/मनपा/नर/५२०१/२०१५-१६, दि.०५.०३.२०१६.
४. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र.मिभा/मनपा/नर/५२१५/२०१५-१६, दि.०८.०३.२०१६.

**<u>प्रस्तावना</u>:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र.१०७/१पै, १०८/१, २,३/१०९/ २३, २४, २७, २८, ११०/५पै या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या एकूण ७७८९.०२ चौ.मी. क्षेत्रापैकी २८९०.५१ चौ.मी. क्षेत्रामध्ये शाळेचे बांधकाम करण्यास मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मे.काऊनटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. या विकासकास दिलेली बांधकाम परवानगी व विकासकास उक्त क्षेत्र ३० वर्षे भाडेपट्ट्यावर देण्याबाबत महानगरपालिकेने केलेला करारनामा रद्द करण्याबाबत व शाळेची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेऊन विकसित करण्याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने पारीत केलेला दि.१३.०७.२०१५ रोजीचा ठराव क्र.३२, संदर्भीय दि.२०.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये निलंबित करण्यात आला आहे.

२. तसेच यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.४४४८/२०१३ मध्ये दि.२६.०७.२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयाने उक्त ठराव क्र.३२ विखंडीत करावा अथवा नाही, याबाबत ३ आठवड्यात निर्णय घेण्याचे तसेच घेतलेल्या निर्णयाची माहिती पुढील सुनावणीच्या वेळी मा.न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२०.०६.२०१८ रोजी ठेवली होती. सद्य:स्थितीत सदर प्रकरणाची सुनावणी दि.१०.१२.२०१८ रोजी ठेवण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सदर ठराव विखंडीत करण्याबाबत विहित मुदतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.०८०३.२०१६ च्या पत्रान्वये उक्त महासभेचा दि.१३.०७.२०१५ रोजीचा ठराव क्र.३२ विखंडीत करण्याबाबत स्पष्ट अभिप्राय सादर केले आहेत. या प्रकरणी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी प्रस्तुत ठराव विखंडनाच्या अनुषंगाने नमूद केलेली कारणमिमांसा विचारात घेता, सदर ठराव विखंडीत करण्याची बाब शासनाच्या विराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णय**:-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने दि.१३.०७.२०१५ रोजी अन्वये पारीत केलेला ठराव क्र.३२, हा महानगरपालिकेचे आर्थिक हिताच्या विरोधात असल्याचे स्पष्ट होत असल्याने, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रांद्वारे प्रस्तावित केल्यानुसार सदर ठरावाच्या विखंडनासाठी दिलेली सहमती विचारात घेता, मिरा-भाईंदर महानगरपालिका महासभा ठराव क्र.३२, दि.१३.०७.२०१५ हा, शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (३) अन्वये अंतिमत: विखंडीत करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०७२४१५२६१८२२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2018.07.24 15:26:58 +05'30'

**( नवनाथ रा. वाठ )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
४) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
५) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवडनस्ती (नवि-२८).

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

**कार्यालय: स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के.स्कूलच्या बाजूला, कनकिया, मिरारोड (पूर्व), ता.मिरा भाईंदर, जि.ठाणे-४०११०७. • दूरध्वनी : 022-28121455 • Email ID : mbmc.tp@gmail.com**


जा.क्र. : मिभा/मनपा/नर/१९८८/20-21 दिनांक : 02/12/2020

प्रति,
मा. अवर सचिव (नवि-28)
नगरविकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -32

**विषय - <u>सन 2013 चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानसभा आश्वासन क्रमांक 370.</u>**
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या चाळी व अनाधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याबाबत.

संदर्भ - शासन पत्र क्र.विसआ/मिभाम-1617/प्रक्र.240/नवि-28 दि.01/12/2020.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपण अपेक्षिलेली माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी, स.क्र. 107/1पै.,1पै.,108/2, 109/1 ते 7,8पै.,10ते 14,15पै.,15पै.,16पै.,,17पै.,18 ते 28 या जागेसाठी विकासक मे. काऊन टाऊन लँड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना यापूर्वी पत्र क्र. मनपा/नर/1606/06-07 दि.14/08/2006 अन्वये औद्योगिक वापरासाठी नकाशा मंजूर करून पत्र क्र. मनपा/नर/303/07-08 दि.26/04/2007 अन्वये औद्योगिक वापरासाठी बांधकाम परवानगी दिलेली आहे. सदर नकाशे मंजूर करते वेळी नागरी सुविधा भुखंडासाठी 5 टक्के प्रमाणे 1784.50 चौ.मी. क्षेत्र प्रस्तावित केलेले होते. तद्नंतर पत्र क्र. मनपा/नर/1551/2007-08 दि.25/07/2007 अन्वये औद्योगिक विभागाचे रहिवास विभागात रूपांतर करून (I to R) मंजूर केलेल्या रेखांकनात सुविधा भूखंडासाठी 20% प्रमाणे 7161.11 चौ.मी. क्षेत्र प्रस्तावित करून बांधकाम नकाशे मंजूर करण्यात आले होते. पत्र क्र. मनपा/नर/4332/2008-09 दि.12/03/2009 अन्वये मंजूर केलेल्या सुधारीत रेखांकनात सुविधा भूखंडासाठी 7545.00 चौ.मी. क्षेत्र प्रस्तावित केलेले होते. तद्नंतर मौजे महाजनवाडी, स.क्र. 109/9अ,110/3पै.,4पै.,5पै., ही जागा सामाविष्ट करून या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/नर/554/2010-11 दि.07/05/2010 अन्वये सुधारीत नकाशे मंजूर करून सुविधा भूखंडासाठी

7781.02 चौ.मी. क्षेत्र प्रस्तावित केलेले आहे. तद्नंतर सदर जागेसठीचे क्षेत्र कायम ठेवून सदर रेखांकनात वेळोवेळी सुधारणा करून सद्यस्थितीत पत्र क्र. मनपा/नर/1102/13-14 दि.02/07/2013 अन्वये सुधारीत नकाशे मंजूरी दिलेली आहे. सदरच्या रेखांकनात वेळोवेळी सुधारणा ही भूखंडाचे क्षेत्र नव्याने प्रस्तावित झाल्यामुळे तसेच भाडे तत्वावरील गृहनिर्माण योजनेच्या प्रस्तावामुळे वेळोवेळी सुधारीत मंजूरी देण्यात आलेली आहे.

सदर नागरी सुविधा क्षेत्राची जागा विकासक मे. काऊनटाऊन लँड डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी नोंदणीकृत कराररनानमा क्र. टनन-10/1263/2009 दि.27/02/2009 व टनन-2/7196/2010 दि.05/06/2018 अन्वये (एकूण क्षेत्र 7781.02 चौ.मी.) महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत करारनाम्यासह महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेले आहे. व त्याची नोंद महसुल अभिलेखी 7/12 वर मिरा भाईंदर महानगरपालिकेची नोंद घेणेत आलेली आहे.

विकासक यांनी यापूर्वी दि.25/07/2007 रोजी ॲमिनीटी स्पेसमध्ये शाळागृहाकरीता मंजूरी घेतलेली होती. व सदर प्रस्ताव कायम करणेकरीता मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि.20/01/2010 रोजी अपिल दाखल केलेले होते. तत्कालीन मा. आयुक्त सो. यांनी दि.07/08/2010 रोजी त्यांचे दालनात चर्चा करून विकासक यांनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडील अपील प्रलंबित असलेने निर्णय घेता येणार नाही. याकरीता विकासकाने अपील मागे घेतलेनंतरच या प्रकाराबाबत निर्णय होईल याप्रमाणे सुचविले नंतर विकासक यांनी अपिल मागे घेतले व त्यानंतर महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/1388/10-11 दि.15/07/2010 अन्वये विकासक यांना एकूण क्षेत्र 7781.02 चौ.मी. क्षेत्राचे 50% क्षेत्र 3890.51 चौ.मी. करीता शाळागृह इमारतीचा प्रस्ताव सादर करणेबाबत विकासक यांना अवगत केले होते व त्यानुसार विकासकाने शैक्षणिक वापराचा प्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावास पत्र क्र. मनपा/नर/1776/ 10-11 दि.05/08/2010 अन्वये नकाशे मंजूरी व बांधकाम परवानगी देणेत आलेली आहे. व सदर परवानगीमध्ये विकासक, मे. काऊन टाऊन लँड डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी शैक्षणिक वापराची इमारत विकसीत केल्यानंतर सदर शैक्षणिक वापरामध्ये महानगरपालिकेसाठी 15% जागा महानगरपालिका शिफारस करेल अशा विद्यार्थ्यांसाठी राखुन ठेवणे बंधनकारक राहील. व शाळागृह जागेचा भाडेपट्टयाबाबत महानगरपालिका अंतिम निर्णय घेईल तो विकासकास बंधनकारक राहील अशी अट नमुद केली आहे.

वरील शैक्षणिक वापराच्या जागेचे क्षेत्रफळ 3890.51 चौ.मी. असून त्याकरीता मासिक भाडे रू. 2,75,000/- (वार्षिक रू.33,00,000/-) इतके आकारणेत येईल व पुढील 5 वर्षांना 10% वाढ आकारण्यात येईल. 30 वर्षाकरीता भाडेकरार करणेत यावा यासाठी मा. महासभा दि.01/02/2011 ठराव

मिरा भाईंदर महानगरपालिका
MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालय: स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के.स्कूलच्या बाजूला, कनकिया, मिरारोड (पूर्व), ता.मिरा भाईंदर, जि.ठाणे-४०११०७. • दूरध्वनी : 022-28121455 • Email ID : mbmc.tp@gmail.com
नगररचना विभाग

जा.क्र. : मिभा/मनपा/नर/१०८८/२०-२१ दिनांक : ०२/१२/२०२०

क्र. 85 अन्वये मंजूर झालेला आहे. सदरचा ठराव मा. महासभा दि.20/08/2011 अन्वये कायम करण्यात आला आहे.

वरील ठरावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका आणि मे. काऊन टाऊन लँड डेव्हलपर्स प्रा.लि. यांच्यामध्ये करारनामा झाला असून सदरचा करारनामा हा दि.30/05/2011 रोजी टनन क्र.2/07258 अन्वये नोंदणीकृत करण्यात आला आहे.

सदर सुविधा भुखंड हा विकासकास दिलेले प्रक्रियेबाबत मा. उच्च न्यायालयात WP.NO.4448/2013 नुसार दावा दाखल करणेत आलेला आहे.

सदर दाव्यानुसार मा. उच्च न्यायालय यांनी महाराष्ट्र शासनास सुविधा भुखंड विकासकाचे प्रक्रियेबाबत निर्णय घेणेस कळविलेले होते.

त्यास अनुसरून महाराष्ट्र शासनाकडून पत्र क्र. मिभाम/अनौ.सं.20/प्र.क्र.274/11/नवि-28, दि.24/06/2014 अन्वये कळविणेत आलेला आहे. व सुविधा भुखंड विकासकास शाळागृह बांधणेकरीता दिलेली प्रक्रिया योग्य असल्याचे कळविलेले आहे. तसेच महानगरपालिकेने ठरविलेले दर हे योग्यअसलेबाबत सहा. संचालक नगररचना, ठाणे यांनी दिलेले अभिप्राय हे सर्व पाहता कलम-451(1) अन्वये सदर विनिर्दिष्ट प्रकरणी शासनाच्या हस्तक्षेपासाठी विनंती केलेल्या निकषात सदर प्रकरण बसत नसल्याने, कलम-451(1) अन्वये शासनास प्राप्त अधिकारांतर्गत हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही असा शासनाने निर्णय घेतला आहे.

तथापि मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांस याचिकेत बदल करावयाचा आहे का याबाबत विचारणा केलेली होती. त्याप्रमाणे श्री. पालांडे यांनी त्यांची याचिका Amend करून मा. उच्च न्यायालयात सादर केली. मिरा भाईंदर महानगरपालिकतर्फे या Amend याचिकेवर आपले म्हणणे सादर करणे बाकी आहे. सद्यस्थिती मा. उच्च न्यायालयाकडून याबाबंत निर्णय घेणेत आलेला नाही. तसेच काम बंद ठेवण्याचे आदेश नाहीत.

सदर भुखंडावर शाळेच्या इमारतीचे बांधकाम जोत्यापर्यंत अपूर्ण अवस्थेत असून महानगरपालिकेने दिलेल्या सुचनेनुसार सदरचे काम बंद आहे.

मा. महासभेने दि.13/07/2015 रोजी ठराव क्र. 32 अन्वये विकासकास देणेत आलेली शाळागृहाची परवानगी तसेच विकासका सोबत केलेला 30 वर्षे कालावधीकरीता करारनामा रद्द करणेबाबत ठराव पारीत केलेला आहे.

वरील दोन्ही बाबत (W.P. व मा. महासभेचा ठराव) शासनाने निर्णय घेणेबाबत मा. उच्च न्यायालयाने दि.26/07/2017 रोजी निर्देश दिलेले आहेत. शासनाने दि.13/07/2015 ठराव क्र. 32 हा

दि.13/07/2015, ठराव क्र. 32 हा दि.20/012016 रोजी निलंबीत केलेला होता. व त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 451(3) अन्वये अंतिमत: दि.24/07/2018 रोजी विखंडीत केलेला आहे. याबाबत महानगरपालिकेला कळविलेले आहे.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती असुन विकासक यांनी वास्तुविशारदामार्फत नागरी सुविधा क्षेत्राच्या 50% च्या मर्यादित जागेमध्ये शाळागृहा इमारतीचे बांधकाम दर्शवुन बांधकाम परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावास महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/7049/2018-19 दि.06/03/2019 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी दिलेली आहे.

सद्यस्थितीत सदर मंजूर रेखांकनातील इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन इमारती भोगवटासह रहिवास व्याप्त आहेत. तसेच नागरी सुविधा क्षेत्रातील जागेतील इमारतीचे बांधकाम जोत्यापर्यंतचे पुर्ण झालेले आहे.

(दिलीप घेवारे)
प्र. सहा. संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

**आश्वासन क्रमांक ७१**

## सन २०१३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासन क्र.७१ च्या बाबत मा. मंत्री (कृषि) यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची माहिती

सर्वश्री नानाजी श्यामकुळे व इतर विधानसभा सदस्य यांनी, **"नागपूर विभागात कृषि यांत्रिकीकरण योजनेंतर्गत गैर पध्दतीने वाटप झाल्याबाबत"** या विषयावर विधानसभा तारांकीत प्रश्न क्र. २४६६ उपस्थित केला होता. सदर प्रश्नावरील दिनांक १२/१२/२०१३ रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी श्री. देवेंद्र फडणवीस, विधानसभा सदस्य यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, हे स्पष्ट झाले की ज्यावेळी या संस्थांनी, या योजनेचा फायदा घेतला, त्यावेळी त्यांच्या मेमोरॅन्डममध्ये तरतुदच नव्हती. लेखापरीक्षकांचा आक्षेप आल्यानंतर आपल्यावर फौजदारी कारवाई होऊ शकते. म्हणून नंतर मेमोरॅन्डममध्ये बदल करण्यात आला आहे. या कृतीला कृषि विभागाचे अधिकारी देखील प्रोटेक्ट करणार आहेत आणी करीत आहे. त्यामुळे या प्रकरणी चौकशी करणार का?

**यावर मा. अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेत, सदर निर्देश आश्वासन क्र.७१ म्हणून प्राप्त झाले आहेत**

या संस्थांना कोणत्या निकषाच्या आधारे ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले, कोणत्या कागदपत्रांची तपासणी केली गेली, अगोदर त्यांचा उद्देश काय होता, नंतर लेखा परिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर त्यामध्ये कोणती सुधारणा केली गेली, याबाबत सर्व चौकशी मंत्री महोदयांनी स्वतः करावी आणि त्याचा अहवाल सभागृहाला सादर करावा.

---

**चौकशीबाबतची माहिती**

मा. अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार या प्रकरणी विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर यांनी चौकशी केली. चौकशीमध्ये पुढील गोष्टी आढळून आल्या आहेत.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालील निकष संस्थांच्या निवडीसाठी होते.

१. नोंदणीकृत संस्थांची निवड आत्मा संस्थेने करणे बंधनकारक राहील.
२. नोंदणीकृत संस्था, ज्यांना शेतीविषयात रस आहे, तसेच अनूभव आहे, अशाच संस्थांची निवड आत्मा संस्थेने करावी.
३. संस्था निवडीकरीता जिल्ह्यातील जास्त खपाच्या वर्तमानपत्रात जाहीरात देवून संस्थांचे अर्ज प्राप्त करुन घेवून निवड करावी.
४. सक्षम गटांची निवड करताना आत्मा संस्थेने गुणांक पध्दतीचा अवलंब करावा.
५. अवजारांच्या किमतीच्या १० टक्के रक्कम आत्मा संस्थेकडे सुरक्षा ठेव म्हणून ठेवणा-या गटांना प्राधान्य देण्यात यावे.
६. गटाच्या कार्यक्षमतेबाबत मागील तीन वर्षातील आर्थीक व्यवहार पाहणे आवश्यक राहील.
७. नोंदणीकृत कृषि विज्ञान मंडळ, पाणलोट विकास संघ, बचत गट, शेतकरी गट, विविध पीक उत्पादकांचे संघ, बिजोत्पादन प्रक्रीया समुह/संस्था (धर्मादाय आयुक्त/सहकारी कायद्यांतर्गत नोंदणी/जिल्ह्यातील आत्मा संस्थेकडील शेतकरी गट) व विविध कार्यकारी सहकारी सोसायटी या प्राधान्य क्रमाने लाभार्थी गटांची निवड करण्यात यावी.
८. वरील प्रमाणे नमुद केलेल्या नोंदणीकृत संस्था, संघ, सोसायटी मधून सक्षम गट उपलब्ध न झाल्यास इतर गटाचे निवडीसाठी आत्मा नियामक मंडळ निर्णय घेईल.
९. निवड करावयाच्या गटामध्ये महिला व मागासवर्गीय शेतकरी गटांचा प्राधान्याने समावेश असावा.

उपरोक्त निकषांच्या आधारे व सदर निकषांनुसार आवश्यक कागदपत्रांची तपासणी करुन संस्थांची निवड आत्मा संस्थे मार्फत करण्यात आली.

रोटा/म्च ९६५१ (ब) (७००-३-२०१५).

२

लेखा परिक्षकांनी केलेल्या लेखा परिक्षणात २१ गटांच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन मध्ये सदर संस्थांच्या स्थापनेचा उद्देश योजनेच्या उद्देशाशी संलग्न नसल्याचा आक्षेप नोंदविला होता. याबाबत विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर यांनी केलेल्या चौकशीत खालील सात संस्थांच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन मध्ये कृषिविषयक कामाचा उल्लेख नसल्याचे आढळले.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता |
|---|---|
| १ | बहुजन महिला उत्कर्ष मंडळ, नागपूर, ता. जि. नागपूर |
| २ | श्रीकृष्ण बहुउद्देशीय संस्था, महादुला, ता.रामटेक, जि. नागपूर |
| ३ | श्री. सोनबाजी स्पोर्टींग अॅन्ड सोशल वेलफेअर, ठाणा ता. उमरेड जि. नागपूर |
| ४ | वाल्मीकी विकास संस्था, नागपूर, ता.कुही, जि. नागपूर |
| ५ | स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय व ग्रामोद्योग संस्था, फेटरी, ता. काटोल जि. नागपूर |
| ६ | प्रगती महिला बचतगट, नेऊरवाडा, ता. पारशिवनी, जि. नागपूर |
| ७ | श्री. संत गमाजी महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालीत कृषि तंत्र विद्यालय, मोंढा, ता. हिंगणा जि. नागपूर |

योजनेच्या मार्गदर्शक सुचनांतील निकष क्रमांक दोन नुसार आत्मा संस्थेने सदर गटांची निवड केली होती. लेखा परिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर त्यामध्ये कोणतीही सुधारणा केलेली नाही.

------

आश्वासन क्रमांक १७९

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ४४(६)] शुक्रवार, सप्टेंबर १, २०१७/भाद्र १०, शके १९३९ [पृष्ठे १०, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ८५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८.**—महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. पृष्ठे १-१०

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १ सप्टेंबर २०१७

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVIII OF 2017.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA

VILLAGE PANCHAYAT ACT, 1965.

**सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

२०१७ चा महा. अध्या. १६. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे), हा दिनांक १९ जुलै २०१७ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २४ जुलै २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६) हे महाराष्ट्र विधानसभेत दिनांक १० ऑगस्ट २०१७ रोजी मांडण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेची दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानसभेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२) (क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक ३ सप्टेंबर २०१७ रोजी उक्त अध्यादेश अंमलात असण्याचा बंद होईल ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ; आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी,** आता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ।

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७ म्हणावे.

(२) तो, दिनांक १९ जुलै २०१७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये,— १९५९ चा ३.

(क) खंड (११अअ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(११अअअ) "सदस्य" याचा अर्थ कलम ११ अन्वये पंचायतीचा सदस्य म्हणून यथोचितरीत्या निवडून आलेला पंचायत सदस्य, असा आहे आणि त्यात कलम ३०अ-१अ अन्वये पंचायतीत थेट निवडून आलेल्या सरपंचाचा अंतर्भाव होतो ;" ;

(ख) खंड (१७) मध्ये "कलम ३०" या मजकुरानंतर ",३०अ-१अ" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली नसेल तर, पंचायतीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या होणाऱ्या सर्व ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत उप-सरपंच अध्यक्षस्थानी असेल ; आणि सरपंच व उप-सरपंच या दोघांच्या अनुपस्थितीत, ग्रामसभेच्या त्या सभेत उपस्थित असलेला, वयाने सर्वात ज्येष्ठ असणारा पंचायतीचा सदस्य अध्यक्षस्थानी असेल. जर पंचायतीचा कोणताही सदस्य उपस्थित नसेल तर ग्रामसभेच्या त्या सभेत, उपस्थित असलेल्या व्यक्तींनी आपल्यामधून निवडून दिलेली व्यक्ती अध्यक्षस्थानी असेल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून आलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये, उप-खंड (एक) च्या पूर्वी, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(एक-अ) कलम ३०अ-१अ अन्वये निवडून आलेला सरपंच — पदसिद्ध सदस्य ; आणि ;". ".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलमे (१) व (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १३ ची सुधारणा.

"(१) मतदार यादीत नाव असलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरलेली नसेल तर, अशी यादी ज्या प्रभागासंबंधित असेल त्या प्रभागाच्या सदस्यांच्या, आणि थेट सरपंच निवडून द्यावयाच्या पंचायतीच्या सरपंचाच्या निवडणुकीत मतदान करण्यास अर्ह असेल.

(२) प्रत्येक सार्वजनिक निवडणुकीकरिता किंवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशित करण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकास मतदार यादीत नाव असलेली आणि २१ वर्षांहून कमी वय नसलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरलेली नसेल तर, त्या गावाच्या कोणत्याही प्रभागासाठी आणि पंचायतीच्या सरपंच पदासाठी म्हणून निवडून येण्यास अर्ह असेल. अशा गावाच्या मतदार यादीत जिचे नाव नोंदविण्यात आले नसेल अशी कोणतीही व्यक्ती त्या गावाच्या कोणत्याही प्रभागासाठी आणि पंचायतीच्या सरपंच पदाकरिता निवडून येण्यास अर्ह असणार नाही.

(२अ) प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीकरिता किंवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशन करण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकास, २१ वर्षांहून कमी वयाची नसेल, आणि जिचे मतदारांच्या यादीत नाव असेल, आणि जी १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली असेल आणि जिला या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरवलेले नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, तिच्याकडे किमान शालेय शिक्षणातील ७वी इयत्तेची परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र असल्याखेरीज किंवा तिने सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे ७वी इयत्तेशी समतूल्य शैक्षणिक अर्हता असल्याखेरीज, सरपंच म्हणून निवडून दिली जाण्यास अर्ह असणार नाही.".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट-कलम (१) मध्ये,— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

(एक) खंड (अ) मधील, उप-खंड (दोन) मध्ये "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी "सहा वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ड) मध्ये, "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी, "सहा वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मधील पोट-कलम (२) मध्ये, "कलम ११" या मजकुरानंतर, "किंवा यथास्थिति कलम ३०अ-१अ", हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील पोट-कलम (२) मध्ये, "राज्य शासन" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी, "आयुक्त" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह, दाखल करण्यात येईल. सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील पोट-कलम (२) मध्ये, "तो राजीनामा सचिवाकडे अग्रेषित करील" या मजुकराऐवजी, "तो राजीनामा सात दिवसांच्या आत सचिवाकडे अग्रेषित करील" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३० ची सुधारणा.

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच, कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) प्रत्येक पंचायतीच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल.";

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (४) मध्ये "व्यक्तीसाठी व स्त्रियांसाठी पंचायतीच्या सरपंचाच्या पदांमध्ये पुढीलप्रमाणे राखीव जागा असतील" या मजकुराऐवजी, "व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी पंचायतींमध्ये सरपंचांच्या पदांचे आरक्षण हे पुढीलप्रमाणे असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ३०अ-१अ समाविष्ट करणे.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल,—

सरपंचाची थेट निवडणूक.

"**३०अ-१अ.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, ज्या पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका घ्यावयाच्या आहेत त्या पंचायतीच्या बाबतीत कलम ३० ची पोट-कलमे (४), (५) व (६) याच्या तरतुदींना अधीन राहून प्रत्येक पंचायतीस एक सरपंच असेल ज्याला, कलम १२ खालील ग्रामपंचायतीच्या मतदार यादीत ज्यांची नावे समाविष्ट असतील, अशा व्यक्तींनी निवडून दिलेले असेल. २०१७ चा. महा. अध्या. १६.

(२) पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल आणि पंचायतीची निवडणूक घेण्याची कार्यपद्धती, अशा निवडणुकीस योग्य त्या फेरफारांसह लागू असेल.

(३) निवडणुकीच्या वेळी कोणीही सरपंच निवडला गेला नाही तर, सरपंच निवडण्यासाठी नव्याने निवडणूक घेण्यात येईल आणि नव्याने घेतलेल्या निवडणुकीमध्येही सरपंचाची निवड झाली नाही तर, अशी रिक्त जागा, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल आणि या पोट-कलमान्वये निवडून दिलेल्या सरपंचाचा पदावधी हा, पंचायतीच्या सदस्यांच्या पदावधी इतका असेल.

(४) पोट-कलम (३) अन्वये निवडून आलेली कोणतीही व्यक्ती ही, या कलमान्वये निवडणुकीमध्ये यथोचितरीत्या निवडून आली असल्याचे मानण्यात येईल.

(५) सरपंचाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल, राज्य निवडणूक आयुक्ताद्वारे किंवा त्या प्रयोजनार्थ त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे, चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(६) सरपंचाच्या निवडणुकीसंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास, त्याबाबतीत कलम १५ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०अ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३०अ मध्ये,

(क) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या पहिल्या सभेमध्ये उप सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल.";

(ख) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२अ) ज्या पंचायतीचा सरपंच थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात, उप सरपंचाच्या बाबतीत कलम ३० च्या पोट-कलम (३) च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.".

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

" (६) ज्या पंचायतीचा सरपंच, या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात या कलमाच्या तरतुदी, पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) मध्ये " सरपंच व उप सरपंच याच्या निवडणुकीसाठी " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी " उप सरपंचाच्या निवडणुकीसाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ च्या तरतुदींनुसार सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल. ".

(ग) पोट-कलम (२) मध्ये " सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी आदेशाद्वारे याबाबत " या मजकुराऐवजी " सभेचे अध्यक्षस्थान सरपंच स्वीकारील, सरपंचाचे पद रिक्त असेल तर जिल्हाधिकारी आदेशाद्वारे याबाबत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (३) मध्ये "सरपंच आणि" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) उप-सरपंचाच्या निवडणुकीमध्ये समसमान मते पडल्यास सरपंचाला निर्णायक मत देण्याचा हक्क असेल आणि सरपंचाचे पद रिक्त असल्यास, त्या निवडणुकीचा निकाल, पीठासीन अधिकारी निर्धारित करील अशा रीतीने त्याच्या समक्ष चिठ्ठी टाकून देण्यात येईल. ";

(च) पोट-कलम (५) मध्ये,—

(एक) " सरपंचाच्या किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) " अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या " या मजकुरानंतर "सरपंचास किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. ".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) मध्ये, "एक-तृतीयांशापेक्षा" या मजकुराऐवजी, "दोन-तृतीयांशापेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये,—

" त्या त्या वेळी पंचायतीच्या कोणत्याही सभेस " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " उप-सरपंचाकडे निहित होतील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" त्या त्या वेळी पंचायतीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असणाऱ्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने जर असा अविश्वास प्रस्ताव संमत करण्यात आला असेल आणि, जिल्हाधिकाऱ्याने या प्रयोजनार्थ नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या समक्ष आणि त्याच्या अध्यक्षतेखालील विशेष ग्राम सभेसमोर गुप्त मतदानाद्वारे त्या अविश्वास प्रस्तावाला संमती दिली असेल तर, सरपंच किंवा, यथास्थिति, उप-सरपंच त्या पदाच्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचे व त्याची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्याचे ताबडतोब थांबवील आणि जर तो अविश्वास प्रस्ताव सरपंचाच्या विरुद्ध संमत करण्यात आला असेल तर त्यानंतर असे अधिकार, कार्ये व कर्तव्ये उप-सरपंचाकडे निहित होतील. " ;

(ग) चौथ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

" परंतु तसेच, सरपंचाच्या किंवा उप-सरपंचाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत आणि पंचायतीची मुदत समाप्त होणाऱ्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत असा कोणताही अविश्वासाचा प्रस्ताव आणला जाणार नाही :

परंतु तसेच, असा अविश्वासाचा प्रस्ताव निष्फळ ठरवल्यास, त्यानंतर पुढील दोन वर्षाच्या कालावधीत असा कोणताही प्रस्ताव आणला जाणार नाही. ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मधील पोट-कलम (२) मध्ये, खंड (एक) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१-अ) ज्या पंचायतीचा सरपंच या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिला असेल अशा पंचायतीच्या संबंधात तो सरपंच पुढील अधिकारांचा देखील वापर करील आणि पुढील कार्ये व कर्तव्ये पार पाडील,—

(अ) पंचायतीच्या सभांच्या कार्यसूचीस अंतिम रूप देणे :

परंतु, जर तीन किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य, लगतनंतरच्या सभेच्या कार्यसूचीवर कोणत्याही बाबीचा समावेश करण्याची मागणी करतील तर, सरपंच ती कोणतीही बाब पुढच्या सभेच्या कार्यसूचीत समाविष्ट करील :

परंतु आणखी असे की, कोणतेही अनौपचारिक वित्तीय कामकाज हे अग्रेषित कार्यसूचीचा भाग असल्याखेरीज चालविले जाणार नाही :

परंतु तसेच, जर सरपंचाच्या मते, पंचायतीचा कोणत्याही विषयावरील ठराव हा त्या गावाच्या व्यापक हितास बाधक ठरणारा असेल तर, सरपंच, तो ठराव लगतनंतरच्या पुढील ग्रामसभेपुढे अंतिम निर्णयासाठी ठेवण्याची व्यवस्था करील आणि त्यावरील ग्रामसभेचा निर्णय अंतिम असेल ;

(ब) पंचायतीचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे ;

(क) पंचायतीशी विचारविनियम करून, योजना राबविण्यासाठी इतर सर्व अधिकारांचा वापर करणे; ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ च्या पोट-कलम (२) मध्ये " पाच वर्षे " या मजकुराऐवजी " सहा वर्षे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे, की या पोट-कलमान्वये रिक्त झालेले थेट निर्वाचित सरपंचाचे पद, ते रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीच्या आत, कलम ३०अ-१अ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेल्या रीतीने निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४९ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये पोट-कलम (४) मधील परंतुकामध्ये,—

(एक) खंड (अ) च्या आधी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अ १) सरपंच हा तिचा पदसिद्ध अध्यक्ष असेल ; " ;

(दोन) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ग) ग्रामसेवक हा तिचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल. ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अअ) ज्या पंचायतीचा सरपंच, या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलमे (१) व (१अ) ऐवजी पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

" (१) सरपंच दरवर्षी विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील विवरणाद्वारे पुढील बाबीसंबंधीच्या रकमा प्रत्येक वर्षाच्या ५ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी निर्धारित करील :—

(अ) निधीतील प्रारंभिक शिल्लक व पुढील वित्तीय वर्षासाठी पंचायतीची अंदाजित प्राप्ती ;

(ब) आस्थापनेसाठी व कलम ४५ अन्वये आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी योजलेला खर्च ;

(क) कलम १३३ अन्वये स्थापन केलेल्या जिल्हा ग्रामविकास निधीला द्यावयाची अंशदानाची रक्कम ;

(ड) खंड (अ), (ब) किंवा, यथास्थिती, (क) अन्वये तयार केलेले विवरण सरपंच पंचायतीसमोर ठेवील ;

(इ) पंचायत उक्त विवरणबाबतच्या आपल्या शिफारशींना ३१ जानेवारी किंवा त्यापूर्वी अंतिम स्वरूप देईल ;

(फ) खंड (इ) खालील पंचायतीच्या शिफारशींसह ते विवरण ग्रामसभेपुढे तिच्या अनुसमर्थनार्थ ठेवण्यात येईल, त्यास ग्रामसभा २८ फेब्रुवारी किंवा त्यापूर्वी अनुसमर्थन देईल ;

(ग) खंड (फ) खालील ग्रामसभेच्या निर्णयानंतर, उक्त विवरण पंचायत समितीला सादर करण्यात येईल.

(१अ) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी,—

(अ) सरपंचाने विवरण सादर न केल्यास, किंवा

(ब) पंचायतीने सदर विवरणास शिफारशी न दिल्यास, किंवा

(क) ग्रामसभेने सदर शिफारशीच्या अनुसमर्थनाबाबतचा निर्णय न घेतल्यास,–

सचिव, करावयाच्या अनिवार्य व कार्यालयीन खर्चासंबंधीचे ते विवरण तयार करील, आणि ते उक्त पोट-कलमान्वये विहित केलेल्या नमुन्यात, पंचायत समितीला सादर करील." ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " पंचायत समिती " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " असा निदेश देईल. " या मजकुराने संपणाऱ्या या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल,-

" पंचायत समिती, दरवर्षी ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी, एकतर त्या विवरणास मान्यता देईल किंवा कलम ४५ खाली येणाऱ्या कोणत्याही कर्तव्याबाबतचा खर्च वाढविण्याचा किंवा तो कमी करण्याचा निदेश देईल. या कलमाच्या पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेली अर्थसंकल्पीय प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दिनांकापर्यंत अशा विवरणानुसार खर्च करण्यात येईल. " ;

(ग) पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये, " पंचायत समिती असे विवरण मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, एकतर अशा विवरणास " या मजकुराऐवजी, " पंचायत समिती अशा विवरणास प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी, आणि सुधारित व पुरक विवरणाच्या बाबतीत, ते विवरण मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, एकतर " हा मजकूर दाखल करण्यात येईल. ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६२अ ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२अ ला, त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, सरपंचास, ज्या वित्तीय वर्षाच्या अशा कोणत्याही विवरणास पूर्वोक्तप्रमाणे मान्यता देण्यात आली असेल त्या वित्तीय वर्षामध्ये कोणत्याही वेळी, सुधारित किंवा पूरक विवरण तयार करविता येईल. असे प्रत्येक सुधारित किंवा पूरक विवरण, जणू काही ते मूळ विवरणच होते असे समजून तशाच रीतीने, पंचायत समितीकडून विचारात घेण्यात येईल आणि त्यास मान्यता देण्यात येईल, आणि अशा सुधारित किंवा पूरक विवरणाच्या संबंधात कलम ६२ च्या तरतुदी लागू असतील. "

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४५ ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४५ मध्ये, पोट-कलम (१अ) वगळण्यात येईल.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

**२२.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेले कोणतेही निदेश देता येतील : १९५९ चा ३.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहामध्ये ठेवण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२३.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१७ चा महा. अध्या. १६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असेल तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणताही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. १९५९ चा ३.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याच्या तत्कालीन विद्यमान तरतुदींनुसार, पंचायतीच्या निवडून दिलेल्या सदस्यांमधून सरपंचाची निवड केली जात होती ज्याच्याकरिता सरपंच पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास त्यांच्यामधून बहुमत मिळणे आवश्यक होते. त्याचबरोबर, अधिनियमाच्या तत्कालीन विद्यमान तरतुदींमध्ये अशीही तरतूद केली होती की, सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांना अविश्वासाचा प्रस्ताव मांडता येत होता. परिणामी, सदस्य वारंवार अविश्वासाचा ठराव मांडायचे, ज्यामुळे सरपंचाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत होता आणि पंचायतीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यामध्ये व्यत्यय येत होते.

२. म्हणून, योग्य त्या विचारविमर्शानंतर, पंचायतीच्या कामकाजामध्ये ज्यामुळे स्थैर्य प्राप्त होईल अशी, लोकांमधून ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाकरिता थेट निवडणूक घेणारी यंत्रणा अंगीकारणे आवश्यक वाटले. म्हणून, त्यामुळे पंचायतीच्या परिणामकारक कामकाजासाठी आणि विकासासाठी सरपंचाचे पद सक्षम करण्याकरिता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) यांमधील तरतुदीमध्ये योग्य त्या आणखी सुधारणा करणे इष्ट वाटले.

३. तत्कालीन प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती :—

(एक) पंचायतीच्या पात्र मतदारांकडून गुप्त मतदान पद्धतीने सरपंचाची निवड करण्यात येईल, अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते.

(दोन) सरपंच, पंचायतीच्या सर्व ग्राम सभांचा आणि ग्रामविकास समित्यांचा अध्यक्षस्थानी असेल अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते.

(तीन) सरपंचाविरुद्ध, पंचायतीकडून जर अविश्वासाचा ठराव मंजूर केला असेल तर तो, अनुसमर्थनासाठी ग्रामसभेसमोर ठेवण्यात येईल, अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते.

(चार) अर्थसंकल्प तयार करण्याची जबाबदारी सरपंचाकडे देण्याचे प्रस्तावित केले होते.

(पाच) निवडून दिलेला सरपंच हा आपल्या गावातील लोकांना थेट जबाबदार असेल.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक १९ जुलै २०१७ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (२०१७ चा महा. अध्या. १६) हा प्रख्यापित केला होता.

५. त्यानंतर, दिनांक २४ जुलै २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६) हे महाराष्ट्र विधानसभेत दिनांक १० ऑगस्ट २०१७ रोजी मांडण्यात आले. तथापि, त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेची दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानसभेकडून उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही.

६. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२) (क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक ३ सप्टेंबर २०१७ रोजी उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद होईल. म्हणून, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी नवीन अध्यादेश प्रख्यापित करून तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

७. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ याच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३१ ऑगस्ट २०१७.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम गुप्ता,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ४४(६)] शुक्रवार, सप्टेंबर १, २०१७/भाद्र १०, शके १९३९ [पृष्ठे १०, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ८५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८.**—महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | पृष्ठे १-१० |

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १ सप्टेंबर २०१७

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVIII OF 2017.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA

VILLAGE PANCHAYAT ACT, 1965.

**सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

२०१७ चा महा. अध्या. १६. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे), हा दिनांक १९ जुलै २०१७ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २४ जुलै २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६) हे महाराष्ट्र विधानसभेत दिनांक १० ऑगस्ट २०१७ रोजी मांडण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेची दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानसभेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२) (क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक ३ सप्टेंबर २०१७ रोजी उक्त अध्यादेश अंमलात असण्याचा बंद होईल ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ; आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी,** आता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ।

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७ म्हणावे.

(२) तो, दिनांक १९ जुलै २०१७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये,— १९५९ चा ३.

(क) खंड (११अअ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(११अअअ) "सदस्य" याचा अर्थ कलम ११ अन्वये पंचायतीचा सदस्य म्हणून यथोचितरीत्या निवडून आलेला पंचायत सदस्य, असा आहे आणि त्यात कलम ३०अ-१अ अन्वये पंचायतीत थेट निवडून आलेल्या सरपंचाचा अंतर्भाव होतो ;" ;

(ख) खंड (१७) मध्ये "कलम ३०" या मजकुरानंतर ",३०अ-१अ" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली नसेल तर, पंचायतीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या होणाऱ्या सर्व ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत उप-सरपंच अध्यक्षस्थानी असेल ; आणि सरपंच व उप-सरपंच या दोघांच्या अनुपस्थितीत, ग्रामसभेच्या त्या सभेत उपस्थित असलेला, वयाने सर्वात ज्येष्ठ असणारा पंचायतीचा सदस्य अध्यक्षस्थानी असेल. जर पंचायतीचा कोणताही सदस्य उपस्थित नसेल तर ग्रामसभेच्या त्या सभेत, उपस्थित असलेल्या व्यक्तींनी आपल्यामधून निवडून दिलेली व्यक्ती अध्यक्षस्थानी असेल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून आलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये, उप-खंड (एक) च्या पूर्वी, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(एक-अ) कलम ३०अ-१अ अन्वये निवडून आलेला सरपंच — पदसिद्ध सदस्य ; आणि ;". ".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलमे (१) व (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १३ ची सुधारणा.

"(१) मतदार यादीत नाव असलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरलेली नसेल तर, अशी यादी ज्या प्रभागासंबंधित असेल त्या प्रभागाच्या सदस्यांच्या, आणि थेट सरपंच निवडून द्यावयाच्या पंचायतीच्या सरपंचाच्या निवडणुकीत मतदान करण्यास अर्ह असेल.

(२) प्रत्येक सार्वजनिक निवडणुकीकरिता किंवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशित करण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकास मतदार यादीत नाव असलेली आणि २१ वर्षांहून कमी वय नसलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरलेली नसेल तर, त्या गावाच्या कोणत्याही प्रभागासाठी आणि पंचायतीच्या सरपंच पदासाठी म्हणून निवडून येण्यास अर्ह असेल. अशा गावाच्या मतदार यादीत जिचे नाव नोंदविण्यात आले नसेल अशी कोणतीही व्यक्ती त्या गावाच्या कोणत्याही प्रभागासाठी आणि पंचायतीच्या सरपंच पदाकरिता निवडून येण्यास अर्ह असणार नाही.

(२अ) प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीकरिता किंवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशन करण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकास, २१ वर्षांहून कमी वयाची नसेल, आणि जिचे मतदारांच्या यादीत नाव असेल, आणि जी १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली असेल आणि जिला या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरवलेले नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, तिच्याकडे किमान शालेय शिक्षणातील ७वी इयत्तेची परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र असल्याखेरीज किंवा तिने सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे ७वी इयत्तेशी समतूल्य शैक्षणिक अर्हता असल्याखेरीज, सरपंच म्हणून निवडून दिली जाण्यास अर्ह असणार नाही.".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट-कलम (१) मध्ये,— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

(एक) खंड (अ) मधील, उप-खंड (दोन) मध्ये "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी "सहा वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ड) मध्ये, "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी, "सहा वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मधील पोट-कलम (२) मध्ये, "कलम ११" या मजकुरानंतर, "किंवा यथास्थिति कलम ३०अ-१अ", हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील पोट-कलम (२) मध्ये, "राज्य शासन" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी, "आयुक्त" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह, दाखल करण्यात येईल. सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील पोट-कलम (२) मध्ये, "तो राजीनामा सचिवाकडे अग्रेषित करील" या मजुकराऐवजी, "तो राजीनामा सात दिवसांच्या आत सचिवाकडे अग्रेषित करील" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३० ची सुधारणा.

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच, कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) प्रत्येक पंचायतीच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल.";

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (४) मध्ये "व्यक्तीसाठी व स्त्रियांसाठी पंचायतीच्या सरपंचाच्या पदांमध्ये पुढीलप्रमाणे राखीव जागा असतील" या मजकुराऐवजी, "व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी पंचायतींमध्ये सरपंचांच्या पदांचे आरक्षण हे पुढीलप्रमाणे असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ३०अ-१अ समाविष्ट करणे.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल,—

सरपंचाची थेट निवडणूक.

"**३०अ-१अ.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, ज्या पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका घ्यावयाच्या आहेत त्या पंचायतीच्या बाबतीत कलम ३० ची पोट-कलमे (४), (५) व (६) याच्या तरतुदींना अधीन राहून प्रत्येक पंचायतीस एक सरपंच असेल ज्याला, कलम १२ खालील ग्रामपंचायतीच्या मतदार यादीत ज्यांची नावे समाविष्ट असतील, अशा व्यक्तींनी निवडून दिलेले असेल. २०१७ चा. महा. अध्या. १६.

(२) पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल आणि पंचायतीची निवडणूक घेण्याची कार्यपद्धती, अशा निवडणुकीस योग्य त्या फेरफारांसह लागू असेल.

(३) निवडणुकीच्या वेळी कोणीही सरपंच निवडला गेला नाही तर, सरपंच निवडण्यासाठी नव्याने निवडणूक घेण्यात येईल आणि नव्याने घेतलेल्या निवडणुकीमध्येही सरपंचाची निवड झाली नाही तर, अशी रिक्त जागा, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल आणि या पोट-कलमान्वये निवडून दिलेल्या सरपंचाचा पदावधी हा, पंचायतीच्या सदस्यांच्या पदावधी इतका असेल.

(४) पोट-कलम (३) अन्वये निवडून आलेली कोणतीही व्यक्ती ही, या कलमान्वये निवडणुकीमध्ये यथोचितरीत्या निवडून आली असल्याचे मानण्यात येईल.

(५) सरपंचाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल, राज्य निवडणूक आयुक्ताद्वारे किंवा त्या प्रयोजनार्थ त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे, चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(६) सरपंचाच्या निवडणुकीसंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास, त्याबाबतीत कलम १५ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०अ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३०अ मध्ये,

(क) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या पहिल्या सभेमध्ये उप सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल.";

(ख) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२अ) ज्या पंचायतीचा सरपंच थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात, उप सरपंचाच्या बाबतीत कलम ३० च्या पोट-कलम (३) च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.".

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

"(६) ज्या पंचायतीचा सरपंच, या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात या कलमाच्या तरतुदी, पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) मध्ये "सरपंच व उप सरपंच याच्या निवडणुकीसाठी" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "उप सरपंचाच्या निवडणुकीसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१अ) या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ च्या तरतुदींनुसार सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल.".

(ग) पोट-कलम (२) मध्ये "सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी आदेशाद्वारे याबाबत" या मजकुराऐवजी "सभेचे अध्यक्षस्थान सरपंच स्वीकारील, सरपंचाचे पद रिक्त असेल तर जिल्हाधिकारी आदेशाद्वारे याबाबत" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (३) मध्ये "सरपंच आणि" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) उप-सरपंचाच्या निवडणुकीमध्ये समसमान मते पडल्यास सरपंचाला निर्णायक मत देण्याचा हक्क असेल आणि सरपंचाचे पद रिक्त असल्यास, त्या निवडणुकीचा निकाल, पीठासीन अधिकारी निर्धारित करील अशा रीतीने त्याच्या समक्ष चिठ्ठी टाकून देण्यात येईल.";

(च) पोट-कलम (५) मध्ये,—

(एक) "सरपंचाच्या किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) "अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या" या मजकुरानंतर "सरपंचास किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) मध्ये, "एक-तृतीयांशापेक्षा" या मजकुराऐवजी, "दोन-तृतीयांशापेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये,—

"त्या त्या वेळी पंचायतीच्या कोणत्याही सभेस" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "उप-सरपंचाकडे निहित होतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"त्या त्या वेळी पंचायतीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असणाऱ्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने जर असा अविश्वास प्रस्ताव संमत करण्यात आला असेल आणि, जिल्हाधिकाऱ्याने या प्रयोजनार्थ नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या समक्ष आणि त्याच्या अध्यक्षतेखालील विशेष ग्राम सभेसमोर गुप्त मतदानाद्वारे त्या अविश्वास प्रस्तावाला संमती दिली असेल तर, सरपंच किंवा, यथास्थिति, उप-सरपंच त्या पदाच्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचे व त्याची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्याचे ताबडतोब थांबवील आणि जर तो अविश्वास प्रस्ताव सरपंचाच्या विरुद्ध संमत करण्यात आला असेल तर त्यानंतर असे अधिकार, कार्ये व कर्तव्ये उप-सरपंचाकडे निहित होतील.";

(ग) चौथ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

" परंतु तसेच, सरपंचाच्या किंवा उप-सरपंचाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत आणि पंचायतीची मुदत समाप्त होणाऱ्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत असा कोणताही अविश्वासाचा प्रस्ताव आणला जाणार नाही :

परंतु तसेच, असा अविश्वासाचा प्रस्ताव निष्फळ ठरवल्यास, त्यानंतर पुढील दोन वर्षाच्या कालावधीत असा कोणताही प्रस्ताव आणला जाणार नाही. ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मधील पोट-कलम (२) मध्ये, खंड (एक) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१-अ) ज्या पंचायतीचा सरपंच या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिला असेल अशा पंचायतीच्या संबंधात तो सरपंच पुढील अधिकारांचा देखील वापर करील आणि पुढील कार्ये व कर्तव्ये पार पाडील,—

(अ) पंचायतीच्या सभांच्या कार्यसूचीस अंतिम रूप देणे :

परंतु, जर तीन किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य, लगतनंतरच्या सभेच्या कार्यसूचीवर कोणत्याही बाबीचा समावेश करण्याची मागणी करतील तर, सरपंच ती कोणतीही बाब पुढच्या सभेच्या कार्यसूचीत समाविष्ट करील :

परंतु आणखी असे की, कोणतेही अनौपचारिक वित्तीय कामकाज हे अग्रेषित कार्यसूचीचा भाग असल्याखेरीज चालविले जाणार नाही :

परंतु तसेच, जर सरपंचाच्या मते, पंचायतीचा कोणत्याही विषयावरील ठराव हा त्या गावाच्या व्यापक हितास बाधक ठरणारा असेल तर, सरपंच, तो ठराव लगतनंतरच्या पुढील ग्रामसभेपुढे अंतिम निर्णयासाठी ठेवण्याची व्यवस्था करील आणि त्यावरील ग्रामसभेचा निर्णय अंतिम असेल ;

(ब) पंचायतीचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे ;

(क) पंचायतीशी विचारविनियम करून, योजना राबविण्यासाठी इतर सर्व अधिकारांचा वापर करणे; ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ च्या पोट-कलम (२) मध्ये " पाच वर्षे " या मजकुराऐवजी " सहा वर्षे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे, की या पोट-कलमान्वये रिक्त झालेले थेट निर्वाचित सरपंचाचे पद, ते रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीच्या आत, कलम ३०अ-१अ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेल्या रीतीने निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४९ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये पोट-कलम (४) मधील परंतुकामध्ये,—

(एक) खंड (अ) च्या आधी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अ १) सरपंच हा तिचा पदसिद्ध अध्यक्ष असेल ; " ;

(दोन) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ग) ग्रामसेवक हा तिचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल. ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अअ) ज्या पंचायतीचा सरपंच, या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलमे (१) व (१अ) ऐवजी पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

" (१) सरपंच दरवर्षी विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील विवरणाद्वारे पुढील बाबीसंबंधीच्या रकमा प्रत्येक वर्षाच्या ५ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी निर्धारित करील :—

(अ) निधीतील प्रारंभिक शिल्लक व पुढील वित्तीय वर्षासाठी पंचायतीची अंदाजित प्राप्ती ;

(ब) आस्थापनेसाठी व कलम ४५ अन्वये आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी योजलेला खर्च ;

(क) कलम १३३ अन्वये स्थापन केलेल्या जिल्हा ग्रामविकास निधीला द्यावयाची अंशदानाची रक्कम ;

(ड) खंड (अ), (ब) किंवा, यथास्थिती, (क) अन्वये तयार केलेले विवरण सरपंच पंचायतीसमोर ठेवील ;

(इ) पंचायत उक्त विवरणबाबतच्या आपल्या शिफारशींना ३१ जानेवारी किंवा त्यापूर्वी अंतिम स्वरूप देईल ;

(फ) खंड (इ) खालील पंचायतीच्या शिफारशींसह ते विवरण ग्रामसभेपुढे तिच्या अनुसमर्थनार्थ ठेवण्यात येईल, त्यास ग्रामसभा २८ फेब्रुवारी किंवा त्यापूर्वी अनुसमर्थन देईल ;

(ग) खंड (फ) खालील ग्रामसभेच्या निर्णयानंतर, उक्त विवरण पंचायत समितीला सादर करण्यात येईल.

(१अ) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी,—

(अ) सरपंचाने विवरण सादर न केल्यास, किंवा

(ब) पंचायतीने सदर विवरणास शिफारशी न दिल्यास, किंवा

(क) ग्रामसभेने सदर शिफारशीच्या अनुसमर्थनाबाबतचा निर्णय न घेतल्यास,-

सचिव, करावयाच्या अनिवार्य व कार्यालयीन खर्चासंबंधीचे ते विवरण तयार करील, आणि ते उक्त पोट-कलमान्वये विहित केलेल्या नमुन्यात, पंचायत समितीला सादर करील." ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " पंचायत समिती " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " असा निदेश देईल. " या मजकुराने संपणाऱ्या या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल,-

" पंचायत समिती, दरवर्षी ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी, एकतर त्या विवरणास मान्यता देईल किंवा कलम ४५ खाली येणाऱ्या कोणत्याही कर्तव्याबाबतचा खर्च वाढविण्याचा किंवा तो कमी करण्याचा निदेश देईल. या कलमाच्या पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेली अर्थसंकल्पीय प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दिनांकापर्यंत अशा विवरणानुसार खर्च करण्यात येईल. " ;

(ग) पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये, " पंचायत समिती असे विवरण मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, एकतर अशा विवरणास " या मजकुराऐवजी, " पंचायत समिती अशा विवरणास प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी, आणि सुधारित व पुरक विवरणाच्या बाबतीत, ते विवरण मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, एकतर " हा मजकूर दाखल करण्यात येईल. ".

**सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६२अ ची सुधारणा.**

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२अ ला, त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, सरपंचास, ज्या वित्तीय वर्षाच्या अशा कोणत्याही विवरणास पूर्वोक्तप्रमाणे मान्यता देण्यात आली असेल त्या वित्तीय वर्षामध्ये कोणत्याही वेळी, सुधारित किंवा पूरक विवरण तयार करविता येईल. असे प्रत्येक सुधारित किंवा पूरक विवरण, जणू काही ते मूळ विवरणच होते असे समजून तशाच रीतीने, पंचायत समितीकडून विचारात घेण्यात येईल आणि त्यास मान्यता देण्यात येईल, आणि अशा सुधारित किंवा पूरक विवरणाच्या संबंधात कलम ६२ च्या तरतुदी लागू असतील. "

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४५ ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४५ मध्ये, पोट-कलम (१अ) वगळण्यात येईल.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

**२२.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेले कोणतेही निदेश देता येतील : १९५९ चा ३.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहामध्ये ठेवण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२३.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१७ चा महा. अध्या. १६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असेल तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणताही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अध्यादेशद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. १९५९ चा ३.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याच्या तत्कालीन विद्यमान तरतुदींनुसार, पंचायतीच्या निवडून दिलेल्या सदस्यांमधून सरपंचाची निवड केली जात होती ज्याच्याकरिता सरपंच पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास त्यांच्यामधून बहुमत मिळणे आवश्यक होते. त्याचबरोबर, अधिनियमाच्या तत्कालीन विद्यमान तरतुदींमध्ये अशीही तरतूद केली होती की, सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांना अविश्वासाचा प्रस्ताव मांडता येत होता. परिणामी, सदस्य वारंवार अविश्वासाचा ठराव मांडायचे, ज्यामुळे सरपंचाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत होता आणि पंचायतीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यामध्ये व्यत्यय येत होते.

२. म्हणून, योग्य त्या विचारविमर्शानंतर, पंचायतीच्या कामकाजामध्ये ज्यामुळे स्थैर्य प्राप्त होईल अशी, लोकांमधून ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाकरिता थेट निवडणूक घेणारी यंत्रणा अंगीकारणे आवश्यक वाटले. म्हणून, त्यामुळे पंचायतीच्या परिणामकारक कामकाजासाठी आणि विकासासाठी सरपंचाचे पद सक्षम करण्याकरिता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) यांमधील तरतुदीमध्ये योग्य त्या आणखी सुधारणा करणे इष्ट वाटले.

३. तत्कालीन प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती :—

(एक) पंचायतीच्या पात्र मतदारांकडून गुप्त मतदान पद्धतीने सरपंचाची निवड करण्यात येईल, अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते.

(दोन) सरपंच, पंचायतीच्या सर्व ग्राम सभांचा आणि ग्रामविकास समित्यांचा अध्यक्षस्थानी असेल अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते.

(तीन) सरपंचाविरुद्ध, पंचायतीकडून जर अविश्वासाचा ठराव मंजूर केला असेल तर तो, अनुसमर्थनासाठी ग्रामसभेसमोर ठेवण्यात येईल, अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते.

(चार) अर्थसंकल्प तयार करण्याची जबाबदारी सरपंचाकडे देण्याचे प्रस्तावित केले होते.

(पाच) निवडून दिलेला सरपंच हा आपल्या गावातील लोकांना थेट जबाबदार असेल.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक १९ जुलै २०१७ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (२०१७ चा महा. अध्या. १६) हा प्रख्यापित केला होता.

५. त्यानंतर, दिनांक २४ जुलै २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६) हे महाराष्ट्र विधानसभेत दिनांक १० ऑगस्ट २०१७ रोजी मांडण्यात आले. तथापि, त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेची दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानसभेकडून उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही.

६. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२) (क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक ३ सप्टेंबर २०१७ रोजी उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद होईल. म्हणून, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी नवीन अध्यादेश प्रख्यापित करून तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

७. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ याच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३१ ऑगस्ट २०१७.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम गुप्ता,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**आश्वासन क्रमांक १६२**

**राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारित)" या योजनेला दिनांक ३१.०३.२०१४ पर्यंत मुदतवाढ देणे, प्रति घरकुल अनुदानात वाढ करुन "क" वर्ग नगरपरिषदांचा यात समावेश करणे व योजनेचे "राजीव गांधी घरकुल योजना" असे नामकरण करुन सदर योजना राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र.रागांयो-२०१३/प्र.क्र.३३०/गृनिधो-१
गृहनिर्माण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २२ ऑगस्ट, २०१४.

वाचा : १) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.रागांयो-२००९/प्र.क्र.१८०/गृनिधो-१. दि.२१.८.२००९
२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.रागांयो २०१/प्र.क्र.४२ (दुय्यम धारिका)/गृनिधो-१, दिनांक २८.०३.२०१३
३) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र. रागांयो २०१२/प्र.क्र.४२/गृनिधो-१, दिनांक २०.०६.२०१३
४) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.इंआयो २०१३/प्र.क्र.२९६/योजना-१०, दिनांक ७.११.२०१३
५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.रआयो २०१४/प्र.क्र.१०/बांधकामे,दि. १८.७.२०१४
६) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.घरकुल २०१२/प्र.क्र.३८/ (भाग-१)/का-१७,दिनांक ७.८.२०१४

प्रस्तावना :-

राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना हक्काचे घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये "सुवर्ण महोत्सवी ग्रामीण निवारा हक्क मोहीम" राबविण्याचा निर्णय घेण्यांत आला होता. या मोहिमेअंतर्गत सन २००९-२०१० ते सन २०११-१२ या ३ वर्षात शासनाच्या गृहनिर्माण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. १ (सुधारित)" च्या माध्यमातून प्रतिवर्षी २१,००० घरकुले बांधण्याचे निश्चित करण्यात आले होते. "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. १ (सुधारित)" या योजनेअंतर्गत राज्य शासनामार्फत देण्यात येणारे प्रति घरकुल अनुदान रु. ६८,५००/- व लाभार्थ्याचा हिस्सा रु.१५००/- अशी एकूण घरकुलाची किंमत रु.७०,०००/- इतकी निश्चित करण्यात आली.

२. ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत राज्याच्या ग्रामीण भागातील दारिद्रेरेषेखालील कुटुंबांकरिता, "इंदिरा आवास योजना" ही योजना राबविण्यात येते. ही योजना केंद्र शासन पुरस्कृत व राज्य शासन सहभागाची योजना असून "इंदिरा आवास योजना" व "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारित)" या दोन्ही योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांच्या माध्यमातून अंमलात येतात. या दोन्ही योजनांतील लाभार्थ्यांची निवड ग्राम पंचायतींकडील दारिद्रयरेषेखालील कुटूंबाकरीता तयार करण्यात आलेल्या एकाच प्रतीक्षा यादीतून करण्यात येते.

३.    ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या निर्णय क्र.इंआयो २०१०/प्र.क्र.१२८/योजना-१० दिनांक २.०७.२०१० च्या शासन निर्णयान्वये इंदिरा आवास योजनेअंतर्गत रु.७०,०००/- इतकी घरकुलाची किंमत निश्चित करण्यात आली होती. त्यामध्ये केंद्र शासनाचा व राज्य शासनाचा एकत्रित हिस्सा रु.६८,५००/- व लाभार्थ्यांचा हिस्सा रु.१,५००/- इतका होता. केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणा-या घरकुलांच्या किंमतीत केलेल्या वाढीस अनुसरुन ग्रामविकास विभागाच्या संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णय दि. ७.११.२०१३ अन्वये राज्य शासनाचा हिस्सा तसेच राज्य शासनाच्या अतिरिक्त अनुदानात वाढ करून दि.१.०४.२०१३ पासून नवीन मंजूर घरकुलाची किंमत रु. १,००,०००/- इतकी निर्धारित करण्यात आली आहे. त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा एकत्रित हिस्सा रु.९५,०००/- इतका वाढविण्यात आला असून, लाभार्थ्यांचा हिस्सा रु.५०००/- इतका ठरविण्यात आला आहे.

४.    इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी "रमाई आवास योजना" तसेच आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी "शबरी आदिवासी घरकुल योजना" या योजना राबविण्यात येतात. ग्रामविकास व जलसंधारण विभागाने उपरोक्त दि.७.११.२०१३ अन्वये इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांच्या किंमतीत रु.७०,०००/- वरुन रु.१,००,०००/- इतकी वाढ केल्याने त्याच धर्तीवर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या दि.१८.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये रमाई आवास योजनेतील तर आदिवासी विकास विभागाने त्यांच्या दि.७.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेतील घरकुलांच्या किंमतीत रु.७०,०००/- वरुन रु.१,००,०००/- इतकी वाढ केली आहे.

वरीलप्रमाणे इंदिरा आवास योजनेच्या व त्या योजनेच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या अन्य २ योजनांच्या घरकुलांच्या किंमतीत वाढ करण्यात आल्याने, इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर गृहनिर्माण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारित) या योजनेअंतर्गत शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सध्याच्या रु.६८,५००/- इतक्या प्रति घरकुल अनुदानातही रु.२६,५००/- इतकी वाढ करुन सदर अनुदान रु.९५,०००/- इतके करण्याचा व त्याअनुषंगाने घरकुलाची किंमत रु.१,००,०००/- इतकी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

५.    "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारित)" अंतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी जून २०१४ च्या पावसाळी अधिवेशनात, रू.१००.०० कोटी इतका निधी, पूरक मागणीद्वारे मंजूर करण्यात आला आहे. तसेच २०१०-११ ते २०१२-१३ या दरम्यान वितरीत केलेला निधी लक्षात घेता या योजनेअंतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी रु.४६१.६३ कोटी व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता रु.१५६.८० कोटी निधी आतापर्यंत उपलब्ध झालेला आहे. त्यापैकी सन २०१०-११ व २०११-१२ करिता वितरित करण्यात आलेला अनुक्रमे रु.४५ कोटी व ९३.२१ कोटी असा एकूण रु.१३८.२१ कोटी इतका निधी यापूर्वीच प्रति घरकुल रु.६८,५००/- या दराने जिल्हा ग्रामीण विकास यंत्राणांना म्हाडामार्फत वितरित करण्यात आलेला असल्यामुळे सद्यस्थितीत एकूण सर्व प्रवर्गासाठी रु.३७३.४२ कोटी व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता रु.१०६.८० कोटी अशा प्रकारे एकूण रु.४८०.२२ कोटी इतका निधी उपलब्ध आहे. या तरतूदीतून रु.९५,०००/- प्रति घरकुल याप्रमाणे एकूण ५०,५५० घरांचे उद्दिष्ट पूर्ण होणार आहे.

६.    राज्यातील वाढत्या नागरीकरणाचा विचार करुन राज्य शासनाने पूर्वीच्या काही ग्रामीण क्षेत्राचा नव्याने नागरी क्षेत्रात समावेश करुन तो भाग "क" वर्ग नगर परिषद क्षेत्र म्हणून जाहीर केलेला आहे. तसेच मूळ ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबे रोजगाराच्या शोधार्थ मोठया प्रमाणावर जवळच्या तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे अशी दारिद्रयरेषेखालील कुटूंबे जरी स्थलांतरणानंतर "क" वर्ग नगर परिषद क्षेत्रात आली तरी त्यांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी अशा दारिद्रयरेषेखालील कुंटुंबाकरिता घरकुल बांधण्यासाठी अनुदान देणे आवश्यक आहे. त्यामुळे "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारित)" योजनेचा

क्षेत्र विस्तार करून ही योजना राज्यातील "क" वर्ग नगरपरिषदांना लागू करण्याबाबतचा प्रस्तावही शासनाच्या विचाराधीन होता.

७. उपरोक्त बदलांमुळे "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारित)" या योजनेच्या मूळ स्वरुपात बदल होत असल्याने राज्य मंत्रिमंडळाच्या दि.६.८.२०१४ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्ताव राज्य मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. उपरोक्त सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन शासनाने पुढील निर्णय घेतले आहेत.

**शासन निर्णय :**

१. इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यांकरिता राबविण्यांत येणा-या "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. १ (सुधारित)" या योजनेला दि.३१.३.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच या योजनेचे नांव बदलून "राजीव गांधी घरकुल योजना" असे करण्यास तसेच ही नवीन योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. राजीव गांधी ग्रामिण निवारा योजना क्र.१ (सुधारित) या योजनेंतर्गत दिनांक १ एप्रिल,२०१३ पासून घरकुलाची किंमत रु.७०,०००/- वरुन रु.१,००,०००/- इतकी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. घरकुलाकरिता सध्याच्या राज्य शासनाच्या रु. ६८,५००/- या अनुदानामध्ये रु. २६,५००/- इतकी वाढ करुन सदर अनुदान रु. ९५,०००/- इतके करण्यास मान्यता देण्यात येत आहे. योजनेतील लाभार्थ्याचा हिस्सा रु. ५,०००/- इतका असेल.

३. वाढीव अनुदानाचा लाभ पूर्वलक्षी प्रभावाने "राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. १ (सुधारित)" या योजनेखालील ग्रामीण क्षेत्रांमधील सन २०१२-१३ या कालावधीकरीता उपलब्ध केलेल्या निधीतून घरकुल मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त अनुदान वाढीमुळे यापूर्वी सदर योजनेअंतर्गत सन २०१२-१३ करिता उपलब्ध झालेल्या एकूण रु.३८०.२४ कोटी निधीचे शासन निर्णय क्र. रागांयो २०१२/प्र.क्र.४२/गृनिधो-१, दिनांक २०.०६.२०१३ व शासन निर्णय क्र.रागांयो २०१/प्र.क्र.४२ (दुय्यम धारिका)/गृनिधो-१, दिनांक २८.०३.२०१३ अन्वये करण्यात आलेले प्रवर्गनिहाय व जिल्हानिहाय वाटप याद्वारे रद्द करण्यात येत असून सुधारित जिल्हानिहाय वाटपाची विवरणपत्रे सोबतच्या "परिशिष्ट १" व "परिशिष्ट २" प्रमाणे राहतील. या प्रित्यर्थ होणारा खर्च दिनांक २०.०६.२०१३ व दिनांक २८.०३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

४. "राजीव गांधी घरकुल योजना" या योजनेकरीता २०१४-१५ या वर्षाकरीता पूरक मागणीव्दारे प्राप्त झालेल्या रु. १००.०० कोटी निधीपैकी रु.८०.०० कोटी निधी ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील सर्व प्रवर्गातील कुटूंबांसाठी वापरात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. या निधीच्या जिल्हानिहाय वाटपाचे विवरणपत्र सोबतच्या "परिशिष्ट ३" प्रमाणे राहील.

५. उपरोक्त (३) व (४) मधील वाटप पूर्वीप्रमाणेच म्हाडामार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना केले जाईल व याबाबतच्या अटी व शर्ती, यापूर्वीच्या वितरण आदेशातील अटी व शर्तीप्रमाणेच राहतील.

६. "राजीव गांधी घरकुल योजना" या योजनेचा क्षेत्रविस्तार ही योजना राज्यातील सर्व "क" वर्ग नगरपरिषदांना लागू करण्यात येत आहे. त्याकरिता सुरुवातीचा निधी म्हणून रु.२०.०० कोटी निधी "क" वर्ग नगरपरिषदांना संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत सदर योजना अंमलात आणण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. "क" वर्ग नगर परिषद क्षेत्रातील घरकुलाची किंमत रु.१,५०,०००/- इतकी असेल. या अंतर्गत लाभार्थ्यांना प्रति घरकुल

रु.१,३८,७५०/- इतके शासनाचे अनुदान देण्यात येईल व लाभार्थी हिस्सा रु.११,२५०/- राहील. रु.२०.०० कोटी निधी म्हाडामार्फत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संबंधित नगरपरिषदांना वाटप होईल. निधी वाटपाचे विवरणपत्र "परिशिष्ट ४" प्रमाणे राहील.

७. "राजीव गांधी घरकुल योजना" या योजनेकरीता सन २०१४-१५ या वर्षासाठी होणारा खर्च मागणी क्र. क्यू-३ मुख्य लेखाशिर्ष -२२१६- गृहनिर्माण -०३ ग्रामीण गृहनिर्माण - ८००, इतर खर्च, (०१) ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पंचवार्षिक योजना (०१) (०३) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.१ (सुधारीत) (२२१६ १४०७) (राज्य योजना-सर्वसाधारण) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४७१/ व्यय-३, दिनांक २१.०८.२०१४ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१४०८२२१२३७१७१९०९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.श्री.ल.पुलकुंडवार)
शासनाचे अवर सचिव

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव (पत्राद्वारे)
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.पालक मंत्री (सर्व जिल्हे)
मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, विधानसभा, विधान भवन,मुंबई
मा.सभापती, विधानपरिषद, विधान भवन,मुंबई
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई.
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई.
मा.विधानसभा सदस्य, सर्व
मा.विधान परिषद, सदस्य, सर्व
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता) /लेखापरीक्षा, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखा व अनुज्ञेयता) /लेखापरीक्षा, नागपूर
महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

५

उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
मुख्य अधिकारी,गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ कोकण/नाशिक/पुणे/नागपूर/अमरावती/ औरंगाबाद
मुख्याधिकारी, सर्व "क" वर्ग नगरपरिषदा, महाराष्ट्र (संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत).
उपमुख्य लेखा परीक्षक,स्थानिक निधी(लेखा)कोकण विभाग,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद (सर्व)
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सर्व)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, (कॉम्प्युटर सेल) नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई
सर्व उप सचिव /अवर सचिव / कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव, (अर्थसंकल्प), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, (गृनिधो-१)

६

परिशिष्ट -१

(शासन निर्णय क्र.रागांयो-२०१३/प्र.क्र.३३०/गृनिधो-१,दि. २२.०८.२०१४ चे सहपत्र)

राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारीत) योजनेकरीता सन २०१२-१३ मध्ये करण्यात आलेले वाटप रदद करुन राजीव गांधी घरकुल योजनेअंतर्गत या निधीचे सर्वसाधारण प्रवर्गासाठी जिल्हानिहाय वाटप दर्शविणारे प्रपत्र. प्रति घरकुल रु.९५,०००/-

| | जिल्हा | उपलब्ध निधी नुसार लाभार्थी | अनुदान एकुण रु. |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | २३२ | २२०४०००० |
| २ | रायगड | ३९१ | ३७१४५००० |
| ३ | रत्नागिरी | ५६७ | ५३८६५००० |
| ४ | सिंधुदुर्ग | ३३७ | ३२०१५००० |
| ५ | नाशिक | ५२० | ४९४००००० |
| ६ | धुळे | ४२२ | ४००९०००० |
| ७ | नंदूरबार | २४६ | २३३७०००० |
| ८ | जळगांव | १७४८ | १६६०६०००० |
| ९ | अहमदनगर | १९५८ | १८६०१०००० |
| १० | सातारा | ४५८ | ४३५१०००० |
| ११ | सांगली | १९५ | १८५२५००० |
| १२ | सोलापूर | ११८४ | ११२४८०००० |
| १३ | कोल्हापूर | ३२९ | ३१२५५००० |
| १४ | औरंगाबाद | १३७१ | १३०२४५००० |
| १५ | जालना | १२६४ | १२००८०००० |
| १६ | परभणी | १४४० | १३६८००००० |
| १७ | हिंगोली | ६३० | ५९८५०००० |
| १८ | बीड | १७४० | १६५३००००० |
| १९ | नांदेड | १२९० | १२२५५०००० |
| २० | उस्मानाबाद | १०४२ | ९८९९०००० |
| २१ | लातूर | ७१६ | ६८०२०००० |
| २२ | बुलढाणा | १६८ | १५९६०००० |
| २३ | अकोला | ६७४ | ६४०३०००० |
| २४ | वाशिम | ६०७ | ५७६६५००० |
| २५ | अमरावती | ९०० | ८५५००००० |
| २६ | यवतमाळ | २१८९ | २०७९५५००० |
| २७ | वर्धा | ७०० | ६६५००००० |
| २८ | नागपूर | ८९० | ८४५५०००० |
| २९ | भंडारा | ५३१ | ५०४४५००० |
| ३० | गोंदिया | १८९६ | १८०१२०००० |
| ३१ | चंद्रपूर | १२५९ | ११९६०५००० |
| ३२ | गडचिरोली | ८८७ | ८४२६५००० |
| | एकूण | २८,७८१ | २,७३४,१९५,००० |

| परिशिष्ट -२<br>(शासन निर्णय क्र.रागांयो-२०१३/प्र.क्र.३३०/गृनिधो-१,दि. २२.०८.२०१४ चे सहपत्र) | | | |
|---|---|---|---|
| राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ (सुधारीत) योजनेकरीता सन २०१२-१३ मध्ये करण्यात आलेले वाटप रदद करुन राजीव गांधी घरकुल योजनेअंतर्गत या निधीचे अनुसुचित जमाती प्रवर्गासाठी जिल्हानिहाय वाटप दर्शविणारे प्रपत्र. प्रति घरकुल रु.९५,०००/- | | | |
| अ.क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | अनुदान रु. |
| १ | ठाणे | १८२८ | १७३,६६०,००० |
| २ | रायगड | २७८ | २६,४१०,००० |
| ३ | नाशिक | १६७६ | १५९,२२०,००० |
| ४ | धुळे | १०३७ | ९८,५१५,००० |
| ५ | नंदूरबार | २१७७ | २०६,८१५,००० |
| ६ | जळगांव | १५८ | १५,०१०,००० |
| ७ | अहमदनगर | ४२ | ३,९९०,००० |
| ८ | हिंगोली | १२६ | ११,९७०,००० |
| ९ | नांदेड | १६८ | १५,९६०,००० |
| १० | अकोला | ४७ | ४,४६५,००० |
| ११ | वाशिम | ८९ | ८,४५५,००० |
| १२ | अमरावती | ५९० | ५६,०५०,००० |
| १३ | यवतमाळ | ९६६ | ९१,७७०,००० |
| १४ | वर्धा | १११ | १०,५४५,००० |
| १५ | नागपूर | ७१ | ६,७४५,००० |
| १६ | गोंदिया | ६१९ | ५८,८०५,००० |
| १७ | चंद्रपूर | ४३१ | ४०,९४५,००० |
| १८ | गडचिरोली | ८२९ | ७८,७५५,००० |
| | एकूण | ११२४३ | १,०६८,०८५,००० |

परिशिष्ट -३

(शासन निर्णय क्र.रागांयो-२०१३/प्र.क्र.३३०/गृनिधो-१,दि. २२.०८.२०१४ चे सहपत्र)

राजीव गांधी घरकुल योजनेअंतर्गत सन २०१४- १५

या वर्षासाठी मंजूर रुपये ८० कोटी निधीचे जिल्हानिहाय वाटप दर्शविणारे प्रपत्र. (प्रति घरकुल रु.९५,०००/-)

| | जिल्हा | उपलब्ध निधी नुसार लाभार्थी | अनुदान एकूण |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ६८ | ६,४६०,००० |
| २ | रायगड | ११४ | १०,८३०,००० |
| ३ | रत्नागिरी | १६६ | १५,७७०,००० |
| ४ | सिंधुदुर्ग | ९९ | ९,४०५,००० |
| ५ | नाशिक | १५२ | १४,४४०,००० |
| ६ | धुळे | १२४ | ११,७८०,००० |
| ७ | नंदूरबार | ७२ | ६,८४०,००० |
| ८ | जळगांव | ५११ | ४८,५४५,००० |
| ९ | अहमदनगर | ५७३ | ५४,४३५,००० |
| १० | सातारा | १३४ | १२,७३०,००० |
| ११ | सांगली | ५७ | ५,४१५,००० |
| १२ | सोलापूर | ३४६ | ३२,८७०,००० |
| १३ | कोल्हापूर | ९६ | ९,१२०,००० |
| १४ | औरंगाबाद | ४०१ | ३८,०९५,००० |
| १५ | जालना | ३७० | ३५,१५०,००० |
| १६ | परभणी | ४२१ | ३९,९९५,००० |
| १७ | हिंगोली | १८४ | १७,४८०,००० |
| १८ | बीड | ५०९ | ४८,३५५,००० |
| १९ | नांदेड | ३७७ | ३५,८१५,००० |
| २० | उस्मानाबाद | ३०५ | २८,९७५,००० |
| २१ | लातूर | २१० | १९,९५०,००० |
| २२ | बुलढाणा | ४९ | ४,६५५,००० |
| २३ | अकोला | १९७ | १८,७१५,००० |
| २४ | वाशिम | १७७ | १६,८१५,००० |
| २५ | अमरावती | २६३ | २४,९८५,००० |
| २६ | यवतमाळ | ६४१ | ६०,८९५,००० |
| २७ | वर्धा | २०५ | १९,४७५,००० |
| २८ | नागपूर | २६१ | २४,७९५,००० |
| २९ | भंडारा | १५६ | १४,८२०,००० |
| ३० | गोंदिया | ५५५ | ५२,७२५,००० |
| ३१ | चंद्रपूर | ३६८ | ३४,९६०,००० |
| ३२ | गडचिरोली | २६० | २४,७००,००० |
| | एकूण | ८,४२१ | ७९९,९९५,००० |

(परिशिष्ट-४)

(शासन निर्णय क्र.रागांयो-२०१३/प्र.क्र.३३०/गृनिधो-१,दि. २२.०८.२०१४ चे सहपत्र)

राजीव गांधी घरकुल योजने करीता सन २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेल्या निधीचे "क" वर्ग नगर परिषद क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी तालुकानिहाय वाटप दर्शविणारे विवरणपत्र (प्रति घरकुल रु.१,३८,७५०/-)

| अ.क्र. | जिल्हा | नगरपरिषद | घरकुलांची संख्या | अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | जव्हार | ४ | ५५५,००० |
| एकूण | | | ४ | ५५५००० |
| | | | | |
| १ | रायगड | अलिबाग | ७ | ९७१,२५० |
| २ | | कर्जत | ९ | १,२४८,७५० |
| ३ | | महाड | ९ | १,२४८,७५० |
| ४ | | माथेरान | १ | १३८,७५० |
| ५ | | मुरुड जंजिरा | ४ | ५५५,००० |
| ६ | | पेण | १२ | १,६६५,००० |
| ७ | | रोहा | ७ | ९७१,२५० |
| ८ | | श्रीवर्धन | ५ | ६९३,७५० |
| ९ | | उरण | १० | १,३८७,५०० |
| एकूण | | | ६४ | ८८८०००० |
| | | | | |
| १ | रत्नागिरी | खेड | ५ | ६९३,७५० |
| २ | | राजापूर | ३ | ४१६,२५० |
| ३ | | दापोली | ५ | ६९३,७५० |
| ४ | | देवरुख | ४ | ५५५,००० |
| ५ | | गुहागर | १ | १३८,७५० |
| ६ | | लांजा | ५ | ६९३,७५० |
| एकूण | | | २३ | ३१९१२५० |
| | | | | |
| १ | सिंधुदूर्ग | मालवण | ६ | ८३२,५०० |
| २ | | सावंतवाडी | ८ | १,११०,००० |
| ३ | | वेगुर्ला | ४ | ५५५,००० |
| ४ | | कणकवली | ५ | ६९३,७५० |
| एकूण | | | २३ | ३१९१२५० |
| | | | | |
| १ | नाशिक | भगूर | ४ | ५५५,००० |
| २ | | इगतपुरी | १० | १,३८७,५०० |
| ३ | | नांदगांव | ७ | ९७१,२५० |
| ४ | | सटाणा | १२ | १,६६५,००० |
| ५ | | सिन्नर | २१ | २,९१३,७५० |
| ६ | | त्र्यंबक | ४ | ५५५,००० |
| ७ | | येवला | १६ | २,२२०,००० |
| एकूण | | | ७४ | १०२६७५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | देवळाली प्रवरा | १० | १,३८७,५०० |
| २ | | पाथर्डी | ९ | १,२४८,७५० |
| ३ | | राहाता | ७ | ९७१,२५० |
| ४ | | राहूरी | १२ | १,६६५,००० |
| ५ | | श्रीगोंदा | १० | १,३८७,५०० |
| ६ | | शिर्डी | ११ | १,५२६,२५० |
| **एकूण** | | | **५९** | **८१८६२५०** |
| १ | नंदुरबार | नवापूर | ११ | १,५२६,२५० |
| २ | | तळोदे | ८ | १,११०,००० |
| **एकूण** | | | **१९** | **२६३६२५०** |
| | | | | |
| १ | धुळे | सिंदखेड | १५ | २,०८१,२५० |
| **एकूण** | | | **१५** | **२०८१२५०** |
| | | | | |
| १ | जळगांव | भडगांव | १२ | १,६६५,००० |
| २ | | धरणगांव | ११ | १,५२६,२५० |
| ३ | | एरंडोल | १० | १,३८७,५०० |
| ४ | | फैजपूर | ८ | १,११०,००० |
| ५ | | जामनेर | १५ | २,०८१,२५० |
| ६ | | पारोळा | १२ | १,६६५,००० |
| ७ | | रावेर | ९ | १,२४८,७५० |
| ८ | | सावदा | ६ | ८३२,५०० |
| ९ | | यावल | १२ | १,६६५,००० |
| **एकूण** | | | **९५** | **१३१८१२५०** |
| | | | | |
| १ | पुणे | आळंदी | ९ | १,२४८,७५० |
| २ | | भोर | ६ | ८३२,५०० |
| ३ | | इंदापूर | ८ | १,११०,००० |
| ४ | | जेजुरी | ५ | ६९३,७५० |
| ५ | | जुन्नर | ८ | १,११०,००० |
| ६ | | सासवड | १० | १,३८७,५०० |
| ७ | | शिरुर | १२ | १,६६५,००० |
| **एकूण** | | | ५८ | ८०४७५०० |
| | | | | |
| १ | सांगली | आष्टा | १२ | १,६६५,००० |
| २ | | तासगाव | १२ | १,६६५,००० |
| ३ | | जत | १०५ | १४,५६८,७५० |
| **एकूण** | | | १२९ | १७८९८७५० |
| | | | | |
| १ | सातारा | महाबळेश्वर | ४ | ५५५,००० |
| २ | | म्हसवडा | ८ | १,११०,००० |
| ३ | | पांचगणी | ५ | ६९३,७५० |
| ४ | | रहिमतपूर | ६ | ८३२,५०० |
| ५ | | वाई | ११ | १,५२६,२५० |

११

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | | मलकापूर | १० | १,३८७,५०० |
| एकूण | | | ४४ | ६१०५००० |
| | | | | |
| १ | सोलापूर | अक्कलकोट | १३ | १,८०३,७५० |
| २ | | दुधनी | ४ | ५५५,००० |
| ३ | | करमाळा | ७ | ९७१,२५० |
| ४ | | कुर्डुवाडी | ७ | ९७१,२५० |
| ५ | | मैंदर्गी | ४ | ५५५,००० |
| ६ | | मंगळवेढा | ७ | ९७१,२५० |
| ७ | | सांगोला | ११ | १,५२६,२५० |
| एकूण | | | ५३ | ७३५३७५० |
| | | | | |
| १ | कोल्हापूर | गडहिंग्लज | ९ | १,२४८,७५० |
| २ | | कागल | ११ | १,५२६,२५० |
| ३ | | करुंदवाड | ७ | ९७१,२५० |
| ४ | | मलकापूर | २ | २७७,५०० |
| ५ | | मुरगूड | ४ | ५५५,००० |
| ६ | | पन्हाळा | १ | १३८,७५० |
| ७ | | वडगाव | ८ | १,११०,००० |
| एकूण | | | ४२ | ५८२७५०० |
| | | | | |
| १ | औरंगाबाद | गंगापूर | ९ | १,२४८,७५० |
| २ | | कन्नड | १३ | १,८०३,७५० |
| ३ | | खुल्ताबाद | ५ | ६९३,७५० |
| ४ | | पैठण | १३ | १,८०३,७५० |
| ५ | | वैजापूर | १३ | १,८०३,७५० |
| एकूण | | | ५३ | ७३५३७५० |
| | | | | |
| १ | परभणी | जिंतूर | १४ | १,९४२,५०० |
| २ | | मानवत | १० | १,३८७,५०० |
| ३ | | पाथरी | १२ | १,६६५,००० |
| ४ | | पूर्णा | १२ | १,६६५,००० |
| ५ | | सेलू | १५ | २,०८१,२५० |
| ६ | | सोनपेठ | ५ | ६९३,७५० |
| एकूण | | | ६८ | ९४३५००० |
| | | | | |
| १ | हिंगोली | कळमनुरी | ८ | १,११०,००० |
| एकूण | | | ८ | १११०००० |
| | | | | |
| १ | जालना | अंबड | १० | १,३८७,५०० |
| २ | | भोकरदन | ८ | १,११०,००० |
| ३ | | परतूर | ११ | १,५२६,२५० |
| एकूण | | | २९ | ४०२३७५० |
| | | | | |

१२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | माहूर | ० | ० |
| २ | | भोकर | १० | १,३८७,५०० |
| ३ | | बिलोली | ५ | ६९३,७५० |
| ४ | | धर्माबाद | ११ | १,५२६,२५० |
| ५ | | हदगाव | ९ | १,२४८,७५० |
| ६ | | कंधार | ८ | १,११०,००० |
| ७ | | किनवट | ९ | १,२४८,७५० |
| ८ | | कुंदलवाडी | ५ | ६९३,७५० |
| ९ | | लोहा | ८ | १,११०,००० |
| १० | | मुदखेड | ८ | १,११०,००० |
| ११ | | मुखेड | ९ | १,२४८,७५० |
| १२ | | उमरी | ४ | ५५५,००० |
| १३ | | अर्धापूर | ८ | १,११०,००० |
| एकूण | | | ९४ | १३०४२५०० |
| | | | | |
| १ | लातूर | अहमदपूर | १४ | १,९४२,५०० |
| २ | | औसा | १२ | १,६६५,००० |
| ३ | | निलंगा | १२ | १,६६५,००० |
| एकूण | | | ३८ | ५२७२५०० |
| | | | | |
| १ | उस्मानाबाद | भूम | ६ | ८३२,५०० |
| २ | | कळंब | ८ | १,११०,००० |
| ३ | | मुरुम | ६ | ८३२,५०० |
| ४ | | नळदुर्ग | ६ | ८३२,५०० |
| ५ | | परांडा | ६ | ८३२,५०० |
| ६ | | तुळजापूर | ११ | १,५२६,२५० |
| ७ | | उमरगा | ११ | १,५२६,२५० |
| एकूण | | | ५४ | ७४९२५०० |
| | | | | |
| १ | बीड | धारुर | ७ | ९७१,२५० |
| २ | | गेवराई | ११ | १,५२६,२५० |
| ३ | | केज | १० | १,३८७,५०० |
| एकूण | | | २८ | ३८८५००० |
| | | | | |
| १ | बुलढाणा | देऊळगाव | १० | १,३८७,५०० |
| २ | | जळगाव | ९ | १,२४८,७५० |
| ३ | | लोणार | ७ | ९७१,२५० |
| ४ | | मेहकर | १४ | १,९४२,५०० |
| ५ | | नांदुरा | १४ | १,९४२,५०० |
| ६ | | सिंदखेडराजा | ५ | ६९३,७५० |
| एकूण | | | ५९ | ८१८६२५० |
| | | | | |
| १ | अमरावती | चांदूररेल्वे | ६ | ८३२,५०० |
| २ | | चांदूरबाजार | ६ | ८३२,५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | | चिखलदरा | २ | २७७,५०० |
| ४ | | दर्यापूर | १२ | १,६६५,००० |
| ५ | | धामणगाव | ७ | ९७१,२५० |
| ६ | | मोर्शी | १२ | १,६६५,००० |
| ७ | | शेंदुरजना | ७ | ९७१,२५० |
| एकूण | | | ५२ | ७२१५००० |
| | | | | |
| १ | यवतमाळ | आर्णी | ९ | १,२४८,७५० |
| २ | | दारव्हा | ८ | १,११०,००० |
| ३ | | दिग्रस | १४ | १,९४२,५०० |
| ४ | | घाटंजी | ७ | ९७१,२५० |
| ५ | | नेर | ९ | १,२४८,७५० |
| ६ | | पांढरकवडा | १० | १,३८७,५०० |
| ७ | | उमरखेड | १५ | २,०८१,२५० |
| एकूण | | | ७२ | ९९९०००० |
| | | | | |
| १ | वाशिम | मंगरुळपीर | १० | १,३८७,५०० |
| २ | | रिसोड | ११ | १,५२६,२५० |
| एकूण | | | २१ | २९१३७५० |
| | | | | |
| १ | अकोला | बाळापूर | १४ | १,९४२,५०० |
| २ | | मुर्तिजापूर | १३ | १,८०३,७५० |
| ३ | | पातूर | ७ | ९७१,२५० |
| ४ | | तेल्हारा | ७ | ९७१,२५० |
| एकूण | | | ४१ | ५६८८७५० |
| | | | | |
| १ | नागपूर | कळमेश्वर | ६ | ८३२,५०० |
| २ | | काटोल | १४ | १,९४२,५०० |
| ३ | | खापा | ५ | ६९३,७५० |
| ४ | | मोहपा | २ | २७७,५०० |
| ५ | | मोवाड | ३ | ४१६,२५० |
| ६ | | नरखेड | ७ | ९७१,२५० |
| ७ | | रामटेक | ७ | ९७१,२५० |
| ८ | | सावनेर | १० | १,३८७,५०० |
| ९ | | मौदा | ४ | ५५५,००० |
| १० | | माहादुळा | ६ | ८३२,५०० |
| एकूण | | | ६४ | ८८८०००० |
| | | | | |
| १ | भंडारा | पवनी | ७ | ९७१,२५० |
| एकूण | | | ७ | ९७१२५० |
| | | | | |
| १ | गोंदिया | तिरोडा | ८ | १,११०,००० |
| एकूण | | | ८ | १११०००० |
| | | | | |

**१४**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | देवळी | ६ | ८३२,५०० |
| **एकूण** | | | **६** | **८३२५००** |
| | | | | |
| १ | चंद्रपूर | **ब्रम्हपूरी** | ११ | १,५२६,२५० |
| २ | | **मुल** | ८ | १,११०,००० |
| ३ | | **राजूरा** | ९ | १,२४८,७५० |
| **एकूण** | | | **२८** | **३८८५०००** |
| | | | | |
| १ | गडचिरोली | देसाईगंज | ९ | १,२४८,७५० |
| **एकूण** | | | ९ | **१२४८७५०** |
| | | | | |
| **एकूण** | | | **१४४१** | **१९९९३८७५०** |

-------

आश्वासन क्रमांक २५०

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष २, अंक ११३(३)] मंगळवार, डिसेंबर २७, २०१६/पौष ६, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १८१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर २०१६

अधिसूचना

**खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक ०६१५/५१/प्र.क्र. ३४/उद्योग-९.—खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम ९ ब चे उप-कलम (२), (३), (४), (५) व (६) कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यातील महाराष्ट्र राज्याची प्रयुक्ती व प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) च्या तरतुदी अंतर्भूत करण्याकरिता सदर अधिनियमाच्या कलम २०ए अंतर्गत भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कामकाज, जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना व कार्य आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये रकमा प्रदान करणे च्या पद्धतीचे विनियमन करण्याकरिता पुढील नियम करीत आहे, ते असे :—

प्रकरण—एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव आणि प्रारंभ**

१. (१) या नियमास महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ असे म्हणावे.

(२) हे नियम दिनांक १६ सप्टेंबर २०१५ पासून अंमलात येतील.

२. व्याख्या.—(१) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(क) "अधिनियम", याचा अर्थ, खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) असा आहे.

(ख) "बाधित क्षेत्र", याचा अर्थ, जिल्हाधिकारी यांनी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, जिल्ह्यात खाण किंवा खाणींच्या समुहापासून, खनिकर्म किंवा खाणकाम संबंधित कामांमुळे बाधित क्षेत्र, या सह राज्य शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जिल्ह्याच्या पलीकडील क्षेत्रे आणि प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट प्रत्यक्ष बाधित क्षेत्रे व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रे यांचासुद्धा समावेश होतो ;

(ग) ''बाधित लोक'', याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट लोक ;

(घ) ''लेखापरीक्षक'', याचा अर्थ, नियामक परिषदेकडून नियुक्त केलेला लेखापरीक्षक किंवा सनदी लेखापाल, [illegible] महालेखापाल किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले इतर लेखापरीक्षक यांचा समावेश होतो ;

(ड) ''केंद्रीय योजना (पीएमकेकेकेवाय)'', याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय), असा होतो ;

(च) ''जिल्हाधिकारी'', यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (महा. १९६६ चा ४१) अंतर्गत असलेला समान अर्थ असणार राहील ;

(छ) ''अंशदान'', याचा अर्थ, प्रन्यासमध्ये जमा करावयाचे अंशदान.—

(एक) प्रमुख खनिजांच्या प्रकरणात, सदर अधिनियमाच्या कलम ९ ब च्या उप-कलम (५) व (६) अंतर्गत केंद्र सरकारकडून वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीप्रमाणे खनिपट्टा धारक किंवा संयुक्त परवाना (पूर्वेक्षण अनुज्ञप्ती व खनिपट्टा) धारक यांचेकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(दोन) गौण खनिजांच्या प्रकरणात सदर अधिनियमाच्या कलम १५ए अंतर्गत गौण खनिजांसाठी राज्य शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील खनिपट्टा किंवा खाणपट्टा किंवा खाण परवानाधारकांकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(ज) ''नियामक परिषद'', याचा अर्थ, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या सर्व विश्वस्तांच्या बनलेल्या प्रन्यासची नियामक परिषद

(झ) ''शासन'', किंवा ''राज्य शासन'', म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ट) ''ग्रामसभा'' याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे ग्रामसभा ;

(ठ) ''खनिपट्टा क्षेत्र'', याचा अर्थ, कोणत्याही खनिजाचे किंवा गौण खनिजाचे पूर्वेक्षण करण्याकरिता किंवा खाणकाम करण्याच्या उद्देशासाठी मंजूर क्षेत्र ;

(ड) ''खनिकर्म'', किंवा ''खाणकाम'' याचा अर्थ, कोणतेही खनिज किंवा गौण खनिज बाहेर काढण्याच्या उद्देशाने केलेले [illegible] कार्य ;

(ढ) ''व्यवस्थापन समिति'', याचा अर्थ, प्रन्यासच्या दैनंदिन व्यवहार व्यवस्थापनाच्या उद्देशासाठी राज्य शासनाने गठित [illegible] समिती ;

(ण) ''पंचायत'', याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे पंचायत ;

(त) ''प्रन्यास'', याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९ ब चा उप-कलम (१) अंतर्गत शासनाने स्थापित केलेला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास ;

(थ) ''प्रन्यास निधी'', याचा अर्थ, नियम १३ अंतर्गत घटित प्रन्यास निधी ;

(द) ''विश्वस्त'', याचा अर्थ, प्रन्यासचे नियमन करण्याच्या उद्देशासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या व्यक्ती ;

(ध) ''वर्ष'', याचा अर्थ, एक एप्रिलपासून सुरू होणारे व पुढील वर्षी 31 मार्च रोजी संपणारे वित्तीय वर्ष किंवा त्याचा [illegible] कालावधी ;

(न) ''जिल्हा परिषद'', याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे जिल्हापरिषद ;

(२) या नियमात वापरलेले, परंतु ज्यांची व्याख्या केलेली नाही असे शब्द किंवा शब्दप्रयोग यांना खाणी व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) मध्ये जे अर्थ दिले असतील तेच अर्थ असतील.

## प्रकरण—दोन

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान

३. **जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे उद्दिष्ट.**—(एक) जिल्ह्यातील खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी संबंधित कार्यामुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्राचे हितसंबंध, लाभ, शाश्वत विकासासाठी, काम करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानाचे उद्दिष्ट असेल ; आणि

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये जमा निधीचा परिणामकारक, पारदर्शक व जबाबदार पद्धतीने वापर करणे.

४. **जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना.**—(एक) अधिसूचनेच्या कलम ९ब च्या उप-कलम (७) अंतर्गत स्थापित प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान हे नियामक परिषद, व्यवस्थापन समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समितीचे बनलेले असेल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कार्यालय प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी स्थित असेल किंवा नियामक परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे राहील.

## प्रकरण—तीन

## नियामक परिषद

५. **नियामक परिषद.—**प्रतिष्ठान प्रन्यासचे व्यवस्थापन नियामक परिषदेकडे निहित करण्यात येईल, जी प्रन्यासच्या राज्यशासनाकडून नियुक्त केलेल्या सर्व विश्वस्तांची बनलेली असेल.

(एक) नियामक परिषद ही पदसिद्ध सदस्य, नामनिर्देशित सदस्य व सदस्य-सचिव यांची बनलेली असेल.

(दोन) नियामक परिषदेचे पदसिद्ध सदस्य व जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधान परिषदेचे सभासद पैकी तीन प्रतिनिधी, हे जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे विश्वस्त राहतील.

(तीन) जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधानपरिषदेचे सभासद यांचे तीन प्रतिनिधी हे, शक्यतो खाणकाम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रातील पालकमंत्री यांनी शिफारस केलेले राहतील व अंतिम नामनिर्देशन राज्यशासनाकडून तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(चार) अशासकीय संस्थेच्या (एनजीओ) दोन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(पाच) खनिज सवलत धारकामधून तीन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः त्यांचे नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(सहा) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल व ते दोन मुदतीपेक्षा जास्त वेळा पुन्हा पुनर्नियुक्तिसाठी पात्र ठरणार नाही.

६. **नियामक परिषदेचे अधिकार व कार्ये.—**सर्व विश्वस्तांची बनलेली, नियामक परिषद यासाठी जबाबदार असेल,—

(एक) प्रन्यासाचा व्यापक धोरणात्मक आराखडा तयार करणे व कार्यशीलतेसाठी कार्यपद्धतीला मान्यता देणे आणि प्रन्यासचे कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे ;

(दोन) व्यवस्थापन समितिकडून मान्यतेकरिता ठेवण्यात आलेले प्रन्यासचे वार्षिक अंदाजपत्रक व वार्षिक कार्यक्रम योजनेला मान्यता देणे. प्रत्येक वित्तीय वर्ष सुरू होण्याच्या किमान एक महिना आधी व्यवस्थापन परिषद वार्षिक कार्यक्रम योजना तयार करेल व नियामक परिषद त्याला मान्यता देईल. वार्षिक कार्यक्रम योजनेमध्ये योजना व प्रकल्पांची यादी त्यांच्या तात्पुरत्या तरतुदीसह समाविष्ट असेल :

परंतु, पुढील वर्षासाठी वार्षिक कार्यक्रम योजना तयार करतांना मागील जबाबदाऱ्यांची व अपूर्ण राहिलेल्या योजनांचे दायित्व यांचे योग्य मूल्यमापन करण्यात येईल. वित्तीय नियमांचे पालन करण्यासाठी व प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी, मागील दायित्वे व जबाबदाऱ्या आणि प्रस्तावित केलेल्या नवीन योजना यांची एकूण बेरीज कोणत्याही परिस्थितीत पुढील वित्तीय वर्षासाठी प्रन्यास निधिमध्ये येणाऱ्या अपेक्षित जमाराशींच्या दोन पटीपेक्षा जास्त असणार नाही :

(तीन) प्रन्यास निधीमार्फत कार्यान्वयीत केलेल्या विकास योजना व कामे यांचे ग्रामसभेमध्ये सामाजिक लेखापरीक्षण आयोजित करणे ;

(चार) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्यासाठी, राज्यशासनाने प्रदान केलेल्या अशा पद्धतीने, उपलब्ध न्यास निधीमधून अशा इतर खर्चास मान्यता देणे ;

(पाच) व्यवस्थापन समितीचे शिफारशींना मान्यता देणे ;

(सहा) प्रन्यासचे वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण झालेले लेखे यांना मागील वर्षाचे समाप्तीनंतर साठ दिवसांचे कालावधीचे आत मान्यता देणे ;

(सात) प्रन्यास चालविण्याकरिता, राज्य शासनाने ठरविल्याप्रमाणे प्रतिनियुक्तिवरील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीला, कंत्राटी किंवा बाह्य यंत्रणेकडून आधारित कामाला मंजुरी देणे ;

(आठ) प्रन्यासची वार्षिक योजना तयार करण्यामध्ये व प्रन्यासचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी, सहाय्य करण्याकरिता उप-समित्या गठित करणे ;

(नऊ) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्याकरिता असे कोणतेही इतर कार्यक्रम हाती घेणे.

७. **नियामक परिषदेच्या सभा.**—(एक) नियामक परिषदेच्या सभा आवश्यकतेप्रमाणे अनेकदा होतील परंतु प्रत्येक तिमाहीत किमान एकदा होईल.

(दोन) नियामक परिषदेची सभा, अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे, नियामक परिषदेच्या सदस्यांना दोन आठवड्याची नोटीस देऊन आयोजन करण्यात येईल.

(तीन) अशा सभेकरिता गणपूर्ति (कोरम), नियामक परिषदेच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील, जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व नंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी पुन: आयोजित करण्यात येईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

प्रकरण—चार

## व्यवस्थापन समिती

८. **व्यवस्थापन समिति.**—(एक) प्रन्यासचा दैनंदिन व्यवहार व्यवस्थापन समिती द्वारे चालविण्यात येईल.

(दोन) फक्त पदसिद्ध सदस्यांना मतदानाचा हक्क राहील.

(तीन) नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा कोणताही हक्क राहणार नाही.

(चार) जिल्ह्यातील खाणकाम यंत्रणा किंवा खनिपट्टाधारक व अशासकीय संस्था यांचे प्रतिनिधी यांची नेमणूक, नियामक परिषदेकडून नामनिर्देशित केलेल्या त्या श्रेणीतील (वर्गातील) प्रतिनिधीमधून व्यवस्थापन समिती करेल.

९. **व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये.**—व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे आहेत ते असे,—

(एक) प्रन्यासच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी कर्तव्ये पार पाडण्यामध्ये योग्य त्या कार्यसक्तीचा वापर करणे ;

(दोन) अधिनियमाच्या तरतुदीनुसार व राज्यशासनाने ठरवून दिलेल्या पद्धतीने संबंधित खनिपट्टा धारकाकडून अंशदानाची रक्कम वेळेवर जमा होईल याची खात्री करणे ;

(तीन) ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील शहरी स्थानिक संस्था, शासकीय विभाग, मंडळे, महामंडळे व राज्य व केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांचेकडून प्रस्ताव व प्रकल्प स्वीकार करणे. तथापि, अनुसूचित क्षेत्रात व्यवस्थापन समिती बाधित क्षेत्रातील ग्रामसभांकडून प्रस्ताव किंवा प्रकल्प प्राप्त करू शकेल ;

(चार) प्रन्यासाच्या वार्षिक योजनेचा व प्रन्यासाचे वार्षिक अंदाजपत्रकाचा, प्रस्तावित योजना व प्रकल्पांसह समन्वय साधणे, मंजूर करणे व मंजूर योजना व प्रकल्पांचेवर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(पाच) वार्षिक योजना व मंजूर योजना व प्रकल्पांचे वर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(सहा) प्रकल्पांना मान्यता देणे आणि मंजुरी आदेश निर्गमित करणे, त्याकरिता प्रन्यास निधी देणे व संवितरण करणे ;

(सात) प्रन्यास निधीची व्यवस्था पाहणे व त्याची कार्यसक्ती पद्धतीने गुंतवणूक करणे आणि भारतीय रिझर्व बँकेकडून मान्यता प्राप्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत प्रन्यासच्या नावाने खाते उघडणे व असे खाते व गुंतवणुकीचे व्यवहार पाहणे ;

(आठ) प्रन्यास निधीचे उपयोगितेचे प्रगतीवर लक्ष ठेवणे ;

(नऊ) लेखापरिक्षण झालेले लेखे, वार्षिक अहवालासह नियामक परिषदेसमोर, मागील वर्षाचे समाप्ती नंतर साठ दिवसांचे कालावधीच्या आत, त्यांचे मान्यतेकरिता ठेवणे ;

(दहा) प्रन्यासचे कामकाजाकरिता कार्यपद्धती तयार करणे व मंजूर करणे ;

(अकरा) राज्य शासनाच्या दिशा-निर्देशानुसार कर्मचाऱ्यांची व लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे, तथापि या नियुक्त्यांना नियामक परिषदेच्या मंजुरीची आवश्यकता राहील ;

(बारा) वेबसाईट तयार करून ती सुस्थितीत ठेवणे, ज्यावर खालील माहिती टाकून अद्यावत ठेवणे,—

(क) प्रन्यासच्या रचनेची व प्रन्यास वर असलेल्या व्यक्तींची सविस्तर माहिती.

(ग) खाणकामामुळे बाधित क्षेत्र व लोकांची यादी.

(घ) खनिपट्टाधारक व इतरांकडून प्राप्त अंशदानाची तिमाही सविस्तर माहिती.

(ङ) प्रन्यासच्या सर्व सभांची विषय सूची, इतिवृत्त व कार्यवाही अहवाल.

(च) वार्षिक योजना, अंदाज पत्रक, कार्य आदेश व वार्षिक अहवाल.

(छ) सध्या सुरू असलेल्या कामांची ऑनलाईन स्थिती, हाती घेण्यात आलेल्या सर्व प्रकल्प व कार्यक्रमांची कार्यान्वयन स्थिती व प्रगती वेबसाईट वर उपलब्ध करून द्यावी, यात कामाचे वर्णन, लाभार्थींचा तपशील, अंदाजित किंमत, कार्यान्वयन यंत्रणेचे नाव, काम सुरू करण्याची व पूर्ण करण्याची अपेक्षित तारीख, मागील तिमाहीपर्यंतची वित्तीय व भौतिक (प्रत्यक्ष) प्रगती इत्यादी माहितीचा समावेश करावा.

(ज) विविध कल्याण योजनांतर्गत लाभार्थींची यादी.

(झ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) अंतर्गत ऐच्छिक प्रकटीकरण ; आणि

(ञ) प्रन्यासच्या सुरळीत कामकाज आणि व्यवस्थापनाकरिता आवश्यक इतर सर्व गोष्टी करणे.

१०. **व्यवस्थापन समितीच्या सभा :—**(एक) व्यवस्थापन समितीच्या सभा एका वित्तीय वर्षात किमान चार वेळा घेण्यात येतील व [illegible] ठरविल्याप्रमाणे आयोजित केल्या जातील.

(दोन) या सभांसाठी गणपूर्ति (कोरम), व्यवस्थापन समितीच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील जर गणपूर्ति झाली नाही तर सभा [illegible] पुढे ढकलण्यात येईल व ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी आयोजित केली जाईल. ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

(तीन) व्यवस्थापन समितीची सभा अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली होईल, त्यांच्या अनुपस्थितीमध्ये, पदसिद्ध सदस्य आपल्यातून स्थानापन्न अध्यक्षाची निवड करू शकतील.

प्रकरण—पाच

## प्रन्यास निधिचे व्यवस्थापन

११. **प्रन्यास अंतर्गत निधिची घडण.—**(एक) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासची नियामक परिषद प्रन्यास अंतर्गत एक निधी [illegible] जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास निधी असे संबोधण्यात येईल. ज्याचे व्यवस्थापन प्रन्यासच्या व्यवस्थापन समितीद्वारे करण्यात येईल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचा प्रन्यास निधी, खालील रकमांचा स्वीकार करेल.

(क) राज्य शासनाकडून दिलेली प्रारंभिक जमा ;

(ख) राज्य शासनाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे राज्य शासनाकडून किंवा कोणतीही इतर यंत्रणा, संस्था किंवा व्यक्ती यांच्याकडून प्राप्त कोणतेही अनुदान, अंशदान किंवा इतर भांडवली सहाय्य ;

(ग) नियम २ चा उप-नियम (१) चे उपवाक्य (जी) मध्ये व्याख्या केलेले अंशदान ;

(घ) गुंतवणूक व इतर जमा आणि त्यावर जमा झालेले व्याज व त्यापासून प्राप्त झालेले इतर कोणतेही उत्पन्न ;

(ङ) प्रन्यासच्या इतर सर्व मालमत्ता व त्यापासून प्राप्त झालेले उत्पन्न किंवा त्याचे झालेले अधिमूल्यन ; आणि

(च) राज्य स्तरीय संनियंत्रण समितीने ठरविल्याप्रमाणे इतर जिल्ह्यांच्या अंशदान निधीतून प्राप्त झालेला निधी.

१२. **प्रन्यास निधीचे प्रवर्तन.—**प्रन्यास निधी, भारतीय रिझर्व बँकेने मान्यता दिलेल्या एक किंवा जास्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा [illegible] बँकेत प्रन्यासच्या नावाने असा सार्वजनिक निधी ठेवण्यात येईल व सर्व खाते हे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व व्यवस्थापन [illegible] यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्य करतील. या निधीचे खाते पुस्तके प्रन्यासची व्यवस्थापन समिती सांभाळेल. हे खाते अंशदान [illegible] (सांभाळण्यात) यावे.

१३. **प्रन्यास निधीमधून खर्च.—**या न्यासमध्ये उपलब्ध निधी हा भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार प्रधानमंत्री खनिज [illegible] (पी एम के के के वाय) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील उद्देश अंमलात आणण्याकरिता उपयोगात आणण्यात येईल :—

(१) खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी निगडीत कार्यामुळे बाधित क्षेत्रांच्या सर्वांगीण विकासाकरिता, व्यवस्थापन समितीने [illegible] नियामक परिषदेने मान्यता दिलेल्या प्रन्यासच्या वार्षिक कार्यक्रम योजनेच्या उद्देशाकरिता :

(दोन) किमान २/३ रक्कम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रांमध्ये वापरण्यात येईल व उर्वरित कमाल १/३ रक्कम अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रामध्ये वापरण्यात येईल (प्रत्यक्ष बाधित खाणकाम क्षेत्र हे खाण/डंपपासून २० कि.मी. च्या त्रिज्येच्या आत राहील).

(तीन) प्रन्यासकडे उपलब्ध निधीपैकी किमान साठ टक्के उच्च प्राथमिकता क्षेत्रांकरिता उपयोगात आणल्या जाईल जसे.—

(क) पेयजल पुरवठा केंद्रीभूत जलशुद्धीकरण यंत्रणा, जल प्रक्रिया केंद्र, शाश्वत किंवा तात्पुरती जलवितरण जाळे (नेटवर्क), ज्यामध्ये एकल पाणीपुरवठा सुविधेचा समावेश आहे. जलवितरण पाईपलाईन टाकणे.

(ख) पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.—सांडपाणी प्रक्रिया केंद्र, जलप्रवाह, तलाव, तळे, भू-जल, क्षेत्रातील अन्य जलस्त्रोत यांचे प्रदूषण प्रतिबंध, खनिकर्म काम व डंपसमुळे होणारे वायू व धुळ प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता उपाययोजना, खाणीतील पाणी निचरा व्यवस्था, खाण प्रदूषण प्रतिबंध तंत्रज्ञान आणि पर्यावरण-सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता आवश्यक इतर वायू, जल व भू-पृष्ठ प्रदूषण नियंत्रण यंत्रणा.

(ग) आरोग्यसेवा.—बाधित क्षेत्रांमध्ये प्राथमिक किंवा दुय्यम आरोग्य सेवा सुविधा निर्मिती करणे व या कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यामध्ये फक्त आरोग्य सेवा पायाभूत सुविधा निर्मिती यावर भर नसावा तर त्यासोबत अशा सुविधा प्रभावी करण्याकरिता आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे व पुरवठा यांच्या तरतुदीवर सुद्धा भर असावा. हे प्रयत्न सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य सेवा पायाभूत सुविधा यांना पूरक व यांचे बरोबर काम करणे अशा असाव्या. याकरिता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मायनर्स हेल्थ यांचेकडे उपलब्ध असलेले कौशल्य (विशेष ज्ञान) हे सुद्धा विचारात घेऊन खनिकर्म कामाशी निगडीत आजार व रोग यांची काळजी घेण्याकरिता आवश्यक विशेष पायाभूत सुविधा आराखडा तयार करण्यात यावा. खनिकर्म कामामुळे बाधित व्यक्तिकरिता त्यांच्या आरोग्य सेवेसाठी गट विमा योजना राबविता येईल.

(घ) शिक्षण.—शिक्षण संस्था व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र यांचे बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वाचनालये, कला व हस्त कौशल्य वर्ग, स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची तरतूद, दुर्गम भागातील विद्यार्थी किंवा शिक्षक यांचेकरिता निवासी वसतीगृह, क्रिडा पायाभूत सुविधा, शिक्षक किंवा इतर मदतनिस कर्मचारी, इ. शिक्षा मांडणी (इ-लर्निंग सेट अप), विद्यार्थ्यांकरिता इतर वाहतुकीची व्यवस्था (बस, व्हॅन सायकल, रिक्षा इत्यादी) आणि पौष्टिक अन्न यासंबंधी कार्यक्रम.

(च) कृषी व तत्सम उपक्रम.—कृषी व तत्सम उपक्रम आणि वनशेती यांच्याशी संबंधित उपक्रमांचा विकास, बियाणे, उपकरणांचा संच, कृषी उपकरणांना आर्थिक सहाय्य व सूक्ष्म सिंचन सुविधा ठिबक सिंचनासह, बोर वेल व पंपा करिता आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांना संबंधित तत्सम उपक्रमांकरिता सहाय्य जसे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वनशेती इत्यादी. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन रहिवासी (रिकग्नीशन ऑफ फॉरेस्ट राइटस) अॅक्ट, २००६ (२००७ चा २) अंतर्गत वन हक्क धारक या सहाय्याकरिता पात्र ठरतील.

(छ) महिला व बालकल्याण.—माता व बाल आरोग्य, कुपोषण, संसर्गजन्य रोग इत्यादी समस्यांवर उपाय योजनाकरिता विशेष कार्यक्रम

(ज) वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्ती कल्याण,—वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तिकरिता विशेष कार्यक्रम.

(झ) कौशल्य विकास व रोजगार.—उदरनिर्वाहासाठी सहाय्याकरिता कौशल्य विकास, स्थानिक पात्र व्यक्तिकरिता उत्पन्न निर्माण व आर्थिक उपक्रम या प्रकल्प/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्रांचा विकास, स्वंयरोजगार योजना, स्वंयसहाय्यता गटांना सहाय्य व अशा स्वंयरोजगार आर्थिक उपक्रमांकरिता पुढे व मागे संबंध जोडण्याची तरतूद नाविन्यपूर्णतेला, प्रवर्धन उपक्रम परिचालकता व उद्योजकता सहाय्य.

(ट) स्वच्छता.—कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, योग्य निचऱ्याची तरतूद व सांडपाणी प्रक्रिया केंद्र, मलविषयक गाळाच्या विल्हेवाटीची तरतूद, स्वच्छता गृहांची तरतूद आणि इतर संबंधित उपक्रम.

(तीन) न्यास विधिचा चाळीस टक्केपर्यंत इतर प्राथमिकता क्षेत्रावर खर्च करता येईल, जसे

(क) भौतिक पायाभूत सुविधा : आवश्यक भौतिक पायाभूत सुविधा जसे रस्ते, पूल, रेल्वे, जलवाहतूक, विमानतळ, औद्योगिक उद्यान किंवा समूह व इतर औद्योगिक पायाभूत सुविधा प्रदान करणे.

(ख) सिंचन : सिंचनाचे पर्यायी स्त्रोत विकसित करणे, सुयोग्य व आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

(ग) ऊर्जा व पाणलोट विकास क्षेत्र : पारंपरिक विद्युत व उर्जाचे अक्षयस्त्रोतापासून घरगुती विद्युतीकरण व विद्युत पायाभूत सुविधांचे मजबुतीकरण, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा (मायक्रो हायडलसह) व पावसाच्या पाण्याची साठवण, यंत्रणांचा विकास, फळबागा, एकात्मिक शेती व आर्थिक वनीकरण व पाणलोट क्षेत्रांची पुनःस्थापना. राज्य शासनाने वेळोवेळी निर्देशीत कोणतेही इतर पायाभूत सुविधांचे कार्य

(घ) पर्यावरणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याकरिता इतर कोणत्याही उपाययोजना.

[illegible] विभाग, महामंडळ व मंडळामध्ये [illegible] पद्धतीने सार्वजनिक, खाजगी भागीदारीच्या (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप, [illegible]) [illegible] विकास व पायाभूत सुविधासंबंधी प्रकल्प.

[illegible] समाधानाची भरपाई करण्याचे, [illegible] जसे डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, शिक्षक इत्यादी.

[illegible] (दोन) व (तीन), मध्ये नमूद [illegible] शासकीय योजना किंवा कार्यक्रमांची पूर्तता करणे.

[illegible] अंतर्गत [illegible] विकासाच्या योजनांचे नियोजन व संनियंत्रण करण्याकरिता ग्राम सभांना प्रशिक्षण [illegible] त्यांचा क्षमता बांधणी करणे.

[illegible] विश्वस्त वर्षात प्रन्यासनिधीमध्ये प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या रकमेच्या पाच टक्के पेक्षा जास्त नाही अशी रक्कम (किमान [illegible] कोटी) प्रन्यास त्याचा [illegible] किंवा आस्थापना खर्च भागविण्याकरिता खर्च करू शकेल.

[illegible] किंवा आस्थापना [illegible] कमाल मर्यादा [illegible] वेळोवेळी वाढवू शकेल.

[illegible] रक्कम [illegible]

[illegible] इतर कोणतेही कार्य घेण्यात येईल.

२४. **खर्चाची आकारणी.** —विश्वस्तांना [illegible] प्रन्यासनिधीवर आकारण्याचा हक्क राहील —

(क) प्रन्यासचे कार्य किंवा [illegible] — [illegible] खर्च व गुंतवणुकीच्या परिपूर्ती, जतन किंवा फायद्यासाठी व [illegible] असलेली मालमत्ता व प्रन्यासचे हितसंबंधाचे संरक्षण [illegible] केलेला सर्व खर्च.

(ख) [illegible] व कोणतेही इतर संसाधन [illegible] प्राप्त करण्याकरिता विश्वस्तांना आलेला सर्व खर्च (यात [illegible] विवादन व नोटीसच्या अनुषंगाने केलेल्या खर्चांचा समावेश आहे).

(ग) [illegible] न्यायिक कार्यवाही संबंधित किंवा प्रन्यासच्या संबंधी विश्वस्तांच्या [illegible] कामकाजाशी झालेला सर्व खर्च यात [illegible] सल्लागारावर झालेल्या खर्चाचा समावेश आहे.

(घ) [illegible] कार्य किंवा [illegible] झालेला सर्व कायदेशीर व वैधानिक खर्च यात प्रन्यासच्या [illegible] समावेश आहे.

(ङ) [illegible] आलेला सर्व खर्च आणि कार्यवाही संबंधात आलेला [illegible] तपासणी, [illegible] सल्लागाराचे शुल्क, [illegible] लेखा परीक्षक व असे [illegible] खर्च.

२५. लेखा व लेखापरीक्षण.

(१) [illegible] संबंधित [illegible] पुस्तके [illegible] ठेवील.

(२) [illegible] लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षण करण्यात येईल.

(३) [illegible] भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे [illegible] अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.

(४) [illegible] शकेल.

(५) [illegible], विशिष्ट वर्षाचे किंवा अशा काही कालावधीचे लेखापरीक्षण करण्याकरिता [illegible] दर्शविलेल्या अटी व शर्तीवर [illegible] शकेल.

(६) [illegible] मंजूर [illegible] व वार्षिक योजना त्याच्या मंजूर योजना व प्रकल्पासह जिल्हा परिषद, [illegible] संबंधित वेबसाइटवर प्रकाशित करण्याकरिता पाठवील.

(७) [illegible] पंचाहत्तर दिवसाच्या आत, मंजूर योजना व प्रकल्पांच्या भौतिक व वित्तीय [illegible] परिषद व [illegible] प्रशासनाकडे त्यांच्या संबंधित वेबसाइटवर प्रकाशित करण्याकरिता [illegible] पाठवील.

(८) [illegible] संबंधित [illegible] उपक्रमांचा [illegible]

(नऊ) वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आत नियामक परिषदेकडून मंजूर वार्षिक अहवाल व मंजूर लेखा अहवाल त्यांची मान्यता मिळाल्यानंतर ताबडतोब जिल्हा परिषद व राज्य शासनाकडे संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्यासाठी पाठवेल.

(दहा) वार्षिक अहवाल मान्यता मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत शासनास सादर करण्यात येईल व प्रन्यासच्या वेबसाईटवर सुद्धा प्रकाशित करण्यात येईल.

(अकरा) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासच्या वार्षिक अहवाल नियामक परिषदेसमोर सादर केला जाईल.

## प्रकरण सहा

## संकिर्ण

**१६. कामाची अंमलबजावणी**

(एक) कामे किंवा साहित्य, प्रन्यासकडून, राज्य शासनाने अशा खरेदीकरिता विनिर्दिष्ट केलेल्या योग्य पद्धतींचा अवलंब करून खरेदी (संपादन) करू शकेल.

(दोन) प्रन्यासने हाती घेतलेली कामे शक्यतो फक्त शासकीय विभाग यंत्रणा, सार्वजनिक उपक्रम यांचे मार्फत कार्यान्वयीन करावे. ज्या साधारणपणे अशी कामे, संबंधित नियमांना अनुसरून करतात, आणि त्याची अंमलबजावणी करतांना किंवा कंत्राट मंजूर करतांना त्या संस्थेस अशा पद्धती लागू होतात.

(तीन) तांत्रिक मान्यता व कामाची देखरेख संबंधित विभागाला लागू होणाऱ्या प्रशासकीय प्रदान केलेल्या शक्ती अंतर्गत सदर कामे करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(चार) जी कामे शासकीय विभाग यंत्रणा किंवा सार्वजनिक उपक्रमामार्फत कार्यान्वयीन करणे शक्य नसेल अशा कामांचे संबंधीत व्यवस्थापन समिती ते काम, कोणत्याही इतर सक्षम व सुयोग्य यंत्रणेला, पारदर्शक पद्धतीचा अवलंब करून, नियामक परिषदेची पूर्व परवानगी प्राप्त करून, मंजूर करू शकेल.

(पाच) सर्व यंत्रणा व लाभार्थींना विधिचे हस्तांतरण त्यांचे बँक खात्यात करण्यात येईल.

**१७. अनुसूचित क्षेत्रांसाठी विशेष तरतूद**

(एक) भारतीय संविधानाच्या अनुसूची ५ व ६ सह वाचल्या जाणाऱ्या अनुच्छेद २४४ ला ध्यानात ठेवून, जे अनुसूचित जमाती व त्यांच्या क्षेत्राला व अशा पंचायतीच्या (ज्या अनुसूचित क्षेत्राचा विस्तार आहेत) तरतुदी असलेल्या अधिनियम, १९६६ ला आणि अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत येणारी गावे ती अनुसूचित क्षेत्रात चालणाऱ्या खनन व खनिज विषयक कार्यांनी बाधित झाली आहे अशांना ग्रामसभेची मंजुरी खालीलप्रमाणे घेणे आवश्यक आहे :—

(अ) अशा सर्व योजना, कार्यक्रम, प्रकल्प जे प्रधानमंत्री खनीज क्षेत्र कल्याण योजने (PMKKKY) अंतर्गत घ्यावयाचे आहेत अशी.

(ब) शासनाच्या लागू मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे लाभार्थी चिन्हित करणे.

(दोन) संबंधित गावात घेतलेल्या कार्यांचा अहवाल वित्तीय वर्ष पूर्ण झाल्यावर ग्रामसभेला सादर केला जाईल.

**१८. प्रन्यास रद्द करणे.**—राज्य स्तरीय संनियंत्रण समितिच्या शिफारशीवरून प्रन्यास रद्द करण्याचा राज्य शासनाला विशेषाधिकार वापरता येईल. राज्य शासन जो अवधी निश्चित करेल तो पर्यंत प्रन्यास विद्यमान राहील. प्रन्यासाच्या निर्वापणकाळी प्रन्यासाची सर्व मालमत्ता व दायित्व राज्य शासनाकडे हस्तांतरित होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अपूर्व चंद्रा,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

टीप.—सदर अधिसूचना दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या मूळ इंग्रजी अधिसूचनेचे मराठी भाषेतील भाषांतरित प्रारूप आहे. सदरील भाषांतरित अधिसूचनेमधील एखाद्या अर्थाबाबत प्रश्न उद्भवल्यास मूळ इंग्रजी अधिसूचना पहावी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**आश्वासन क्रमांक ५६८**

(सात) प्रन्यास चालविण्याकरिता, राज्य शासनाने ठरविल्याप्रमाणे प्रतिनियुक्तिवरील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीला, कंत्राटी किंवा बाह्य यंत्रणांकडून आधारित कामाला मंजुरी देणे ;

(आठ) प्रन्यासची वार्षिक योजना तयार करण्यामध्ये व प्रन्यासचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी, सहाय्य करण्याकरिता उप-समित्या गठित करणे ;

(नऊ) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्याकरिता असे कोणतेही इतर कार्यक्रम हाती घेणे.

७. **नियामक परिषदेच्या सभा.**—(एक) नियामक परिषदेच्या सभा आवश्यकतेप्रमाणे अनेकदा होतील परंतु प्रत्येक तिमाहीत किमान एकदा होईल.

(दोन) नियामक परिषदेची सभा, अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे, नियामक परिषदेच्या सदस्यांना दोन आठवड्याची नोटीस देऊन आयोजित करण्यात येईल.

(तीन) अशा सभेकरिता गणपूर्ति (कोरम), नियामक परिषदेच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील, जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व नंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी पुन: आयोजित करण्यात येईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

प्रकरण--चार

## व्यवस्थापन समिती

८. **व्यवस्थापन समिति.**—(एक) प्रन्यासचा दैनंदिन व्यवहार व्यवस्थापन समिती द्वारे चालविण्यात येईल.

(दोन) फक्त पदसिद्ध सदस्यांना मतदानाचा हक्क राहील.

(तीन) नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा कोणताही हक्क राहणार नाही.

(चार) जिल्ह्यातील खाणकाम यंत्रणा किंवा खनिपट्टाधारक व अशासकीय संस्था यांचे प्रतिनिधी यांची नेमणूक, नियामक परिषदांवर नामनिर्देशित केलेल्या त्या श्रेणीतील (वर्गातील) प्रतिनिधीमधून व्यवस्थापन समिती करेल.

९. **व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये.**—व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे आहे ते असे,—

(एक) प्रन्यासच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी कर्तव्ये पार पाडण्यामध्ये योग्य त्या कार्यसक्तीचा वापर करणे ;

(दोन) अधिनियमाच्या तरतुदीनुसार व राज्यशासनाने ठरवून दिलेल्या पद्धतीने संबंधित खनिपट्टा धारकाकडून अंशदानाची रक्कम वेळेवर जमा होईल याची खात्री करणे ;

(तीन) ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील शहरी स्थानिक संस्था, शासकीय विभाग, मंडळे, महामंडळे व राज्य व केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांचेकडून प्रस्ताव व प्रकल्प स्वीकार करणे. तथापि, अनुसूचित क्षेत्रात व्यवस्थापन समिती बाधित क्षेत्राच्या ग्रामसभांकडून प्रस्ताव किंवा प्रकल्प प्राप्त करू शकेल ;

(चार) प्रन्यासाच्या वार्षिक योजनेचा व प्रन्यासाचे वार्षिक अंदाजपत्रकाचा, प्रस्तावित योजना व प्रकल्पांसह समन्वय साधणे, संघटित करणे व मंजूर योजना व प्रकल्पांचेवर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(पाच) वार्षिक योजना व मंजूर योजना व प्रकल्पांचे वर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(सहा) प्रकल्पांना मान्यता देणे आणि मंजुरी आदेश निर्गमित करणे, त्याकरिता प्रन्यास निधी देणे व संवितरण करणे ;

(सात) प्रन्यास निधीची व्यवस्था पाहणे व त्याची कार्यसक्ती पद्धतीने गुंतवणूक करणे आणि भारतीय रिझर्व बँकेकडून मान्यता प्राप्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत प्रन्यासच्या नावाने खाते उघडणे व असे खाते व गुंतवणुकीचे व्यवहार पाहणे ;

(आठ) प्रन्यास निधीचे उपयोगितेचे प्रगतीवर लक्ष ठेवणे ;

(नऊ) लेखापरिक्षण झालेले लेखे, वार्षिक अहवालासह नियामक परिषदेसमोर, मागील वर्षाचे समाप्ती नंतर साठ दिवसांचे कालावधीच्या आत, त्यांचे मान्यतेकरिता ठेवणे ;

(दहा) प्रन्यासचे कामकाजाकरिता कार्यपद्धती तयार करणे व मंजूर करणे ;

(अकरा) राज्य शासनाच्या दिशा-निर्देशानुसार कर्मचाऱ्यांची व लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे, तथापि या नियुक्तांना नियामक परिषदेच्या मंजुरीची आवश्यकता राहील ;

(बारा) वेबसाईट तयार करून ती सुस्थितीत ठेवणे, ज्यावर खालील माहिती टाकून अद्यावत ठेवणे,—

(क) प्रन्यासच्या रचनेची व प्रन्यास वर असलेल्या व्यक्तींची सविस्तर माहिती.

(ख) खाणकामामुळे बाधित क्षेत्र व लोकांची यादी.

(ग) खनिपट्टाधारक व इतरांकडून प्राप्त अंशदानाची तिमाही सविस्तर माहिती.

(घ) प्रन्यासच्या सर्व सभांची विषय सूची, इतिवृत्त व कार्यवाही अहवाल.

(च) वार्षिक योजना, अंदाज पत्रक, कार्य आदेश व वार्षिक अहवाल.

(छ) सध्या सुरू असलेल्या कामांची ऑनलाईन स्थिती, हाती घेण्यात आलेल्या सर्व प्रकल्प व कार्यक्रमांची कार्यान्वयन स्थिती व प्रगती वेबसाईट वर उपलब्ध करून द्यावी, यात कामाचे वर्णन, लाभार्थींचा तपशील, अंदाजित किंमत, कार्यान्वयन यंत्रणेचे नाव, काम सुरू करण्याची व पूर्ण करण्याची अपेक्षित तारीख, मागील तिमाहीपर्यंतची वित्तीय व भौतिक (प्रत्यक्ष) प्रगती इत्यादी माहितीचा समावेश करावा.

(ज) विविध कल्याण योजनांतर्गत लाभार्थींची यादी.

(झ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) अंतर्गत ऐच्छिक प्रकटीकरण ; आणि

(तेरा) प्रन्यासच्या सुरळीत कामकाज आणि व्यवस्थापनाकरिता आवश्यक इतर सर्व गोष्टी करणे.

१०. **व्यवस्थापन समितीच्या सभा :—**(एक) व्यवस्थापन समितीच्या सभा एका वित्तीय वर्षात किमान चार वेळा घेण्यात येतील व त्या अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे आयोजित केल्या जातील.

(दोन) या सभांसाठी गणपूर्ति (कोरम), व्यवस्थापन समितीच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी आयोजित केली जाईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

(तीन) व्यवस्थापन समितीची सभा अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली होईल, त्यांच्या अनुपस्थितीमध्ये, पदसिद्ध सदस्य आपल्यातून स्थानापन्न अध्यक्षाची निवड करू शकतील.

## प्रकरण—पाच

## प्रन्यास निधिचे व्यवस्थापन

११. **प्रन्यास अंतर्गत निधिची घडण.—**(एक) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासची नियामक परिषद प्रन्यास अंतर्गत एक निधी स्थापित करेल ज्याला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास निधी असे संबोधण्यात येईल. ज्याचे व्यवस्थापन प्रन्यासच्या व्यवस्थापन समितीद्वारे करण्यात येईल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचा प्रन्यास निधी, खालील रकमांचा स्वीकार करेल.

(क) राज्य शासनाकडून दिलेली प्रारंभिक जमा ;

(ख) राज्य शासनाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे राज्य शासनाकडून किंवा कोणतीही इतर यंत्रणा, संस्था किंवा व्यक्ती यांचेकडून प्राप्त कोणतेही अनुदान, अंशदान किंवा इतर भांडवली सहाय्य ;

(ग) नियम २ चा उप-नियम (१) चे उपवाक्य (जी) मध्ये व्याख्या केलेले अंशदान ;

(घ) गुंतवणूक व इतर जमा आणि त्यावर जमा झालेले व्याज व त्यापासून प्राप्त झालेले इतर कोणतेही उत्पन्न ;

(च) प्रन्यासच्या इतर सर्व मालमत्ता व त्यापासून प्राप्त झालेले उत्पन्न किंवा त्याचे झालेले अधिमूल्यन ; आणि

(छ) राज्य स्तरिय संनियंत्रण समितीने ठरविल्याप्रमाणे इतर जिल्ह्यांच्या अंशदान निधीतून प्राप्त झालेला निधी.

१२. **प्रन्यास निधीचे प्रवर्तन.—**प्रन्यास निधी, भारतीय रिझर्व बँकेने मान्यता दिलेल्या एक किंवा जास्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत फक्त प्रन्यासच्या नावाने असा सार्वजनिक निधी ठेवण्यात येईल व सर्व खाते हे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व व्यवस्थापन समितीचे सदस्य-सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्य करतील. या निधीचे खाते पुस्तके प्रन्यासची व्यवस्थापन समिती सांभाळेल. हे खाते अंशदान निधीपासून स्वतंत्र ठेवण्यात (सांभाळण्यात) यावे.

१३. **प्रन्यास निधीमधून खर्च.—**या न्यासमध्ये उपलब्ध निधी हा भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पी एम के के के वाय) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील उद्देश अंमलात आणण्याकरिता उपयोगात आणण्यात येईल :—

(एक) खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी निगडीत कार्यामुळे बाधित क्षेत्रांच्या सर्वांगीण विकासाकरिता, व्यवस्थापन समितीने तयार केलेल्या व नियामक परिषदेने मान्यता दिलेल्या प्रन्यासच्या वार्षिक कार्यक्रम योजनेच्या उद्देशाकरिता ;

(दोन) किमान २/३ रक्कम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रांमध्ये वापरण्यात येईल व उर्वरित कमाल १/३ रक्कम अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रांकरिता वापरण्यात येईल (प्रत्यक्ष बाधित खाणकाम क्षेत्र हे खाण/डंपपासून २० कि.मी. च्या त्रिज्येच्या आंत राहील).

(तीन) न्यासाकडे उपलब्ध निधीपैकी किमान साठ टक्के उच्च प्राथमिकता क्षेत्रांकरिता उपयोगात आणल्या जाईल जसे.—

(क) पेयजल पुरवठा केंद्राभूत जलशुद्धीकरण यंत्रणा, जल प्रक्रिया केंद्र, शाश्वत किंवा तात्पुरती जलवितरण जाळे (नेटवर्क), ज्यामध्ये एकल पाणीपुरवठा सुविधेचा समावेश आहे. जलवितरण पाईपलाईन टाकणे.

(ख) पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.—सांडपाणी प्रक्रिया केंद्र, जलप्रवाह, तलाव, तळे, भू-जल, क्षेत्रातील अन्य जलस्त्रोत यांचे प्रदूषण प्रतिबंध, खनिकर्म काम व डंपसमुळे होणारे वायू व धुळ प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता उपाययोजना, खाणीतील पाणी निचरा व्यवस्था, खाण प्रदूषण प्रतिबंध तंत्रज्ञान आणि पर्यावरण-सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता आवश्यक इतर वायू, जल व भू-पृष्ठ प्रदूषण नियंत्रण यंत्रणा.

(ग) आरोग्यसेवा.—बाधित क्षेत्रामध्ये प्राथमिक किंवा दुय्यम आरोग्य सेवा सुविधा निर्मिती करणे व या कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यामध्ये फक्त आरोग्य सेवा पायाभूत सुविधा निर्मिती यावर भर नसावा तर त्यासोबत अशा सुविधा प्रभावी करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे व पुरवठा यांच्या तरतुदीवर सुद्धा भर असावा. हे प्रयत्न सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य सेवा पायाभूत सुविधा यांना पूरक व यांचे बरोबर काम करणे अशा असाव्या. याकरिता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ मायनर्स हेल्थ यांचेकडे उपलब्ध असलेले कौशल्य (विशेष ज्ञान) हे सुद्धा विचारात घेऊन खनिकर्म कामाशी निगडीत आजार व रोग यांची काळजी घेण्याकरिता आवश्यक विशेष पायाभूत सुविधा आराखडा तयार करण्यात यावा. खनिकर्म कामामुळे बाधित व्यक्तिकरिता त्यांच्या आरोग्य सेवेसाठी गट विमा योजना राबविता येईल.

(घ) शिक्षण.—शिक्षण संस्था व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र यांचे बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वाचनालये, कला व हस्त कौशल्य वर्ग, स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची तरतूद, दुर्गम भागातील विद्यार्थी किंवा शिक्षक यांचेकरिता निवासी वसतीगृह, क्रिडा पायाभूत सुविधा, शिक्षक किंवा इतर मदतनिस कर्मचारी, इ. शिक्षा मांडणी (इ-लर्निंग सेट अप), विद्यार्थ्यांकरिता इतर वाहतुकीची व्यवस्था (बस, व्हॅन, सायकल, रिक्षा इत्यादी) आणि पौष्टिक अन्न यासंबंधी कार्यक्रम.

(च) कृषी व तत्सम उपक्रम.—कृषी व तत्सम उपक्रम आणि वनशेती यांच्याशी संबंधित उपक्रमांचा विकास, बियाणे, उपकरणांचा लहान संच, कृषी उपकरणांना आर्थिक सहाय्य व सूक्ष्म सिंचन सुविधा ठिबक सिंचनासह, बोर वेल व पंपा करिता आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांना शेतीच्या तत्सम उपक्रमांकरिता सहाय्य जसे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वनशेती इत्यादी. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन रहिवासी (रिकग्नीशन ऑफ फॉरेस्ट राइटस) ॲक्ट, २००६ (२००७ चा २) अंतर्गत वन हक्क धारक या सहाय्याकरिता पात्र ठरतील.

(छ) महिला व बालकल्याण.—माता व बाल आरोग्य, कुपोषण, संसर्गजन्य रोग इत्यादी समस्यांवर उपाय योजनांकरिता विशेष कार्यक्रम

(ज) वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्ती कल्याण,—वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तिकरिता विशेष कार्यक्रम.

(झ) कौशल्य विकास व रोजगार.—उदरनिर्वाहासाठी सहाय्याकरिता कौशल्य विकास, स्थानिक पात्र व्यक्तिकरिता उत्पन्न निर्माण व आर्थिक उपक्रम या प्रकल्प/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्रांचा विकास, स्वंयरोजगार योजना, स्वंयसहाय्यता गटांना सहाय्य व अशा स्वंयरोजगार आर्थिक उपक्रमांकरिता पुढे व मागे संबंध जोडण्याची तरतूद नाविन्यपूर्णतेला, प्रवर्धन उपक्रम परिचालकता व उबवणी केंद्रांना सहाय्य.

(ट) स्वच्छता.—कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, योग्य निचऱ्याची तरतूद व सांडपाणी प्रक्रिया केंद्र, मलविषयक गाळाच्या विल्हेवाटीची तरतूद, स्वच्छता गृहांची तरतूद आणि इतर संबंधित उपक्रम.

(तीन) न्यास निधिचा चाळीस टक्केपर्यंत इतर प्राथमिकता क्षेत्रावर खर्च करता येईल, जसे

(क) भौतिक पायाभूत सुविधा : आवश्यक भौतिक पायाभूत सुविधा जसे रस्ते, पूल, रेल्वे, जलवाहतूक, विमानतळ, औद्योगिक उद्यान किंवा समूह व इतर औद्योगिक पायाभूत सुविधा प्रदान करणे.

(ख) सिंचन : सिंचनाचे पर्यायी स्त्रोत विकसित करणे, सुयोग्य व आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

(ग) ऊर्जा व पाणलोट विकास क्षेत्र : पारंपरिक विद्युत व उर्जांचे अक्षयस्त्रोतापासून घरगुती विद्युतीकरण व विद्युत पायाभूत सुविधांचे मजबुतीकरण, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा (मायक्रो हायडलसह) व पावसाच्या पाण्याची साठवण, यंत्रणांचा विकास, फळबागा, एकात्मिक शेती व आर्थिक वनीकरण व पाणलोट क्षेत्रांची पुनःस्थापना. राज्य शासनाने वेळोवेळी निर्देशीत कोणतेही इतर पायाभूत सुविधांचे कार्य.

(घ) पर्यावरणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याकरिता इतर कोणत्याही उपाययोजना.

(चार) शासकीय विभाग, महामंडळ व मंडळामार्फत थेट निधि पद्धतीने, सार्वजनिक, खाजगी भागीदारीच्या (पब्लिक, प्रायव्हेट पार्टनरशीप) माध्यमातून, विविध विकास व पायाभूत सुविधेसंबंधी प्रकल्प.

(पाच) पात्र मानवी संसाधनाची भरपाई करण्याची व्यवस्था जसे डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, शिक्षक इत्यादी.

(सहा) उप-नियम (दोन) व (तीन) मध्ये नमूद क्षेत्रांसंबंधी शासकीय योजना किंवा कार्यक्रमांची पूर्तता करणे.

(सात) प्रन्यासनिधि अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकासाच्या योजनांचे नियोजन व संनियंत्रण करण्याकरिता ग्राम सभांना प्रशिक्षण देणे व त्याची क्षमता बांधणी करणे.

(आठ) प्रन्यासने जिल्ह्यात वित्तीय वर्षात प्रन्यासनिधिमध्ये प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या रकमेच्या पाच टक्के पेक्षा जास्त नाही अशी रक्कम (किमान रु. २५ लक्ष ते कमाल रु. २ कोटी) प्रन्यास त्याचा प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याकरिता खर्च करू शकेल.

परंतु, प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याची कमाल मर्यादा राज्य शासन वेळोवेळी वाढवू शकेल.

(नऊ) वार्षिक जमेची वाजवी रक्कम स्थायीदान म्हणून ठेवता येईल.

(दहा) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (प्र.म.खे.क्षे.क.यो.) अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे इतर कोणतेही कार्य घेण्यात येईल.

**१४. खर्चाची आकारणी.**—विश्वस्तांना खालील खर्च प्रन्यासनिधि व आकारण्याचा हक्क राहील.—

(एक) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये — योग्यरित्या केलेला खर्च व गुंतवणुकीच्या परिपूर्ती, जतन किंवा फायद्यासाठी व प्रन्यास निधिचा समावेश असलेली मालमत्ता व प्रन्यासचे हितसंबंधाचे संरक्षण करण्याकरिता केलेला सर्व खर्च.

(दोन) अंशदान व कोणतेही इतर संसाधन ज्यात वाढ होईल ते प्राप्त करण्याकरिता विश्वस्तांना आलेला सर्व खर्च (यात कोणताही करार किंवा इतर लेखी करारनाम्याच्या निष्पादन व नोंदणीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा समावेश आहे.)

(तीन) कोणत्याही न्यायीक कार्यवाही संबंधित किंवा प्रन्यासच्या संबंधी विश्वस्ताच्या विरुद्ध कामकाजाशी झालेला सर्व खर्च यात व्यावसायिक शुल्क व न्यायिक सल्लागारावर झालेल्या खर्चाचा समावेश आहे.

(चार) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये झालेला सर्व कायदेशीर व वैधानिक खर्च यात प्रन्यासच्या कामासंबंधात देय होणारी किंवा प्रदान केलेला कर, शुल्क व इतर आकारणीचा समावेश आहे.

(पाच) सभा आयोजित करण्यात व इतर कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि नियोजन, अंमलबजावणी, तपासणी, आढावा व प्रकल्प अहवाल तयार करणे, सल्लागारांचे शुल्क, तृतीय पक्ष तपासणी लेखा परिक्षक व असे त्याच्या अनुषंगिक इतर खर्च.

**१५. लेखा व लेखापरीक्षण**

(एक) प्रन्यासचे कामकाजाचे सत्य स्वच्छ चित्र सादर करण्याकरिता व्यवस्थापन समिती प्रन्यासनिधि संबंधित खाते पुस्तके, दस्तऐवज व अभिलेख सुयोग्यरित्या सांभाळेल किंवा ठेवेल.

(दोन) प्रन्यासच्या लेख्यांचे किमान वर्ष संपल्यानंतर पात्र लेखापरीक्षकाकडून लेखापरिक्षण करण्यात येईल.

(तीन) प्रन्यासच्या लेखा परीक्षकाचा नेमणूक, नियामक परिषदेकडून, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे पॅनेलवर असलेल्या सनदी लेखापालच्या यादी मधून नियामक परिषदने ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.

(चार) नियामक परिषद लेखापाल यांना काढून टाकू शकते किंवा बदलू शकते.

(पाच) राज्यशासन, विशिष्ट वर्षांचे किंवा अशा काही कालावधीचे लेखापरिक्षण करण्याकरिता राज्यशासनाने ठरविलेल्या अटी व शर्तीवर लेखापालाची किंवा लेखापालांची नेमणूक करू शकेल किंवा राज्याचे लेखापाल यांना विनंती करू शकेल.

(सहा) प्रन्यास त्याचे पुढील वित्तीय वर्षाकरिता मंजूर अंदाजपत्रक व वार्षिक योजना त्याच्या मंजूर योजना व प्रकल्पांसह, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन व राज्य शासनास त्यांचे संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्याकरिता पाठवील.

(सात) प्रन्यास, तिमाही संपल्यानंतर पंचेचाळीस दिवसाच्या आत, मंजूर योजना व प्रकल्पांच्या भौतिक व वित्तीय संबंधात तिमाही प्रगती अहवाल तयार करेल व त्याला जिल्हा परिषद व जिल्हा प्रशासनाकडे त्यांच्या संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्याकरिता तात्काळ पाठवेल.

(आठ) प्रत्येक वर्षी वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रन्यास त्या संबंधित वित्तीय वर्षाच्या त्याच्या उपक्रमांवर वार्षिक अहवाल तयार करेल व त्याला नियामक परिषदसमोर ठेवेल.

(नऊ) वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आत नियामक परिषदेकडून मंजूर वार्षिक अहवाल व मंजूर लेखा अहवाल त्यांची मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ जिल्हा परिषद व राज्य शासनाकडे संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्यासाठी पाठवेल.

(दहा) वार्षिक अहवाल मान्यता मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत शासनास सादर करण्यात येईल व प्रन्यासच्या वेबसाईटवर सुद्धा प्रकाशित करण्यात येईल.

(अकरा) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासच्या वार्षिक अहवाल नियामक परिषदेसमोर सादर केला जाईल.

प्रकरण सहा

**संकिर्ण**

१६. **कामाची अंमलबजावणी**

(एक) कामे किंवा साहित्य, प्रन्यासकडून, राज्य शासनाने अशा खरेदीकरिता विनिर्दिष्ट केलेल्या योग्य पद्धतीचा अवलंब करून खरेदी (संपादन) करू शकेल.

(दोन) प्रन्यासने हाती घेतलेली कामे शक्यतो फक्त शासकीय विभाग यंत्रणा, सार्वजनिक उपक्रम यांचे मार्फत कार्यन्वयीन करेल. ज्या साधारणपणे अशी कामे, संबंधित नियमांना अनुसरून करतात, आणि त्याची अंमलबजावणी करतांना किंवा कंत्राट मंजूर करतांना त्या संस्थेला अशा पद्धती लागू होतात.

(तीन) तांत्रिक मान्यता व कामाची देखरेख संबंधित विभागाला लागू होणाऱ्या प्रशासकीय प्रदान केलेल्या शक्ती अंतर्गत सदर काम करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(चार) जी कामे शासकीय विभाग यंत्रणा किंवा सार्वजनिक उपक्रमामार्फत कार्यन्वयीन करणे शक्य नसेल अशा कामांचे संबंधात व्यवस्थापन समिती ते काम, कोणत्याही इतर सक्षम व सुयोग्य यंत्रणेला, पारदर्शक पद्धतीचा अवलंब करून, नियामक परिषदेची पूर्व परवानगी प्राप्त करून, मंजूर करू शकेल.

(पाच) सर्व यंत्रणा व लाभार्थींना विधिचे हस्तांतरण त्यांचे बँक खात्यात करण्यात येईल.

१७. **अनुसूचित क्षेत्रांसाठी विशेष तरतूद**

(एक) भारतीय संविधानाच्या अनुसूची ५ व ६ सह वाचल्या जाणाऱ्या अनुच्छेद २४४ ला ध्यानात ठेवून, जे अनुसूचित जाती व जमाती क्षेत्राला व अशा पंचायतीच्या (ज्या अनुसूचित क्षेत्राचा विस्तार आहेत) तरतुदी असलेल्या अधिनियम, १९६६ ला आणि अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत येणारी गावे ती अनुसूचित क्षेत्रात चालणाऱ्या खनन व खनन विषयक कार्यांनी बाधित झाली आहे अशांना ग्रामसभेची मंजुरी खालीलप्रमाणे घेणे आवश्यक आहे :—

(अ) अशा सर्व योजना, कार्यक्रम, प्रकल्प जे प्रधानमंत्री खनीज क्षेत्र कल्याण योजने (PMKKKY) अंतर्गत घ्यावयाचे आहे आणि

(ब) शासनाच्या लागू मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे लाभार्थी चिन्हित करणे.

(दोन) संबंधित गावात घेतलेल्या कार्याचा अहवाल वित्तीय वर्ष पूर्ण झाल्यावर ग्रामसभेला सादर केला जाईल.

१८. **प्रन्यास रद्द करणे.**—राज्य स्तरीय संनियंत्रण समितिच्या शिफारशीवरून प्रन्यास रद्द करण्याचा राज्य शासनाला विवेकाधिकार वापरता येईल. राज्य शासन जो अवधी निश्चित करेल तो पर्यंत प्रन्यास विद्यमान राहील. प्रन्यासाच्या निर्वापणकाळी प्रन्यासाची सर्व मालमत्ता व दायित्व राज्य शासनाकडे हस्तांतरित होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अपूर्व चंद्रा,**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

**टीप.**—सदर अधिसूचना दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या मूळ इंग्रजी अधिसूचनेचे मराठी भाषेतील भाषांतरित प्रारुप आहे. सदरील भाषांतरित अधिसूचनेमधील एखाद्या अर्थाबाबत प्रश्न उद्भवल्यास मूळ इंग्रजी अधिसूचना पहावी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**आश्वासन क्रमांक ४३१**

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष २, अंक ११३(३)] मंगळवार, डिसेंबर २७, २०१६/पौष ६, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८१**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर २०१६

**अधिसूचना**

**खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक एमडीएफ. ०६१५/५१/प्र.क्र. ३४/उद्योग-९.—खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम ९ ब च उप-कलम (२), (३), (४), (५) व (६) कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यातील महाराष्ट्र राज्याची प्रयुक्ती व प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) च्या तरतुदी अंतर्भूत करण्याकरिता सदर अधिनियमाच्या कलम २०ए अंतर्गत भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कामकाज, जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना व कार्ये आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये रकमा जमा करणे च्या पद्धतीचे विनियमन करण्याकरिता पुढील नियम करीत आहे, ते असे :—

प्रकरण—एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव आणि प्रारंभ**

१. (१) या नियमास महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ असे म्हणावे.

(२) हे नियम, दिनांक १६ सप्टेंबर २०१५ पासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(क) "अधिनियम", याचा अर्थ, खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) असा आहे.

(ख) "बाधित क्षेत्र", याचा अर्थ, जिल्हाधिकारी यांनी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, जिल्ह्यात खाण किंवा खाणींच्या समुहापासून, खनिकर्म कामाशी संबंधित कामांमुळे बाधित क्षेत्र, या सह राज्य शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जिल्ह्याच्या पलीकडील क्षेत्रे आणि प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट प्रत्यक्ष बाधित क्षेत्रे व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रे यांचासुद्धा समावेश होतो ;

(ग) "बाधित लोक", याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट लोक ;

(घ) "लेखापरीक्षक", याचा अर्थ, नियामक परिषदेकडून नियुक्त केलेला लेखापरीक्षक किंवा सनदी लेखापाल, आणि राज्याचे महालेखापाल किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले इतर लेखापरीक्षक यांचा समावेश होतो ;

(ङ) "केंद्रीय योजना (पीएमकेकेकेवाय)", याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) असा होतो ;

(च) "जिल्हाधिकारी", याला महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (महा. १९६६ चा ४१) अंतर्गत असणारा समान अर्थ लागू राहील ;

(छ) "अंशदान", याचा अर्थ, प्रन्यासमध्ये जमा करावयाचे अंशदान —

(एक) प्रमुख खनिजांच्या प्रकरणात, सदर अधिनियमाच्या कलम ९ ब च्या उप-कलम (५) व (६) अंतर्गत केंद्र सरकारकडून वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीप्रमाणे खनिपट्टा धारक किंवा संयुक्त परवाना (पुर्वेक्षण अनुज्ञप्ती व खनिपट्टा) धारक यांचेकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(दोन) गौण खनिजांच्या प्रकरणात सदर अधिनियमाच्या कलम १५ए अंतर्गत गौण खनिजासाठी राज्य शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील खनिपट्टा किंवा खाणपट्टा किंवा खाण परवानाधारकांकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(ज) "नियामक परिषद", याचा अर्थ, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या रूपे विश्वस्तांच्या बनलेल्या प्रन्यासची नियामक परिषद ;

(झ) "शासन", किंवा "राज्य शासन", म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ट) "ग्रामसभा", याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे ग्रामसभा ;

(ठ) "खनिपट्टा क्षेत्र", याचा अर्थ, कोणत्याही खनिजाचे किंवा गौण खनिजाचे पुर्वेक्षण करण्याकरिता किंवा खाणकाम करण्याच्या उद्देशासाठी मंजूर क्षेत्र ;

(ड) "खनिकर्म", किंवा "खाणकाम" याचा अर्थ, कोणतेही खनिज किंवा गौण खनिज बाहेर काढण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेले कार्य ;

(ढ) "व्यवस्थापन समिति", याचा अर्थ, प्रन्यासच्या दैनंदिन व्यवहार व्यवस्थापनाच्या उद्देशासाठी राज्य शासनाने गठित केलेली समिती ,

(ण) "पंचायत", याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे पंचायत ;

(त) "प्रन्यास", याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९ ब चा उप-कलम (१) अंतर्गत शासनाने स्थापित केलेला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास ;

(थ) "प्रन्यास निधी", याचा अर्थ, नियम १३ अंतर्गत घटित प्रन्यास निधी ;

(द) "विश्वस्त", याचा अर्थ, प्रन्यासचे नियमन करण्याच्या उद्देशासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या व्यक्ती ;

(ध) "वर्ष", याचा अर्थ, एक एप्रिलपासून सुरू होणारे व पुढील वर्षी ३१ मार्च रोजी संपणारे वित्तीय वर्ष किंवा त्याचा भाग कालावधी ;

(न) "जिल्हा परिषद", याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे जिल्हापरिषद ;

(२) या नियमात वापरलेले, परंतु ज्याची व्याख्या केलेली नाही असे शब्द किंवा शब्दप्रयोग यांना खाणी व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) मध्ये जे अर्थ दिले असतील तेच अर्थ असतील.

## प्रकरण—दोन

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान

३. **जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे उद्दिष्ट.**—(एक) जिल्ह्यातील खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी संबंधित कार्यांमुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्रांचे हितसंबंध, लाभ, शाश्वत विकासासाठी, काम करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानाचे उद्दिष्ट आहे ; आणि

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये जमा निधीचा परिणामकारक, पारदर्शक व जबाबदार पद्धतीने वापर करणे.

४. **जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना.**—(एक) अधिसूचनेच्या कलम ९ब च्या उप-कलम (७) अंतर्गत स्थापित प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान हे नियामक परिषद, व्यवस्थापन समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समितिचे बनलेले असेल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कार्यालय प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी स्थित असेल किंवा नियामक परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे राहील.

## प्रकरण—तीन

## नियामक परिषद

५. **नियामक परिषद.**—प्रतिष्ठान प्रन्यासचे व्यवस्थापन नियामक परिषदेकडे निहित करण्यात येईल, जी प्रन्यासच्या राज्यशासनाकडून नियुक्त केलेल्या सर्व विश्वस्तांची बनलेली असेल.

(एक) नियामक परिषद ही पदसिद्ध सदस्य, नामनिर्देशित सदस्य व सदस्य-सचिव यांची बनलेली असेल.

(दोन) नियामक परिषदेचे पदसिद्ध सदस्य व जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधान परिषदेचे सभासद पैकी तीन प्रतिनिधी, हे जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे विश्वस्त राहतील.

(तीन) जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधानपरिषदेचे सभासद यांचे तीन प्रतिनिधी हे, शक्यतो खाणकाम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रातील पालकमंत्री यांनी शिफारस केलेले राहतील व अंतिम नामनिर्देशन राज्यशासनाकडून तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(चार) अशासकीय संस्थेच्या (एनजीओ) दोन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(पाच) खनिज सवलत धारकामधून तीन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः त्यांचे नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(सहा) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल व ते दोन मुदतीपेक्षा जास्त वेळा पुन्हा पुनर्नियुक्तिसाठी पात्र ठरणार नाही.

६. **नियामक परिषदेचे अधिकार व कार्ये.**—सर्व विश्वस्तांची बनलेली, नियामक परिषद यासाठी जबाबदार असेल,—

(एक) प्रन्यासाचा व्यापक धोरणात्मक आराखडा तयार करणे व कार्यशीलतेसाठी कार्यपद्धतीला मान्यता देणे आणि प्रन्यासचे कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे ;

(दोन) व्यवस्थापन समितिकडून मान्यतेकरिता ठेवण्यात आलेले प्रन्यासचे वार्षिक अंदाजपत्रक व वार्षिक कार्यक्रम योजनेला मान्यता देणे. वर्ष सुरू होणाच्या किमान एक महिना आधी व्यवस्थापन परिषद वार्षिक कार्यक्रम योजना तयार करेल व नियामक परिषद त्याला मान्यता देईल. वार्षिक कार्यक्रम योजनेमध्ये योजना व प्रकल्पांची यादी त्यांच्या तात्पुरत्या तरतुदीसह समाविष्ट असेल :

परंतु, पुढील वर्षासाठी वार्षिक कार्यक्रम योजना तयार करतांना मागील जबाबदाऱ्यांची व अपूर्ण राहिलेल्या योजनांचे दायित्व यांचे एकूण मूल्यमापन करण्यात येईल. वित्तीय नियमांचे पालन करण्यासाठी व प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी, मागील दायित्वे व जबाबदाऱ्या आणि प्रस्तावित केलेल्या नवीन योजना यांची एकूण बरीज कोणत्याही परिस्थितीत पुढील वित्तीय वर्षासाठी प्रन्यास निधिमध्ये येणाऱ्या अपेक्षित गुंतवणुकीच्या दोन पटींपेक्षा जास्त असणार नाही ;

(तीन) प्रन्यास निधीमार्फत कार्यान्वयीत केलेल्या विकास योजना व कामे यांचे ग्रामसभेमध्ये सामाजिक लेखापरीक्षण आयोजित करणे ;

(चार) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्यासाठी, राज्यशासनाने प्रदान केलेल्या अशा पद्धतीने, उपलब्ध न्यास निधीमधून अशा इतर खर्चास मान्यता देणे ;

(पाच) व्यवस्थापन समितीचे शिफारशींना मान्यता देणे ;

(सहा) प्रन्यासचे वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण झालेले लेखे यांना मागील वर्षाचे समाप्तीनंतर साठ दिवसांचे कालावधीचे आत मान्यता देणे ;

(सात) प्रन्यास चालविण्याकरिता, राज्य शासनाने ठरविल्याप्रमाणे प्रतिनियुक्तिवरील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीला, कंत्राटी किंवा बाह्य यंत्रणांकडून आधारित कामाला मंजुरी देणे ;

(आठ) प्रन्यासची वार्षिक योजना तयार करण्यामध्ये व प्रन्यासचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी, सहाय्य करण्याकरिता उप-समित्या गठित करणे ;

(नऊ) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्याकरिता असे कोणतेही इतर कार्यक्रम हाती घेणे.

७. **नियामक परिषदेच्या सभा.**—(एक) नियामक परिषदेच्या सभा आवश्यकतेप्रमाणे अनेकदा होतील परंतु प्रत्येक तिमाहीत किमान एकदा होईल.

(दोन) नियामक परिषदेची सभा, अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे, नियामक परिषदेच्या सदस्यांना दोन आठवड्याची नोटीस देऊन आयोजित करण्यात येईल.

(तीन) अशा सभेकरिता गणपूर्ती (कोरम), नियामक परिषदेच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील, जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व नंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी पुनः आयोजित करण्यात येईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

प्रकरण—चार

**व्यवस्थापन समिती**

८. **व्यवस्थापन समिति.**—(एक) प्रन्यासचा दैनंदिन व्यवहार व्यवस्थापन समिती द्वारे चालविण्यात येईल.

(दोन) फक्त पदसिद्ध सदस्यांना मतदानाचा हक्क राहील.

(तीन) नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा कोणताही हक्क राहणार नाही.

(चार) जिल्ह्यातील खाणकाम यंत्रणा किंवा खनिपट्टाधारक व अशासकीय संस्था यांचे प्रतिनिधी यांची नेमणूक, नियामक परिषदांवर नामनिर्देशित केलेल्या त्या श्रेणीतील (वर्गातील) प्रतिनिधीमधून व्यवस्थापन समिती करेल.

९. **व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये.**—व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे आहे ते असे,—

(एक) प्रन्यासच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी कर्तव्ये पार पाडण्यामध्ये योग्य त्या कार्यसक्तीचा वापर करणे ;

(दोन) अधिनियमाच्या तरतुदीनुसार व राज्यशासनाने ठरवून दिलेल्या पद्धतीने संबंधित खनिपट्टा धारकाकडून अंशदानाची रक्कम वेळेवर जमा होईल याची खात्री करणे ;

(तीन) ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील शहरी स्थानिक संस्था, शासकीय विभाग, मंडळे, महामंडळे व राज्य व केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांचेकडून प्रस्ताव व प्रकल्प स्वीकार करणे. तथापि, अनुसूचित क्षेत्रात व्यवस्थापन समिती बाधित क्षेत्राच्या ग्रामसभांकडून प्रस्ताव किंवा प्रकल्प प्राप्त करू शकेल ;

(चार) प्रन्यासाच्या वार्षिक योजनेचा व प्रन्यासाचे वार्षिक अंदाजपत्रकाचा, प्रस्तावित योजना व प्रकल्पांसह समन्वय साधणे, संघटित करणे व मंजूर योजना व प्रकल्पांचेवर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(पाच) वार्षिक योजना व मंजूर योजना व प्रकल्पांचेवर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(सहा) प्रकल्पांना मान्यता देणे आणि मंजुरी आदेश निर्गमित करणे, त्याकरिता प्रन्यास निधी देणे व संवितरण करणे ;

(सात) प्रन्यास निधीची व्यवस्था पाहणे व त्याची कार्यसक्ती पद्धतीने गुंतवणूक करणे आणि भारतीय रिझर्व बँकेकडून मान्यता प्राप्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत प्रन्यासच्या नावाने खाते उघडणे व असे खाते व गुंतवणुकीचे व्यवहार पाहणे ;

(आठ) प्रन्यास निधीचे उपयोगितेचे प्रगतीवर लक्ष ठेवणे ;

(नऊ) लेखापरीक्षण झालेले लेखे, वार्षिक अहवालासह नियामक परिषदेसमोर, मागील वर्षाचे समाप्ती नंतर साठ दिवसांचे कालावधीच्या आत, त्यांचे मान्यतेकरिता ठेवणे ;

(दहा) प्रन्यासचे कामकाजाकरिता कार्यपद्धती तयार करणे व मंजूर करणे ;

(अकरा) राज्य शासनाच्या दिशा-निर्देशानुसार, कर्मचाऱ्यांची व लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे, तथापि या नियुक्तांना नियामक परिषदेच्या मंजुरीची आवश्यकता राहील ;

(बारा) वेबसाईट तयार करून ती सुस्थितीत ठेवणे, ज्यावर खालील माहिती टाकून अद्यावत ठेवणे,—

(क) प्रन्यासच्या रचनेची व प्रन्यास वर असलेल्या व्यक्तींची सविस्तर माहिती.

(ख) खाणकामामुळे बाधित क्षेत्र व लोकांची यादी.

(ग) खनिपट्टाधारक व इतरांकडून प्राप्त अंशदानाची तिमाही सविस्तर माहिती.

(घ) प्रन्यासच्या सर्व सभांची विषय सूची, इतिवृत्त व कार्यवाही अहवाल.

(च) वार्षिक योजना, अंदाज पत्रक, कार्य आदेश व वार्षिक अहवाल.

(छ) सध्या सुरू असलेल्या कामांची ऑनलाईन स्थिती, हाती घेण्यात आलेल्या सर्व प्रकल्प व कार्यक्रमांची कार्यान्वयन स्थिती व प्रगती वेबसाइट वर उपलब्ध करून द्यावी, यात कामाचे वर्णन, लाभार्थींचा तपशील, अंदाजित किंमत, कार्यान्वयन यंत्रणेचे नाव, काम सुरू करण्याची व पूर्ण करण्याची अपेक्षित तारीख, मागील तिमाहीपर्यंतची वित्तीय व भौतिक (प्रत्यक्ष) प्रगती इत्यादी माहितीचा समावेश करावा.

(ज) विविध कल्याण योजनांतर्गत लाभार्थींची यादी.

(झ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) अंतर्गत ऐच्छिक प्रकटीकरण ; आणि

(तेरा) प्रन्यासच्या सुरळीत कामकाज आणि व्यवस्थापनाकरिता आवश्यक इतर सर्व गोष्टी करणे.

१०. **व्यवस्थापन समितीच्या सभा** :—(एक) व्यवस्थापन समितीच्या सभा एका वित्तीय वर्षात किमान चार वेळा घेण्यात येतील व त्या अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे आयोजित केल्या जातील.

(दोन) या सभांसाठी गणपूर्ति (कोरम), व्यवस्थापन समितीच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी आयोजित केली जाईल, ज्याकरिता गणपूर्तीची अट लागू होणार नाही.

(तीन) व्यवस्थापन समितीची सभा अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली होईल, त्यांच्या अनुपस्थितीमध्ये, पदसिद्ध सदस्य आपल्यातून स्थानापन्न अध्यक्षाची निवड करू शकतील.

प्रकरण—पाच

## प्रन्यास निधिचे व्यवस्थापन

११. **प्रन्यास अंतर्गत निधिची घडण.**—(एक) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचा नियामक परिषद प्रन्यास अंतर्गत एक निधी स्थापित करेल ज्याला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास निधी असे संबोधण्यात येईल. ज्याचे व्यवस्थापन प्रन्यासच्या व्यवस्थापन समितीद्वारे करण्यात येईल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचा प्रन्यास निधी, खालील रकमांचा स्वीकार करेल.

(क) राज्य शासनाकडून दिलेली प्रारंभिक जमा ;

(ख) राज्य शासनाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे राज्य शासनाकडून किंवा कोणतीही इतर यंत्रणा, संस्था किंवा व्यक्ती यांचेकडून प्राप्त कोणतेही अनुदान, अंशदान किंवा इतर भांडवली सहाय्य ;

(ग) नियम २ चा उप-नियम (१) चे उपवाक्य (जी) मध्ये व्याख्या केलेले अंशदान ;

(घ) गुंतवणूक व इतर जमा आणि त्यावर जमा झालेले व्याज व त्यापासून प्राप्त झालेले इतर कोणतेही उत्पन्न ;

(च) प्रन्यासच्या इतर सर्व मालमत्ता व त्यापासून प्राप्त झालेले उत्पन्न किंवा त्याचे झालेले अधिमूल्यन ; आणि

(छ) राज्य स्तरिय संनियंत्रण समितीने ठरविल्याप्रमाणे इतर जिल्ह्यांच्या अंशदान निधीतून प्राप्त झालेला निधी.

१२. **प्रन्यास निधीचे प्रवर्तन.**—प्रन्यास निधी, भारतीय रिझर्व बँकेने मान्यता दिलेल्या एक किंवा जास्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत फक्त प्रन्यासच्या नावाने असा सार्वजनिक निधी ठेवण्यात येईल व सर्व खाते हे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व व्यवस्थापन समितीचे सदस्य-सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्य करतील. या निधीचे खाते पुस्तके प्रन्यासची व्यवस्थापन समिती सांभाळेल. हे खाते अंशदान निधीपासून स्वतंत्र ठेवण्यात (सांभाळण्यात) यावे.

१३. **प्रन्यास निधीमधून खर्च.**—या न्यासमध्ये उपलब्ध निधी हा भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पी एम के के के वाय) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील उद्देश अंमलात आणण्याकरिता उपयोगात आणण्यात येईल :—

(एक) खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी निगडीत कार्यामुळे बाधित क्षेत्रांच्या सर्वांगीण विकासाकरिता, व्यवस्थापन समितीने तयार केलेल्या व नियामक परिषदेने मान्यता दिलेल्या प्रन्यासच्या वार्षिक कार्यक्रम योजनेच्या उद्देशाकरिता ;

(दोन) किमान २/३ रक्कम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रांमध्ये वापरण्यात येईल व उर्वरित कमाल १/३ रक्कम अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रांकरिता वापरण्यात येईल (प्रत्यक्ष बाधित खाणकाम क्षेत्र हे खाण/डंपपासून २० कि.मी. च्या त्रिज्येच्या आत राहील).

(तीन) प्रन्यासकडे उपलब्ध निधीपैकी किमान साठ टक्के उच्च प्राथमिकता क्षेत्रांकरिता उपयोगात आणल्या जाईल जसे.—

(क) पेयजल पुरवठा केंद्रीभूत जलशुद्धीकरण यंत्रणा, जल प्रक्रिया केंद्र, शाश्वत किंवा तात्पुरती जलवितरण जाळे (नेटवर्क), ज्यामध्ये एकल पाणीपुरवठा सुविधेचा समावेश आहे. जलवितरण पाईपलाईन टाकणे.

(ख) पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.—सांडपाणी प्रक्रिया केंद्र, जलप्रवाह, तलाव, तळे, भू-जल, क्षेत्रातील अन्य जलस्त्रोत यांचे प्रदूषण प्रतिबंध, खनिकर्म काम व डंपसमुळे होणारे वायू व धुळ प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता उपाययोजना, खाणीतील पाणी निचरा व्यवस्था, खाण प्रदूषण प्रतिबंध तंत्रज्ञान आणि पर्यावरण-सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता आवश्यक इतर वायू, जल व भू-पृष्ठ प्रदूषण नियंत्रण यंत्रणा.

(ग) आरोग्यसेवा.—बाधित क्षेत्रामध्ये प्राथमिक किंवा दुय्यम आरोग्य सेवा सुविधा निर्मिती करणे या कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यामध्ये फक्त आरोग्य सेवा पायाभूत सुविधा निर्मिती यावर भर नसावा तर त्यासोबत अशा सुविधा प्रभावी करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे व पुरवठा यांच्या तरतुदीवर सुद्धा भर असावा. हे प्रयत्न सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य सेवा पायाभूत सुविधा यांना पूरक व यांचे बरोबर काम करणे अशा असाव्या. याकरिता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ मायनर्स हेल्थ यांचेकडे उपलब्ध असलेले कौशल्य (विशेष ज्ञान) हे सुद्धा विचारात घेऊन खनिकर्म कामाशी निगडीत आजार व रोग यांची काळजी घेण्याकरिता आवश्यक विशेष पायाभूत सुविधा आराखडा तयार करण्यात यावा. खनिकर्म कामामुळे बाधित व्यक्तिकरिता त्यांच्या आरोग्य सेवेसाठी गट विमा योजना राबविता येईल.

(घ) शिक्षण.—शिक्षण संस्था व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र यांचे बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वाचनालये, कला व हस्त कौशल्य वर्ग, स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची तरतूद, दुर्गम भागातील विद्यार्थी किंवा शिक्षक यांचेकरिता निवासी वसतीगृह, क्रिडा पायाभूत सुविधा, शिक्षक किंवा इतर मदतनिस कर्मचारी, इ. शिक्षा मांडणी (इ-लर्निंग सेट अप), विद्यार्थ्यांकरिता इतर वाहतुकीची व्यवस्था (बस, व्हॅन, सायकल, रिक्षा इत्यादी) आणि पौष्टिक अन्न यासंबंधी कार्यक्रम.

(च) कृषी व तत्सम उपक्रम.—कृषी व तत्सम उपक्रम आणि वनशेती यांच्याशी संबंधित उपक्रमांचा विकास, बियाणे, उपकरणांचा लहान संच, कृषी उपकरणांना आर्थिक सहाय्य व सूक्ष्म सिंचन सुविधा ठिबक सिंचनासह, बोर वेल व पंपा करित आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांना शेतीच्या तत्सम उपक्रमांकरिता सहाय्य जसे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वनशेती इत्यादी. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन रहिवासी (रिकग्नीशन ऑफ फॉरेस्ट राइटस्) ॲक्ट, २००६ (२००७ चा २) अंतर्गत वन हक्क धारक या सहाय्याकरिता पात्र ठरतील.

(छ) महिला व बालकल्याण.—माता व बाल आरोग्य, कुपोषण, संसर्गजन्य रोग इत्यादी समस्यांवर उपाय योजनांकरिता विशेष कार्यक्रम

(ज) वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्ती कल्याण,—वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तिकरिता विशेष कार्यक्रम.

(झ) कौशल्य विकास व रोजगार.—उदरनिर्वाहासाठी सहाय्याकरिता कौशल्य विकास, स्थानिक पात्र व्यक्तिकरिता उत्पन्न निर्माण व आर्थिक उपक्रम या प्रकल्प/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्रांचा विकास, स्वयंरोजगार योजना, स्वंयसहाय्यता गटांना सहाय्य व अशा स्वंयरोजगार आर्थिक उपक्रमांकरिता पुढे व मागे संबंध जोडण्याची तरतूद नाविन्यपूर्णतेला, प्रवर्धन उपक्रम परिचालकता व उबवणी केंद्रांना सहाय्य.

(ट) स्वच्छता.—कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, योग्य निचऱ्याची तरतूद व सांडपाणी प्रक्रिया केंद्र, मलविषयक गाळाच्या विल्हेवाटीची तरतूद, स्वच्छता गृहांची तरतूद आणि इतर संबंधित उपक्रम.

(तीन) न्यास विधिचा चाळीस टक्केपर्यंत इतर प्राथमिकता क्षेत्रावर खर्च करता येईल, जसे

(क) भौतिक पायाभूत सुविधा : आवश्यक भौतिक पायाभूत सुविधा जसे रस्ते, पूल, रेल्वे, जलवाहतूक, विमानतळ, औद्योगिक उद्यान किंवा समूह व इतर औद्योगिक पायाभूत सुविधा प्रदान करणे.

(ख) सिंचन : सिंचनाचे पर्यायी स्त्रोत विकसित करणे, सुयोग्य व आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

(ग) ऊर्जा व पाणलोट विकास क्षेत्र : पारंपरिक विद्युत व उर्जाचे अक्षयस्त्रोतापासून घरगुती विद्युतीकरण व विद्युत पायाभूत सुविधांचे मजबुतीकरण, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा (मायक्रो हायडलसह) व पावसाच्या पाण्याची साठवण, यंत्रणांचा विकास, फळबागा, एकात्मिक शेती व आर्थिक वनीकरण व पाणलोट क्षेत्रांची पुनःस्थापना. राज्य शासनाने वेळोवेळी निर्देशीत कोणतेही इतर पायाभूत सुविधांचे कार्य.

(घ) पर्यावरणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याकरिता इतर कोणत्याही उपाययोजना.

(चार) शासकीय विभाग, महामंडळ व मंडळामार्फत थेट निधी पद्धतीने, सार्वजनिक, खाजगी भागीदारीच्या (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) माध्यमातून, विविध विकास व पायाभूत सुविधेसंबंधी प्रकल्प.

(पाच) पात्र मानवी संसाधनाची भरपाई करण्याची व्यवस्था जसे डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, शिक्षक इत्यादी.

(सहा) उप-नियम (दोन) व (तीन) मध्ये नमूद क्षेत्रासंबंधी शासकीय योजना किंवा कार्यक्रमांची पूर्तता करणे.

(सात) प्रन्यासनिधि अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकासाच्या योजनांचे नियोजन व संनियंत्रण करण्याकरिता ग्राम सभांना प्रशिक्षण देणे व त्याची क्षमता बांधणी करणे

(आठ) प्रन्यासने जिल्ह्यात वित्तीय वर्षात प्रन्यासनिधिमध्ये प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या रकमेच्या पाच टक्के पेक्षा जास्त नाही अशी रक्कम (किमान रु. २५ लक्ष ते कमाल रु. २ कोटी) प्रन्यास त्याचा प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याकरिता खर्च करू शकेल.

परंतु, प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याची कमाल मर्यादा राज्य शासन वेळोवेळी वाढवू शकेल.

(नऊ) वार्षिक जमेची वाजवी रक्कम स्थायीदान म्हणून ठेवता येईल

(दहा) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पी एम के के के वाय) अंतर्गत मार्गदर्शक तत्वाप्रमाणे इतर कोणतेही कार्य घेण्यात येईल

**१४. खर्चाची आकारणी.**—विश्वस्तांना खालील खर्च प्रन्यासनिधि व आकारण्याचा हक्क राहील :—

(एक) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये — योग्यरित्या केलेला खर्च व गुंतवणुकीच्या परिपूर्ती, जतन किंवा फायद्यासाठी व प्रन्यास निधिचा समावेश असलेली मालमत्ता व प्रन्यासचे हितसंबंधाचे संरक्षण करण्याकरिता केलेला सर्व खर्च.

(दोन) अंशदान व कोणतेही इतर संसाधन ज्यात वाढ होईल ते प्राप्त करण्याकरिता विश्वस्तांना आलेला सर्व खर्च (यात कोणताही करार किंवा इतर लेखी करारनाम्याच्या निष्पादन व नोंदणीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा समावेश आहे.)

(तीन) कोणत्याही न्यायीक कार्यवाही संबंधित किंवा प्रन्यासच्या संबंधी विश्वस्ताच्या विरुद्ध कामकाजाशी झालेला सर्व खर्च यात व्यावसायिक शुल्क व न्यायिक सल्लागारावर झालेल्या खर्चाचा समावेश आहे.

(चार) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये झालेला सर्व कायदेशीर व वैधानिक खर्च यात प्रन्यासच्या कामासंबंधात देय होणारी किंवा प्रदान केलेला कर, शुल्क व इतर आकारणीचा समावेश आहे.

(पाच) सभा आयोजित करण्यात व इतर कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि नियोजन, अंमलबजावणी, तपासणी, आढावा व प्रकल्प अहवाल तयार करणे, सल्लागाराचे शुल्क, तृतीय पक्ष तपासणी लेखा परीक्षक व असे त्याच्या अनुषंगिक इतर खर्च.

**१५. लेखा व लेखापरीक्षण**

(एक) प्रन्यासचे कामकाजाचे सत्य स्वच्छ चित्र सादर करण्याकरिता व्यवस्थापन समिती प्रन्यासनिधि संबंधित खाते पुस्तके, दस्तऐवज व अभिलेख सुयोग्यरित्या सांभाळेल किंवा ठेवेल.

(दोन) प्रन्यासच्या लेख्यांचे किमान वर्ष संपल्यानंतर पात्र लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षण करण्यात येईल.

(तीन) प्रन्यासच्या लेखा परीक्षकाची नेमणूक, नियामक परिषदेकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे पॅनेलवर असलेल्या सनदी लेखापालच्या यादी मधून नियामक परिषदने ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल

(चार) नियामक परिषद लेखापाल यांना काढून टाकू शकते किंवा बदलू शकते.

(पाच) राज्यशासन, विशिष्ट वर्षाचे किंवा अशा काही कालावधीचे लेखापरीक्षण करण्याकरिता राज्यशासनाने ठरविलेल्या अटी व शर्तीवर लेखापालाची किंवा लेखापालांची नेमणूक करू शकेल किंवा राज्याचे लेखापाल यांना विनंती करू शकेल

(सहा) प्रन्यास त्याचे पुढील वित्तीय वर्षाकरिता मंजूर अंदाजपत्रक व वार्षिक योजना त्याच्या मंजूर योजना व प्रकल्पांसह, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन व राज्य शासनास त्यांचे संबंधित वेबसाइटवर प्रकाशित करण्याकरिता पाठवील

(सात) प्रन्यास, तिमाही संपल्यानंतर पंचेचाळीस दिवसाच्या आत मंजूर योजना व प्रकल्पांच्या भौतिक व वित्तीय संबंधात तिमाही प्रगती अहवाल तयार करेल व त्याला जिल्हा परिषद व जिल्हा प्रशासनाकडे त्यांच्या संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्याकरिता तात्काळ पाठवेल

(आठ) प्रत्येक वर्षी वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रन्यास त्या संबंधित वित्तीय वर्षाच्या त्याच्या उपक्रमांवर वार्षिक अहवाल तयार करेल व त्याला नियामक परिषदपुढे ठेवेल.

(नऊ) वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आत नियामक परिषदेकडून मंजूर वार्षिक अहवाल व मंजूर लेखा अहवाल त्यांची मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ जिल्हा परिषद व राज्य शासनाकडे संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्यासाठी पाठवेल.

(दहा) वार्षिक अहवाल मान्यता मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत शासनाला सादर करण्यात येईल व प्रन्यासच्या वेबसाईटवर सुद्धा प्रकाशित करण्यात येईल.

(अकरा) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासच्या वार्षिक अहवाल नियामक परिषदेसमोर सादर केला जाईल.

## प्रकरण सहा

## संकिर्ण

१६. कामाची अंमलबजावणी

(एक) काम किंवा साहित्य, प्रन्यासकडून, राज्य शासनाने अशा खरेदीकरिता विनिर्दिष्ट केलेल्या योग्य पद्धतीचा अवलंब करून खरेदी (संपादन) करू शकेल.

(दोन) प्रन्यासने हाती घेतलेली कामे शक्यतो फक्त शासकीय विभाग यंत्रणा, सार्वजनिक उपक्रम यांचे मार्फत कार्यान्वयीन करेल. ज्या साधारणपणे अशी कामे, संबंधित नियमांना अनुसरून करतात, आणि त्याची अंमलबजावणी करतांना किंवा कंत्राट मंजूर करतांना त्या संस्थेला अशा पद्धती लागू होतात.

(तीन) तांत्रिक मान्यता व कामाची देखरेख संबंधित विभागाला लागू होणाऱ्या प्रशासकीय प्रदान केलेल्या शक्ती अंतर्गत सदर काम करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(चार) जी कामे शासकीय विभाग यंत्रणा किंवा सार्वजनिक उपक्रमामार्फत कार्यान्वयीन करणे शक्य नसेल अशा कामांचे संबंधात व्यवस्थापन समिती ते काम, कोणत्याही इतर सक्षम व सुयोग्य यंत्रणेला, पारदर्शक पद्धतीचा अवलंब करून, नियामक परिषदेची पूर्व परवानगी प्राप्त करून, मंजूर करू शकेल.

(पाच) सर्व यंत्रणा व लाभार्थींना विधिचे हस्तांतरण त्यांचे बँक खात्यात करण्यात येईल.

१७. अनुसूचित क्षेत्रासाठी विशेष तरतूद

(एक) भारतीय संविधानाच्या अनुसूची ५ व ६ सह वाचल्या जाणाऱ्या अनुच्छेद २४४ ला ध्यानात ठेवून, जे अनुसूचित जाती व जमाती क्षेत्राला व अशा पंचायतीच्या (ज्या अनुसूचित क्षेत्राचा विस्तार आहेत) तरतुदी असलेल्या अधिनियम, १९९६ ला आणि अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत येणारी गावे ती अनुसूचित क्षेत्रात चालणाऱ्या खनन व खनन विषयक कार्यांनी बाधित झाली आहे असताना ग्रामसभेची मंजुरी खालीलप्रमाणे घेणे आवश्यक आहे :—

(अ) अशा सर्व योजना, कार्यक्रम, प्रकल्प जे प्रधानमंत्री खनीज क्षेत्र कल्याण योजने (PMKKKY) अंतर्गत घ्यावयाचे आहे आ:

(ब) शासनाच्या लागू मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे लाभार्थी चिन्हित करणे.

(दोन) संबंधित गावात घेतलेल्या कार्याचा अहवाल वित्तीय वर्ष पूर्ण झाल्यावर ग्रामसभेला सादर केला जाईल.

१८. प्रन्यास रद्द करणे.—राज्य स्तरीय संनियंत्रण समितिच्या शिफारशीवरून प्रन्यास रद्द करण्याचा राज्य शासनाला विवेकाधिकार वापरता येईल. राज्य शासन जो अवधी निश्चित करेल तो पर्यंत प्रन्यास विद्यमान राहील. प्रन्यासाच्या निर्वापणकाळी प्रन्यासाची सर्व मालमत्ता व दायित्व राज्य शासनाकडे हस्तांतरित होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अपूर्व चंद्रा,**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

टीप.—सदर अधिसूचना दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या मूळ इंग्रजी अधिसूचनेचे मराठी भाषेतील भाषांतरित प्रारुप आहे. सदरील भाषांतरित अधिसूचनेमधील एखाद्या अर्थाबाबत प्रश्न उद्भवल्यास मूळ इंग्रजी अधिसूचना पहावी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

आश्वासन क्रमांक ४३२

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष २, अंक ११३(३)] मंगळवार, डिसेंबर २७, २०१६/पौष ६, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८१**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर २०१६

**अधिसूचना**

**खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक एमडीएफ. ०६१५/५१/प्र.क्र. ३४/उद्योग-९.—खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम ९ ब चे उप-कलम (२), (३), (४), (५) व (६) कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यातील महाराष्ट्र राज्याची प्रयुक्ती व प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) च्या तरतुदी अंतर्भूत करण्याकरिता सदर अधिनियमाच्या कलम २०ए अंतर्गत भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कामकाज, जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना व कार्ये आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये रकमा प्रदान करणे च्या पद्धतीचे विनियमन करण्याकरिता पुढील नियम करीत आहे, ते असे :—

प्रकरण—एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव आणि प्रारंभ**

१. (१) या नियमास महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ असे म्हणावे.

(२) हे नियम, दिनांक १६ सप्टेंबर २०१५ पासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(क) "अधिनियम", याचा अर्थ, खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) असा आहे.

(ख) "बाधित क्षेत्र", याचा अर्थ, जिल्हाधिकारी यांनी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, जिल्ह्यात खाण किंवा खाणींच्या समुहापासून, खनिकर्म कामाशी संबंधित कामांमुळे बाधित क्षेत्र, या सह राज्य शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जिल्ह्याच्या पलीकडील क्षेत्र आणि प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट प्रत्यक्ष बाधित क्षेत्र व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र यांचासुद्धा समावेश होतो ;



भाग चार-अ—१८१—१

एचबी ०३३९-४५

(ग) ''बाधित लोक'', याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट लोक ;

(घ) ''लेखापरीक्षक'', याचा अर्थ, नियामक परिषदेकडून नियुक्त केलेला लेखापरीक्षक किंवा सनदी लेखापाल, आणि राज्याचे महालेखापाल किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले इतर लेखापरीक्षक याचा समावेश होतो ;

(ङ) ''केंद्रीय योजना (पीएमकेकेकेवाय)'', याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) असा होतो ;

(च) ''जिल्हाधिकारी'', याला महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (महा. १९६६ चा ४१) अंतर्गत असणारा समान अर्थ लागू राहील ;

(छ) ''अंशदान'', याचा अर्थ, प्रन्यासमध्ये जमा करावयाचे अंशदान.—

(एक) प्रमुख खनिजांच्या प्रकरणात, सदर अधिनियमाच्या कलम ९ ब च्या उप-कलम (५) व (६) अंतर्गत केंद्र सरकारकडून वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीप्रमाणे खनिपट्टा धारक किंवा संयुक्त परवाना (पुर्वेक्षण अनुज्ञप्ती व खनिपट्टा) धारक यांचेकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(दोन) गौण खनिजांच्या प्रकरणात सदर अधिनियमाच्या कलम १५ए अंतर्गत गौण खनिजासाठी राज्य शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील खनिपट्टा किंवा खाणपट्टा किंवा खाण परवानाधारकांकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(ज) ''नियामक परिषद'', याचा अर्थ, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या सर्व विश्वस्तांच्या बनलेल्या प्रन्यासची नियामक परिषद ;

(झ) ''शासन'', किंवा ''राज्य शासन'', म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ट) ''ग्रामसभा'', याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे ग्रामसभा ;

(ठ) ''खनिपट्टा क्षेत्र'', याचा अर्थ, कोणत्याही खनिजाचे किंवा गौण खनिजाचे पुर्वेक्षण करण्याकरिता किंवा खाणकाम करण्याच्या उद्देशासाठी मंजूर क्षेत्र ;

(ड) ''खनिकर्म '', किंवा ''खाणकाम '' याचा अर्थ, कोणतेही खनिज किंवा गौण खनिज बाहेर काढण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेले कार्य ;

(ढ) ''व्यवस्थापन समिति'', याचा अर्थ, प्रन्यासच्या दैनंदिन व्यवहार व्यवस्थापनाच्या उद्देशासाठी राज्य शासनाने गठित केलेली समिती ,

(ण) ''पंचायत'', याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे पंचायत ;

(त) ''प्रन्यास'', याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९ ब चा उप-कलम (१) अंतर्गत शासनाने स्थापित केलेला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास ;

(थ) ''प्रन्यास निधी'', याचा अर्थ, नियम १३ अंतर्गत घटित प्रन्यास निधी ;

(द) ''विश्वस्त'', याचा अर्थ, प्रन्यासचे नियमन करण्याच्या उद्देशासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या व्यक्ती ;

(ध) ''वर्ष'', याचा अर्थ, एक एप्रिलपासून सुरू होणारे व पुढील वर्षी ३१ मार्च रोजी संपणारे वित्तीय वर्ष किंवा त्याचा भाग कालावधी ;

(न) ''जिल्हा परिषद'', याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे जिल्हापरिषद ;

(२) या नियमात वापरलेले, परंतु ज्याची व्याख्या केलेली नाही असे शब्द किंवा शब्दप्रयोग यांना खाणी व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) मध्ये जे अर्थ दिले असतील तेच अर्थ असतील.

प्रकरण—दोन

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान

३. **जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे उद्दिष्ट.**—(एक) जिल्ह्यातील खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी संबंधित कार्यामुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्रांचे हितसंबंध, लाभ, शाश्वत विकासासाठी, काम करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानाचे उद्दिष्ट आहे ; आणि

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये जमा निधीचा परिणामकारक, पारदर्शक व जबाबदार पद्धतीने वापर करणे.

४. **जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना**.—(एक) अधिसूचनेच्या कलम ९ब च्या उप-कलम (७) अंतर्गत स्थापित प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान हे नियामक परिषद, व्यवस्थापन समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समितिचे बनलेले असेल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कार्यालय प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी स्थित असेल किंवा नियामक परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे राहील.

## प्रकरण—तीन

## नियामक परिषद

५. **नियामक परिषद**.—प्रतिष्ठान प्रन्यासचे व्यवस्थापन नियामक परिषदेकडे निहित करण्यात येईल, जी प्रन्यासच्या राज्यशासनाकडून नियुक्त केलेल्या सर्व विश्वस्तांची बनलेली असेल.

(एक) नियामक परिषद ही पदसिद्ध सदस्य, नामनिर्देशित सदस्य व सदस्य-सचिव यांची बनलेली असेल.

(दोन) नियामक परिषदेचे पदसिद्ध सदस्य व जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधान परिषदेचे सभासद पैकी तीन प्रतिनिधी, हे जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे विश्वस्त राहतील.

(तीन) जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधानपरिषदेचे सभासद यांचे तीन प्रतिनिधी हे, शक्यतो खाणकाम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रातील पालकमंत्री यांनी शिफारस केलेले राहतील व अंतिम नामनिर्देशन, राज्यशासनाकडून तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(चार) अशासकीय संस्थेच्या (एनजीओ) दोन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(पाच) खनिज सवलत धारकामधून तीन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः त्यांचे नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(सहा) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक तीन वर्षांपेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल व ते दोन मुदतीपेक्षा जास्त वेळा पुन्हा पुनर्नियुक्तिसाठी पात्र ठरणार नाही.

६. **नियामक परिषदेचे अधिकार व कार्ये**.—सर्व विश्वस्तांची बनलेली, नियामक परिषद यासाठी जबाबदार असेल,—

(एक) प्रन्यासाचा व्यापक धोरणात्मक आराखडा तयार करणे व कार्यशीलतेसाठी कार्यपद्धतीला मान्यता देणे आणि प्रन्यासचे कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे ;

(दोन) व्यवस्थापन समितिकडून मान्यतेकरिता ठेवण्यात आलेले प्रन्यासचे वार्षिक अंदाजपत्रक व वार्षिक कार्यक्रम योजनेला मान्यता देणे. वर्ष सुरू होणाच्या किमान एक महिना आधी व्यवस्थापन परिषद वार्षिक कार्यक्रम योजना तयार करेल व नियामक परिषद त्याला मान्यता देईल. वार्षिक कार्यक्रम योजनेमध्ये योजना व प्रकल्पांची यादी त्यांच्या तात्पुरत्या तरतुदीसह समाविष्ट असेल :

परंतु, पुढील वर्षासाठी वार्षिक कार्यक्रम योजना तयार करतांना मागील जबाबदाऱ्यांची व अपूर्ण राहिलेल्या योजनांचे दायित्व यांचे एकूण मूल्यमापन करण्यात येईल. वित्तीय नियमांचे पालन करण्यासाठी व प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी, मागील दायित्वे व जबाबदाऱ्या आणि प्रस्तावित केलेल्या नवीन योजना यांची एकूण बेरीज कोणत्याही परिस्थितीत पुढील वित्तीय वर्षासाठी प्रन्यास निधिमध्ये येणाऱ्या अपेक्षित गुंतवणुकीच्या दोन पटींपेक्षा जास्त असणार नाही ;

(तीन) प्रन्यास निधीमार्फत कार्यान्वयीत केलेल्या विकास योजना व कामे यांचे ग्रामसभेमध्ये सामाजिक लेखापरीक्षण आयोजित करणे ;

(चार) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्यासाठी, राज्यशासनाने प्रदान केलेल्या अशा पद्धतीने, उपलब्ध न्यास निधीमधून अशा इतर खर्चास मान्यता देणे ;

(पाच) व्यवस्थापन समितीचे शिफारशींना मान्यता देणे ;

(सहा) प्रन्यासचे वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण झालेले लेखे यांना मागील वर्षाचे समाप्तीनंतर साठ दिवसांचे कालावधीचे आत मान्यता देणे ;

(सात) प्रन्यास चालविण्याकरिता, राज्य शासनाने ठरविल्याप्रमाणे प्रतिनियुक्तिवरील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीला, कंत्राटी किंवा बाह्य यंत्रणांकडून आधारित कामाला मंजुरी देणे ;

(आठ) प्रन्यासची वार्षिक योजना तयार करण्यामध्ये व प्रन्यासचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी, सहाय्य करण्याकरिता उप-समित्या गठित करणे ;

(नऊ) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्याकरिता असे कोणतेही इतर कार्यक्रम हाती घेणे.

७. **नियामक परिषदेच्या सभा.**—(एक) नियामक परिषदेच्या सभा आवश्यकतेप्रमाणे अनेकदा होतील परंतु प्रत्येक तिमाहीत किमान एकदा होईल.

(दोन) नियामक परिषदेची सभा, अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे, नियामक परिषदेच्या सदस्यांना दोन आठवड्याची नोटीस देऊन आयोजित करण्यात येईल.

(तीन) अशा सभेकरिता गणपूर्ति (कोरम), नियामक परिषदेच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील, जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व नंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी पुनः आयोजित करण्यात येईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

## प्रकरण—चार

## व्यवस्थापन समिती

८. **व्यवस्थापन समिति.**—(एक) प्रन्यासचा दैनंदिन व्यवहार व्यवस्थापन समिती द्वारे चालविण्यात येईल.

(दोन) फक्त पदसिद्ध सदस्यांना मतदानाचा हक्क राहील.

(तीन) नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा कोणताही हक्क राहणार नाही.

(चार) जिल्ह्यातील खाणकाम यंत्रणा किंवा खनिपट्टाधारक व अशासकीय संस्था यांचे प्रतिनिधी यांची नेमणूक, नियामक परिषदांवर नामनिर्देशित केलेल्या त्या श्रेणीतील (वर्गातील) प्रतिनिधीमधून व्यवस्थापन समिती करेल.

९. **व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये.**—व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्य खालीलप्रमाणे आहे ते असे,—

(एक) प्रन्यासच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी कर्तव्ये पार पाडण्यामध्ये योग्य त्या कार्यसक्तीचा वापर करणे ;

(दोन) अधिनियमाच्या तरतुदीनुसार व राज्यशासनाने ठरवून दिलेल्या पद्धतीने संबंधित खनिपट्टा धारकाकडून अंशदानाची रक्कम वेळेवर जमा होईल याची खात्री करणे ;

(तीन) ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील शहरी स्थानिक संस्था, शासकीय विभाग, मंडळे, महामंडळे व राज्य व केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांचेकडून प्रस्ताव व प्रकल्प स्वीकार करणे. तथापि, अनुसूचित क्षेत्रात व्यवस्थापन समिती बाधित क्षेत्राच्या ग्रामसभांकडून प्रस्ताव किंवा प्रकल्प प्राप्त करू शकेल ;

(चार) प्रन्यासाच्या वार्षिक योजनेचा व प्रन्यासाचे वार्षिक अंदाजपत्रकाचा, प्रस्तावित योजना व प्रकल्पांसह समन्वय साधणे, संघटित करणे व मंजूर योजना व प्रकल्पांचेवर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(पाच) वार्षिक योजना व मंजूर योजना व प्रकल्पांचे वर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(सहा) प्रकल्पांना मान्यता देणे आणि मंजुरी आदेश निर्गमित करणे, त्याकरिता प्रन्यास निधी देणे व संवितरण करणे ;

(सात) प्रन्यास निधीची व्यवस्था पाहणे व त्याची कार्यसक्ती पद्धतीने गुंतवणूक करणे आणि भारतीय रिझर्व बँकेकडून मान्यता प्राप्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत प्रन्यासच्या नावाने खाते उघडणे व असे खाते व गुंतवणुकीचे व्यवहार पाहणे ;

(आठ) प्रन्यास निधीचे उपयोगितेचे प्रगतीवर लक्ष ठेवणे ;

(नऊ) लेखापरिक्षण झालेले लेखे, वार्षिक अहवालासह नियामक परिषदेसमोर, मागील वर्षाचे समाप्ती नंतर साठ दिवसांचे कालावधीच्या आत, त्यांचे मान्यतेकरिता ठेवणे ;

(दहा) प्रन्यासचे कामकाजाकरिता कार्यपद्धती तयार करणे व मंजूर करणे ;

(अकरा) राज्य शासनाच्या दिशा-निर्देशानुसार कर्मचाऱ्यांची व लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे, तथापि या नियुक्तांना नियामक परिषदेच्या मंजुरीची आवश्यकता राहील ;

(बारा) वेबसाईट तयार करून ती सुस्थितीत ठेवणे, ज्यावर खालील माहिती टाकून अद्यावत ठेवणे,—

(क) प्रन्यासच्या रचनेची व प्रन्यास वर असलेल्या व्यक्तींची सविस्तर माहिती.

(ख) खाणकामामुळे बाधित क्षेत्र व लोकांची यादी.

(ग) खनिपट्टाधारक व इतरांकडून प्राप्त अंशदानाची तिमाही सविस्तर माहिती.

(घ) प्रन्यासच्या सर्व सभांची विषय सूची, इतिवृत्त व कार्यवाही अहवाल.

(च) वार्षिक योजना, अंदाज पत्रक, कार्य आदेश व वार्षिक अहवाल.

(छ) सध्या सुरू असलेल्या कामांची ऑनलाईन स्थिती, हाती घेण्यात आलेल्या सर्व प्रकल्प व कार्यक्रमांची कार्यान्वयन स्थिती व प्रगती वेबसाइट वर उपलब्ध करून द्यावी, यात कामाचे वर्णन, लाभार्थींचा तपशील, अंदाजित किंमत, कार्यान्वयन यंत्रणेचे नाव, काम सुरू करण्याची व पूर्ण करण्याची अपेक्षित तारीख, मागील तिमाहीपर्यंतची वित्तीय व भौतिक (प्रत्यक्ष) प्रगती इत्यादी माहितीचा समावेश करावा.

(ज) विविध कल्याण योजनांतर्गत लाभार्थींची यादी.

(झ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) अंतर्गत ऐच्छिक प्रकटीकरण ; आणि

(तेरा) प्रन्यासच्या सुरळीत कामकाज आणि व्यवस्थापनाकरिता आवश्यक इतर सर्व गोष्टी करणे.

१०. **व्यवस्थापन समितीच्या सभा :**—(एक) व्यवस्थापन समितीच्या सभा एका वित्तीय वर्षात किमान चार वेळा घेण्यात येतील व त्या अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे आयोजित केल्या जातील.

(दोन) या सभांसाठी गणपूर्ति (कोरम), व्यवस्थापन समितीच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी आयोजित केली जाईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

(तीन) व्यवस्थापन समितीची सभा अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली होईल, त्यांच्या अनुपस्थितीमध्ये, पदसिद्ध सदस्य आपल्यातून स्थानापन्न अध्यक्षाची निवड करू शकतील.

प्रकरण—पाच

## प्रन्यास निधिचे व्यवस्थापन

११. **प्रन्यास अंतर्गत निधिंची घडण.**—(एक) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासची नियामक परिषद प्रन्यास अंतर्गत एक निधी स्थापित करेल ज्याला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास निधी असे संबोधण्यात येईल. ज्याचे व्यवस्थापन प्रन्यासच्या व्यवस्थापन समितीद्वारे करण्यात येईल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचा प्रन्यास निधी, खालील रकमांचा स्वीकार करेल.

(क) राज्य शासनाकडून दिलेली प्रारंभिक जमा ;

(ख) राज्य शासनाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे राज्य शासनाकडून किंवा कोणतीही इतर यंत्रणा, संस्था किंवा व्यक्ती यांचेकडून प्राप्त कोणतेही अनुदान, अंशदान किंवा इतर भांडवली सहाय्य ;

(ग) नियम २ चा उप-नियम (१) चे उपवाक्य (जी) मध्ये व्याख्या केलेले अंशदान ;

(घ) गुंतवणूक व इतर जमा आणि त्यावर जमा झालेले व्याज व त्यापासून प्राप्त झालेले इतर कोणतेही उत्पन्न ;

(च) प्रन्यासच्या इतर सर्व मालमत्ता व त्यापासून प्राप्त झालेले उत्पन्न किंवा त्याचे झालेले अधिमूल्यन ; आणि

(छ) राज्य स्तरिय सनियंत्रण समितीने ठरविल्याप्रमाणे इतर जिल्ह्यांच्या अंशदान निधीतून प्राप्त झालेला निधी.

१२. **प्रन्यास निधीचे प्रवर्तन.**—प्रन्यास निधी, भारतीय रिझर्व बँकेने मान्यता दिलेल्या एक किंवा जास्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत फक्त प्रन्यासच्या नावाने असा सार्वजनिक निधी ठेवण्यात येईल व सर्व खाते हे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व व्यवस्थापन समितीचे सदस्य-सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्य करतील. या निधीचे खाते पुस्तके प्रन्यासची व्यवस्थापन समिती सांभाळेल. हे खाते अंशदान निधीपासून स्वतंत्र ठेवण्यात (सांभाळण्यात) यावे.

१३. **प्रन्यास निधीमधून खर्च.**—या न्यासमध्ये उपलब्ध निधी हा भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पी एम के के के वाय) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील उद्देश अंमलात आणण्याकरिता उपयोगात आणण्यात येईल :—

(एक) खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी निगडीत कार्यामुळे बाधित क्षेत्रांच्या सर्वांगीण विकासाकरिता, व्यवस्थापन समितीने तयार केलेल्या व नियामक परिषदने मान्यता दिलेल्या प्रन्यासच्या वार्षिक कार्यक्रम योजनेच्या उद्देशाकरिता ;

(दोन) किमान २/३ रक्कम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रांमध्ये वापरण्यात येईल व उर्वरित कमाल १/३ रक्कम अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रांकरिता वापरण्यात येईल (प्रत्यक्ष बाधित खाणकाम क्षेत्र हे खाण/डंपपासून २० कि.मी. च्या त्रिज्येच्या आत राहील).

(तीन) प्रन्यासकडे उपलब्ध निधीपैकी किमान साठ टक्के उच्च प्राथमिकता क्षेत्रांकरिता उपयोगात आणल्या जाईल जसे.—

(क) पेयजल पुरवठा केंद्रीभूत जलशुद्धीकरण यंत्रणा, जल प्रक्रिया केंद्र, शाश्वत किंवा तात्पुरती जलवितरण जाळे (नेटवर्क), ज्यामध्ये एकल पाणीपुरवठा सुविधेचा समावेश आहे. जलवितरण पाईपलाईन टाकणे.

(ख) पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.—सांडपाणी प्रक्रिया केंद्र, जलप्रवाह, तलाव, तळे, भू-जल, क्षेत्रातील अन्य जलस्त्रोत यांचे प्रदूषण प्रतिबंध, खनिकर्म काम व डंपसमुळे होणारे वायू व धुळ प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता उपाययोजना, खाणीतील पाणी निचरा व्यवस्था, खाण प्रदूषण प्रतिबंध तंत्रज्ञान आणि पर्यावरण-सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता आवश्यक इतर वायू, जल व भू-पृष्ठ प्रदूषण नियंत्रण यंत्रणा.

(ग) आरोग्यसेवा.—बाधित क्षेत्रामध्ये प्राथमिक किंवा दुय्यम आरोग्य सेवा सुविधा निर्मिती करणे व या कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यामध्ये फक्त आरोग्य सेवा पायाभूत सुविधा निर्मिती यावर भर नसावा तर त्यासोबत अशा सुविधा प्रभावी करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे व पुरवठा यांच्या तरतुदीवर सुद्धा भर असावा. हे प्रयत्न सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य सेवा पायाभूत सुविधा यांना पूरक व यांचे बरोबर काम करणे अशा असाव्या. याकरिता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ मायनर्स हेल्थ यांचेकडे उपलब्ध असलेले कौशल्य (विशेष ज्ञान) हे सुद्धा विचारात घेऊन खनिकर्म कामाशी निगडीत आजार व रोग यांची काळजी घेण्याकरिता आवश्यक विशेष पायाभूत सुविधा आराखडा तयार करण्यात यावा. खनिकर्म कामामुळे बाधित व्यक्तिकरिता त्यांच्या आरोग्य सेवेसाठी गट विमा योजना राबविता येईल.

(घ) शिक्षण.—शिक्षण संस्था व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र यांचे बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वाचनालये, कला व हस्त कौशल्य वर्ग, स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची तरतूद, दुर्गम भागातील विद्यार्थी किंवा शिक्षक यांचेकरिता निवासी वसतीगृह, क्रिडा पायाभूत सुविधा, शिक्षक किंवा इतर मदतनिस कर्मचारी, इ. शिक्षा मांडणी (इ-लर्निंग सेट अप), विद्यार्थ्यांकरिता इतर वाहतुकीची व्यवस्था (बस, व्हॅन, सायकल, रिक्षा इत्यादी) आणि पौष्टिक अन्न यासंबंधी कार्यक्रम.

(च) कृषी व तत्सम उपक्रम.—कृषी व तत्सम उपक्रम आणि वनशेती यांच्याशी संबंधित उपक्रमांचा विकास, बियाणे, उपकरणांचा लहान संच, कृषी उपकरणांना आर्थिक सहाय्य व सूक्ष्म सिंचन सुविधा ठिबक सिंचनासह, बोर वेल व पंपा करिता आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांना शेतीच्या तत्सम उपक्रमांकरिता सहाय्य जसे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वनशेती इत्यादी. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन रहिवासी (रिकग्नीशन ऑफ फॉरेस्ट राइटस्) ॲक्ट, २००६ (२००७ चा २) अंतर्गत वन हक्क धारक या सहाय्याकरिता पात्र ठरतील.

(छ) महिला व बालकल्याण.—माता व बाल आरोग्य, कुपोषण, संसर्गजन्य रोग इत्यादी समस्यांवर उपाय योजनांकरिता विशेष कार्यक्रम

(ज) वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्ती कल्याण.—वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तिकरिता विशेष कार्यक्रम.

(झ) कौशल्य विकास व रोजगार.—उदरनिर्वाहासाठी सहाय्याकरिता कौशल्य विकास, स्थानिक पात्र व्यक्तिकरिता उत्पन्न निर्माण व आर्थिक उपक्रम या प्रकल्प/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्रांचा विकास, स्वंयरोजगार योजना, स्वंयसहाय्यता गटांना सहाय्य व अशा स्वंयरोजगार आर्थिक उपक्रमांकरिता पुढे व मागे संबंध जोडण्याची तरतूद नाविन्यपूर्णतेला, प्रवर्धन उपक्रम परिचालकता व उबवणी केंद्रांना सहाय्य.

(ट) स्वच्छता.—कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, योग्य निचऱ्याची तरतूद व सांडपाणी प्रक्रिया केंद्र, मलविषयक गाळाच्या विल्हेवाटीची तरतूद, स्वच्छता गृहांची तरतूद आणि इतर संबंधित उपक्रम.

(तीन) न्यास विधिचा चाळीस टक्केपर्यंत इतर प्राथमिकता क्षेत्रावर खर्च करता येईल, जसे

(क) भौतिक पायाभूत सुविधा : आवश्यक भौतिक पायाभूत सुविधा जसे रस्ते, पूल, रेल्वे, जलवाहतूक, विमानतळ, औद्योगिक उद्यान किंवा समूह व इतर औद्योगिक पायाभूत सुविधा प्रदान करणे.

(ख) सिंचन : सिंचनाचे पर्यायी स्त्रोत विकसित करणे, सुयोग्य व आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

(ग) ऊर्जा व पाणलोट विकास क्षेत्र : पारंपरिक विद्युत व उर्जाचे अक्षयस्त्रोतापासून घरगुती विद्युतीकरण व विद्युत पायाभूत सुविधांचे मजबुतीकरण, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा (मायक्रो हायडलसह) व पावसाच्या पाण्याची साठवण, यंत्रांचा विकास, फळबागा, एकात्मिक शेती व आर्थिक वनीकरण व पाणलोट क्षेत्रांची पुनःस्थापना. राज्य शासनाने वेळोवेळी निर्देशीत कोणतेही इतर पायाभूत सुविधांचे कार्य.

(घ) पर्यावरणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याकरिता इतर कोणत्याही उपाययोजना.

(चार) शासकीय विभाग, महामंडळ व मंडळामार्फत थेट किंवा एजन्सीने सार्वजनिक, खाजगी भागीदारीच्या (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) माध्यमातून, विविध विकास व पायाभूत सुविधांसंबंधी प्रकल्प.

(पाच) पात्र मानवी संसाधनाची भरपाई करण्याकरिता व्यवस्था जसे डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, शिक्षक इत्यादी.

(सहा) उप-नियम (दोन) व (तीन) मध्ये नमूद क्षेत्रासंबंधी शासकीय योजना किंवा कार्यक्रमांची पूर्तता करणे.

(सात) प्रन्यासनिधि अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकासाच्या योजनांचे नियोजन व संनियंत्रण करण्याकरिता ग्राम सभांना प्रशिक्षण देणे व त्याची क्षमता बांधणी करणे.

(आठ) प्रन्यासने जिल्ह्यात वित्तीय वर्षात प्रन्यासनिधीमध्ये प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या रकमेच्या पाच टक्के पेक्षा जास्त नाही अशी रक्कम (किमान रु. २५ लक्ष ते कमाल रु. २ कोटी) प्रन्यास त्याचा प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याकरिता खर्च करू शकेल.

परंतु, प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याची कमाल मर्यादा राज्य शासन वेळोवेळी वाढवू शकेल.

(नऊ) वार्षिक जमेची वाजवी रक्कम स्थायीदान म्हणून ठेवता येईल.

(दहा) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पी एम के के के वाय) अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे इतर कोणतेही कार्य घेण्यात येईल.

**१४. खर्चाची आकारणी.**—विश्वस्ताना खालील खर्च प्रन्यासनिधि व आकारण्याचा हक्क राहील :—

(एक) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये — योग्यरीत्या केलेला खर्च व गुंतवणुकीच्या परिपूर्ती, जतन किंवा फायद्यासाठी व प्रन्यास निधिचा समावेश असलेली मालमत्ता व प्रन्यासचे हितसंबंधाचे संरक्षण करण्याकरिता केलेला सर्व खर्च.

(दोन) अंशदान व कोणतेही इतर संसाधन ज्यात वाढ होईल ते प्राप्त करण्याकरिता विश्वस्तांना आलेला सर्व खर्च (यात कोणताही करार किंवा इतर लेखी करारनाम्याच्या निष्पादन व नोंदणीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा समावेश आहे.)

(तीन) कोणत्याही न्यायीक कार्यवाही संबंधित किंवा प्रन्यासच्या संबंधी विश्वस्ताच्या विरुद्ध कामकाजाशी झालेला सर्व खर्च यात व्यावसायिक शुल्क व न्यायिक सल्लागारावर झालेल्या खर्चाचा समावेश आहे.

(चार) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये झालेला सर्व कायदेशीर व वैधानिक खर्च यात प्रन्यासच्या कामासंबंधात देय होणारी किंवा प्रदान केलेला कर, शुल्क व इतर आकारणीचा समावेश आहे.

(पाच) सभा आयोजित करण्यात व इतर कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि नियोजन, अंमलबजावणी, तपासणी, आढावा व प्रकल्प अहवाल तयार करणे, सल्लागाराचे शुल्क, तृतीय पक्ष तपासणी लेखा परिक्षक व असे त्याच्या अनुषंगिक इतर खर्च.

**१५. लेखा व लेखापरीक्षण**

(एक) प्रन्यासचे कामकाजाचे सत्य स्वच्छ चित्र सादर करण्याकरिता व्यवस्थापन समिती प्रन्यासनिधि संबंधित खाते पुस्तके, दस्तऐवज व अभिलेख सुयोग्यरित्या सांभाळेल किंवा ठेवेल.

(दोन) प्रन्यासच्या लेख्यांचे किमान वर्ष संपल्यानंतर पात्र लेखापरीक्षकाकडून लेखापरिक्षण करण्यात येईल.

(तीन) प्रन्यासच्या लेखा परीक्षकाची नेमणूक, नियामक परिषदेकडून, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे पॅनेलवर असलेल्या सनदी लेखापालच्या यादी मधून नियामक परिषदेने ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.

(चार) नियामक परिषद लेखापाल यांना काढून टाकू शकते किंवा बदलू शकते.

(पाच) राज्यशासन, विशिष्ट वर्षाचे किंवा अशा काही कालावधीचे लेखापरिक्षण करण्याकारता राज्यशासनाने ठरविलेल्या अटी व शर्तीवर लेखापालाची किंवा लेखापालांची नेमणूक करू शकेल किंवा राज्याचे लेखापाल यांना विनंती करू शकेल.

(सहा) प्रन्यास त्याचे पुढील वित्तीय वर्षाकरिता मंजूर अंदाजपत्रक व वार्षिक योजना त्याच्या मंजूर योजना व प्रकल्पासह, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन व राज्य शासनास त्यांचे संबंधित वेबसाइटवर प्रकाशित करण्याकरिता पाठवील.

(सात) प्रन्यास, तिमाही संपल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत, मंजूर योजना व प्रकल्पांच्या भौतिक व वित्तीय संबंधात तिमाही प्रगती अहवाल तयार करेल व त्याला जिल्हा परिषद व जिल्हा प्रशासनाकडे त्यांच्या संबंधित वेबसाइटवर प्रकाशित करण्याकरिता तात्काळ पाठवेल.

(आठ) प्रत्येक वर्षी वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रन्यास त्या संबंधित वित्तीय वर्षाच्या त्याच्या उपक्रमांवर वार्षिक अहवाल तयार करेल व त्याला नियामक परिषदेसमोर ठेवेल.

(नऊ) वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आत नियामक परिषदेकडून मंजूर वार्षिक अहवाल व मंजूर लेखा अहवाल त्यांची मान्यता मिळाल्यानंतर ताबडतोब जिल्हा परिषद व राज्य शासनाकडे संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्यासाठी पाठवेल.

(दहा) वार्षिक अहवाल मान्यता मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत शासनास सादर करण्यात येईल व प्रन्यासच्या वेबसाईटवर सुद्धा प्रकाशित करण्यात येईल.

(अकरा) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासच्या वार्षिक अहवाल नियामक परिषदेसमोर सादर केला जाईल.

प्रकरण सात

संकिर्ण

१६. कामाची अंमलबजावणी

(एक) कामे किंवा साहित्य, प्रन्यासकडून, राज्य शासनाने अशा खरेदीकरिता विनिर्दिष्ट केलेल्या योग्य पद्धतीचा अवलंब करून खरेदी (संपादन) करू शकेल.

(दोन) प्रन्यासने हाती घेतलेली कामे शक्यतो फक्त शासकीय विभाग यंत्रणा, सार्वजनिक उपक्रम यांचे मार्फत कार्यन्वयीन करेल. ज्या साधारणपणे अशी कामे, संबंधित नियमांना अनुसरून करतात, आणि त्याची अंमलबजावणी करतांना किंवा कंत्राट मंजूर करतांना त्या संस्थेल अशा पद्धती लागू होतात.

(तीन) तांत्रिक मान्यता व कामाची देखरेख संबंधित विभागाला लागू होणाऱ्या प्रशासकीय प्रदान केलेल्या शक्ती अंतर्गत सदर काम करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(चार) जी कामे शासकीय विभाग यंत्रणा किंवा सार्वजनिक उपक्रमामार्फत कार्यन्वयीन करणे शक्य नसेल अशा कामांचे संबंधात व्यवस्थापन समिती हे काम, कोणत्याही इतर सक्षम व सुयोग्य यंत्रणेला, पारदर्शक पद्धतीचा अवलंब करून, नियामक परिषदेची पूर्व परवानगी प्राप्त करून, मंजूर करू शकेल.

(पाच) सर्व यंत्रणा व लाभार्थींना विधिचे हस्तांतरण त्यांचे बँक खात्यात करण्यात येईल.

१७. अनुसूचित क्षेत्रांसाठी विशेष तरतूद

(एक) भारतीय संविधानाच्या अनुसूची ५ व ६ सह वाचल्या जाणाऱ्या अनुच्छेद २४४ ला ध्यानात ठेवून, जे अनुसूचित जाती व जमाती क्षेत्राला व अशा पंचायतीच्या (ज्या अनुसूचित क्षेत्राचा विस्तार आहेत) तरतुदी असलेल्या अधिनियम, १९९६ ला आणि अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत येणारी गावे ती अनुसूचित क्षेत्रात चालणाऱ्या खनन व खनन विषयक कार्यांनी बाधित झाली आहे अशांना ग्रामसभेची मंजुरी खालीलप्रमाणे घेणे आवश्यक आहे :—

(अ) अशा सर्व योजना, कार्यक्रम, प्रकल्प जे प्रधानमंत्री खनीज क्षेत्र कल्याण योजने (PMKKKY) अंतर्गत घ्यावयाचे आहे आणि

(ब) शासनाच्या लागू मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे लाभार्थी चिन्हित करणे.

(दोन) संबंधित गावात घेतलेल्या कार्याचा अहवाल वित्तीय वर्ष पूर्ण झाल्यावर ग्रामसभेला सादर केला जाईल.

१८. **प्रन्यास रद्द करणे.**—राज्य स्तरीय संनियंत्रण समितिच्या शिफारशीवरून प्रन्यास रद्द करण्याचा राज्य शासनाला विवेकाधिकार वापरता येईल. राज्य शासन जो अवधी निश्चित करेल तो पर्यंत प्रन्यास विद्यमान राहील. प्रन्यासाच्या निर्वापणकाळी प्रन्यासाची सर्व मालमत्ता व दायित्व राज्य शासनाकडे हस्तांतरित होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अपूर्व चंद्रा,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

टीप.—सदर अधिसूचना दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या मूळ इंग्रजी अधिसूचनेचे मराठी भाषेतील भाषांतरित प्रारुप आहे. सदरील भाषांतरित अधिसूचनेमधील एखाद्या अर्थाबाबत प्रश्न उद्भभल्यास मूळ इंग्रजी अधिसूचना पहावी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**आश्वासन क्रमांक ४४२**

वाळू/रेती निर्गती: SMATS प्रणाली
लागू करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : गौखनि-१०/१०१४/प्र.क्र.४९८/ख**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :** २६ डिसेंबर, २०१४.

पहा:- शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: गौखनि१०/०५१२/प्र.क्र.३००/ख,
दिनांक. १२.०३.२०१३

<u>प्रस्तावना:-</u>

माननीय सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी क्रमांक १९६२८-१९६२९/२००९ मध्ये दिनांक २७.२.२०१२ रोजी दिलेले आदेश, जनहित याचिका क्रमांक ०१/२०११ आणि जनहित याचिका क्रमांक १०६/२०१२ मधील माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश, वाळू /रेती निर्गती धोरणाच्या अंमलबजावणीतील अडचणी इत्यादी बाबींचा साकल्याने विचार करून, पर्यावरण संतुलन राखत समतोल व स्थायी विकास साधणे, त्यात लोकांना सहभागी करून घेणे, पारंपारिक व्यवसाय करणाऱ्यांच्या हिताचे रक्षण करणे, लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, आणि अवैध उत्खनन व वाहतुकीच्या घटनांना आळा घालून राज्याच्या महसूलात वाढ करणे, या दृष्टीने संदर्भाधीन दिनांक १२.०३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती सुधारित धोरण निश्चित केले आहे.

अवैध उत्खनन व वाहतूकीला आळा घालण्याच्या दृष्टीने उक्त दिनांक १२.०३.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये व्यापक तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून वाळू/रेती वाहतूकीसाठी बारकोडींग असलेले वाहतूक पासेस वापरणे अनिवार्य करण्यात आलेले होते. तथापि, राज्यात अवैध उत्खनन व वाहतूकीची अनेक प्रकरणे निदर्शनास येत आहेत. तसेच सदर शासन निर्णयात वाळू/रेती उत्खनन/ वाहतूक आणि लिलावाबाबत अटी व शर्ती विषयक सविस्तर तरतूदी करण्यात आल्या आहेत. वाळू लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यातील सर्वसाधारण अटी व शर्ती यामध्ये संपूर्ण राज्यात एकवाक्यता रहावी म्हणून, अटी व शर्तींचे निश्चितीकरण करणे आवश्यक झाले आहे. अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुलभ प्रणाली लागू करण्याची आणि लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यातील सर्वसाधारण अटी व शर्तींचे निश्चितीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वाळू/रेती लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यातील सर्वसाधारण अटी व शर्तींचे निश्चितीकरण करण्याचा आणि अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध व्हावा, या प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि राज्याच्या महसूलात वाढ व्हावी यासाठी महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS (Sand Mining Approval and Tracking System) प्रणाली राज्यात सन २०१४-२०१५ पासून लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, त्यासाठी पुढीलप्रमाणे तरतूदी करण्यात येत आहेत:-

१) संपूर्ण राज्यात एकवाक्यता रहावी म्हणून, वाळू लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यातील सर्वसाधारण अटी व शर्तींचे निश्चितीकरण करुन, त्या परिशिष्ट "अ" येथे देण्यात आलेल्या आहेत.

२) वाळू/रेती लिलावाच्या निविदा प्रक्रियेचे वेळी निविदेमध्ये परिशिष्ट "अ" येथील अटी व शर्तींचा सर्वसाधारण अटी व शर्ती म्हणून समावेश करण्यात यावा.

३) उपरिनिर्दिष्ट अटी व शर्तींचे उचितपणे समाविष्ट व काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

२. महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS (Sand Mining Approval and Tracking System) प्रणाली राज्यात सन २०१४-२०१५ पासून अनिवार्य स्वरुपात लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याने आता बारकोड प्रणाली रद्द करुन सदर प्रणाली प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे तरतूदी करण्यात येत आहेत:-

१) उक्त मोबाईल आधारित सुलभ SMATS (Sand Mining Approval and Tracking System) प्रणाली राज्यात सन २०१४-२०१५ पासून अनिवार्य स्वरुपात लागू करण्यात येत असल्याने, संदर्भाधीन दिनांक १२.०३.२०१३ च्या शासननिर्णयाद्वारे वाळू/रेती वाहतूकीसाठी लागू करण्यात आलेली बारकोडींग ही व्यवस्था रद्द करण्यात येत आहे.

२) महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS (Sand Mining Approval and Tracking System) प्रणाली राज्यात सन २०१४-२०१५ पासून अनिवार्य स्वरुपात लागू करण्यात येत असल्याने वाळू/रेती लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यात या प्रणालीचा वापर अनिवार्य राहील, अशी तरतूद करणे बंधनकारक राहील.

३) महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS (Sand Mining Approval and Tracking System) प्रणालीचा वापर करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना (User Manual) परिशिष्ट "ब" येथे देण्यात आल्या आहेत.

४) सदर प्रणालीनुसार लिलावधारकास त्याचे ३ मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील.

५) लिलावधारक निर्धारित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे (SMS) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनूसार त्यास एसएमएसद्वारे टोकन नंबर प्राप्त होईल. असा टोकन नंबर प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकास वाळू/रेतीची वाहतूक करता येणार नाही. टोकन नंबरशिवाय वाहतूक केल्यास ती अवैध ठरुन त्यावर प्रचलित कायदे व धोरणानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

६) वाळू/रेती वाहतूक करणाऱ्या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किंवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतूक अवैध ठरेल.

७) वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून, नियुक्त भरारी पथकाकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तींकडून केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम) ४८ (७) व (८), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ आणि संदर्भाधीन दिनांक १२.०३.२०१३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

८) उक्त प्रणालीचा अवलंब करणे सुलभ व्हावे, याद्दष्टीने सर्वोच्च बोलीद्वारे लिलावधारकास वाळूघाट निर्धारित झाल्यास आणि त्याने त्याबाबतची १/४ रक्कम जमा केल्यास अशा लिलावधारक व संबंधितांना जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रशिक्षण देण्यात येईल.

९) उक्त प्रणाली सन २०१४-२०१५ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांना अनिवार्य करण्यात आली आहे. अवैध उत्खनन अधिक प्रभावीपणे रोखण्याच्या द्दष्टीने उक्त प्रणालीबरोबरच शासनास कोणताही आर्थिक भार पडणार नाही, अशा अतिरिक्त उपाययोजना करण्याची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना मुभा राहील. त्याद्दष्टीने अतिरिक्त उपाययोजनांच्या संदर्भात संबंधित जिल्हाधिकारी लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यात तत्संबंधी अटी व शर्तींचा समावेश करु शकतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१४१२२६१६०८१३१२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santokh Singh Sandhu

Digitally signed by Santokh Singh Sandhu
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Santokh Singh Sandhu
Date: 2014.12.26 16:22:49 +05'30'

(एस. एस. संधू)
प्रधान सचिव (महसूल)

प्रत:-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मंत्रालयीन विभाग.
६) सर्व विभागीय आयुक्त.
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व उपविभागीय अधिकारी.

९) सर्व तहसिलदार.
१०) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
११) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) प्रधान, मुख्य वन संरक्षक, नागपूर.
१३) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१४) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), नागपूर.
१५) सर्व, कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१६) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई४०० ०३२.

## परिशिष्ट "अ"

## वाळू लिलावधारकासाठी सर्वसाधारण निर्देश, अटी व शर्ती

१) वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक बोलीने ई-ऑक्शनद्वारे लिलावाला सुरुवात करण्यात येईल.

२) ई-टेंडर/ ई-ऑक्शनद्वारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किमंतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाचा १० दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

३) ई-टेंडर/ ई-ऑक्शनद्वारे लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणून रुपये ३, ००,०००/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा ऑफसेट प्राईसच्या २०% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम म्हणून रोखीने भरावी लागेल.

परंतु ज्या वाळु गटाची हातची किंमत रूपये १० लाखापेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या २०% रक्कम अनामत रक्कम रोखीने भरावी लागेल.

ज्या लिलावधारकाची अत्युच्च बोली / निविदा स्विकारण्यात येईल, त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या १/४ रकमेत समायोजित करण्यात येईल. ज्या लिलावधारकाची बोली / निविदा स्विकारण्यात येणार नाहीत, त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येतील.

४) लिलावाने घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहिल. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

५) ई-टेंडर/ ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचा राहील व सदर निर्णय लिलावाच्या दिवशीच कळविण्यात येईल.

६) ई-टेंडर/ ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व १/४ रक्कम भरल्यानंतर १५ दिवसात बोलीची उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्वीकारण्याऱ्या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये १००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकनावर (स्टॅम्प पेपर) करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत रेती / वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी वरील अ.क्र.३ प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली ७५% रक्कम सर्वोच्च बोली स्वीकारल्यापासून १५ दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकाने शिल्लक राहीलेली ७५% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात येईल.

७) ज्यावेळी रेती/वाळू (ठेका) लिलाव रद्द करण्यात येईल, अशा वेळेस त्या रेती/वाळू क्षेत्राचा नव्याने ई-टेंडर/ ई-ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किमंतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेर लिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

८) लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढण्याने जमीनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतीना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतिम असतील.

९) विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाटा म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून रेती/वाळू काढता येणार नाही.

१०) कोणत्याही रेल्वेच्या पूलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मिटर्स (२००० फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी- नाल्यांवर पूल आहेत, त्यांच्या स्तंभापासून १०० मीटर्स पर्यत रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

११) जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविणेत यावी.

१२) वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहिल. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

१३) लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू/ रेती काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

लिलावधारकास कोणत्याही वैध कारणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी ,प्रशासकिय यंत्रणांचा विरोध यांमुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा वाळूगटाचा ताबा न दिल्यास, लिलावाची मुदत संपण्यापूर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रक्कम परत करतांना लिलावाची देकाराची रक्कम

लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

१४) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिका-याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू /रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत.

१५) लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था / संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

१६) लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर इत्यादी विहीत केल्याप्रमाणे अदा करावेत.

१७) लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या /मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे.

१८) लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी ३० सप्टेबर रोजीच संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्याने वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे तसेच मानवी वा नैसर्गिक आपतीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

१९) उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही.अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

२०) नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

२१) रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

२२) लिलावधारकाने गावक-याच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

२३) रेती/वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

२४) महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS (Sand Mining Approval and Tracking System) प्रणाली राज्यात सन २०१४-२०१५ पासून अनिवार्य स्वरुपात लागू करण्यात येत असल्याने वाळू/रेती लिलावधारकांना या प्रणालीचा वापर करणे अनिवार्य राहील.

२५) सदर प्रणालीनुसार लिलावधारकास त्याचे ३ मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील.

२६) लिलावधारक निर्धारित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे (SMS) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनूसार त्यास एसएमएसद्वारे टोकन नंबर प्राप्त होईल. असा टोकन नंबर प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकास वाळू/रेतीची वाहतूक करता येणार नाही. टोकन नंबरशिवाय वाहतूक केल्यास ती अवैध ठरुन त्यावर प्रचलित कायदे व धोरणानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

२७) वाळू/रेती वाहतूक करणाऱ्या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किंवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतूक अवैध ठरेल.

२८) वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून, नियुक्त भरारी पथकाकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तींकडून केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम) ४८ (७) व (८), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ आणि संदर्भाधीन दिनांक १२.०३.२०१३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

२९) वाळू/रेती लिलावधारकाने नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे

लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी अव्वल कारकून,मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

३०) गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे , लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबधीत महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन दयावीत.

३१) लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रुपये ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या २० टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी याच्यांकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रु. १० लाखापेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या २०% रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल हि रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पुर्णत: जप्त करण्यात येईल.

३२) लिलावधारकाने नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम (संबधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार तसेच अन्य कायदे/नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

३३) लिलावधारक /परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

३४) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे / बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

३५) सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे अवश्यक आहे.

३६) वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३७) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

३८) अवैध वाळू /रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील ४८(७) व (८) नुसार तसेच इतर लागू होणा-या सर्व कायदे व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

३९) लिलाव मंजूर करणेत आलेल्या वाळू गटांना वाळू उत्खननाकरिता संक्शन पंपाचा वापर करावा लागेल अशा वाळू गटांना भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची व शासनाची परवानगी मिळाल्यानंतर रितसर परवानगी देणेत येईल.

४०) ई-टेंडर/ ई-ऑक्शन मध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती /संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

४१) लिलावधारकांने निवीदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी, शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्या नंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.

४२) दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे जनहितास्तव कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

४३) शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**************

**आश्वासन क्रमांक ७७६,७७७**

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ( MRTP Act, 1966 )

Modification to the existing Regulation 46(3) with Appendix-VI in the Development Control Regulations for Navi-Mumbai Municipal Corporation,1994 under Section 37(2) of the Act.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Urban Development Department
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated 4th February, 2015.

## NOTIFICATION

No. TPB-4312/643/CR-9/1/2014/UD-11:-

Whereas the Government of Maharashtra, in Urban Development Department, vide its Notification No. TPB-4306/564/CR-55/06/UD-11, dated 12th December 2007, under sub-section (2) of Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act,1966 (hereinafter referred to as "the said Act") sanctioned the proposal of modification to the Development Control Regulations 1994, ( hereinafter referred to as "the said Regulations") as submitted under sub-section (1) of the Section 37 of the said Act by Navi Mumbai Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Corporation") for its area by keeping some of the Regulations in abeyance and whereas the said Regulations have become applicable with effect from 27th December 2007;

And whereas, the Government in Urban Development Department, vide its Notification No. TPB/4306/564/CR-55/06/UD-11, dated 21st July 2008, has sanctioned the Regulations which were kept in abeyance vide its earlier Notification dated 12th December 2007, under sub-section (2) of Section 37 of the said Act, and the same have come into force with effect from 23rd July 2008;

And whereas, the said Corporation vide its Resolution No.1267 dated the 11th May 2012, has decided to modify the existing Regulation 46(3) along with Appendix-VI in the Development Control Regulations of the said Corporation regarding reconstruction /redevelopment of building or buildings previously constructed by CIDCO within the limits of the said Corporation and accordingly, in exercise of the powers conferred by sub-section (I) of Section 37 of the said Act, the said Corporation, vide its Notice No. NMMC/TP/SSNR/2400/2012, dated 25th May, 2012 has proposed to modify the existing Regulation 46(3) alongwith Appendix-VI in the Development Control Regulations of the said Corporation (hereinafter referred to as "proposed modification") and invited objections / suggestions in respect thereof from the general public;

And whereas, the said Corporation, vide its letter No. NMMC/TPD/ADTP/5010/2012, dated the 7th September 2012 has submitted the proposed modification in the said Regulations to the State Government for final sanction, after following the procedure as contemplated under Section 37(1) of the said Act.;

And whereas, the Govt. finds it appropriate to sanction with certain changes the proposed modification submitted by the said Corporation regarding redevelopment of dangerous and dilapidated buildings constructed by CIDCO;

Now therefore, after considering the above facts and circumstances and after consulting Director of Town Planning and in exercise of powers conferred by sub-section (2) of Section 37 and of the said Act and of all other powers enabling it in this behalf, the Government hereby—

A. Sanctions the proposed modification to Regulation 46(3) with Appendix-VI of the said Regulations with certain changes as described more specifically in the Schedule appended hereto ;

B. Fixes the date of publication of this Notification in the Official Gazette as the date of coming into force of this modification;

C. Directs the said Corporation that, in the Schedule of Modifications sanctioning the said Regulations, after the last entry, the schedule referred at (A) above shall be added:

This Notice shall also be made available on the Govt. website— www.Maharashtra.gov.in

**By order and the name of the Governor of Maharashtra.**

**( Sanjay Banait )**
**Under Secretary to Government.**

SCHEDULE

( Accompaniment to Notification No.TPB 4312/643/CR-9/1/2014/UD-11, Dated : 04/02/2015)

The existing Regulation 46 (3) & Appendix VI of the said Regulation is substituted by the following new Regulation –

46(3):- **Regulation for reconstruction/redevelopment schemes undertaken by CIDCO/ Owners' Association / Co-operative Housing Society ( CHS ) in respect of the authorised buildings previously constructed by CIDCO but subsequently destroyed by natural calamities or accidental fires or which have collapsed by aging or are demolished or being demolished under a lawful order of the Municipal Commissioner etc. :-**

Reconstruction / Redevelopment, in whole or in part of a building, previously constructed by CIDCO (not being a building wholly occupied by warehousing/ Industrial user and also not being an individually owned structure, which has ceased to exist for the reasons mentioned above) or a building constructed by CIDCO which has been declared dilapidated by the Commissioner NMMC or a buildings constructed by CIDCO which is above 30 years of age, irrespective of its status of dilapidation, (hereinafter collectively referred to as "dangerous/ dilapidated building" ) shall be permissible in accordance with the provisons contained in Appendix-VI of this Regulation.

Appendix- VI

[ Regulation No. 46(3)]

Regulation for Reconstruction / Redevelopment :-

1. For redevelopment of building or buildings in the housing schemes of CIDCO, containing houses or tenements for (i) EWS/LIG and/or (ii) MIG and/or (iii) HIG, the total permissible FSI shall as specified in Table-A below and shall be based on gross plot area :--

Table - A

| Sr. No. | Category | Permissible FSI |
|---|---|---|
| i | Plot area of 1000 sq. m. or more and having access road of minimum 15m width . | 2.50 |
| ii | Plots area of 1000 sq.m.or more and having access road of minimum 9m width. | 2.00 |
| iii | All other plots having access road below 9m width. | 1.80 or Authorisedly consumed FSI + 50% Incentive whichever is less |

Identification of dangerous / dilapidated buildings shall be done by a Committee Under the Chairmanship of the Municipal Commissioner, NMMC, comprising Superintendent Engineer, Public Works Department, Thane; Joint Director, Town Planning, Konkan Division; City Engineer, NMMC; Chief Engineer, CIDCO; Chief Planner, CIDCO and such other members as may be appointed by the Municipal Commissioner, NMMC, having regard to their academic qualifications, technical competence and previous experience in the field of Structural Engineering.

2. Where redevelopment of any dangerous / dilapidated building(s) in a Housing Scheme of CIDCO constructed building is undertaken by the Co-op Housing Society or the occupiers of such building(s) or by the lessees of CIDCO, the Rehabilitation area Entitlement, Incentive FSI and sharing of balance FSI shall be as follows :-

A) **Rehabilitation Area Entitlement :**

i) Under redevelopment of any dangerous / dilapidated building(s) in a Housing Scheme of CIDCO, the entitlement of rehabilitation area for an existing residential tenement shall be equal to sum total of -

(a) a basic entitlement equivalent to the carpet area of the existing tenement plus 35% thereof, subject to a minimum carpet area of 300 sq ft, and

(b) an additional entitlement, governed by the size of the plot under redevelopment, in accordance with the Table - B below :-

Table – B

| Area of the Plot under Redevelopment | Additional Entitlement (As % of the Carpet Area of the Existing Tenement) |
|---|---|
| Upto 4000 sq.m. | Nil |
| Above 4000 sq.m to 2hect | 10% |
| Above 2 hect to 5 hect | 15% |
| Above 5 hect to 10 hect | 20% |

**Explanation** : *The plot under redevelopment, means the total area of the land on which redevelopment of dangerous / dilapidated building (s) is to be undertaken.*

Provided that the maximum entitlement of rehabilitation area shall in no case exceed the maximum limit of carpet area prescribed for MIG category by the Govt., as applicable on the date of approval of the redevelopment project.

Provided further that the entitlement of rehabilitation area, as admissible under this regulation, shall be exclusive of the area of balcony.

ii) Under redevelopment of any dangerous / dilapidated building(s) in a Housing Scheme of CIDCO, the entitlement of rehabilitation area of any

existing authorised commercial unit / amenity unit in the Residential Housing Scheme shall be equal to the carpet area of the existing unit plus 20% thereof.

B) **Incentive FSI** : Incentive FSI admissible against the FSI required for rehabilitation, as calculated above, shall be based on the ratio (hereinafter referred to as Basic Ratio) of Land Rate (LR)in Rs/Sqm. of the plot under redevelopment as per the Annual Schedule of Rates (ASR) and Rate of Construction (RC)* in Rs/Sqm applicable to the area as per the ASR and shall be as given in the Table - C below :-

Table - C

| Basic Ratio (LR/RC) | Incentive (As % of Admissible Rehabilitation Area) |
|---|---|
| Above 3.00 | 70% |
| Above 2.00 and upto 3.00 | 80% |
| Above 1.00 and upto 2.00 | 90% |
| Upto 1.00 | 100% |

**Explanation :-** ** RC is the rate of construction in respect of R.C.C. Construction, as published by the Chief Controlling Revenue Authority & Inspector General of Registration, Maharashtra State in the Annual Schedule of Rates.*

Provided that the above incentive will be subject to the availability of the FSI on the Plot under redevelopment and its distribution by NMMC, with prior approval of CIDCO.

Provided further that in case there are more than one land rate applicable to different parts of the plot under redevelopment , a weighted average of all the applicable rates shall be taken for calculating the Average Land Rate and the Basic Ratio.

Provided further that the Land Rate (LR) and the Rate of Construction (RC) for calculation of the Basic Ratio shall be taken for the year in which the redevelopment project is approved by the authority.

C) **Sharing of the Balance FSI :**

The FSI remaining in balance after providing for the rehabilitation and the incentive components, calculated as per (A) and (B) above respectively, shall be shared between the existing or proposed Co-operative Housing Society/Apartment Ownership Association and CIDCO, in the form of built-up area, as given in Table D below and the share of CIDCO shall be handed over to CIDCO free of cost.

**Table - D**

८. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणाच्या कामामध्ये केबल परिचालक अथवा बहुविध यंत्रणा परिचालक यांच्याद्वारे अडथळा आणला गेल्यास महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ८(१०) अन्वये जवळच्या पोलिस स्थानकातील प्रभारी अधिकारी यांची मदत घेण्याची मुभा तपासणी पथकास असेल. तसेच उक्त अधिनियमातील कलम ८(८) अन्वये अडथळा आणणाऱ्या व्यक्तींना इतर शिक्षेसह रु.२०००/- पर्यंत दंड करण्याची तरतूद उपलब्ध आहे. या तरतुदीचाही वापर आवश्यकता भासल्यास तपासणी पथक प्रमुखांनी करावा. या संदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांनी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा पोलिस अधिक्षकांना / पोलिस आयुक्तांना पत्र पाठवून सहयोग देण्यासंदर्भात विनंती करावी.

९. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणामध्ये अतिरिक्त केबल जोडण्या अथवा कमी केबल जोडण्या आढळल्यास त्यानुसार करमणूक शुल्क वसुलीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी.

१०. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणामध्ये अतिरिक्त जोडण्या आढळल्यास त्या केबल परिचालकास ज्या तारखेस महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ४(२)(ब) नुसार परवाना देण्यात आला आहे, त्या तारखेपासून अनुज्ञेय करमणूक शुल्क व त्यावरील व्याज याची आकारणी जिल्हाधिकारी यांनी करावी. तसेच कलम ५ अन्वये दंडनीय कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलावीत.

११. एखादा स्थानिक केबल परिचालक अथवा बहुविध यंत्रणा परिचालक वारंवार चुकीच्या केबल जोडण्या घोषित करीत असल्यास उक्त अधिनियमातील कलम ९ड नुसार चित्रपटगृह चालकांबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात असलेल्या अधिकाराप्रमाणेच केबल

सेवेसंदर्भातील परिचालकांना "केबल टेलिव्हीजन नेटवर्क रुल, १९९४" नुसार देण्यात आलेला परवाना रद्द करण्याबाबत परवाना देणाऱ्या प्राधिकरणास प्रस्ताव पाठविता येईल.

१२. सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३२४१४४०१८८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vidya Ramappa Hampayya

Digitally signed by Vidya Ramappa Hampayya
DN: CN = Vidya Ramappa Hampayya, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Undersecretary
Date: 2015.03.26 19:30:00 +05'30'

(विद्या हम्पय्या)
शासनाचे अवर सचिव

**प्रत, तातडीच्या आवश्यक कार्यवाहीकरिता**

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी

**प्रत माहितीसाठी**

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रधान सचिव (महसूल), १ ला मजला, मंत्रालय,मुंबई ३२
३) प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४) निवड नस्ती, टी-१ कार्यासन

-----------

**RNI No. MAHBIL /2009/35530**
**Reg. No. MH/MR/South-341/2014-16**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १३ (८)] बुधवार, जून २५, २०१४/आषाढ ४, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ४१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**—महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. ... ... | १-३ |

दिनांक २४ जून २०१४ रोजी माननीय राज्यपाल यांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २५ जून २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९२३ चा १. २०१४ चा महा. अध्या. ४. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमात आणखी सुधारणा करण्याच्या हेतूने, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक १० फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमामध्ये रूपांतर करण्यासाठी, सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २, हे विधेयक दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आले होते ;



एचबी ०३३९-५१

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाची दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजी सत्र समाप्ती झाल्याने राज्य विधानमंडळाकडून उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे पुन्हा अधिवेशन भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, म्हणजेच दिनांक ६ एप्रिल २०१४ नंतर, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे असे वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ५ एप्रिल २०१४ रोजी महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१४, हा प्रख्यापित केला होता ; २०१४ चा महा. अध्या. १०.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १० फेब्रुवारी २०१४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९२३ चा १.

(एक) खंड (अ-अ१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (अ-अ२) " केबल परिचालक " याचा अर्थ, केबल परिचालक म्हणून नोंदणी केलेली आणि तसेच, केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ याच्या तरतुदींनुसार अधिसूचित क्षेत्राकरिता बहुविध यंत्रणा परिचालक म्हणून नोंदणी करण्यात आलेली आणि निवासी किंवा निवासेतर ठिकाणी अभिदात्यांच्या दूरचित्रवाणी संचावरून चित्रपट किंवा चलचित्रपट किंवा चलचित्रपटांची मालिका दाखविण्यासाठी बसविलेल्या डिजिटल दूरचित्रवाणी संकेत संचमांडणीद्वारे पुन्हा प्रक्षेपित करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था, असा आहे ; १९९५ चा ७.

(अ-अ३) " स्थानिक केबल परिचालक " याचा अर्थ, जी व्यक्ती किंवा कंपनी बहुविध यंत्रणा परिचालकाकडून डिजिटल दूरचित्रवाणी संकेत स्वीकारते आणि अभिदात्यांकडून पैसे घेऊन, निवासी किंवा निवासेतर ठिकाणी त्याचे पुन्हा प्रक्षेपण करते, अशी व्यक्ती किंवा कंपनी, असा आहे ; " ;

(दोन) खंड (अ-अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अ-अब) " बहुविध यंत्रणा परिचालक " याचा अर्थ, जो केबल परिचालक एखाद्या प्रसारकाकडून किंवा त्याच्या अधिकृत अभिकरणांकडून कार्यक्रम सेवा घेतो आणि त्याचवेळी अनेक अभिदात्यांना एकतर थेटपणे किंवा एक किंवा अधिक स्थानिक केबल परिचालकांमार्फत ती सेवा मिळण्यासाठी पुन:प्रक्षेपित करतो किंवा आपली स्वत:ची कार्यक्रम सेवा प्रक्षेपित करतो, असा केबल परिचालक, असा आहे ; आणि त्यामध्ये त्यांची अधिकृत वितरण अभिकरणे—मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो—यांचा समावेश होतो ; " ;

(तीन) खंड (क) चा, उप-खंड (पाच) वगळण्यात येईल.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील, विद्यमान पोट-कलम (४) ला त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (ब) पोट-कलम (२) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केबल नेटवर्कमार्फत किंवा त्याला जोडलेल्या केबल दूरचित्रवाणीमार्फत किंवा इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीमार्फत प्रक्षेपण मिळविण्याकरिता चित्रपट किंवा चलचित्रपट किंवा चलचित्रपटांची मालिका दाखविण्यासाठी, कोणत्याही प्रकारच्या अँटेनाच्या किंवा इतर कोणत्याही उपकरण संचाच्या मदतीने रेडिओ

वारंवारता संकेत (फ्रिक्वेंसी सिग्नल) ग्रहण करणाऱ्या प्रत्येक दूरदर्शन संचावर, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क बसवण्यात येईल व बहुविध यंत्रणा परिचालकाकडून ते राज्य शासनाकडे भरण्यात येईल.

(क) स्थानिक केबल परिचालक, जोडणीधारकांकडून करमणूक शुल्क वसूल करील आणि जेथे बहुविध यंत्रणा परिचालकाची नोंदणी केली असेल तेथे ते शुल्क, वेळेत, बहुविध यंत्रणा परिचालकाला देईल किंवा जेथे बहुविध यंत्रणा परिचालकाची नोंदणी केलेली नसेल तेथे ते शुल्क, थेट राज्य शासनाकडे भरण्यात येईल ; तथापि, प्रिॲक्टिव्हेटेड व ॲक्टिव्हेटेड सेट टॉप बॉक्सद्वारा रेडिओ वारंवारता संकेत (फ्रिक्वेंसी सिग्नल) ग्रहण करणाऱ्या दूरदर्शन संचावर करमणूक शुल्क, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने बसवण्यात येईल.

(ड) खंड (ब) आणि (क) खाली देय असणारे करमणूक शुल्क बसविणे, त्याची वसुली करणे व ते भरणे यांसाठी बहुविध यंत्रणा परिचालक किंवा केबल परिचालक, विहित करण्यात येईल, अशी प्रतिभूती ठेव आणि अशी माहिती, जिल्हाधिकाऱ्याला देईल.".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील, " तो प्रत्येक अपराधाबद्दल कमीत कमी पाचशे रुपये आणि जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यंतच्या दंडाच्या " या मजकुराऐवजी " तो प्रत्येक अपराधासाठी कमीत कमी पन्नास हजार रुपये किंवा महसुलाच्या हानीच्या दहापट, यांपैकी जे जास्त असेल अशा दंडाच्या, " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ५ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ७ ची सुधारणा.

" (कअ) कलम ३ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ड) अन्वये जिल्हाधिकाऱ्याला द्यावयाची प्रतिभूती ठेवीची रक्कम आणि ज्या नमुन्यात माहिती द्यावयाची तो नमुना, विहित करणे ; ".

२०१४ चा महा. अध्या. १०. ६. (१) महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे उक्त अध्यादेशाचे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. ७. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक वा इष्ट वाटेल असा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल असा निदेश **राजपत्रात**, प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येईल : १९२३ चा १.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

आश्वासन क्रमांक ८०४

क्र.कावि/क.कर/31/2016
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
दिनांक :- 9.1.2016

प्रति

मा. उपआयुक्त,(क.शू.)
अमरावती विभाग,
अमरावती.

विषय :- विधानसभा हिवाळी 2014 अधिवेशन आश्वासन पूर्तताबाबत

संदर्भ :- आपले ई मेल संदेश दिनांक 9.1.2016

*****

महोदय,

राज्यामध्ये विनापरवानगी खाजगी वाहिन्यांबाबत विधानसभा हिवाळी 2014 अधिवेशन आश्वासनपूर्तीबाबत अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | आश्वासन क्र | विषय | आश्वासन | आश्वासन पूर्तीबाबत केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|
| 1 | 804 | राज्यामध्ये विनापरवानगी खाजगी केबल वाहिन्या चालविल्या जात असणेबाबत | अमरावती शहरातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करमणूक कर अधिकारी, एसडीओ, किंवा तहसिलदार यापैकी जिल्हाधिकारी ज्यांची नेमणूक करतील अशा अधिक-यांचे स्कॉड नेमण्यात येईल. | खाजगी दुरदर्शन वाहिन्यांची संनियंत्रण समिती जिल्हादंडाधिकारी य.चे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीकडे प्राप्त तक्रारींची चौकशी पोलीस अधिक्षक, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी यांचेकडून करण्यात येते. तसेच तहसिल स्तरावर उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी, ना तह यांचे पथकाद्वारे तक्रारींची पडताळणी करण्यात येते.<br>प्राप्त तक्रारींवर समितीच्या बैठकी घेण्यात येऊन तक्रारीची शहानिशा करण्यात येऊन वाहिनी दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल. |

आपला विश्वासू,

निवासी उपजिल्हाधिकारी,
बुलडाणा.

**राज्यात प्रत्येक जिल्ह्यात केबल जोडण्यांच्या संदर्भात विनाक्रम (रॅण्डम) सर्वेक्षण करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः ईएनटी-२०१५/प्र.क्र.६७/टी-१**
पहिला मजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२
तारीख: २६ मार्च, २०१५.

शासन परिपत्रक

महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ३(१)(क) अनुसार विहित दराने केबल जोडण्यांवर करमणूक शुल्क लागू करण्यात येतो. बहुविध यंत्रणा परिचालक व केबल परिचालक यांनी घोषित केलेल्या केबल जोडण्यांच्या वस्तुनिष्ठ संख्येबाबत विश्वासार्हतेने विधान करता येत नाही. ही वस्तुस्थिती असल्याने पर्यायाने करमणूक शुल्कापोटी अनुज्ञेय महसूलाची हानी होत असण्याची दाट शक्यता वाटते. त्यामुळे महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ८ अन्वये कोणत्याही करमणुकीच्या ठिकाणी तपासणी करण्याचा राज्यशासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन प्रत्येक जिल्ह्यात केबल जोडण्यांचे नियमित विनाक्रम सर्वेक्षण करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येत आहेत.

१. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व जिल्ह्यातील बहुविध यंत्रणा परिचालक (मल्टीसिस्टिम ऑपरेटर) आणि स्थानिक केबल परिचालक (लोकल केबल ऑपरेटर) यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण अशा परिचालकांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात केबल जोडण्यांच्या संख्येबाबत दाखल केलेले संयुक्त शपथपत्रामध्ये तसेच स्थानिक केबल परिचालक यांनी स्वत: केलेल्या शपथपत्राद्वारे घोषित केबल जोडण्यांचे संख्येनुसार करावे. उदाहरणार्थ, एक हजार किंवा त्यापेक्षा कमी केबल जोडण्यांची संख्या असलेले केबल परिचालक यांचा एक वर्ग करता येईल. त्याचप्रमाणे एक हजार ते दोन हजार इतक्या केबल जोडण्या असलेला दुसरा वर्ग करता येईल. याप्रमाणे केबल आयोजकांची तसेच बहुविध यंत्रणा परिचालक यांची जिल्हानिहाय वर्गीकृत माहिती प्रथमत: विभागीय आयुक्त स्तरावर संकलित करण्यात यावी.

२. विभागीय आयुक्त स्तरावर वरीलप्रमाणे संकलित माहितीच्या अद्यावतीकरणाची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत संबंधित जिल्ह्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी उपायुक्त, करमणूक शुल्क विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, यांना प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. वरीलप्रमाणे जिल्हानिहाय वर्गीकृत माहिती संकलित झाल्यानंतर विभागीय आयुक्त स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी आयुक्त कार्यालयाच्या अखत्यारीतील प्रत्येक जिल्ह्यातील तीन केबल परिचालक व एक बहुविध यंत्रणा परिचालक यांची घोषित केलेल्या केबल जोडण्यांचे विनाक्रम सर्वेक्षण करण्याकरिता निवड करण्यासाठी सोडत घेण्यात यावी.

४. या सोडतीबाबत दिनांक व वेळ विभागीय आयुक्त कार्यालयाने स्थानिक वृत्तपत्रामध्ये अथवा महसूल विभागाच्या अधिकृत वेबसाईटवरुन प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. तसेच याची माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाच्या व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचना फलकावरही उपलब्ध करुन देण्यात यावी.

५. विभागीय आयुक्त कार्यालयात विहित दिनांकास केबल चालक व बहुविध यंत्रणा परिचालक यांच्या उपस्थितीत प्रत्येक जिल्ह्यातील तीन केबल परिचालक व एक बहुविध यंत्रणा परिचालक यांची विनाक्रम सर्वेक्षणासाठी निवड सोडत काढून करण्यात यावी.

६. वरीलप्रमाणे केबल जोडण्यांच्या विनाक्रम सर्वेक्षणासाठी सोडतीच्या माध्यमातून जिल्हानिहाय निवडण्यात आलेल्या केबल चालक व बहुविध यंत्रणा परिचालक यांनी दिलेल्या केबल जोडण्यांचे क्षेत्रिय पातळीवर सर्वेक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारीपेक्षा कमी नाही अशा दर्जाच्या अधिकाऱ्याच्या निरीक्षणाखाली तहसिलदार, करमणूक शुल्क निरीक्षक, लिपीक यांचे एक किंवा अनेक तपासणी पथक आवश्यकतेनुसार तयार करण्यात यावेत.

७. सदर तपासणी पथकांनी सोडत झाल्यापासून पुढील पंधरा दिवसामध्ये क्षेत्रीय पातळीवर केबल जोडण्यांचे सर्वेक्षण पूर्ण करुन त्याची माहिती व्यक्तीश: संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना सादर करावी.

८. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणाच्या कामामध्ये केबल परिचालक अथवा बहुविध यंत्रणा परिचालक यांच्याद्वारे अडथळा आणला गेल्यास महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ८(१०) अन्वये जवळच्या पोलिस स्थानकातील प्रभारी अधिकारी यांची मदत घेण्याची मुभा तपासणी पथकास असेल. तसेच उक्त अधिनियमातील कलम ८(८) अन्वये अडथळा आणणाऱ्या व्यक्तींना इतर शिक्षेसह रु.२०००/- पर्यंत दंड करण्याची तरतूद उपलब्ध आहे. या तरतुदीचाही वापर आवश्यकता भासल्यास तपासणी पथक प्रमुखांनी करावा. या संदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांनी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा पोलिस अधिक्षकांना / पोलिस आयुक्तांना पत्र पाठवून सहयोग देण्यासंदर्भात विमंती करावी.

९. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणामध्ये अतिरिक्त केबल जोडण्या अथवा कमी केबल जोडण्या आढळल्यास त्यानुसार करमणूक शुल्क वसुलीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी.

१०. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणामध्ये अतिरिक्त जोडण्या आढळल्यास त्या केबल परिचालकास ज्या तारखेस महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ४(२)(ब) नुसार परवाना देण्यात आला आहे, त्या तारखेपासून अनुज्ञेय करमणूक शुल्क व त्यावरील व्याज याची आकारणी जिल्हाधिकारी यांनी करावी. तसेच कलम ५ अन्वये दंडनीय कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलावीत.

११. एखादा स्थानिक केबल परिचालक अथवा बहुविध यंत्रणा परिचालक वारंवार चुकीच्या केबल जोडण्या घोषित करीत असल्यास उक्त अधिनियमातील कलम ९ड नुसार चित्रपटगृह चालकांबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात असलेल्या अधिकाराप्रमाणेच केबल

सेवेसंदर्भातील परिचालकांना "केबल टेलिव्हीजन नेटवर्क रुल, १९९४" नुसार देण्यात आलेला परवाना रद्द करण्याबाबत परवाना देणाऱ्या प्राधिकरणास प्रस्ताव पाठविता येईल.

१२. सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३२४१४४०१८८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vidya Ramappa Hampayya

Digitally signed by Vidya Ramappa Hampayya
DN: CN = Vidya Ramappa Hampayya, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Undersecretary
Date: 2015.03.26 19:30:00 +05'30'

(विद्या हम्पय्या)
शासनाचे अवर सचिव

**प्रत, तातडीच्या आवश्यक कार्यवाहीकरिता**

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी

**प्रत माहितीसाठी**

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रधान सचिव (महसूल), १ ला मजला, मंत्रालय,मुंबई ३२
३) प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४) निवड नस्ती, टी-१ कार्यासन

----------

**आश्वासन क्रमांक ८०५**

**राज्यात प्रत्येक जिल्ह्यात केबल जोडण्यांच्या संदर्भात विनाक्रम (रॅण्डम) सर्वेक्षण करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः ईएनटी-२०१५/प्र.क्र.६७/टी-१**
पहिला मजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२
तारीख: २६ मार्च, २०१५.

<u>शासन परिपत्रक</u>

महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ३(१)(क) अनुसार विहित दराने केबल जोडण्यांवर करमणूक शुल्क लागू करण्यात येतो. बहुविध यंत्रणा परिचालक व केबल परिचालक यांनी घोषित केलेल्या केबल जोडण्यांच्या वस्तुनिष्ठ संख्येबाबत विश्वासार्हतेने विधान करता येत नाही. ही वस्तुस्थिती असल्याने पर्यायाने करमणूक शुल्कापोटी अनुज्ञेय महसूलाची हानी होत असण्याची दाट शक्यता वाटते. त्यामुळे महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ८ अन्वये कोणत्याही करमणुकीच्या ठिकाणी तपासणी करण्याचा राज्यशासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन प्रत्येक जिल्ह्यात केबल जोडण्यांचे नियमित विनाक्रम सर्वेक्षण करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येत आहेत.

१. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व जिल्ह्यातील बहुविध यंत्रणा परिचालक (मल्टीसिस्टिम ऑपरेटर) आणि स्थानिक केबल परिचालक (लोकल केबल ऑपरेटर) यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण अशा परिचालकांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात केबल जोडण्यांच्या संख्येबाबत दाखल केलेले संयुक्त शपथपत्रामध्ये तसेच स्थानिक केबल परिचालक यांनी स्वत: केलेल्या शपथपत्राद्वारे घोषित केबल जोडण्यांचे संख्येनुसार करावे. उदाहरणार्थ, एक हजार किंवा त्यापेक्षा कमी केबल जोडण्यांची संख्या असलेले केबल परिचालक यांचा एक वर्ग करता येईल. त्याचप्रमाणे एक हजार ते दोन हजार इतक्या केबल जोडण्या असलेला दुसरा वर्ग करता येईल. याप्रमाणे केबल आयोजकांची तसेच बहुविध यंत्रणा परिचालक यांची जिल्हानिहाय वर्गीकृत माहिती प्रथमत: विभागीय आयुक्त स्तरावर संकलित करण्यात यावी.

२. विभागीय आयुक्त स्तरावर वरीलप्रमाणे संकलित माहितीच्या अद्यावतीकरणाची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत संबंधित जिल्ह्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी उपायुक्त, करमणूक शुल्क विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, यांना प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. वरीलप्रमाणे जिल्हानिहाय वर्गीकृत माहिती संकलित झाल्यानंतर विभागीय आयुक्त स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी आयुक्त कार्यालयाच्या अखत्यारीतील प्रत्येक जिल्ह्यातील तीन केबल परिचालक व एक बहुविध यंत्रणा परिचालक यांची घोषित केलेल्या केबल जोडण्यांचे विनाक्रम सर्वेक्षण करण्याकरिता निवड करण्यासाठी सोडत घेण्यात यावी.

४. या सोडतीबाबत दिनांक व वेळ विभागीय आयुक्त कार्यालयाने स्थानिक वृत्तपत्रामध्ये अथवा महसूल विभागाच्या अधिकृत वेबसाईटवरुन प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. तसेच याची माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाच्या व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचना फलकावरही उपलब्ध करुन देण्यात यावी.

५. विभागीय आयुक्त कार्यालयात विहित दिनांकास केबल चालक व बहुविध यंत्रणा परिचालक यांच्या उपस्थितीत प्रत्येक जिल्ह्यातील तीन केबल परिचालक व एक बहुविध यंत्रणा परिचालक यांची विनाक्रम सर्वेक्षणासाठी निवड सोडत काढून करण्यात यावी.

६. वरीलप्रमाणे केबल जोडण्यांच्या विनाक्रम सर्वेक्षणासाठी सोडतीच्या माध्यमातून जिल्हानिहाय निवडण्यात आलेल्या केबल चालक व बहुविध यंत्रणा परिचालक यांनी दिलेल्या केबल जोडण्यांचे क्षेत्रिय पातळीवर सर्वेक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारीपेक्षा कमी नाही अशा दर्जाच्या अधिकाऱ्याच्या निरीक्षणाखाली तहसिलदार, करमणूक शुल्क निरीक्षक, लिपीक यांचे एक किंवा अनेक तपासणी पथक आवश्यकतेनुसार तयार करण्यात यावेत.

७. सदर तपासणी पथकांनी सोडत झाल्यापासून पुढील पंधरा दिवसामध्ये क्षेत्रीय पातळीवर केबल जोडण्यांचे सर्वेक्षण पूर्ण करुन त्याची माहिती व्यक्तीशः संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना सादर करावी.

८. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणाच्या कामामध्ये केबल परिचालक अथवा बहुविध यंत्रणा परिचालक यांच्याद्वारे अडथळा आणला गेल्यास महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ८(१०) अन्वये जवळच्या पोलिस स्थानकातील प्रभारी अधिकारी यांची मदत घेण्याची मुभा तपासणी पथकास असेल. तसेच उक्त अधिनियमातील कलम ८(८) अन्वये अडथळा आणणाऱ्या व्यक्तींना इतर शिक्षेसह रु.२०००/- पर्यंत दंड करण्याची तरतूद उपलब्ध आहे. या तरतुदीचाही वापर आवश्यकता भासल्यास तपासणी पथक प्रमुखांनी करावा. या संदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांनी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा पोलिस अधिक्षकांना / पोलिस आयुक्तांना पत्र पाठवून सहयोग देण्यासंदर्भात विनंती करावी.

९. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणामध्ये अतिरिक्त केबल जोडण्या अथवा कमी केबल जोडण्या आढळल्यास त्यानुसार करमणूक शुल्क वसुलीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी.

१०. केबल जोडण्यांच्या सर्वेक्षणामध्ये अतिरिक्त जोडण्या आढळल्यास त्या केबल परिचालकास ज्या तारखेस महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ४(२)(ब) नुसार परवाना देण्यात आला आहे, त्या तारखेपासून अनुज्ञेय करमणूक शुल्क व त्यावरील व्याज याची आकारणी जिल्हाधिकारी यांनी करावी. तसेच कलम ५ अन्वये दंडनीय कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलावीत.

११. एखादा स्थानिक केबल परिचालक अथवा बहुविध यंत्रणा परिचालक वारंवार चुकीच्या केबल जोडण्या घोषित करीत असल्यास उक्त अधिनियमातील कलम ९ड नुसार चित्रपटगृह चालकांबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात असलेल्या अधिकाराप्रमाणेच केबल

सेवेसंदर्भातील परिचालकांना "केबल टेलिव्हीजन नेटवर्क रुल, १९९४" नुसार देण्यात आलेला परवाना रद्द करण्याबाबत परवाना देणाऱ्या प्राधिकरणास प्रस्ताव पाठविता येईल.

१२. सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३२४१४४०१८८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vidya Ramappa Hampayya

Digitally signed by Vidya Ramappa Hampayya
DN: CN = Vidya Ramappa Hampayya, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Undersecretary
Date: 2015.03.26 19:30:00 +05'30'

(विद्या हम्पय्या)
शासनाचे अवर सचिव

**प्रत, तातडीच्या आवश्यक कार्यवाहीकरिता**

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी

**प्रत माहितीसाठी**

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रधान सचिव (महसूल), १ ला मजला, मंत्रालय,मुंबई ३२
३) प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४) निवड नस्ती, टी-१ कार्यासन

-----------

RNI No. MAHBIL /2009/35530

Reg. No. MH/MR/South-341/2014-16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १३ (८)] बुधवार, जून २५, २०१४/आषाढ ४, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**—महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. ... ... पृष्ठे १–३

दिनांक २४ जून २०१४ रोजी माननीय राज्यपाल यांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**<br>
प्रधान सचिव,<br>
महाराष्ट्र शासन,<br>
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २५ जून २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९२३ चा १. २०१४ चा महा. अध्या. ४. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमात आणखी सुधारणा करण्याच्या हेतूने, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक १० फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमामध्ये रूपांतर करण्यासाठी, सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २, हे विधेयक दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाची दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजी सत्र समाप्ती झाल्याने राज्य विधानमंडळाकडून उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे पुन्हा अधिवेशन भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, म्हणजेच दिनांक ६ एप्रिल २०१४ नंतर, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे असे वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिति अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ५ एप्रिल २०१४ रोजी महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१४, हा प्रख्यापित केला होता ; (२०१४ चा महा. अध्या. १०.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १० फेब्रुवारी २०१४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— (१९२३ चा १.)

(एक) खंड (अ-अ१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (अ-अ२) " केबल परिचालक " याचा अर्थ, केबल परिचालक म्हणून नोंदणी केलेली आणि तसेच, केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ याच्या तरतुदींनुसार अधिसूचित क्षेत्राकरिता बहुविध यंत्रणा परिचालक म्हणून नोंदणी करण्यात आलेली आणि निवासी किंवा निवासेतर ठिकाणी अभिदात्यांच्या दूरचित्रवाणी संचावरून चित्रपट किंवा चलचित्रपट किंवा चलचित्रपटांची मालिका दाखविण्यासाठी बसविलेल्या डिजिटल दूरचित्रवाणी संकेत संचमांडणीद्वारे पुन्हा प्रक्षेपित करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था, असा आहे ; (१९९५ चा ७.)

(अ-अ३) " स्थानिक केबल परिचालक " याचा अर्थ, जी व्यक्ती किंवा कंपनी बहुविध यंत्रणा परिचालकाकडून डिजिटल दूरचित्रवाणी संकेत स्वीकारते आणि अभिदात्यांकडून पैसे घेऊन, निवासी किंवा निवासेतर ठिकाणी त्याचे पुन्हा प्रक्षेपण करते, अशी व्यक्ती किंवा कंपनी, असा आहे ; " ;

(दोन) खंड (अ-अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अ-अब) " बहुविध यंत्रणा परिचालक " याचा अर्थ, जो केबल परिचालक एखाद्या प्रसारकाकडून किंवा त्याच्या अधिकृत अभिकरणांकडून कार्यक्रम सेवा घेतो आणि त्याचवेळी अनेक अभिदात्यांना एकतर थेटपणे किंवा एक किंवा अधिक स्थानिक केबल परिचालकांमार्फत ती सेवा मिळण्यासाठी पुन:प्रक्षेपित करतो किंवा आपली स्वत:ची कार्यक्रम सेवा प्रक्षेपित करतो, असा केबल परिचालक, असा आहे ; आणि त्यामध्ये त्यांची अधिकृत वितरण अभिकरणे—मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो—यांचा समावेश होतो ; " ;

(तीन) खंड (क) चा, उप-खंड (पाच) वगळण्यात येईल.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील, विद्यमान पोट-कलम (४) ला त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (ब) पोट-कलम (२) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केबल नेटवर्कमार्फत किंवा त्याला जोडलेल्या केबल दूरचित्रवाणीमार्फत किंवा इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीमार्फत प्रक्षेपण मिळविण्याकरिता चित्रपट किंवा चलचित्रपट किंवा चलचित्रपटांची मालिका दाखविण्यासाठी, कोणत्याही प्रकारच्या अँटेनाच्या किंवा इतर कोणत्याही उपकरण संचाच्या मदतीने रेडिओ

वारंवारता संकेत (फ्रिक्वेंसी सिग्नल) ग्रहण करणाऱ्या प्रत्येक दूरदर्शन संचावर, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क बसवण्यात येईल व बहुविध यंत्रणा परिचालकाकडून ते राज्य शासनाकडे भरण्यात येईल.

(क) स्थानिक केबल परिचालक, जोडणीधारकांकडून करमणूक शुल्क वसूल करील आणि जेथे बहुविध यंत्रणा परिचालकाची नोंदणी केली असेल तेथे ते शुल्क, वेळेत, बहुविध यंत्रणा परिचालकाला देईल किंवा जेथे बहुविध यंत्रणा परिचालकाची नोंदणी केलेली नसेल तेथे ते शुल्क, थेट राज्य शासनाकडे भरण्यात येईल ; तथापि, प्रिॲक्टिव्हेटेड व ॲक्टिव्हेटेड सेट टॉप बॉक्सद्वारा रेडिओ वारंवारता संकेत (फ्रिक्वेंसी सिग्नल) ग्रहण करणाऱ्या दूरदर्शन संचावर करमणूक शुल्क, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने बसवण्यात येईल.

(ड) खंड (ब) आणि (क) खाली देय असणारे करमणूक शुल्क बसविणे, त्याची वसुली करणे व ते भरणे यांसाठी बहुविध यंत्रणा परिचालक किंवा केबल परिचालक, विहित करण्यात येईल, अशी प्रतिभूती ठेव आणि अशी माहिती, जिल्हाधिकाऱ्याला देईल.".

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील, " तो प्रत्येक अपराधाबद्दल कमीत कमी पाचशे रुपये आणि जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यंतच्या दंडाच्या " या मजकुराऐवजी " तो प्रत्येक अपराधासाठी कमीत कमी पन्नास हजार रुपये किंवा महसुलाच्या हानीच्या दहापट, यांपैकी जे जास्त असेल अशा दंडाच्या, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (कअ) कलम ३ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ड) अन्वये जिल्हाधिकाऱ्याला द्यावयाची प्रतिभूती ठेवीची रक्कम आणि ज्या नमुन्यात माहिती द्यावयाची तो नमुना, विहित करणे ; ".

२०१४ चा महा. अध्या. १०.

सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती.

**६.** (१) महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे उक्त अध्यादेशाचे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

१९२३ चा १.

**७.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक वा इष्ट वाटेल असा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल असा निदेश **राजपत्रात**, प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३१(२)] सोमवार, ऑगस्ट १७, २०१५/श्रावण २६, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४६**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**—महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम ... ... ... पृष्ठे १ – ३

दिनांक १४ ऑगस्ट २०१५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नि. ज. जमादार,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १७ ऑगस्ट २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९२३ चा १. २०१५ चा महा. अध्या. ११. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १२ जून २०१५ रोजी, महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, २०१५ प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १२ जून २०१५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ च्या पोट-कलम (३) मध्ये, "आणि कलम ५ च्या" हा मजकूर वगळण्यात येईल. १९२३ चा १.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ब ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ब च्या पोट-कलम (४) मध्ये, "आणि अशा रीतीने निर्धारित केलेल्या" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "असा निदेशसुद्धा, राज्य शासनास देता येईल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी "आणि, मालक अशा रीतीने निर्धारित केलेल्या कराच्या रकमेशिवाय, कलम ५ नुसार असलेल्या शास्तीची रक्कम देण्यासही पात्र असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ५ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ५ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

कलम ४ चे अनुपालन न केल्याबद्दल शिक्षा.

"५. (१) जर कोणत्याही व्यक्तीस करमणुकीच्या कोणत्याही स्थानात प्रवेश देण्यात आला असेल व असा प्रवेश देताना कलम ४ च्या तरतुदींचे अनुपालन करण्यात आले नसेल तर, ज्या करमणुकीच्या स्थानात अशा व्यक्तीस प्रवेश देण्यात आला असेल त्या करमणुकीच्या स्थानाचा मालक, जे करमणूक शुल्क भरावयास पाहिजे होते त्या शुल्काबरोबर आणखी, अशा प्रत्येक अनुपालन न केल्याबद्दल पन्नास हजार रुपये किंवा अशा करमणूक शुल्काच्या दहापट इतकी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल इतकी रक्कम शास्ती म्हणून जिल्हाधिकाऱ्याला देण्यास पात्र असेल :

परंतु, जिल्हाधिकारी, मालकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, अशी शास्ती देण्यासाठी अशा मालकाला आवश्यक करणारा असा कोणताही आदेश काढणार नाही.

(२) जिल्हाधिकाऱ्याने या कलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश कलम १०अ अन्वये अपील करण्यायोग्य असेल.".

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १०अ च्या पोट-कलम (१) मध्ये, "कलम ४ब अन्वये शास्तीसह किंवा शास्ती न करता आकारणी करणाऱ्या" या मजकुरानंतर "किंवा कलम ५ खालील" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

६. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेले निदेश देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येईल.

२०१५ चा महा. अध्या. ११.

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

**७.** (१) महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, २०१५ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**आश्वासन क्रमांक १२०**

क्र पोमसं/२०/१९५/कम्युनिटी पोलीसींग /३७६/२०१७ मुंबई दि. २८/१२/२०

विषय- राज्यातील विविध पोलीस घटकांत Community Policing योजना राबविणेबाबत

परिपत्रक -

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रगत व गतिमान महाराष्ट्राच्या संकल्पनेस (Transform Maharashtra) अनुसरुन मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून पुढील २ वर्षात विविध खात्यांना महत्वाच्या विषयांच्या उद्दीष्टये ठरवून देण्यात आली असून, सदर विषयाच्या अनुषंगाने पोलीस विभागासाठी, खालील नमूद Community Policing योजना राबविणेबाबत उद्दीष्टयपुर्ती ठरवून देण्यात आली आहे.

**Community Policing ची प्रस्तावना-**

अलिकडील काळात देश व जागतीक पातळीवर वेगाने होत असलेल्या शैक्षणीक, औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमुळे सर्व सामान्य जनतेपासून उच्चभ्रू समाजापर्यंत सर्वत्र बदलाचे वारे वेगाने वाहत आहे. या सकारात्मक बदला बरोबरच गुन्हेगारीचे स्वरूप दहशतवादी घातपाती कृत्ये यामुळे नागरीकांच्या जिवीताच्या, मालमत्तेच्या सुरक्षेचा धोका निर्माण झाला आहे. सामाजिक तंटे व दोन जाती / धर्मातील तेढ कमी करण्यासाठी तसेच शहरी / ग्रामीण भागात जातीय सलोखा निर्माण करुन जातीय ऐक्य वाढीस लागण्याच्या दृष्टीने कम्युनिटी पोलीसींग अत्यंत परिणामकारक व आवश्यक ठरु शकते. आधुनिक काळात पारंपारीक पध्दत बदलून सर्वांच्या सुरक्षेसाठी पोलीसांना नागरीकांची साथ मिळणे हि अत्यंत आवश्यक झाली असून त्यातून Community Policing ची संकल्पना प्रगतीशील राष्ट्रांमध्ये व महाराष्ट्रामध्ये वापरण्यास सुरूवात झाली आहे. पूर्वीपासूनच मोहल्ला कमिटी, शांतता समिती जातीय सलोखा इ. योजना अस्तित्वात आहेत.

**Community Policing ची उद्दीष्टये:-**

१. जाती धर्मातील सलोखा वाढविणे , सामाजिक विव्देष तणाव कमी करणे.
२. गुन्हेगारी प्रतिबंध , नियंत्रण व गुन्हे उघडकीस आणण्यास पोलीस जनता सहकार्य.
३. कार्यक्षेत्रातील नागरीकांचा आपआपसातील खटले, दावे, वादविवाद समुपदेशनाव्दारे वाद मिटवून पोलीस व न्यायालयाच्या कामांचा ताण कमी करणे, इतर स्थानिक तात्कालिक वाद न्यायपंचायतीप्रमाणे मिटवणे.
४. समाजातील बदलते वैचारीक, सामाजिक प्रवाह व त्यांचा समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम याचा अभ्यास करणे.
५. गुन्हेगारी , सुरक्षा , कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने जनतेच्या माध्यमातून गुप्तचर यंत्रणेचे जाळे तयार करणे
६. समाजातील अपप्रवृत्ती, गुन्हेगारी व घातक प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी Community Policing (C.. च्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन मार्गदर्शन, समुपदेशन, प्रसिध्द माध्यमे तसेच सोशल मेडीयाच्या माध्यमातून सुधारण्याचा प्रयत्न करणे.
७. संबंधीत कार्यक्षेत्रातील नागरीकांमध्ये सुसंवाद, बंधुभाव व सांघीक व समतेचे वातावरण निर्माण होण्यासाठी चांगले उपक्रम, कार्यक्रमांना चांगल्या व्यक्तींना , संघटनांना आदर्श कामासाठी प्रोत्साहन देणे (उदा. ... कार्यशाळा, मॅरेथॉन, विविध धर्मांचे सण एकत्रित साजरे करणे, सांस्कृतिक व क्रिडा इ. करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणे इ.)
८. फेरीवाले, चौकीदार, पत्रीवाले, सुरक्षा रक्षक, वाहनतळ संभाळणारे, रक्षा चालक / टॅक्सी चालक, ... चालक/वाहक, द्वारपाल, दुकानदार, दलाल, कार खरेदी विक्री करणारे दलाल, नेट कॅफे चालक, पी.सी.ओ. चालविणारे, अथिती गृह इ. सहकार्याने संशयी कारवाया करणाऱ्या लोकांना शोधण्यासाठी ... कम्युनिटींग कक्षांतर्गत पोलीसांचे डोळे आणि कान असे कार्यक्रम राबविणे .
९. पिडीत महिला / मुली यांच्या सहाय्यतेसाठी पोलीस कम्युनिटींग कक्षांतर्गत महिलांसाठी विशेष कक्ष स्थापन करुन पिडीत महिलांना / मुलींना वेळीच मदत करणे, त्यांना कायद्याच्या सुविधा उपलब्ध करुन देणे.

**Community Policing cell कार्यान्वयन:-**

राज्यातील विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस कम्युनिटींग कक्षाची स्थापना करुन त्याचे खालील प्रमाणे कार्यान्वयन करण्यात यावे:-

| घटक | पोलीस आयुक्त कार्यालयाचे ठिकाणी | पोलीस अधीक्षक कार्यालयाचे ठिकाणी |
|---|---|---|
| प्रभारी अधिकारी | सहायक पोलीस आयुक्त | पोलीस निरीक्षक |
| नियंत्रण अधिकारी | पोलीस उपायुक्त (विशेष) (शाखा) | पोलीस उप अधीक्षक (गृह) / अपर पोलीस अधीक्षक |

**Community Policing cell मधील अधिकाऱ्यांची कर्तव्ये:-**

Community Policing cell च्या प्रभारी अधिका-यांनी , नियंत्रण अधिका-यांचे मार्गदर्शनाखाली समाजातील जातीय सलोखा राखण्यासाठी व तो वृध्दींगत करण्यासाठी मोहल्ला समिती / झोपडपट्टी पंचायत यांच्या वेळोवेळी व नियमितपणे बैठका घ्याव्यात तसेच समाजातील ऐक्य व एकोपा वाढविण्यासाठी विविध जातीधर्मातील लोकांमध्ये मॅरेथॉन स्पर्धा / सांस्कृतीक कार्यक्रमांचे / विविध धर्मिय सणांचे एकत्रित आयोजन, वक्तृत्व स्पर्धा/ देशभक्तीपर कार्यक्रम / क्रीडास्पर्धा / तरुणांसाटी शरीर सौष्टव स्पर्धा / साहसी खेळ व व्यायाम तसेच नैसर्गीक आपत्ती प्रसंगी तोंड देण्यासाठी तरुणांच्या शक्तीचा सुयोग्य वापर करणेसाठी विविध कार्यशाळा आयोजित करणे इ तसेच याव्यतिरीक्त स्थानिक स्तरावरुन लोकांचा सहभाग जास्तीतजास्त वाढविण्यासाठी विविध संकल्पनावर विचार होवून त्याचे प्रत्यक्ष कार्यन्वयन करणे.

सदर संबंधाने शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेले खालील नमूद शासन निर्णय तसेच या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेली परिपत्रके यांचा शिघ्र संदर्भाने आढावा घेण्यात यावा:-

१.महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शा.नि. क्र. डीआयएस२००२/सीआर८४/विशा-१(ब), दि. ३०/०९/२००२ - राज्यात जातीय सलोखा योजना राबीण्याबाबत.

२.महाराष्ट्र शासन, गृह विभाग(विशेष), शा.नि. क्र. डीआयएस२००१/सीआर ३१५/विशा-१(ब), दि. ३०/०६/२००३ - कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यात जिल्हा / तालुका स्तरावर शांतता समिती स्थापन करुन प्रभाविपणे कार्यरत करण्याबाबत.

३.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयीन परिपत्रक क्र. पोमसं/२०/१९९/जातीयसलोखा/कावसु/३४५/२०११, दि२४/०६/२०१० - राज्यातील जातीय सलोखा योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

४.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयीन परिपत्रक क्र. पोमसं/२०/१९९/पोलीस मित्र समिती (मोहल्ला कमिटी)/ कावसु/ ३४५/२०१०, दि. ०६/०८/२०११ - राज्यातील पोलीस मित्र समिती (मोहल्ला कमिटी) राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

५.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयीन परिपत्रक क्र. पोमसं/२०/१९९/जातीय सलोखा हाताळणी / प्रमाणित कार्यपध्दती (SOP)/१३/२१८/२०१३, दि. ०६/०९/२०११ - जातीय सलोखा प्रमाणित कार्यपध्दती (SOP) समाजामध्ये जातीय सलोख्याचे व सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होवून समाजातील परस्पर सामंजस्य व बंधुभाव वाढीस लागावा व जातीय तेढ /कटूता नष्ट व्हावी यासाठी कम्युनिटी पोलीसींग च्या माध्यमातून उपाययोजना करण्यात याव्यात यापुर्वी उपरोक्त प्रमाणे निर्गमीत शासन निर्णय व परिपत्रके यांमधील महत्वाच्या बाबी येथे पुन्हा उदधृत करण्यात येत असून सदर सूचनांस अनुसरुन योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात:-

**१. मोहल्ला कमिटी / झोपडपट्टी पंचायत** - समाजातील सर्वात खालच्या घटकापर्यंत पोहचण्यासाठी आणि त्यांच बरोबर काम करण्यासाठी मोहल्ला कमिटी / झोपडपट्टी पंचायत हे सर्वात हे सर्वात सशक्त साधन असून मोठ्या शहरातील मिश्र वस्त्या आणि झोपडपट्ट्या जेथे पोलीसांची उपस्थिती / शिरकाव कमी आहे अशा ठिकाणी ही साधने परिणामकारक व्यवस्था राखण्यासाठी खूप उपयुक्त आहेत.

स्थानिक मोहल्ला / पोलीस दूरक्षेत्र / बिट चौकी यांचा उपयोग स्थानिक कमिटीचे सदस्य आणि सामान्य यांच्या भेटीसाठी करता येवू शकतो. मोहल्ला कमिटी / झोपडपट्टी पंचायत यांच्या बैठका नियमितपणे घ्याव्यात. यासाठी फक्त सणवार किंवा अन्य विशेष प्रसंगाचे निमित्त्य असन्याची गरज नाही ती एक सततची निरंतर प्रक्रिया असावी.

२. **सकारात्मक (व्यावसायीक ) सामाजिक पोलीस योजना** - पोलीस आणि समाज यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी सामाजिक घटकांशी संवाद साधण्याचा प्रभावीपणे प्रयत्न करणे, व्यावसायीक दृष्ट्या आवश्यक असून तरूणांशी संवाद साधून त्या द्वारे परस्पर विश्वास निर्माण करणे व ज्या वेळी परिसरातील शांततेस धोका निर्माण होईल त्यावेळी प्रमाणितयंत्रणा निर्माण करणे.

३. प्रमाणित कार्यपध्दती (SOP) :-

अ) सकारात्मक सामाजिक पोलीस योजना
ब) गुप्तवार्ताचे प्राप्तीकरण व संकलन
क) धोक्याचे इशारे वेळीच ओळखणे
ड) पुराणमतवादी घटकांशी सामना करणे
इ) संभाव्य संकटांचा इशारा मिळताच करावयाची कारवाई
फ) कारवाई दरम्यानची वर्तणुक
ग) पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी योग्य आणि व्यावसायीक वर्तणुक ठेवण्याचे महत्त्व

उपरोक्त महत्त्वाच्या मुद्द्यांच्या अनुषुंगाने कम्युनिटी पोलीसींगच्या माध्यमातून विविध उपाययोजना अग्रक्रमाने राबविण्यात याव्यात माहिती सांख्यिकीय पध्दतीने संकलीत (Quantifyable and Measurable) करण्यात यावी तसेच सदरची माहिती तिमाही अहवालाच्या स्वरुपात या कार्यालयास खालील विहीत नमून्यात नियमीतपणे सादर करण्यात यावी:-

| अ.क्र. | माहे | घेण्यात आलेल्या बैठका/ स्पर्धा इ. चा तपशिल व संख्या | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |

तरी घटक प्रमुखाना विनंती करण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे Community Policing Cell ची तात्काळ स्थापना करुन त्याअंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांचा तिमाही पध्दतीने अनुपालन अहवाल या कार्यालयास उक्त विहीत नमून्यात सादर करण्यात यावा.

(प्रभात कुमार) 20/12
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचेकरीता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)

प्रत- आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली, परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

प्रत -
कार्यासन अधिकारी . का.क्र.३६ (संग्रहार्थ )

ISSUED
22 DEC 2017

**आश्वासन क्रमांक ११७५**

८३५
जा.क्रं.जिपसा/ग्रापापू/आस्था-४/वशी/ /२०१५
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जि.प.सांगली
दिंनाक :-२६/१०/२०१५.

## आदेश

ज्या अर्थी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ अन्वये, श्री.एन.एस.जाधव शाखा अभियंता,(यात्रिकी) देखभाल व दुरुस्ती कक्ष अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद सांगली यांचे विरुध्द आरोप इ कडील दि.०३/०८/२०१५ च्या ज्ञापनान्वये त्यांना बजावणेत येऊन १० दिवसाचे आत खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले होते.तथापी , त्यांनी खुलासा अदयाप पर्यत सादर केलेला नाही.

त्या अर्थी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम-७ श्री.एन.एस.जाधव शाखा अभियंता,(यात्रिकी) यांच्या विरुध्दचे आरोपा बाबत विभागीय चौकशी सुरु करणेचा निर्णय घेणेत आला असुन , सहाय्य आयुक्त (चौकशी ) विभागीय चौकशी अधिकारी , खाते निहाय चौकशी परिषद सेवक पुणे -१ यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेत येत असून , त्यांनी चौकशीचे काम उपनिर्दिष्ठ नियमातील तरतुदी नुसार पुर्ण करुन चौकशी अहवाल दोन प्रति एक महिन्याच्या आत इकडे सादर करावा .

तसेच महाराष्ठ्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ मधील सादर करता अधिकारी म्हणून उपअभियंता (यांत्रिकी) ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग , जिल्हा परिषद सांगली यांची नेमणूक करणेत येत असून , त्यांनी सादर करता अधिकरी या नात्याने विभागीय चौकशीचे वेळी वेळेत उपस्थित राहून श्री.एन.एस.जाधव शाखा अभियंता,(यात्रिकी) यांचे वर ठेवणेत आलेला आरोप सिध्द होतील या दृष्टीने सर्व कागदपत्री पुराव्याचे अध्ययन करुन जिल्हा परिषदेची बाजू माडण्याची जबाबदारी त्यावर टाकण्यात येत आहे.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली.**

**प्रति,**

**विभागीय चौकशी अधिकारी , खाते निहाय चौकशी परिषद सेवक पुणे -१**
**२/- सोबत चौकशी कागदपत्री १ ते १७ जोडली आहे.**

**प्रतः-** श्री.एन.एस.जाधव शाखा अभियंता,(यात्रिकी) देखभाल व दुरुस्ती कक्ष जिल्हा परिषद,सांगली. यांना उपअभियंता (यांत्रिकी) जिल्हा परिषद,सांगली. यांचे मार्फत रवाना.

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**

**उपअभियंता (यात्रिकी) उपविभाग /देखभाल दुरुस्ती कक्ष जिल्हा परिषद , सांगली**

२/- सदरचे आदेश संबंधितास तात्काळ रुजू करुन दुसरे प्रतिवर,,(जादा प्रत पोहोच) संबंधिताची तारखेसह स्वाक्षरी घेवून सदरची (पोहोच) इकडे सत्वर बिनचूकपणे सादर करणेत यावी .

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,सांगलीकरीता.**

८३५
जा.क्रं.जिपसा/ग्रापापू/आस्था-४/वशी/ /२०१५
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जि.प.सांगली
दिंनाक :-२८ /१०/२०१५.

## आदेश,

ज्या अर्थी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ अन्वये, श्री.व्ही.एम.शिंदे,शाखा अभियंता,(विद्युत) देखभाल व दुरुस्ती कक्ष अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद सांगली यांचे विरुध्द आरोप इ कडील दि.०३/०८/२०१५ च्या ज्ञापनान्वये त्यांना बजावणेत येऊन १० दिवसाचे आत खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले होते.तथापी , त्यांनी खुलासा अदयाप पर्यत सादर केलेला नाही.

त्या अर्थी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम-७ श्री.व्ही.एम.शिंदे,शाखा अभियंता,(विद्युत) यांच्या विरुध्दचे आरोपा बाबत विभागीय चौकशी सुरु करणेचा निर्णय घेणेत आला असुन , सहाय्य आयुक्त (चौकशी ) विभागीय चौकशी अधिकारी , खाते निहाय चौकशी परिषद सेवक पुणे -१ यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेत येत असून , त्यांनी चौकशीचे काम उपनिर्दिष्ठ नियमातील तरतुदी नुसार पुर्ण करुन चौकशी अहवाल दोन प्रति एक महिन्याच्या आत इकडे सादर करावा .

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ मधील सादर करता अधिकारी म्हणून उपअभियंता (यांत्रिकी) ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग , जिल्हा परिषद सांगली यांची नेमणूक करणेत येत असून , त्यांनी सादर करता अधिकरी या नात्याने विभागीय चौकशीचे वेळी वेळेत उपस्थित राहून श्री. श्री.व्ही.एम.शिंदे,शाखा अभियंता,(विद्युत) यांचे वर ठेवणेत आलेला आरोप सिध्द होतील या दृष्टीने सर्व कागदपत्री पुराव्याचे अध्ययन करुन जिल्हा परिषदेची बाजू माडण्याची जबाबदारी त्यावर टाकण्यात येत आहे.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली.**

**प्रति,**

**विभागीय चौकशी अधिकारी , खाते निहाय चौकशी परिषद सेवक पुणे -१**
**२/- सोबत चौकशी कागदपत्री १ ते १७ जोडली आहे.**

**प्रतः-** श्री.व्ही.एस.शिंदे,शाखा अभियंता(विदयुत),देखभाल व दुरुस्ती कक्ष जिल्हा परिषद,सांगली. यांना उपअभियंता (यांत्रिकी) जिल्हा परिषद,सांगली. यांचे मार्फत रवाना.

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**
**उपअभियंता (यात्रिकी) उपविभाग /देखभाल दुरुस्ती कक्ष जिल्हा परिषद , सांगली**

२/- सदरचे आदेश संबंधितास तात्काळ रुजू करुन दुसरे प्रतिवर, (जादा प्रत पोहोच) संबंधिताची तारखेसह स्वाक्षरी घेवून सदरची (पोहोच) इकडे सत्वर बिनचूकपणे सादर करणेत यावी .

२८/१०/१५
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगलीकरीता.**

क्र. अतासु -२०१५/प्र.क्र.०९/शिकाना (पापु-१७)

राजेश कुमार, भा. प्र. से.
प्रधान सचिव

सत्यमेव जयते

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
दिनांक : १५ डिसेंबर, २०१५

**विषय:- सन-२०१५ चे अर्थसंकल्पिय अधिवेशनातील विधानसभा आश्वासन क्र. ११७५**

प्रिय, श्री संतोष,

(vi) It is made clear that the applicants who have filed various Civil Applications in this Writ Petition for Intervention and for modification of the orders passed by this Court on 16th July, 2015, if have filed any application for change of mutation entries or seeking any further permission, the same shall be considered by the concerned Authorities on their own merits expeditiously;

(vii) It is clarified that none of the orders passed by the Civil Court after order of this Court on 14th/15th July, 2011 in Writ Petition No.7500 of 2008 and other companion matters are stayed by this order;

(viii) It is made clear that if any other orders are passed by the Civil Court in the proceedings filed pursuant to the liberty granted by this Court in the orders passed in Writ Petition No.7500 of 2008 on 14th/15th July, 2011, the same would not be affected by the order passed by this Court granting interim reliefs in terms of prayer Clauses (c) and (d) of the Writ Petition No.6751 of 2015;

(ix) In view of the aforesaid clarification, Civil Application No.2277 of 2015 is disposed of;

(x) In so far as Civil Application No.5269 of 2017 filed by the State Government is concerned, in

view of this Court granting interim relief in terms of prayer Clauses (c) and (d) and clarified the status-quo order passed by this Court on 16th July, 2015, no further relief is warranted in the Civil Application filed by the State Government i.e. Civil Application No.5269 of 2017 and the same is, accordingly, disposed of;

(xi) In view of the aforesaid order, none of the Civil Applications for intervention are pressed by those applicants and are accordingly disposed off. No order as to costs.

**(R.D. DHANUKA, J.)**

***IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY***
***CIVIL APPELLATE JURISDICTION***

***WRIT PETITION NO.6751 OF 2015***
***WITH***
***CIVIL APPLICATION NOS. 2775, 2277, 2291, 2294, 2334, 2335, 2336, 2385, 2388, 2389, 2395, 2391, 2499, 2500, 2501, 2502, 2503, 2516, 2517, 2518, 2519, 2525, 2746, 2752, 2747, 2748, 2749, 2750, 2751, 2775, 2776, 2777, 2780, 2778, 2829, 2830, 2831, 2833, 2834, 2861, 2862 OF 2017***
***AND***
***CIVIL APPLICATION (STAMP) NOS. 33431 OF 2016, 5269, 21122, 21750, 30825, 31434, 34253, 34259, 34470, 34480 & 34485 OF 2017***
***IN WRIT PETITION NO.6751 OF 2016***

The Estate Investment Co. (P) Ltd. & Anr. .. Petitioners
V/s.
The Divisional Commissioner,
Konkan Bhavan, & Ors. .. Respondents

......

Mr.Simil Purohit a/w. Mr.Viraj Maniar, Mr. Harsh Behany i/b.M/s.Maniar Srivastava & Associates, Advocate for Applicant in CAW 2294 of 2017.

Mr.Harsh Behany a/w. Mr.Nivit Srivastava i/b. M/s.Maniar Srivastava & Associates, Advocate for Applicant in CAW 2749 and 2525 of 2017.

Dr.Milind Sathe, Senior Advocate a/w. Mr.Kamalesh Ghumre i/b. Ms. Sonali Jadhav, Advocate for the applicant in CAW 2277 of 2015.

Mr.K.I. Khandelwal, Advocate for the Applicant in CAW(St.) Nos.21750, 34253 and 34259 of 2017.

Mr.Ravi Kadam, Senior Advocate a/w. Mr.Prasad Dhakephalkar, Senior Advocate, Mr.Vineet Naik, Senior Advocate and Mr.Saran Jagtiani, Ms.Sheetal Shah, Mr.Shrikant Shah i/b. Mehta & Girdharlal, Advocate for the Petitioners in Writ Petition No.6751 of 2015.

Mr.S.H. Kankal, AGP for Respondent Nos.1 to 5 in W.P. No.6751 of 2015 and for Applicant in CAW(st.) No.5269 of 2017.

Mr.Subit Chakrabarti i/b. M/s.Vidhi Partners, Advocate for the Applicant in CAW 2334 of 2017.

Mr.K.S. Dewal i/b. Mr.J.M. Joshi, Advocate for the Applicant in CAW 2775 of 2017.

Mr.Sandesh D. Patil i/by Mr.Prithviraj S. Gole for the applicants in Civil Application Nos.2335, 2336, 2385, 2388, 2389, 2395, 2391, 2499, 2500, 2501, 2516, 2517, 2518, 2519, 2746, 2752, 2747, 2748, 2750, 2751, 2776, 2777, 2780, 2778, 2829, 2830, 2831, 2833, 2834, 2861, 2862, 2877, 2878 of 2017 and Civil Application (St.) No.30825 of 2017.

---

***CORAM : R.D. DHANUKA, J.***
***DATE : 20th December 2017***

***P.C.:***

. Mr.Patil, learned counsel appearing for some of the applicants in the civil applications states that his appearance is not shown in the order dated 12th December 2017.

2. Office is directed to show the appearance of Mr.Sandesh D. Patil i/by Mr.Prithviraj S.Gole for the applicants in respect of the following Civil Application Numbers :-

"Civil Application Nos.2335, 2336, 2385, 2388, 2389, 2395, 2391, 2499, 2500, 2501, 2516, 2517, 2518, 2519, 2746, 2752, 2747, 2748, 2750, 2751, 2776, 2777, 2780, 2778, 2829, 2830, 2831, 2833, 2834, 2861, 2862, 2877, 2878 of 2017 and Civil Application (St.) No.30825 of 2017. "

3. The paragraph number 10 on page 4 of the said order dated 12th December 2017 shall be read as paragraph number "6".

4. The order dated 12th December 2017 stands corrected accordingly.

***R.D. DHANUKA, J.***

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र. महसुल/कक्ष-१/टे-२/इस्टेट इनव्हेस्टमेंट/कावि-F१४३७७३६६४७२२४ दिनांक ०३/२/२०१८

प्रति,

तहसिलदार ठाणे,

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दि. इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचे नाव दाखल असलेल्या जमिनबाबत कंपनीने दाखल केलेल्या रिट पिटीशन नं ६७५१/२०१५ मध्ये व सदर याचिकेमध्ये दाखल असलेल्या विविध सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये मा. न्यायालयाने दिनांक १२/१२/२०१७ व २०/१२/२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशाबाबत.

संदर्भ :- आपलेकडील पत्र क्र.महसुल/क-१/टे-२/जमिनबाब/कावि-३०१/२०१७ दिनांक ३/१/२०१७

उपरोक्त विषयाबाबत आपलेकडील संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविणेत येते की दि. इस्टेट इनव्हेस्ट कंपनीचे नाव दाखल असलेल्या जमिनीबाबत कंपनीने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ६७५१/२०१५ मध्ये व सदर रिट पिटशन मध्ये दाखल असलेल्या विविध सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १२/१२/२०१७ व दि. २०/१२/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाचे अवलोकन करावे.

प्रस्तुत प्रकरणी रिट पिटीशन क्र. ६७५१/२०१७ मध्ये व सदर रिट पिटीशनमध्ये दाखल विविध सिव्हिल ॲप्लीकेशनमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१२/१२/२०१७ व दि. २०/१२/२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार दि. इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचे जमिनीबाबत विविध परवानगी मिळणेकरीता केलेल्या अर्जाबाबत गुणवत्तेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. सदरची कार्यवाही करताना मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचा अवमान होणार नाही यांची दक्षता घ्यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(तहसिलदार महसूल)

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे. जिल्हाधिकारी ठाणे करीता

प्रत :- मा.जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे नागरी सकुलंन ठाणे यांचेकडे माहितीकरीता व आवश्यक कार्यवाहीसाठी,

प्रत :- आयुक्त, मिराभाईदर महानगरपालिका मिराभाईदर यांचेकडे माहितीकरीता व आवश्यक कार्यवाही करीता रवाना.

प्रत :- उपविभागीय अधिकारी ठाणे यांचेकडे माहितीकरीता व आवश्यक कार्यवाही करीता रवाना,

(तहसिलदार महसूल)

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे. जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे जिल्हाधिकारी ठाणे करीता

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे – ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ – २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

Scanned with CamScanner

**आश्वासन क्रमांक ९३३**

31-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3B-8

JN/ 17:40

**पृ.शी./मु.शी.:** लक्षवेधी सूचनांच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.विजय शिवतारे ( जलसंधारण व जलसंपदा राज्यमंत्री ) :अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने मौजे भाईंदर, मिरा व घोडबंदर ता.जि.ठाणे या भागातील दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या जमिनींबाबत या विषयावरील श्री.नरेंद्र मेहता,वि.स.स.यांच्या दिनांक 6 एप्रिल,2015 रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी. )

---

Monday, April 6, 2015 4:15:30 PM Welcome, Guest Ministry Search Search

# Ministry of Corporate Affairs

Government of India

Service Transformation

Empowering Business, Protecting Investors

Regulator • Integrator • Facilitator • Educator

Home Services Legislation Information Help

Register Digital Signature Quick Links

- Register Digital Signature
- Director
- Manager / Secretary
- Practising Professional
- View Signatory Details
- Update DSC for Bank Official/Nodal Administrator

Report Abuse

Forms Download

Pre-requisite Software for efiling

## View Signatory Details

Company / LLP Name : ESTATE INVESTMENT CO PVT LTD

CIN/LLPIN : U65990MH1945PTC00435

Submit Reset

List of Signatories Print

| DIN/DPIN/PAN | Full Name | Present residential address | Designation | Date of Appointment | Whether DSC Registered | Expiry Date of DSC |
|---|---|---|---|---|---|---|
| 00170587 | NANDKUMAR KUDILAL SEKSARIA | SEKSARIA BLDG., 74 MARINE DRIVE, MUMBAI 400020, Maharashtra, INDIA | Director | 01/10/1979 | YES | 11/06/2015 |
| 00170785 | RAMCHANDRA THOMA SHETTY | 402, ASHIRWAD - I, OFF J.P. ROAD, 7 BUNGALOWS, ANDHERI (WEST), MUMBAI, 400061, Maharashtra, INDIA | Director | 23/08/2011 | YES | 20/05/2015 |
| 00170828 | HARSH NANDKUMAR SEKSARIA | SEKSARIA BLDG., 74, MARINE DRIVE, MUMBAI 400020, Maharashtra, INDIA | Director | 25/10/2013 | YES | 20/05/2015 |

This site is owned by MINISTRY OF CORPORATE AFFAIRS

Sitemap | Disclaimer | Privacy Policy

Last Updated: 18/3/2015. Site is best viewed in 1024x768 resolution

THE ESTATE INVESTMENT CO. PVT. LTD. MUMBAI

## आश्वासन क्रमांक ६९८



क्र.हिर्डी/टे-१/आस्था/निलंबन/कावि/९४०८
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
ठाणे विभाग ठाणे
दिनांक :- २५/११/२०१३

वाचले :-

१. पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे यांचेकडील पत्र जा.क्र./अेसीबी/ठाणे/क्लिक्लिजे/२०१३/८८ दिनांक २१/११/२०१३

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ चा नियम ४ (२) (अ)

आदेश :-

ज्याअर्थी श्री.गुलाब महादेव भालेराव, तत्कालीन तलाठी साझा माजिवडे, सध्या तलाठी साझा कोलशेत ता.ठाणे यांचे विरुध्द ठाणे नगर पो.स्टे.गु.र.नं.I २०८/२०१३ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १३ (१) (ड) सह १३ (२) व भारतीय दंडविधान संहीता कलम ४६५, ४६६, १६६, १६७, २५०, १२०(ब), १०९ व ३४ प्रमाणें गुन्हा दाखल होवून त्यांना दिनांक २१/११/२०१३ रोजी १०.३० वाजता अटक झाली असून त्यांना दिनांक २६/११/२०१३ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर करणेत आलेली आहे.

त्याअर्थी मी जगतसिंग गिरासे, उपविभागीय अधिकारी ठाणे विभाग ठाणे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चा नियम ४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून उक्त नियम ४ (२) (अ) अन्वये श्री.गुलाब महादेव भालेराव, तत्कालीन तलाठी साझा माजिवडे, सध्या तलाठी साझा कोलशेत ता.ठाणे यांना अटक झालेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक २१/११/२०१३ पासून निलंबित करीत आहे.

श्री.गुलाब महादेव भालेराव, तलाठी यांचे निलंबन कालावधीतील प्रदान करावयाच्या निर्वाह भत्याबाबत पुढील आदेश देण्यात येत आहे.

(अ) निलंबन कालावधीत श्री.भालेराव यांनी खाजगी सेवा अगर धंदा / व्यापार करु नये. उल्लंघन केल्यास ते निर्वाह भत्ता मिळणेस पात्र राहणार नाहीत शिवाय शिस्तभंगाचे कार्यवाहीस पात्र ठरतील.

(ब) निर्वाह भत्ता प्रदान करण्यापूर्वी त्यांनी निलंबित कालावधीत कोणतीही खाजगी सेवा स्विकारली नव्हती अथवा ते कोणताही धंदा / व्यापारात गुंतलेले नव्हते याची खात्री दाखला देवून करून दिली पाहीजे.

(क) श्री.भालेराव यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील वेतन (प्रदाने) नियम १९८१ मधील ६८ अन्वये निलंबनाच्या तारखेपासून निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता व इतर भत्ते देय राहतील.

(ड) निलंबनाच्या काळात श्री.भालेराव यांचे मुख्यालय ठाणे हे राहील. त्यांनी सदरचे मुख्यालय तहसिलदार ठाणे यांचे पूर्व परवानगीशिवाय सोडू नये. कुचराई केल्यास ते शिस्तभंगाचे कार्यवाहीस पात्र ठरतील.

(इ) श्री.भालेराव यांचे बाबतीत तहसिलदार ठाणे हे निलंबन वेतन व शासकीय नियमानुसार असलेले इतर भत्ते काढणेसाठी धारणाधिकारी म्हणून राहतील.

(जगतसिंग गिरासे)
उपविभागीय अधिकारी
ठाणे विभाग ठाणे

प्रत :-

१. श्री.गुलाब महादेव भालेराव, तत्कालीन तलाठी साझा माजिवडा, सध्या तलाठी साझा कोलशेत ता.ठाणे

२. तहसिलदार ठाणे

त्यांनी सोबतच्या आदेशाची प्रत श्री.भालेराव यांना बजावून त्यांचे स्वाक्षरीसह अहवाल सादर करावा. तसेच त्यांचा कार्यभार नजिकच्या तलाठीकडे सोपवावा.

३. मा.जिल्हाधिकारी ठाणे (आस्थापना शाखा) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

४. कोषागार अधिकारी ठाणे

उपविभागीय अधिकारी
ठाणे विभाग ठाणे

**आश्वासन क्रमांक १०६१**

**राज्यातील देवस्थान जमीनींच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता शासनास शिफारशी करण्याकरीता अभ्यास समिती नियुक्त करण्याबाबत..........**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जमीन -२०१६/प्र.क्र. १००/ज-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ मार्च, २०१६

**प्रस्तावना :-**

प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमीनींचा धारणाधिकार रुपांतरीत करणेसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करणे या विषयाबाबत मंत्रिमंडळाच्या दि.१७.०२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय घेतांना मंत्रिमंडळाने राज्यातील देवस्थान जमिनींच्या संदर्भातही शासनाची भूमिका ठरविण्याकरीता अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्याकरीता प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचाही निर्णय घेतला आहे.

सबब, त्या अनुषंगाने राज्यातील देवस्थान जमिनी यांच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता यासंदर्भात सर्वकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारस करण्याकरीता प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

राज्यातील देवस्थान जमिनी यांच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता याबाबत सर्वंकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारसी करण्याकरीता या आदेशान्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २. | अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांनी नामनिर्देशित केलेला वित्त विभागाचा प्रधान सचिव /सचिव स्तराचा अधिकारी | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव (विधी व न्याय) | सदस्य |
| ४. | विभागीय आयुक्त, पुणे विभाग | सदस्य |
| ५. | विभागीय आयुक्त, नाशिक विभाग | सदस्य |
| ६. | विभागीय आयुक्त, कोकण विभाग | सदस्य |
| ७. | उप सचिव (ज-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

०२. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

अ) राज्यातील विविध भागातील देवस्थान जमिनींच्या वापराची सद्यस्थिती चा अभ्यास

करुन देवस्थान जमिनींचे झालेले बेकायदेशीर हस्तांतरण व वापरात बदल या विषयी उपाययोजना सुचविणे.

ब) शहरी भागातील देवस्थान जमिनींच्या वापराचा अभ्यास करुन अशा जमिनीचा पुढील विनियोग व वापर आणि व्यवस्थापन करण्यासंबंधी शिफारशी करणे.

०३. उपरोक्त कार्यकक्षेतील विषयांबाबत सर्वकष अभ्यास करुन अशा जमिनींच्या संदर्भात योग्य शिफारशींसह समितीने आपला अभ्यास अहवाल ३ महिन्यात शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३२३१७४२५५५६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil S Kothekar

Digitally signed by Sunil S Kothekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=c55205ca6d1113bfaec735bd2d1c5326d6b007c5cd3a46a6e4c4857e58ad2afe, cn=Sunil S Kothekar
Date: 2016.03.23 18:30:38 +05'30'

(सुनिल कोठेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव/वि.का.अ., मंत्रालाय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मुंबई.
७) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, पुणे विभाग,पुणे.
९) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक
१०) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण.
११) उप सचिव (ज-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) निवडनस्ती (ज-१)

**आश्वासन क्रमांक ९०**

RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष २, अंक ३४] शुक्रवार, मे २७, २०१६/ज्येष्ठ ६, शके १९३८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ५७

प्राधिकृत प्रकाशन

बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक प्रअ/६४५७/विनि/पुनर्रचना, दिनांक २७ मे २०१६

## अधिसूचना

विषय.— बृहन्मुंबईच्या विकास आराखड्याची पुनर्रचना.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रारुप विकास आराखडा (२०३४) व
प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) चे प्रकाशन.

अद्ययावत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २३(१) सह कलम ३८ च्या अद्ययावत तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २० ऑक्टोबर २००८ च्या ठराव क्र. ७६७ अन्वये महानगरपालिका अधिकारक्षेत्रातील क्षेत्राकरिता विकास आराखडा पुनर्रचित करण्याच्या उद्देशास मंजुरी दिली. त्यानुसार या संदर्भातील अधिसूचना दिनांक १ जुलै २००९ च्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली. तद्नंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २५ मधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जमिनीच्या विद्यमान भूवापराचे सर्वेक्षण करण्यात आले आणि त्यानुसार विद्यमान भूवापर नकाशे तयार करण्यात आले आणि जनतेच्या माहितीकरिता आणि त्यावर अभिप्राय प्राप्त करण्याकरिता महापालिकेच्या संकेत स्थळावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयास उपलब्ध करण्यात आले.

राज्य शासनाने सदर अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये प्रारुप विकास आराखडा तयार करण्याच्या आणि त्याचे प्रकाशन विनिर्दिष्ट करण्याच्या कालावधीस वेळोवेळी मुदतवाढ दिली. अंतिमतः राज्य शासनाने दिनांक २० ऑक्टोबर २०१४ च्या आदेशानुसार प्रारुप विकास आराखडा २०३४ तयार करण्याच्या व त्याचे प्रकाशन करण्याच्या कालावधीस दिनांक ४ एप्रिल २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली.

तद्नंतर, प्रारुप विकास आराखडा (२०३४) व प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) तयार करण्यात आली असून सदरहू प्रारुप विकास आराखडा (२०३४) व प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीस महानगरपालिकेने दिनांक २३ फेब्रुवारी २०१५ च्या ठराव क्र. ११९५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) नुसार तो प्रकाशित करून जनतेकडून सूचना/हरकती प्राप्त करण्यास मंजुरी दिली होती.

त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये अधिसूचना शासकीय राजपत्रात क्र. प्रअ/३२५९६/विनि/साधारण, दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करून सूचना देण्यात आली होती की, बृहन्मुंबईसाठीचा प्रारुप विकास आराखडा उपरोक्त कायद्याच्या तरतुदीनुसार प्रसिद्ध करण्यात आला होता.

सदर आराखडा प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन निर्णय क्र.वि.स.प्रस्ताव/२०१५/१७४७/५६/नवि-११, दि.२३ एप्रिल २०१५ अन्वये तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये "बृहन्मुंबई महानगरपालिकने दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ रोजी शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेमधील चुकांची सखोल शहानिशा करून सगळ्या चुकांची जागेवरील परिस्थितीनुसार, गुणवत्तेनुसार, नियोजनाचे दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून त्यानुरूप दुरुस्ती करून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील प्रकरण तीनच्या तरतुदींचे पालन करून प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये महासभेच्या पूर्वमान्यतेने चार महिन्यांचे मुदतीमध्ये नागरिकांच्या सूचना/हरकतींसाठी पुनःप्रसिद्ध करावी." असे निदेश दिले. सदर कालावधीस शासनाच्या आदेशानुसार प्रथमतः दिनांक २२ फेब्रुवारी २०१६ पर्यंत आणि त्यानंतर दिनांक ३१ मे २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

त्याअनुषंगाने, प्रारुप विकास आराखडा (२०३४) व प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) तयार करण्यात आली असून सदरहू प्रारुप विकास आराखडा (२०३४) व प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) महानगरपालिकेने दिनांक २७ मे २०१६ च्या ठराव क्र. ३०७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) तसेच शासन निर्णय क्र.वि.स.प्रस्ताव/२०१५/१७४७/५६/नवि-११, दिनांक २३ एप्रिल २०१५, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये दिलेल्या निदेशानुसार बृहन्मुंबईसाठी विभागवार प्रारुप विकास आराखड्याचा मसुदा, प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीचा मसुदा व प्रारुप विकास आराखड्याा संदर्भातील अहवाल, जनतेकडून सूचना आणि/किंवा हरकती प्राप्त करण्यासाठी, पुनर्प्रसिद्ध करणे

व

यापूर्वी महापालिका ठराव क्र. ११९५, दिनांक २३ फेब्रुवारी २०१५ अन्वये मंजूर केलेला तसेच अधिसूचना क्र.प्रअ/३२५९६/विनि/साधारण, दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ अन्वये शासकीय राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेला, जनतेकडून सूचना व हरकतीसाठी बृहन्मुंबईसाठीचा प्रारुप विकास आराखडा (२०३४) आणि प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) रद्दबातल करणे यासाठी मंजुरी दिली.

वरील बाबींच्या अनुषंगाने उक्त नियमाच्या कलम २६(१) अन्वये याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, बृहन्मुंबईच्या प्रारुप विकास आराखडा (२०३४) व प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) उपरोक्त कायद्याच्या तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये दिलेल्या शासन निर्णय क्र.वि.स.प्रस्ताव/२०१५/१७४७/५६/नवि-११, दिनांक २३ एप्रिल २०१५, निदेशानुसार तयार करून पुनर्प्रसिद्ध करण्यात आला आहे.

बृहन्मुंबईच्या प्रारुप विकास आराखडा (२०३४), प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४), वरील मसुदा अहवाल आणि त्यासंबंधित प्रती समिती सभागृह नं. ३ (विकास नियोजन पुनर्रचना सभागृह), २ रा मजला, महापालिका मुख्यालय, मुख्य इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे कुठल्याही कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पाहणी करता उपलब्ध आहेत.

तसेच महापालिकेच्या "*www.mcgm.gov.in*" या संकेतस्थळावर ही उपलब्ध करण्यात आली आहे.

संबंधित विभागाचा प्रारुप विकास आराखडा (२०३४) देखील क्षेत्रीय इमारत प्रस्ताव कार्यालयात पाहणीकरिता उपलब्ध आहेत. त्यांचे कार्यालयीन पत्ते खालीलप्रमाणे आहेत :—

| अनु.क्र. | क्षेत्रीय इमारत प्रस्ताव कार्यालये | | विभाग प्रमुख | क्षेत्रीय इमारत प्रस्ताव कार्यालयाचा टपाल पत्ता |
|---|---|---|---|---|
| | क्षेत्र | विभाग | | |
| १. | शहर | ए, बी, सी, डी, ई, एफ/द, एफ/उ, जी/द व जी/उ | उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर | दोस्ती एकर, विद्यालंकार मार्ग, वडाळा रोड, मुंबई ४०० ०३७. |
| २. | पश्चिम उपनगरे | एच/प, एच/पू, के/प व के/पू | उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प. उप.१ | १ ला मजला, भाभा हॉस्पिटल इमारत, वांद्रे (प.), मुंबई ४०० ०५०. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | पश्चिम उपनगरे | पी/द, पी/उ, आर/द, आर/मध्य व आर/उ | उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प. उप. २ | "सी" विंग, संस्कृती कॉम्प्लेक्स, ९०' फी.पी. रोड, कांदिवली (पू.), मुंबई ४०० १०१ |
| ४. | पूर्व उपनगरे | एल, एम/पू, एम/प, एन, एस व टी | उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) पू. उपनगरे | राज लिगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (प.), मुंबई ४०० ०८३. |

तसेच महापालिका विभागांचे प्रारुप विकास आराखडा (२०३४) त्या त्या संबंधित प्रशासकीय विभाग कार्यालयात तपासणीकरिता उपलब्ध करण्यात आले आहेत.

महानगरपालिका मुख्यालयाच्या उपरोक्त सभागृह क्र. ३ मध्ये प्रारुप विकास नियोजन आराखडा २०३४ बद्दल जनतेस माहिती उपलब्ध करून देण्यासाठी विकास नियोजन अभियंते, विकास नियंत्रण नियमावली घमु यांचा सहाय्य कक्ष गठित करण्यात आला आहे.

उचित अधिनियमाच्या कलम २६(१) मध्ये विहित केल्यानुसार सदर सूचनेच्या अधिकृत शासकीय राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत बृहन्मुंबईच्या प्रारुप विकास आराखडा २०३४ व प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) वर जनतेकडून सूचना व हरकतींसाठी आता मागविल आहोत आणि सदर सूचना व हरकती प्रारुप पुनर्रचित विकास आराखडा अंतिम करताना आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये राज्य शासनाची अंतिम मंजुरी प्राप्त करण्यास सादर करतेवेळी विचारात घेतल्या जातील.

ऑनलाईन सूचना व हरकती ह्यासुद्धा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर *portal.mcgm.gov.in* खालील लिंकवर "Draft Development Plan 2014-34 suggestions/objection" पाठविता येऊ शकतील.

सूचना व हरकती या शक्यतो महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या स्वरूपात (Format) मध्ये द्याव्यात.

सदर सूचना आणि/वा हरकती लिखित स्वरूपात महापालिका आयुक्तांना उपरोक्त वैधानिक ६० (साठ) दिवसांच्या कालावधीत प्रमुख अभियंता (विकास नियोजन), ५ वा मजला, महापालिका मुख्यालय, विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या पत्त्यावर कळवाव्यात. "प्रारुप विकास आराखडा (२०३४) करिता सूचना/हरकती" असे ठळक अक्षरामध्ये लिहिलेल्या बंद लिफाफ्यांमध्ये सूचना/हरकती कळवाव्यात.

राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या तारखेच्या आधी व राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या ६० (साठ) दिवसानंतर दिलेल्या सूचना या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

अजोय मेहता,

महापालिका आयुक्त

**आश्वासन क्रमांक ८१३**

पाचोरा नगरपरिषद पाचोरा जि. जळगांव
फोन नं. 02596-240166,240101 फॅक्स नं. 243155 ई-मेल :- copachora@gmail.com

------------------------000000------------------------

जा.क्र. पानपा/लेखा/3135 /२०१७
पाचोरा नगरपरिषद पाचोरा जि. जळगांव
दिनांक 28 /३/२०१७

प्रति,

मा. जिल्हाधिकारी सो.
जिल्हाधिकारी कार्यालय,
जळगांव

विषय :- महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१५ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन क्रमांक ८१३

संदर्भ :- मा. कक्ष अधिकारी, मुंबई यांचेकडील पत्र क्र. विसआ-२०१५/ प्र.क्र.१३१/नवि-१७ दिनांक १६/११/२०१५

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्रान्वये खालील प्रमाणे माहिती सादर करीत आहोत.

उपलब्ध निधी

| अनुदान | २०१४-१५ | आदेश क्रमांक व दिनांक | २०१५-१६ | आदेश क्रमांक व दिनांक | २०१६-१७ | आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| वैशिष्ट्यपूर्ण अनुदान | ०० | ---- | ३००००००० <br> ५००००००० | क्र. संकीर्ण- २०१५/ प्र.क्र.८१/ नवि-१६ दि. १८/११/२०१५ संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१०३/ नवि-३३ दि. ३१/३/२०१६ व क्र.एमयुआयडीसीएल/ पीएफपफ फॅन्ड/ युएलबी/ ११७३/२०१५-१६ दि. ३१/३/२०१६ | ३००००००० | क्र. संकीर्ण- २०१६/ प्र.क्र. २११(९१)/ नवि-१६ दिनांक २४ ऑगष्ट २०१६ |
| रस्ता अनुदान | ३८००००० | --- | ३५००००००० | क्र. जीईएन-२०१५/ प्र.क्र.८२/ नवि-१६ दि. ८ मार्च २०१६ | ३००००००० | क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २११/नवि-१६ दि. २४ ऑगष्ट २०१६ |
| दलीत वस्ती | ०० | ---- | ८१२२००० | क्र.विघयो/२०१४/प्र.क्र. ९५/नवि-४ दि.७/७/२०१५ | ३३६७२८९५ | क्र.विघयो/२०१४/प्र.क्र. ९५/नवि-४ दि.७/७/२०१५ |
| अल्पसंख्याक अनुदान | ०० | ---- | १०००००० <br> ६०००००० <br> २०००००० | क्र. क्षीविका-२०१५/ प्र.क्र.७६/(भाग-३)/का-९ दि. २१/११/२०१५ क्र. क्षीविका-२०१६/ प्र.क्र.४३/का-९ दि. ३१ मार्च २०१६ क्र. नाक्षीवि-२०१६/प्र.क्र.१३५/ १६/का-९ दि. २८/१२/२०१६ | ०० | ---- |

मुख्याधिकारी
पाचोरा नगरपरिषद पाचोरा

"वैशिष्टयपूर्ण" योजनेअंतर्गत नगरपरिषद/नगरपंचायत यांना निधी वितरीत करण्याबाबत.
सन २०१५-१६ साठी लेखाशिर्ष (२२१७ १३०१) खाली रक्कम रू. १५०.७५ कोटी.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
**शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८१/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १८ नोव्हेंबर, २०१५**

वाचा :-(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकीर्ण-१०२०००/प्र.क्र.४०/२०००/नवि-४, दिनांक २५ फेब्रुवारी,२०००.
(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-२००७/८७३/नवि-१६, दिनांक १६ फेब्रुवारी,२००८ व दिनांक ६ सप्टेंबर,२०१३
(३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५.
(४) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्र.शा.५ दिनांक २४ जुलै,२०१५

प्रस्तावना :-

राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांना वैशिष्ट्यपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्र. (३) व (४) येथील वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार "वैशिष्ट्यपुर्ण" या योजनेअंतर्गत राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांना "अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर" निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत त्यांना "वैशिष्ट्यपुर्ण" या योजनेअंतर्गत रक्कम रु.१५०,७५,००,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये एकशे पन्नास कोटी पंच्चाहत्तर लक्ष मात्र ) इतका निधी सोबत जोडलेल्या अनुसूचीनुसार नगरपरिषद/नगरपंचायत निहाय कामांना वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा ९०% हिस्सा राज्य शासनाचा व १०% हिस्सा नगरपरिषद/नगरपंचायत यांचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना सोबत जोडलेल्या अनुसूचीतील रकाना क्र. ५ मध्ये नमूद प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व तदनंतरच सदरचा निधी आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात यावा.

३. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा संबधित नगरपरिषद/नगरपंचायत राहील.

४. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

५. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

<u>६. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे. सदर योजनेंअतर्गत नाविण्यपूर्ण अभिनव अशा स्वरुपाचे

कामकाज नगरपरिषदेने हाती घेणे अपेक्षित असून अशा कामास प्राधान्य द्यावयाचे आहे. सदरहू काम नगरपरिषदेच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सदर योजनेंतर्गत हाती घेतलेले काम भांडवली स्वरुपाचे असावे ज्यायोगे भविष्यात नगरपालिकांना आर्थिक स्वयंपुर्ण होण्यासाठी कायम स्वरुपी उत्पनाचा स्त्रोत मिळून देण्याच्या दृष्टीने फायदेशीर राहील.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना “ई-निविदा” कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. “ई-निविदा” कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

७. <u>कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

८. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्यं संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

९. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१०. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे नगरपरिषद/नगरपंचायत यांना वितरण करण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी यांना नियंत्रक अधिकारी तसेच; संबधित जिल्हा प्रशासन अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सोबत जोडलेल्या अनुसूचीतील रकाना क्र. ६ मध्ये नमूद राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम संबधित जिल्हाधिकारी यांचेकडे नियंत्रक अधिकारी म्हणून वर्ग करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करून सदरच्या कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

११. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये “वैशिष्ट्यपूर्ण” या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून; सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्यानंतर व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदरचा निधी आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात यावा.

१४. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी ७५% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण

अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१२. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी.असे गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१३. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१४. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१५. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना निधी वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थाकडून राज्य शासनास येणे असणा-या रकमांचा आढावा संबधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावा व अशा रकमा वसूल करण्याबाबत आहरण व संवितरण अधिका-यास सूचित करावे.शासनास अशा येणे असणा-या रकमा वसूल करूनच उर्वरित निधी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस वितरीत करावा व वसूल केलेल्या रकमा शासनाच्या योग्य लेख्याखाली जमा करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिका-याने करावी.अशा कपात करण्यात आलेल्या रकमांमुळे प्रकल्प अपूर्ण राहणार नाही याची दक्षता घेण्याबरोबरच, अशी कपात केलेली रक्कम प्रकल्प पुर्ततेसाठी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील.

१६. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता/तांत्रिक मान्यता देण्यात आल्याची खातरजमा करावी. त्याचप्रमाणे वितरीत करण्यात येणारा निधी ठेव बांधकामाचे स्वरूपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करू नये.

१७. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक

२५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ अन्वये कार्यवाही करावी.

**१८.** वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १७ एप्रिल,२०१५ मधील सोबतच्या परिशिष्टाच्या अ.क्र. (९) मधील तपासणी सूचीतील अ.क्र. (५),(६),(७),(८) व (९) तसेच, शासन परिपत्रकामधील परिच्छेद (७) ते (१८) पैकी परिच्छेद क्र. (७),(८),(९),(१२),(१३),(१५), (१६) व (१८) लागू होत नाहीत.तसेच, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्र.शा.५ दिनांक २४ जुलै,२०१५ च्या परिच्छेद (अ) मधील अ.क्र. (६),(८),(९) व (१०) लागू होत नाहीत.उर्वरीत बाबींची उपरोक्त परिच्छेदांनुसार पुर्तता करण्यात आली आहे.

**१९.** यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, ८०, सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (४२) नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (वेतनेतर) , ३१ , सहायक अनुदाने (वेतनेतर) , (२२१७ १३०१), या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

**२०.** वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १७ एप्रिल,२०१५ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**२१.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१११८१७२२१९६५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Shankar Kumbhar

Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: CN = Vivek Shankar Kumbhar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = UNDER SECRETARY
Date: 2015.11.18 21:27:22 +05'30'

(विवेक कुंभार)

**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८

३. सर्व विभागीय आयुक्त

४. सर्व जिल्हाधिकारी

५. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव

६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,

७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,

८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१२. सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी

१३. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.

१४. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८१/नवि-१६, दिनांक :- १८ नोव्हेंबर, २०१५ सोबतची कामाची अनुसूची

| अ. क्र. | जिल्हा | नगरपरिषद/नगरपंचायत | कामाचे नाव | प्रकल्प खर्च (१००%) रक्कम (रू.) | राज्य शासनाचा हिस्सा (९०%) रक्कम (रू.) | नगरपरिषद/नगरपंचायतचा हिस्सा (१०%) रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पालघर | डहाणु नगरपरिषद | L.E.D. Lights करिता | ३३३३३३३३ | ३००००००० | ३३३३३३३ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **३०००००००** | |
| २ | रायगड | अलिबाग नगरपरिषद | वैशिष्ट्यपूर्ण कामांकरिता | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ३ | | पेण नगरपरिषद | | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ४ | | मुरुड जंजिरा नगरपरिषद | | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| ५ | | कर्जत नगरपरिषद | खुले नाटयगृह, क्रिडांगण, L.E.D. Lights करिता | ३३३३३३३३ | ३०००००००० | ३३३३३३३ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **८०००००००** | |
| ६ | रत्नागिरी | देवरुख नगरपंचायत | हिंदू स्मशानभूमी | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | करिता | | | |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१०००००००** | |
| ७ | सिंधुदुर्ग | मालवण नगरपरिषद | L.E.D. Lights करिता | ५५५५५५६ | ५०००००० | ५५५५५६ |
| ८ | | वेंगुर्ला नगरपरिषद | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१५००००००** | |
| ९ | नाशिक | भगुर नगरपरिषद | उद्यान विकासासाठी | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१०००००००** | |
| १० | अहमदनगर | पाथर्डी नगरपरिषद | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| ११ | | श्रीगोंदा नगरपरिषद | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **२००००००००** | |
| १२ | नंदुरबार | नंदुरबार नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| १३ | | शहादा नगरपरिषद | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **२००००००००** | |
| १४ | धुळे | सिंदखेडा नगरपंचायत | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१००००००००** | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | जळगाव | भुसावळ नगरपरिषद | | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| १६ | | चोपडा नगरपरिषद | | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| १७ | | फैजपुर नगरपरिषद | | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२२ |
| १८ | | जामनेर नगरपरिषद | | ४४४४४४४४ | ४०००००००० | ४४४४४४४४ |
| १९ | | पाचोरा नगरपरिषद | स्मशानभूमी बांधकाम | ३३३३३३३३ | ३०००००००० | ३३३३३३३३ |
| २० | | पारोळा नगरपरिषद | उद्यान व क्रिडा संकुल उर्वरित बांधकाम | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२२ |
| २१ | | रावेर नगरपरिषद | रस्ते कामासाठी | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२२ |
| २२ | | सावदा नगरपरिषद | | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२२ |
| २३ | | यावल नगरपरिषद | | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१८०००००००** | |
| २४ | पुणे | आळंदी नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२२ |
| २५ | | भोर नगरपरिषद | नगरपरिषद इमारत (उर्वरित काम) | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| २६ | | दौंड नगरपरिषद | दुकान केंद्र, सांस्कृतिक केंद्र आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २७ | | लोणावळा नगरपरिषद | प्रशासकीय इमारत फर्निचर करिता | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| २८ | | तळेगाव दाभाडे नगरपरिषद | शॉपिंग सेंटर | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **९००००००० ** | |
| २९ | सांगली | तासगाव नगरपरिषद | नाटयगृह इमारत | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **२००००००००** | |
| ३० | सातारा | सातारा नगरपरिषद | रस्ता पायाभूत सुविधांसाठी | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ३१ | | फलटण नगरपरिषद | स्मशान भूमी | ११११११११ | १०००००००० | १११११११ |
| | | | शॉपिंग सेंटर बांधकाम पूर्ण करण्यासाठी | ८३३३३३३ | ७५०००००० | ८३३३३३ |
| | | | नगरपरिषद इमारत बांधकाम | १३८८८८८९ | १२५००००० | १३८८८८९ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **५००००००००** | |
| ३२ | सोलापुर | कुर्डुवाडी नगरपरिषद | हायमास्ट दिवे बसविण्यासाठी | ११११११११ | १०००००००० | १११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१०००००००० ** | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | कोल्हापुर | इचलकरंजी नगरपरिषद | सामाजिक सभागृह, रस्ते व गटार बांधकाम | ३३३३३३३३ | ३००००००० | ३३३३३३३ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **३०००००००** | |
| ३४ | औरंगाबाद | गंगापुर नगरपरिषद | | २२२२२२२२ | २००००००० | २२२२२२२ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **२०००००००** | |
| ३५ | परभणी | गंगाखेड नगरपरिषद | अन्नछत्र बांधकामासाठी | ८३३३३३३ | ७५००००० | ८३३३३३ |
| | | | घाट विकास | २७७७७७८ | २५००००० | २७७७७८ |
| ३६ | | मानवत नगरपरिषद | नवीन प्रशासकीय इमारत | २२२२२२२२ | २००००००० | २२२२२२२ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **३०००००००** | |
| ३७ | हिंगोली | बसमतनगर नगरपरिषद | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| ३८ | | हिंगोली नगरपरिषद | तलाव सुशोभीकरण | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **२०००००००** | |
| ३९ | जालना | भोकरदन नगरपरिषद | सभागृह,हायमॅक्स व स्ट्रीट लाईट | ११११११११ | १००००००० | ११११११११ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४० | | परतुर नगरपरिषद | नाट्यगृह बांधकाम | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| | | जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू) | | | ३०००००००० | |
| ४१ | नांदेड | कंधार नगरपरिषद | दुकान-गाळे बांधकाम | ३६१११११११ | ३२५०००००० | ३६११११११ |
| ४२ | | धर्माबाद नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| ४३ | | मुखेड नगरपरिषद | I.E.D. Lights बसविण्यासाठी | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ४४ | | किनवट नगरपरिषद | प्रशासकीय इमारत उर्वरीत कामे | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| | | जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू) | | | ७२५०००००० | |
| ४५ | बीड | अंबेजोगाई नगरपरिषद | | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| ४६ | | बीड नगरपरिषद | व्यापारी संकुल | २७७७७७७८ | २५०००००० | २७७७७७८ |
| ४७ | | धारुर नगरपरिषद | | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| ४८ | | गेवराई नगरपरिषद | | २७७७७७७८ | २५०००००० | २७७७७७८ |
| ४९ | | माजलगाव नगरपरिषद | इमारत बांधकाम | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| ५० | | परळी वैजनाथ नगरपरिषद | नवीन इमारत , नाट्यगृह | २७७७७७७८ | २५०००००० | २७७७७७८ |
| | | जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू) | | | १०५०००००० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | बुलढाणा | चिखली नगरपरिषद | व्यापारी संकुल बांधकाम | २२२२२२२२ | २००००००० | २२२२२२२ |
| ५२ | | देऊळगाव राजा नगरपरिषद | कार्यालयीन इमारत बांधकाम | ३३३३३३३३ | ३००००००० | ३३३३३३३ |
| ५३ | | जळगाव (जामोद) नगरपरिषद | सांस्कृतिक भवन, बांधकाम व बगीचा | २२२२२२२२ | २००००००० | २२२२२२२ |
| ५४ | | शेगाव नगरपरिषद | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| ५५ | | नांदुरा नगरपरिषद | पंचवटी पुलाचे बांधकाम व इतर वैशिष्ट्यपूर्ण योजनांसाठी | ३३३३३३३३ | ३०००००००० | ३३३३३३३ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **११००००००००** | |
| ५६ | अमरावती | मोर्शी नगरपरिषद | I.E.D. Lights बसविण्यासाठी | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ५७ | | धामणगाव रेल्वे नगरपरिषद | भाजी बाजार, दुकान संकुल, प्रशासकीय इमारत, जलतरण तलाव | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ५८ | | शेंदुरजनाघाट नगरपरिषद | जलतरण तलाव | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **६००००००००** | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५९ | यवतमाळ | दिग्रस नगरपरिषद | | ५००००००० | ४५०००००० | ५००००००० |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **४५००००००** | |
| ६० | वाशिम | कारंजा नगरपरिषद | प्रशासकीय इमारत बांधकामासाठी | २२२२२२२२ | २००००००० | २२२२२२२ |
| ६१ | | वाशिम नगरपरिषद | नाट्यगृह बांधकाम पूर्ण करण्यासाठी | ३३३३३३३३ | ३००००००० | ३३३३३३३ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **५५००००००** | |
| ६२ | अकोला | मुर्तीजापुर नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ५००००००० | ४५०००००० | ५०००००० |
| ६३ | | तेल्हारा नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **५५००००००** | |
| ६४ | नागपूर | कळमेश्वर नगरपरिषद | नगरपरिषद हायस्कुल इमारत | २२२२२२२२ | २००००००० | २२२२२२२ |
| ६५ | | कामठी नगरपरिषद | व्यापारी संकुल, वाहन पार्कींग,प्रशासकीय इमारत | २२२२२२२२ | २००००००० | २२२२२२२ |
| ६६ | | काटोल नगरपरिषद | | ११११११११ | १००००००० | ११११११११ |
| ६७ | | नरखेड नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | १६६६६६६७ | १५०००००० | १६६६६६७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६८ | | रामटेक नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ४४४४४४४४ | ४०००००००० | ४४४४४४४ |
| ६९ | | सावनेर नगरपरिषद | I.E.D. Lights बसविण्यासाठी | ५५५५५५५६ | ५०००००००० | ५५५५५५६ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१५५००००००** | |
| ७० | गोंदिया | तिरोरा नगरपरिषद | मल्टीपरपज हॉल | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१०००००००** | |
| ७१ | वर्धा | आर्वी नगरपरिषद | मुस्लिम समाजा करिता सामाजिक सभागृह, आठवडी बाजार | ११११११११ | १०००००००० | ११११११११ |
| ७२ | | वर्धा नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ७३ | | देवळी नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ३३३३३३३३ | ३०००००००० | ३३३३३३३ |
| | | | नाट्यगृह | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |
| ७४ | | हिंगणघाट नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ४४४४४४४४ | ४०००००००० | ४४४४४४४ |
| | | **जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू)** | | | **१२००००००००** | |
| ७५ | चंद्रपुर | ब्रम्हपुरी नगरपरिषद | तलाव सौंदर्यीकरण | २२२२२२२२ | २०००००००० | २२२२२२२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू) | | | २०००००००० | |
| ७६ | गडचिरोली | देसाईगंज नगरपरिषद | प्रशासकीय इमारत | ३३३३३३३३ | ३०००००००० | ३३३३३३३ |
| | | जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू) | | | ३०००००००० | |
| सर्व जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द एकूण रक्कम (रू) | | | | १६९७२२२२२२ | १५२७५००००० | १६९७२२२२२ |

**"वैशिष्टयपूर्ण" योजनेअंतर्गत नगरपरिषद/नगरपंचायत यांना निधी वितरीत करण्याबाबत.**

सन २०१५-१६ साठी लेखाशिर्ष (२२१७ १३०१) खाली रक्कम रू. १६९.९२ कोटी.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८१/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ३१ मार्च, २०१६.**

वाचा :-

(१)शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकीर्ण-१०२०००/प्र.क्र.४०/२०००/नवि-४, दिनांक २५ फेब्रुवारी,२०००.

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-२००७/८७३/नवि-१६, दिनांक १६ फेब्रुवारी,२००८ व दिनांक ६ सप्टेंबर,२०१३.

(३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५.

(४) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्र.शा.५ दिनांक २४ जुलै,२०१५.

(५) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.- अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३,दिनांक ६ फेब्रुवारी,२०१६.

(६) नगर विकास विभाग पुनर्विनियोजन आदेश क्रमांक बीयुडी-१८१६/प्र.क्र.५२/नवि-४ दिनांक ३१ मार्च,२०१६.

प्रस्तावना :-

राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांना वैशिष्ट्यपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्र. (३), (४) व (५) येथील वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार "वैशिष्ट्यपुर्ण" या

योजनेअंतर्गत राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांना "अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर" निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांना "वैशिष्ट्यपुर्ण" या योजनेअंतर्गत रक्कम रु.१६९,९२,६२,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये एकशे एकोणसत्तर कोटी ब्याण्णव लक्ष बासष्ट हजार मात्र ) इतका निधी सोबत जोडलेल्या अनुसूचीनुसार नगरपरिषद/नगरपंचायत निहाय कामांना वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा ९०% हिस्सा राज्य शासनाचा व १०% हिस्सा नगरपरिषद/नगरपंचायत यांचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना राज्य शासनाच्या (९०%) व नगरपरिषद/नगरपंचायत (१०%) यांच्या एकत्रित प्रकल्प खर्चाच्या (१००%) मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

३. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा संबधित नगरपरिषद/नगरपंचायत राहील.

४. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

५. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

<u>६. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची

खातरजमा करणे.सदर योजनेंअतर्गत नाविण्यपूर्ण अभिनव अशा स्वरुपाचे कामकाज नगरपरिषदेने हाती घेणे अपेक्षित असून अशा कामास प्राधान्य द्यावयाचे आहे. सदरहू काम नगरपरिषदेच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सदर योजनेंतर्गत हाती घेतलेले काम भांडवली स्वरुपाचे असावे ज्यायोगे भविष्यात नगरपालिकांना आर्थिक स्वयंपुर्ण होण्यासाठी कायम स्वरुपी उत्पनाचा स्त्रोत मिळून देण्याच्या दृष्टीने फायदेशीर राहील.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.तसेच दर सहा महिन्यांनी जिल्ह्याअंतर्गत या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचा आढावा घेणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

७. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

८. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

९. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१०. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे नगरपरिषद/नगरपंचायत यांना वितरण करण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी यांना नियंत्रक अधिकारी तसेच, संबधित जिल्हा प्रशासन अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सोबत जोडलेल्या अनुसूचीतील रकाना क्र. ५ मध्ये नमूद राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम संबधित जिल्हाधिकारी यांचेकडे नियंत्रक अधिकारी म्हणून वर्ग करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करून सदरच्या कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

११. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये “वैशिष्ट्यपूर्ण” या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१२. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी ७५% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी

यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

**१३.** या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी.असे गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

**१४.** या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

**१५.** आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

**१६.** संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता/तांत्रिक मान्यता देण्यात आल्याची खातरजमा करावी. त्याचप्रमाणे वितरीत करण्यात येणारा निधी ठेव बांधकामाचे स्वरूपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करू नये.

**१७.** या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ अन्वये कार्यवाही करावी.

**१८.** वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १७ एप्रिल,२०१५ मधील सोबतच्या परिशिष्टाच्या अ.क्र. (९) मधील तपासणी सूचीतील अ.क्र. (५),(६),(७),(८) व (९) तसेच, शासन परिपत्रकामधील परिच्छेद (७) ते (१८) पैकी परिच्छेद क्र. (७),(८),(९),(११),(१२),(१३),(१५), (१६) व (१८) लागू होत नाहीत.तसेच, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्र.शा.५ दिनांक २४ जुलै,२०१५ च्या परिच्छेद (अ) मधील अ.क्र. (६),(८),(९) व (१०) लागू होत नाहीत.उर्वरीत बाबींची उपरोक्त परिच्छेदांनुसार पुर्तता करण्यात आली आहे.

**१९.** यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, ८०, सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (४२) नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (वेतनेतर) , ३१ , सहायक अनुदाने (वेतनेतर) , (२२१७ १३०१), या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

**२०.** वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १७ एप्रिल,२०१५ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**२१.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३३१११२००२११२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Shankar Kumbhar

Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: CN = Vivek Shankar Kumbhar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = UNDER SECRETARY
Date: 2016.03.31 16:20:20 +05'30'

(विवेक कुंभार)

**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. सर्व विभागीय आयुक्त
४. जिल्हाधिकारी,
५. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

११. जिल्हा कोषागार अधिकारी,

१२. जिल्हा प्रशासन अधिकारी,

१३. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.

१४. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

| अ.क्र. | जिल्हा | नगरपरिषद/ नगरपंचायत | कामाचे नाव | १०% राज्य शासनाचा हिस्सा (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पालघर | डहाणू | स्मशानभूमी बांधकाम | १,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **१,००,००,०००** |
| २ | ठाणे | अंबरनाथ | JNNURM योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या भूयारी गटार योजना पूर्ण करण्यासाठी | १०,००,००,००० |
| ३ | | मुरबाड | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **१२,००,००,०००** |
| ४ | रायगड | रोहा | वैशिष्ट्यपूर्ण योजना | १,००,००,००० |
| ५ | | कर्जत | खुले नाट्यगृह व नाट्यगृहास कंपाऊंड वॉल बांधकामासाठी | २,००,००,००० |
| नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | ३,००,००,००० |
| ६ | रत्नागिरी | राजापूर | स्मशानभूमी व इतर विविध विकास कामे | १,००,००,००० |
| नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | १,००,००,००० |
| ७ | सिंधुदूर्ग | वेंगुर्ला | इमारत बांधकाम | ५,००,००,००० |
| नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | ५,००,००,००० |
| ८ | नंदुरबार | नंदुरबार | प्रशासकीय इमारत बांधकाम | १,००,००,००० |
| नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | १,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | जळगाव | फैजपूर | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ३,००,००,००० |
| १० | | | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ३,००,००,००० |
| ११ | | सावदा | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| १२ | | यावल | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| १३ | | अंमळनेर | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **१२,००,००,०००** |
| १४ | अहमदनगर | पाथर्डी | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ५,००,००,००० |
| १५ | | राहता | वैशिष्ट्यपूर्ण योजना | १,००,००,००० |
| १६ | | कोपरगाव | शॉपिंग सेंटर | ५,००,००,००० |
| १७ | | कर्जत | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **१३,००,००,०००** |
| १८ | पुणे | लोणावळा | प्रशासकीय इमारतीच्या फर्निचरकरिता | २,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **२,००,००,०००** |
| १९ | जालना | भोकरदन | सभागृह बांधकाम,हायमॅक्स लाईट व स्ट्रीट लाईट करिता | ४,००,००,००० |
| २० | | बदनापूर | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ३,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **७,००,००,०००** |
| २१ | परभणी | पूर्णा | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ३,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **३,००,००,०००** |
| २२ | हिंगोली | हिंगोली | तलाव सुशोभिकरणासाठी | १,००,००,००० |
| २३ | | वसमत | प्राथमिक सोई-सुविधा व उद्यान विकासाठी | २,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **३,००,००,०००** |
| २४ | नांदेड | कंधार | दुकान-गाळे बांधकामासाठी | ३,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **३,००,००,०००** |
| २५ | बीड | वडवणी | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| २६ | | | व्यापारी संकुल बांधकामासाठी | ४,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **६,००,००,०००** |
| २७ | अमरावती | शेंदुरजनाघाट | LED Lights करिता | १,००,००,००० |
| २८ | | | जलतरण तलाव बांधण्यासाठी | २,००,००,००० |
| २९ | | | सातनुर चौफुलीवरिल स्मशानभुमी विकास बांधकामासाठी | १,००,००,००० |
| ३० | | वरूड | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ४,००,००,००० |
| ३१ | | मोर्शी | जलतरण तलाव व LED Lights करिता | २,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **१०,००,००,०००** |
| ३२ | वाशिम | मानोरा | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ३,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **३,००,००,०००** |
| ३३ | बुलढाणा | नांदुरा | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ५,००,००,००० |
| ३४ | | जळगाव-जामोद | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ६,९२,६२,००० |
| ३५ | | मलकापूर | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ४,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **१५,९२,६२,०००** |
| ३६ | यवतमाळ | यवतमाळ | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ४,००,००,००० |
| ३७ | | नेर-नवाबपूर | व्यापारी संकुल बांधकामासाठी | ५,००,००,००० |
| ३८ | | | LED Lights करिता | ४,००,००,००० |
| ३९ | | पांढरकवडा | वैशिष्ट्यपूर्ण योजना | १,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | | कळंब | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| ४१ | | राळेगाव | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| ४२ | | बाभुळगाव | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| ४३ | | उमरखेड | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ३,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **२३,००,००,०००** |
| ४४ | नागपूर | कन्हान-पिंपरी | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| ४५ | | हिंगणा | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| ४६ | | कामठी | व्यापारी संकुल बांधकामासाठी | २,००,००,००० |
| ४७ | | मोवाड | स्मशानभूमी व आठवडी बाजारकरिता | ५,००,००,००० |
| ४८ | | काटोल | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ४,००,००,००० |
| ४९ | | उमरेड | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ६,००,००,००० |
| ५० | | रामटेक | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| ५१ | | वाडी | प्रशासकीय इमारत,बाजारपेठ बांधकाम व बगिचा सुशोभिकरण | ३,००,००,००० |
| ५२ | | कळमेश्वर | जलतरण केंद्र आणि तलाव विद्युतीकरणासाठी | ३,००,००,००० |
| ५३ | | महादुला | वैशिष्ट्यपूर्ण योजना | २,००,००,००० |
| **नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.)** | | | | **३१,००,००,०००** |
| ५४ | वर्धा | वर्धा | क्रिडांगण-उद्यान विकासाठी | ४,००,००,००० |
| ५५ | | सेलू | वैशिष्ट्यपूर्ण योजना | १,००,००,००० |
| ५६ | | हिंगणघाट | प्रशासकीय इमारत बांधकाम व प्राथमिक सोई-सुविधांसाठी | ४,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | ९,००,००,००० |
| ५७ | भंडारा | भंडारा | IHSDP योजनेअंतर्गत भंडारा टप्पा क्र.२ येथील घरकुलांसाठी विशेष बाब | ३,००,००,००० |
| नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | ३,००,००,००० |
| ५८ | गडचिरोली | गडचिरोली | वैशिष्ट्यपूर्ण योजना | ३,००,००,००० |
| नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | ३,००,००,००० |
| नियंत्रक अधिकारी म्हणून सर्व जिल्हाधिकारी यांचेकडे सपूर्द रक्कम (रू.) | | | | १,६९,९२,६२,००० |

"वैशिष्टयपूर्ण" योजनेअंतर्गत नगरपरिषदांना निधी वितरीत करण्याबाबत.
सन २०१६-१७ साठी लेखाशिर्ष (२२१७ १३०१) खाली रक्कम रू. २३६.३९ कोटी.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१०/नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ ऑगस्ट, २०१६.

वाचा :-

(१)शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकीर्ण-१०२०००/प्र.क्र.४०/२०००/नवि-४, दिनांक २५ फेब्रुवारी,२०००.

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-२००७/८७३/नवि-१६, दिनांक १६ फेब्रुवारी,२००८ व दिनांक ६ सप्टेंबर,२०१३.

(३)वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९ /अर्थ-३,दिनांक २० एप्रिल,२०१६

(४) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३१ /कोषा.प्रशा.-५ ,दिनांक १० मे,२०१६

(५) शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण- २०१६/प्र.क्र.१३९/नवि-१६ दिनांक २८ एप्रिल,२०१६.

(६) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण- २०१६/प्र.क्र.१४५/नवि-१६, दिनांक ११ मे,२०१६

(७) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६ /नवि-१६, दिनांक ३ ऑगस्ट,२०१६

प्रस्तावना :-

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्र. (३) व (४) येथील

वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच, संदर्भाधीन क्र (५), (६) व (७) येथील नगर विकास विभागाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार "वैशिष्ट्यपुर्ण" या योजनेअंतर्गत राज्यातील नगरपरिषदांना "अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर" निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील नगरपरिषदांना "वैशिष्ट्यपुर्ण" या योजनेअंतर्गत रक्कम **रु.२३६,३९,००,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये दोनशे छत्तीस कोटी एकोणचाळीस लक्ष मात्र)** इतका निधी नगरपरिषदांना वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा ९०% हिस्सा राज्य शासनाचा व १०% हिस्सा नगरपरिषदांना यांचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना राज्य शासनाच्या (९०%) व नगरपरिषद/नगरपंचायत (१०%) यांच्या एकत्रित प्रकल्प खर्चाच्या (१००%) मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

३. सदर योजनेअंतर्गत निधी वितरीत करावयाच्या नगरपरिषदा व सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

५. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

<u>६. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक

नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.सदर योजनेंअतर्गत नाविण्यपूर्ण अभिनव अशा स्वरुपाचे कामकाज नगरपरिषदेने हाती घेणे अपेक्षित असून अशा कामास प्राधान्य द्यावयाचे आहे. सदरहू काम नगरपरिषदेच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सदर योजनेंतर्गत हाती घेतलेले काम भांडवली स्वरुपाचे असावे ज्यायोगे भविष्यात नगरपालिकांना आर्थिक स्वयंपुर्ण होण्यासाठी कायम स्वरुपी उत्पनाचा स्त्रोत मिळून देण्याच्या दृष्टीने फायदेशीर राहील.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.तसेच दर सहा महिन्यांनी जिल्ह्याअंतर्गत या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचा आढावा घेणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेचा (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठल्याही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

७. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे (Third Party Audit)कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

८. यापूर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

९. दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०१६-२०१७ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१०. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे कार्यान्वयन यंत्रणेस वितरण करण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी यांना नियंत्रक अधिकारी तसेच, संबधित जिल्हा प्रशासन अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सोबत जोडलेल्या अनुसूचीतील रकाना क्र. ५ मध्ये नमूद राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम संबधित जिल्हाधिकारी यांचेकडे नियंत्रक अधिकारी म्हणून वर्ग करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करून सदरच्या कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

११. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये "वैशिष्ट्यपूर्ण" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१२. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी

१००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

**१३.** या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी.असे गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

**१४.** या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

**१५.** आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०१८ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

**१६.** राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी संबधित कार्यान्वयन यंत्रणा यांना **कोणत्याही प्रकारची कपात न करता** वितरीत करण्यात यावा.सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी थेट वळता करू नये.

**१७.** या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ अन्वये कार्यवाही करावी.

१८. वित्त विभागाचे शासन परिपत्रक अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९ /अर्थ-३,दिनांक २० एप्रिल,२०१६ मधील सोबतच्या परिशिष्टाच्या अ.क्र. (९) मधील तपासणी सूचीतील अ.क्र. (५),(६),(७),(८) व (९) तसेच, शासन परिपत्रकामधील परिच्छेद (७) ते (१८) पैकी परिच्छेद क्र. (७),(८),(१२),(१३),(१४),(१५), (१६) व (१८) लागू होत नाहीत.तसेच, वित्त विभागाचे शासन परिपत्रक संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३१ /कोषा.प्रशा.-५ ,दिनांक १० मे,२०१६ च्या परिच्छेद (अ) मधील अ.क्र. (६),(८),(९) व (१०) लागू होत नाहीत.उर्वरीत बाबींची उपरोक्त परिच्छेदांनुसार पुर्तता करण्यात आली आहे.

**१९.** यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, ८०, सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (४२) नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (वेतनेतर) , ३१ , सहायक अनुदाने (वेतनेतर) , (२२१७ १३०१), या लेखाशिर्षाखाली सन २०१६-२०१७ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

**२०.** वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९ /अर्थ-३,दिनांक २० एप्रिल,२०१६ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**२१.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८२४१७३८२३२५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Shankar Kumbhar

Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: CN = Vivek Shankar Kumbhar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = UNDER SECRETARY
Date: 2016.08.31 10:20:41 +05'30'

(विवेक कुंभार)

**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी
१३. संबधित सर्व नगरपरिषदा
१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**आश्वासन क्रमांक ९४२**

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : टिपीबी ४३१४ /प्र.क्र.२०१/२०१४ / नवि-११
नगर विकास विभाग, शिबिर कार्यालय, नागपूर.
दिनांक :- ८/१२/२०१५

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका.

**विषय :-** बृहन्मुंबई क्षेत्राची सुधारित प्रारुप विकास योजना २०१४-२०३४ महानगरपालिका क्षेत्रातील कोळीवाडे व आदिवासी पाडे विकास योजनेवर दर्शविणेबाबत......

महोदय,

शासन नगरविकास विभागाकडील दिनांक ८.५.२०१२ च्या अधिसूचनेन्वये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल मंजूर होवून गावठाण पुनर्विकासाच्या तरतूदी कोळीवाडयांनाही लागू करणेत आलेल्या आहेत. बृहन्मुंबई क्षेत्राची सुधारित प्रारुप विकास योजना पुनर्प्रसिध्द करणेची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सबब सदर प्रारुप विकास योजनेमध्ये कोळीवाडे तसेच आदिवासी पाड्यांच्या हद्दी बिनचूकपणे दर्शविण्याची दक्षता घेण्यात यावी, असे आपणांस कळविण्याच्या मला सूचना आहेत.

आपला

(किशोर द. गिरोल्ला)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.

आश्वासन क्रमांक ११६२

**तात्काळ**

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. ०२२ २२७९४१९५
Email: samadhan.khatkale@nic.in
https://urban.maharashtra.gov.in

क्रमांक : सिआयडी-३३१६/५/प्र.क्र.१०/नवि-१०
नगर विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
दिनांक : ८ नोव्हेंबर, २०१६

प्रति,

१) **विभागीय आयुक्त,**
कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई-४०००२१.

२) **व्यवस्थापकीय संचालक,**
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको),
निर्मल, दुसरा मजला, नरीमन पॉइंट,
मुंबई-४०० ०२१.

३) **अध्यक्ष,**
जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट,
११०७, रहेजा केंद्र, एफपीजे मार्ग,
नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.

४) **जिल्हाधिकारी, रायगड**

**विषय:-** विधानसभा विनंती अर्ज समितीचा अहवाल (२०१५-२०१६)
नवीन शेवा (ता.उरण, जि.रायगड) या गावाच्या पुनर्वसनाकरिता जेएनपीटीने शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतरही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नसल्याबाबत...

**संदर्भ :-** १) शासनपत्र समक्रमांक दि.१८.७.२०१६
२) विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.३३३१५/मविस, दि.४.८.२०१६

महोदय,

नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा या गावांच्या पुनर्वसनाबाबत आपल्या कार्यालयाकडून सादर केलेले अहवाल व विनंती अर्ज समितीसमोर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने आपणांस पुढीलप्रमाणे कळविण्याचे निदेश आहेत :-

(अ) नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनासाठी त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या जमीनीपैकी जमीन सिडको महामंडळाने द्यावी.

(ब) हनुमान कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनासाठी जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी जमीन उपलब्ध करुन द्यावी व पुनर्वसनाची कार्यवाही करावी तसेच सध्याची जमीन जे.एन.पी.टी. ने ताब्यात घेऊन योग्य वापर करावा.

आपला,

**( समाधान खटकाळे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

एचबी ०३३९-६४अ

आश्वासन क्रमांक ४४०

गोपनीय

**महाराष्ट्र शासन**

**क्रमांक: विसताप्र-२०१५/प्र.क्र. ३७/नवि-33**
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक :-** ०६ मार्च, २०१७.

प्रति,
आयुक्त तथा संचालक,
नगर परिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई

**विषय:-** महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर **लोणावळा भुयारी गटार प्रकल्पामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.....**

**संदर्भ:-** जिल्हाधिकारी पुणे यांचा पत्र क्रमांक जावक क्र.पसन./कावि/२१४७/१६, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१६ अन्वये प्राप्त अहवाल. **(संलग्न)**

**महोदय,**

राज्य शासन पुरस्कृत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत **लोणावळा शहराच्या भुयारी गटार प्रकल्पास** शासनाने मान्यता दिलेली आहे.

०२. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शासनाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रामुख्याने खालीलप्रमाणे **गंभीर स्वरुपाच्या वित्तिय अनियमितता** झाल्याचे निदर्शनास येत आहे.

- सदर प्रकल्पासाठी नेमलेल्या ठेकेदारास मोबिलायझेशन ॲडव्हान्स देयक अदा करणेकामी त्यास वित्तिय मान्यता दिलेली नसणे.
- तत्कालिन मुख्याधिकारी, अभियंता व लेखाधिकारी व संबंधित कर्मचारी यांच्याकडून आवश्यक दक्षता घेण्यात आली नसल्याने बनावट बँक गॅरंटीच्या पोटी मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिल्यामुळे नगरपरिषदेची आर्थिक फसवणूक होणे.
- मोबिलायझेशन ॲडव्हान्स रक्कम वसुल करण्यास अपयश येणे.
- सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये दुर्लक्ष झाल्यामुळे प्रकल्पाचे काम रखडणे व याबाबत शासनाने वितरीत केलेला निधी अखर्चित राहणे.
- शहरास मुलभूत पायाभूत सुविधांपासून वंचित रहावे लागणे.

०३. सबब उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्याचे मला निदेश आहेत.

१. सदर **गंभीर वित्तिय अनियमिततेच्या अनुषंगाने** जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांची **विभागीय चौकशी** करण्यात यावी.

२. सदर चौकशीबाबत **नेमके दोषारोप निश्चित करून** सदर **विभागीय चौकशी विहित कालावधीत पूर्ण करून घेण्याची जबाबदारी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय** यांची राहील.

३. विभागीय चौकशीच्या आधारे **संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.**

४. याबाबतची संपूर्ण कार्यवाही ही **विहित कालावधीमध्ये** पूर्ण होईल याबाबत आवश्यक **दक्षता घेण्याच्या सूचना** कृपया **संबंधितांना** देण्यात याव्यात, ही विनंती.

**आपला,**

**(निलेश पोतदार)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: विसताप्र-२०१५/प्र.क्र. ३७/नवि-33
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक** :- ३१ जुलै, २०१७.

प्रति,
**सदस्य सचिव,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.**

**विषय**:- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर **लोणावळा भुयारी गटार प्रकल्पाबाबत......**

**महोदय,**

राज्य शासन पुरस्कृत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत **लोणावळा शहराच्या भुयारी गटार प्रकल्पास** शासनाने मान्यता दिलेली आहे.

०२. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शासनाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाचे कंत्राटदार मे. **सुनिल फार्म इंजिनियरिंग कंपनी** यांनी लोणावळा नगरपरिषदेकडून अदा करण्यात आलेल्या मोबिलायझेशन ॲडव्हान्स पोटी अदा केलेली **बँक गॅरंटी खोटी** असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

०३. सबब मे.सुनिल फार्म इंजिनियरिंग कंपनी यांचे संचालक भागीदार यांनी **खोट्या व बनावट अनामत रकमेच्या कॉल डिपॉझिट रिसिट दाखल करुन लोणावळा नगरपरिषदेची फसवणूक केली असल्याबाबत** लोणावळा नगरपरिषदेमार्फत **लोणावळा शहर पोलिस स्थानक येथे दिनांक ०६ एप्रिल, २०१३ रोजी तक्रार (FIR) क्र.३८/२०१३ दाखल करण्यात आली आहे.**

०४. सबब उपरोक्त अनुषंगाने शासनाच्या मान्यतेनुसार **उपरोक्त नमूद कंत्राटदारास काळया यादीमध्ये टाकणेबाबत आवश्यक कार्यवाही कृपया तात्काळ** करण्यात यावी. सदर अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कृपया अवगत करावे, ही विनंती.

**आपला,**

३१/०७/१७
(निलेश पोतदार)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

आश्वासन क्रमांक १६५

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : मबाआ-२०१५/प्र.क्र.१७४ (भाग-१)/का.०७
महिला व बाल विकास विभाग,
३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दुरभाष:-०२२-२२८८०३११
दिनांक ०१ जुलै, २०१७

विषय :- श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , यांच्याविरुध्द विभागीय चौकशी.

ज्ञापन :-

शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नियम क्र ८ अन्वये श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , सध्या कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव यांच्या गैरवर्तणूकी बाबत खातेनिहाय चौकशी करण्याचे ठरविले आहे.

२. ज्याबाबत चौकशी करण्याचे ठरविले आहे अशा गैरवर्तणूकीच्या/ अनियमितेच्या दोषारोपांचा गोषवारा जोडपत्र १ मध्ये दिलेला आहे. प्रत्येक दोषारोपाच्या पृष्ठयार्थ गैरवर्तणूकीच्या/अनियमितेच्या आरोपांचे विवरणपत्र जोडपत्र २ सोबत जोडण्यात आलेले आहे. साक्षीदारांची यादी व ज्या दस्ताऐवजावरून दोषारोपाच्या बाबींना पुष्टी देण्याची योजले आहे, त्याची यादी सुद्धा सोबत जोडली आहे.(जोडपत्र ३ व ४)

३. श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , सध्या कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव हे ज्ञापन मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्यांचे बचावाचे लेखी निवेदन सादर करावे. तसेच त्यांचे म्हणणे व्यक्तीश: मांडण्याची त्यांची इच्छा असेल तर त्यांनी तसेही नमूद करावे.

४. श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , सध्या कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव त्यांना असे कळविण्यात येत आहे की, जे दोषारोप त्यांनी कबूल केलेले नाहीत फक्त तेवढयाच द्रोषारोपाच्या बाबतीत चौकशी केली जाईल. म्हणून त्यांनी प्रत्येक दोषारोप विनिर्देशपूर्वक कबूल किंवा नाकबूल केला पाहिजे.

५. श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , सध्या कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव यांना आणखी असे कळविण्यात येत आहे की, त्यांनी वरील परिच्छेद ३ मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या कालावधीत किंवा त्यापूर्वी आपल्या बचावाचे लेखी निवेदन सादर केले नाही किंवा चौकशी अधिका-यांपुढे ते व्यक्तीश: हजर झाले नाहीत किंवा त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ मधील तरतूदींचे किंवा उक्त नियमानुसार काढण्यांत आलेल्या आदेशांचे अनुपालन करण्यात त्यांनी अन्यथा कसूर केली व नकार दिला तर चौकशी प्राधिका-यास त्यांचे विरुध्द एकतर्फी चौकशी चालू करता येईल.

६. श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , सध्या कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव यांचे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९च्या नियम क्र (२३) कडे लक्ष वेधण्यांत येत आहे. या नियमानुसार कोणत्याही शासकीय कर्मचा-याला त्याच्या शासकीय सेवेसंबंधीच्या कोणत्याही बाबतीत त्याच्या हितसंबंधास पोषक होईल, अशा प्रकारे वरिष्ठ प्राधिका-यावर कोणताही राजकीय अथवा बाहय दबाव आणता येणार नाही किंवा आणण्याचा प्रयत्न करता येणार नाही. याबाबतीत त्यांच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तींकडून या शिस्तभंग कार्यवाही संबंधात अभिवेदन आल्यास श्रीम. बागुल यांना असे अभिवेदन केले असल्याची माहीती होती ते त्यांच्या सांगण्यावरुन करण्यात आले आहे, असे गृहीत धरण्यात येईल व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ मधील नियम क्र (२३) चे उल्लंघन केल्याबद्दल त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

निर्गमित
दिनांक:

( ला.रा.गुजर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , सध्या कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव यांना आयुक्त महिला व बालविकास पुणे यांच्यामार्फत.

प्रतीलिपी आयुक्त महिला व बाल विकास पुणे यांच्याकडे ३ प्रतीत अग्रेषित, त्यांना विनंती करण्यात येते की, श्रीमती सरस्वती बागुल, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बदलापूर , सध्या कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव यांच्यावर १ प्रत बजावावी व १ प्रतीवर पोच घेऊन ती शासनास उपलब्ध करून द्यावी.

श्रीम. सरस्वती नामदेव बागुल,तत्कालीन. बाल विकास प्रकल्प अधिकारी, उल्हासनगर-बदलापूर यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबत. "चौकशी अधिकारी" ची नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन आदेश क्र..मबाआ-२०१५/प्र.क्र.१७४ (भाग-१)/का-७
३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २९ नोंव्हेबर, २०१७

वाचा : १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसपीओ ८०७/प्र.क्र.२१/०७/११ अ दिनांक २८ ऑक्टोबर २००९.

आदेश

ज्या अर्थी श्रीम. सरस्वती नामदेव बागुल,तत्कालीन. बाल विकास प्रकल्प अधिकारी, उल्हासनगर-बदलापूर यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम क्र. ८ अन्वये चौकशी सुरु करण्यात आली आहे.

२. आणि ज्याअर्थी त्यांच्याविरुध्दच्या दोषारोपाबाबत सविस्तर चौकशी करण्याकरिता चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी असे शासनास वाटते.

३. त्याअर्थी आता शासन महाराष्ट्र नागरी सेवा (नियम शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ पोट नियम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर श्रीम. सरस्वती नामदेव बागुल,तत्कालीन. बाल विकास प्रकल्प अधिकारी, उल्हासनगर-बदलापूर यांचेविरुध्द दोषारोपांबाबत चौकशी करण्याकरिता प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी,कोकण विभाग यांची ' चौकशी अधिकारी ' म्हणून नियुक्ती करीत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(त्वा.रा.गुजर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,(नोंदणीकृत पोच देय डाकेने)

प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी,कोकण विभाग, नवी मुंबई यांना खालील कागदपत्रासह अग्रेषित.

१) श्रीम. सरस्वती नामदेव बागुल,तत्कालीन. बाल विकास प्रकल्प अधिकारी, उल्हासनगर-बदलापूर यांच्याविरुद्धचे दोषारोप पत्रे व विवरणपत्र
२) अपचाराचे बचावाचे निवेदन
३) सादरकर्ता अधिकारी नियुक्ती आदेशाची प्रत

प्रत (पोच देय डाकेने)

१) श्री. बी.जी.तांबे, सहाय्यक आयुक्त तथा सादरकर्ता अधिकारी,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
२) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांना विनंती करण्यात येते की, श्रीम. सरस्वती नामदेव बागुल,तत्कालीन. बाल विकास प्रकल्प अधिकारी, उल्हासनगर-बदलापूर, यांना त्यांचे नावाचे सीलबंद पाकीट पोहचते करुन त्यांच्याकडून दिनांकीत पोच पावती घ्यावी व ती शासनास सादर करावी.

**आश्वासन क्रमांक ३७५**

५०२/
२३/८/१७

**मुख्य अभियंता कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग**
**" बांधकाम भवन " अदालत रोड,**
**औरंगाबाद-431 005**

E-Mail:aurangabad.ce@mahapwd.com Ph.No.(0240) 2331815, 2331616 Fax-2332068

जा.क्र.मु.अ/चौकशी/का.4/अेई/औ/आश्वासन-37 दि. 26 JUN 2017

200570-260717

सा. बां. वि.
प्रेषणीय शाखा
क्र. 16 AUG 2017
का. क्र. २८८८८
आ. क्र. सेवा ६ अ

प्रति,
**कार्यासन अधिकारी सेवा- 6 अ**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय मुंबई

**विषय-** विधानमंडळातील सन 2015 च्या दुस-या (पावसाळी)अधिवेशनातील प्रलंबित आश्वासन क्रमांक 375

**संदर्भ-** 1. प्रादेशिक कार्यालयाचे पत्र क्र.मुअ/चौकशी/का.4/अेई/औ/आश्वासन-375/101584 दि. 05/04 /2017
2. शासन सा.बां. विभागाचे पत्र क्र. विपआ-2015/375/प्र.क्र.105/सेवा-6(अ) दि. 24/07/2017

विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 26780 च्या अनुषंगाने आश्वासन क्र. 375 प्राप्त झाले होते. प्रादेशिक कार्यालयाने या आश्वासनाचा अहवाल विधानसभा तारांकीत प्रश्ना क्र. 44209 संबधाने शासनास सादर केला आहे.

शासनाने संदर्भिय पत्रान्वये विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 26780 वर उपस्थित केलेल्या आश्वासन क्र. 375 च्या अनुषंगाने देण्यात येत असल्याचे सुधारीत पत्र शासनास सादर करण्याचे सुचित केले आहे.

तरी प्रादेशिक कार्यालयाने संदर्भिय पत्रान्वये सादर केलेला अहवाल हा विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 26780 वर उपस्थित केलेल्या आश्वासन क्र. 375 संदर्भातील आहे.

माहितीस्तव सादर.

प्रति-का.
२१/८

(स्थळ प्रतीवर मु.अ.यांची स्वाक्षरी असे)

मुख्य अभियंता करिता

विधानपरिषद प्राथम्य

मुख्य अभियंता कार्यालय
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग
" बांधकाम भवन " अदालत रोड,
औरंगाबाद-431 005

E-Mail:aurangabad.ce@mahapwd.com Ph.No.(0240) 2331815, 2331616 Fax-2332068

**अतितात्काळ**

जा.क्र.मु.अ/चौकशी/का.4/अेई/औ/आश्वासन-375 101584-050417 दि. 5 APR 2017

**प्रति,**
**प्र.रा. शिंदे**
**कार्यासन अधिकारी सेवा-6 अ**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय मुंबई

**विषय-** विधानमंडळातील सन 2015 च्या अधिवेशनातील प्रलंबित आश्वासने

**संदर्भ-**
1. शासन सा.बां. विभाग विभागाचे पत्र क्र. विपआ-1016/ 85/ प्र.क्र.29/सेवा-6(अ) दि. 22/06/2016
2. या कार्यालयाचे पत्र क्र. मु.अ/चौकशी/का.4/अेई/औ/आश्वासन-375/102849 दि. 30/06/2016
3. या कार्यालयाचे पत्र क्र. मु.अ/चौकशी/का.4/अेई/औ/आश्वासन-375/103103 दि. 16/07/2016
4. या कार्यालयाचे पत्र क्र. मु.अ/चौकशी/का.4/अेई/औ/आश्वासन-375/103632 दि. 16/08/2016
5. शासन सा.बां. विभागाचे पत्र क्र.विपआ-1016/प्र.क्र.29/सेवा-6 अ दि. 17/12/2016
6. या कार्यालयाचे पत्र क्र. मुअऔ/का-14/प्रआ/आश्वासन/6653व.प्र. दि. 23/12/2016
7. या कार्यालयाचे पत्र क्र. मुअऔ/का-14/प्रआ/आश्वासन/200100 दि.03/02/2017
8. अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ,औरंगाबाद यांचे पत्र क्र.प्रलि/चौ/1000086 दि. 04/02/2016

विधानसभा तारांकीत प्रश्न क्र. 44209 च्या अनुषंगाने शासनाने दि. 16/06/2016 च्या पत्रान्वये मंडळास अग्रेषीत केलेल्या पत्राची प्रत या कार्यालयास पाठविली आहे. शासनाने मंडळास, या प्रकरणाचा अहवाल / माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशीत केले आहे.

विधानसभा तारांकीत प्रश्न क्र. 44209 च्या अनुषंगाने आश्वासन क्र. 375 ची पुर्तता करण्यासाठी शासनाने दि. 22/06/2016 च्या पत्रान्वये या कार्यालयास सुचित केलेले आहे.

सदर शासन पत्रास अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ,औरंगाबाद यांना संदर्भिय पत्र क्र. 2,3,4, 6 व 7 अन्वये आश्वासनाची पुर्तता करुन अहवाल सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

.अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांनी मुद्देनिहाय पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे व आश्वासन संपुष्टात आणण्याची विनंती केलेली आहे. सदर अहवाल प्रादेशिक कार्यालयाच्या सहमतीसह शासनास सादर करण्यात येत आहे.

**सोबत**-वरिल प्रमाणे

मुख्य अभियंता

# अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांचे कार्यालय

बांधकाम भवन अदालतरोड औरंगाबाद-431005

दुरध्वनी 0240-2331022 फॅक्स.0240-2331175

E-mail : aurangabad.se@mahapwd.com


गोपनीय /

जा.क्र.प्रलि /चौ/ Outward 1000086-040217 २०१७ दि.:-

---

प्रती,

मुख्य अभियंता,

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,

औरंगाबाद.

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ४४२०९
औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ४मधील अभियंत्यांनी केलेल्या गैरव्यवहाराचा अहवाल शासनास सादर केला नसल्याबाबत.

संदर्भ:- १.शासन सार्वजनिक बांधकाम विभाग पत्र क्र. विसता-२०१६/४४२०९ /प्र.क्र. ३२/ सेवा६अ दि.१६/६/२०१६.
२.आपले कार्यालयाचे पत्र जा. क्र. मुअ/चौकशी/कार्यासन4/अेई/औ / आश्वासन / ३६३२/दि.१६/८/२०१६.
३.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांचे पत्र जा. क्र. प्रली/चौ/८२५ दि.३/२/२०१७.

आवक ८१२

विषयांकीत प्रकरणी कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग औरंगाबाद यांनी संदर्भ क्र. १ च्या अनुषंगाने अहवाल व माहिती सादर केलेली आहे. सदर अहवालावरून खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | मुद्या | माहिती /अहवाल. |
|---|---|---|
| १ | सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात सा.बां. उपविभाग क्र. १ औरंगाबाद अंतर्गत सी.ओ.पी.व्दारे करण्यात आलेल्या खर्च तसेच यासाठी वापरण्यात आलेले व्हाऊचर्स यांचा समग्र गोषवारा सादर करावा. | सा.बां.उपविभाग क्र. १ औरंगाबाद अंतर्गत सी.ओ.पी.व्दारे करण्यात आलेल्या खर्च तसेच यासाठी वापरण्यात आलेले व्हाउचर्स यांचा समग्र गोषवारा सादर करण्यात येत आहे. |
| २ | सदर व्हाऊचर्सची यदृच्छ पध्दतीने तपासणी करून महाराष्ट्र सा.बां.नियमावली १९८४ च्या परिशिष्ट २४ मधील क्र.१२ नुसार तपशील नोंदविला आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करून तसेच सदर खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यांत आली होती किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करावा. | सदर व्हाऊचर्सची यादृच्छ पध्दतीने तपासणी करण्यांत आली आहे. सदरची कामे किरकोळ व आकस्मीक स्वरूपाची असल्याने म.सा.बां.नियमावली १९८४ च्या परिशिष्ट २४ मधील नियम क्र. ४ च्या अंतर्गत येते.अशा बाबतीत सदरील कामास म्हणजेच उपअभियंता हे सदर बाबतचे सक्षम प्राधिकारी आहेत व त्यांनीच त्याचा लेखा सादर केलेला आहे. |

E/FC ( P 30 )

| | | |
|---|---|---|
| ३ | सन २०१३-१४ व २०१४-१५ चा आर्थिक वर्षाचा लोखंडी व सागवानी लाकडी साहित्या विकल्पाबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आली होती किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करावा. | सन २०१३/१४ व २०१४/१५ या आर्थिक वर्षात लोखंड व सागवानी लाकडी साहित्य विकल्याबाबत तपशील कार्यालयीन तपासणीत आढळुन आला नाही.तेंव्हा सदरील मुद्या संपुष्टात आणावा ही विनंती. |

करीता माहितीस्तव सविनय सादर.

सहपत्र: वरीलप्रमाणे.

(स्थळप्रत अ.अ. यांचे स्वाक्षरीत)

अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद. (करिता)

E/FC ( P 31 )

# कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांचे कार्यालय

पदमपुरा परिसर,औरंगाबाद. — ४३१००५ दुरध्वनी ०२४०-२३३११७४

| जा.क्रं/प्र.लि/चौकशी/ ८२५ | दिनांक- ३ / ९ /२०१६ |
|---|---|

प्रति,

अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ
औरंगाबाद.

विषयः-विधानसभा तारांकीत प्रश्न क्रमांक ४४२०९
औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग -१ मधील अभियंत्यानी केलेल्या गैरव्यवहाराचा अहवाल शासनास सादर केला नसल्याबाबत.

संदर्भः- १.महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग क्रमांक विसता -२०१६/४४२०९/प्र.क्र.३२/सेवा-६(अ) मुंबई
दि. ६ जुन २०१६
२. आपले कार्यालयीन पृष्ठांकित पत्र जा.क्र. प्रली/चौ/ / दि.१६/६/२०१६

उपरोक्त संदर्भिय विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ४४२०९ च्या अनुषंगाने खालील मुद्याबाबतचा अहवाल सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | मुद्या | माहिती /अहवाल |
|---|---|---|
| १ | सन २०१३-१४ व २०१४ -१५ या आर्थिक वर्षात सा.बां.उपविभाग क्र.१ औरंगाबाद अतंर्गत सी.ओ.पी.व्दारे करण्यात आलेल्या खर्च तसेच या साठी वापरण्यात आलेले व्हाऊचर्स यांचा समग्र गोषवारा सादर करावा. | सन-२०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात सा.बां.उपविभागक्र.१औरंगाबाद अंतर्गत सी.ओ.पी.व्दारे करण्यात आलेल्या खर्च तसेच या साठी वापरण्यात आलेले व्हाऊचर्स यांचा समग्र गोषवारा सादर करण्यात येत आहे. |
| २ | सदर व्हाऊचर्सची यादृच्छ पध्दतीने तपासणी करुन महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली १९८४ च्या परिशिष्ट २४ मधील क्र(१) नुसार तपशील नोंदविला आहे किंवा कसे या बाबतची तपासणी करुन तसेच सदर खर्चास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात आली होती किंवा कसे या बाबतचा अहवाल सादर करावा. | सदर व्हाऊचर्सची यादृच्छ पध्दतीने तपासणी करण्यात आली आहे. सदरची कामे किरकोळ व आकस्मीक स्वरुपाची असल्याने महाराष्ट्र सा.बां.नियमावली १९८४ च्या परिशिष्ट २४ मधील नियम क्र.४ च्या अंतर्गत येते. अशा बाबतीत सदरील कामास म्हणजेच उपअभियंता हे सदर बाबतचे सक्षम अधिकारी आहेत.व त्यांनीच त्याचा लेखा सादर केलेला आहे. |
| ३ | सन-२०१३-१४ व २०१४-१५ चा आर्थिक वर्षाचा लोखंडी व सागवानी लाकडी साहित्या विकल्याबाबत सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात आली होती किंवा कसे या बाबतचा अहवाल सादर करावा. | सन-२०१३-१४ व २०१४-१५ चा आर्थिक वर्षात लोखंडी व सागवानी लाकडी साहित्या विकल्याबाबत तपशील कार्यालयीन तपासणीत आढळून आला नाही. तेव्हा सदरील मुद्या संपुष्टात आणावा ही विनंती. |

उपरोक्त मुद्याचा अहवाल विभागात असलेल्या कागदपत्रावरुन दिलेला आहे. हे आपल्या माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर .

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
औरंगाबाद

सहपत्रः- १) सी.ओ.पी.च्या व्हाऊचर्सच्या गोषवारा
२) [illegible]

आश्वासन क्रमांक ८४

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष २, अंक ११३(३)] मंगळवार, डिसेंबर २७, २०१६/पौष ६, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १८१

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर २०१६

### अधिसूचना

**खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक एमडीएफ. ०६१५/५१/प्र.क्र. ३४/उद्योग-९.—खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम ९ ब चे उप-कलम (२), (३), (४), (५) व (६) कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यातील महाराष्ट्र राज्याची प्रयुक्ती व प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) च्या तरतुदी अंतर्भूत करण्याकरिता सदर अधिनियमाच्या कलम २०ए अंतर्गत भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कामकाज, जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना व कार्ये आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये रकमा प्रदान करणे च्या पद्धतीचे विनियमन करण्याकरिता पुढील नियम करीत आहे, ते असे :—

### प्रकरण—एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव आणि प्रारंभ**

१. (१) या नियमास महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ असे म्हणावे.

(२) हे नियम, दिनांक १६ सप्टेंबर २०१५ पासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(क) "अधिनियम", याचा अर्थ, खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) असा आहे.

(ख) "बाधित क्षेत्र", याचा अर्थ, जिल्हाधिकारी यांनी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, जिल्ह्यात खाण किंवा खाणींच्या समुहापासून, खनिकर्म कामाशी संबंधित कामांमुळे बाधित क्षेत्र, या सह राज्य शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जिल्ह्याच्या पलीकडील क्षेत्र आणि प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट प्रत्यक्ष बाधित क्षेत्र व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र यांचासुद्धा समावेश होतो ;

(ग) "बाधित लोक", याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) अंतर्गत समाविष्ट लोक ;

(घ) "लेखापरीक्षक", याचा अर्थ, नियामक परिषदेकडून नियुक्त केलेला लेखापरीक्षक किंवा सनदी लेखापाल, आणि राज्य महालेखापाल किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले इतर लेखापरीक्षक याचा समावेश होतो ;

(ङ) "केंद्रीय योजना (पीएमकेकेकेवाय)", याचा अर्थ, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) असा होतो ;

(च) "जिल्हाधिकारी", याला महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (महा. १९६६ चा ४१) अंतर्गत असणारा समान अर्थ लागू राहील ;

(छ) "अंशदान", याचा अर्थ, प्रन्यासमध्ये जमा करावयाचे अंशदान.—

(एक) प्रमुख खनिजांच्या प्रकरणात, सदर अधिनियमाच्या कलम ९ ब च्या उप-कलम (५) व (६) अंतर्गत केंद्र सरकारकडून वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीप्रमाणे खनिपट्टा धारक किंवा संयुक्त परवाना (पुर्वेक्षण अनुज्ञप्ती व खनिपट्टा) धारक यांचेकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(दोन) गौण खनिजांच्या प्रकरणात सदर अधिनियमाच्या कलम १५ए अंतर्गत गौण खनिजासाठी राज्य शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील खनिपट्टा किंवा खाणपट्टा किंवा खाण परवानाधारकांकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(ज) "नियामक परिषद", याचा अर्थ, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या सर्व विश्वस्तांच्या बनलेल्या प्रन्यासची नियामक परिषद ;

(झ) "शासन", किंवा "राज्य शासन", म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ट) "ग्रामसभा", याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे ग्रामसभा ;

(ठ) "खनिपट्टा क्षेत्र", याचा अर्थ, कोणत्याही खनिजाचे किंवा गौण खनिजाचे पुर्वेक्षण करण्याकरिता किवा खाणकाम करण्याच्या उद्देशासाठी मंजूर क्षेत्र ;

(ड) "खनिकर्म ", किंवा "खाणकाम " याचा अर्थ, कोणतेही खनिज किंवा गौण खनिज बाहेर काढण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेले कार्य ;

(ढ) "व्यवस्थापन समिति", याचा अर्थ, प्रन्यासच्या दैनंदिन व्यवहार व्यवस्थापनाच्या उद्देशासाठी राज्य शासनाने गठित केलेली समिती ;

(ण) "पंचायत", याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे पंचायत ;

(त) "प्रन्यास", याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९ ब चा उप-कलम (१) अंतर्गत शासनाने स्थापित केलेला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास ;

(थ) "प्रन्यास निधी", याचा अर्थ, नियम १३ अंतर्गत घटित प्रन्यास निधी ;

(द) "विश्वस्त", याचा अर्थ, प्रन्यासचे नियमन करण्याच्या उद्देशासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या व्यक्ती ;

(ध) "वर्ष", याचा अर्थ, एक एप्रिलपासून सुरू होणारे व पुढील वर्षी ३१ मार्च रोजी संपणारे वित्तीय वर्ष किंवा त्याचा भाग कालावधी ;

(न) "जिल्हा परिषद", याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे जिल्हापरिषद ;

(२) या नियमात वापरलेले, परंतु ज्याची व्याख्या केलेली नाही असे शब्द किंवा शब्दप्रयोग यांना खाणी व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) मध्ये जे अर्थ दिले असतील तेच अर्थ असतील.

## प्रकरण—दोन

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान

३. **जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे उद्दिष्ट.**—(एक) जिल्ह्यातील खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी संबंधित कार्यांमुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्रांचे हितसंबंध, लाभ, शाश्वत विकासासाठी, काम करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानाचे उद्दिष्ट आहे ; आणि

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये जमा निधीचा परिणामकारक, पारदर्शक व जबाबदार पद्धतीने वापर करणे.

जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना.—(एक) अधिसूचनेच्या कलम ९ब च्या उप-कलम (७) अंतर्गत स्थापित प्रत्येक जिल्हा प्रतिष्ठान हे नियामक परिषद, व्यवस्थापन समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समितिचे बनलेले असेल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कार्यालय प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी स्थित असेल किंवा नियामक परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे राहील.

प्रकरण—तीन

**नियामक परिषद**

५. **नियामक परिषद.**—प्रतिष्ठान प्रन्यासचे व्यवस्थापन नियामक परिषदेकडे निहित करण्यात येईल, जी प्रन्यासच्या राज्यशासनाकडून नियुक्त केलेल्या सर्व विश्वस्तांची बनलेली असेल.

(एक) नियामक परिषद ही पदसिद्ध सदस्य, नामनिर्देशित सदस्य व सदस्य-सचिव यांची बनलेली असेल.

(दोन) नियामक परिषदेचे पदसिद्ध सदस्य व जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधान परिषदेचे सभासद पैकी तीन प्रतिनिधी, हे जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे विश्वस्त राहतील.

(तीन) जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधानपरिषदेचे सभासद यांचे तीन प्रतिनिधी हे, शक्यतो खाणकाम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रातील पालकमंत्री यांनी शिफारस केलेले राहतील व अंतिम नामनिर्देशन, राज्यशासनाकडून तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(चार) अशासकीय संस्थेच्या (एनजीओ) दोन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(दोन) गौण खनिजांच्या प्रकरणात सदर अधिनियमाच्या कलम १५ए अंतर्गत गौण खनिजासाठी राज्य शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील खनिपट्टा किंवा खाणपट्टा किंवा खाण परवानाधारकांकडून देय होणाऱ्या अधिकार शुल्काच्या टक्केवारीत अंशदान देय राहील.

(ज) "नियामक परिषद", याचा अर्थ, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या सर्व विश्वस्तांच्या बनलेल्या प्रन्यासची नियामक परिषद ;

(झ) "शासन", किंवा "राज्य शासन", म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ट) "ग्रामसभा", याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे ग्रामसभा ;

(ठ) "खनिपट्टा क्षेत्र", याचा अर्थ, कोणत्याही खनिजाचे किंवा गौण खनिजाचे पुर्वेक्षण करण्याकरिता किंवा खाणकाम करण्याच्या उद्देशासाठी मंजूर क्षेत्र ;

(ड) "खनिकर्म", किंवा "खाणकाम" याचा अर्थ, कोणतेही खनिज किंवा गौण खनिज बाहेर काढण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेले कार्य ;

(ढ) "व्यवस्थापन समिति", याचा अर्थ, प्रन्यासच्या दैनंदिन व्यवहार व्यवस्थापनाच्या उद्देशासाठी राज्य शासनाने गठित केलेली समिती ,

(ण) "पंचायत", याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे पंचायत ;

(त) "प्रन्यास", याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९ ब चा उप-कलम (१) अंतर्गत शासनाने स्थापित केलेला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास ;

(थ) "प्रन्यास निधी", याचा अर्थ, नियम १३ अंतर्गत घटित प्रन्यास निधी ;

(द) "विश्वस्त", याचा अर्थ, प्रन्यासचे नियमन करण्याच्या उद्देशासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या व्यक्ती ;

(ध) "वर्ष", याचा अर्थ, एक एप्रिलपासून सुरू होणारे व पुढील वर्षी ३१ मार्च रोजी संपणारे वित्तीय वर्ष किंवा त्याचा भाग कालावधी ;

(न) "जिल्हा परिषद", याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे जिल्हापरिषद ;

(२) या नियमात वापरलेले, परंतु ज्याची व्याख्या केलेली नाही असे शब्द किंवा शब्दप्रयोग यांना खाणी व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) मध्ये जे अर्थ दिले असतील तेच अर्थ असतील.

## प्रकरण—दोन

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान

**३. जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे उद्दिष्ट.**—(एक) जिल्ह्यातील खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी संबंधित कार्यामुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्राचे हितसंबंध, लाभ, शाश्वत विकासासाठी, काम करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानाचे उद्दिष्ट आहे ; आणि

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये जमा निधीचा परिणामकारक, पारदर्शक व जबाबदार पद्धतीने वापर करणे.

४. **जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना**.—(एक) अधिसूचनेच्या कलम ९ब च्या उप-कलम (७) अंतर्गत स्थापित प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान हे नियामक परिषद, व्यवस्थापन समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समितिचे बनलेले असेल.

(दोन). जिल्हा खनिज प्रतिष्ठान चे कार्यालय प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी स्थित असेल किंवा नियामक परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे राहील.

प्रकरण—तीन

## नियामक परिषद

५. **नियामक परिषद.**—प्रतिष्ठान प्रन्यासचे व्यवस्थापन नियामक परिषदेकडे निहित करण्यात येईल, जी प्रन्यासच्या राज्यशासनाकडून नियुक्त केलेल्या सर्व विश्वस्तांची बनलेली असेल.

(एक) नियामक परिषद ही पदसिद्ध सदस्य, नामनिर्देशित सदस्य व सदस्य-सचिव यांची बनलेली असेल.

(दोन) नियामक परिषदेचे पदसिद्ध सदस्य व जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधान परिषदेचे सभासद पैकी तीन प्रतिनिधी, हे जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे विश्वस्त राहतील.

(तीन) जिल्ह्यातील विधानसभेचे सभासद/विधानपरिषदेचे सभासद यांचे तीन प्रतिनिधी हे, शक्यतो खाणकाम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रातील पालकमंत्री यांनी शिफारस केलेले राहतील व अंतिम नामनिर्देशन, राज्यशासनाकडून तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(चार) अशासकीय संस्थेच्या (एनजीओ) दोन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(पाच) खनिज सवलत धारकामधून तीन प्रतिनिधींची शिफारस पालकमंत्री करतील व अंतिमतः त्यांचे नामनिर्देशन राज्य शासनाकडून तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल.

(सहा) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही अशा कालावधीसाठी करण्यात येईल व ते दोन मुदतीपेक्षा जास्त वेळा पुन्हा पुनर्नियुक्तिसाठी पात्र ठरणार नाही.

६. **नियामक परिषदेचे अधिकार व कार्ये.**—सर्व विश्वस्तांची बनलेली, नियामक परिषद यासाठी जबाबदार असेल,—

(एक) प्रन्यासाचा व्यापक धोरणात्मक आराखडा तयार करणे व कार्यशीलतेसाठी कार्यपद्धतीला मान्यता देणे आणि प्रन्यासचे कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे ;

(दोन) व्यवस्थापन समितिकडून मान्यतेकरिता ठेवण्यात आलेले प्रन्यासचे वार्षिक अंदाजपत्रक व वार्षिक कार्यक्रम योजनेला मान्यता देणे. वर्ष सुरू होणाच्या किमान एक महिना आधी व्यवस्थापन परिषद वार्षिक कार्यक्रम योजना तयार करेल व नियामक परिषद त्याला मान्यता देईल. वार्षिक कार्यक्रम योजनेमध्ये योजना व प्रकल्पांची यादी त्यांच्या तात्पुरत्या तरतुदींसह समाविष्ट असेल :

परंतु, पुढील वर्षासाठी वार्षिक कार्यक्रम योजना तयार करतांना मागील जबाबदाऱ्यांची व अपूर्ण राहिलेल्या योजनांचे दायित्व यांचे एकूण मूल्यमापन करण्यात येईल. वित्तीय नियमांचे पालन करण्यासाठी व प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी, मागील दायित्वे व जबाबदाऱ्या आणि प्रस्तावित केलेल्या नवीन योजना यांची एकूण बेरीज कोणत्याही परिस्थितीत पुढील वित्तीय वर्षासाठी प्रन्यास निधिमध्ये येणाऱ्या अपेक्षित गुंतवणुकीच्या दोन पटींपेक्षा जास्त असणार नाही ;

(तीन) प्रन्यास निधीमार्फत कार्यान्वयीत केलेल्या विकास योजना व कामे यांचे ग्रामसभेमध्ये सामाजिक लेखापरीक्षण आयोजित करणे ;

(चार) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्यासाठी, राज्यशासनाने प्रदान केलेल्या अशा पद्धतीने, उपलब्ध न्यास निधीमधून अशा इतर खर्चास मान्यता देणे ;

(पाच) व्यवस्थापन समितीचे शिफारशींना मान्यता देणे ;

(सहा) प्रन्यासचे वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण झालेले लेखे यांना मागील वर्षाचे समाप्तीनंतर साठ दिवसांचे कालावधीचे आत मान्यता देणे ;

(सात) प्रन्यास चालविण्याकरिता, राज्य शासनाने ठरविल्याप्रमाणे प्रतिनियुक्तिवरील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीला, कंत्राटी किंवा बाह्य यंत्रणांकडून आधारित कामाला मंजुरी देणे ;

(आठ) प्रन्यासची वार्षिक योजना तयार करण्यामध्ये व प्रन्यासचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी, सहाय्य करण्याकरिता उप-समित्या गठित करणे ;

(नऊ) प्रन्यासचे उद्देश पुढे नेण्याकरिता असे कोणतेही इतर कार्यक्रम हाती घेणे.

७. **नियामक परिषदेच्या सभा.**––(एक) नियामक परिषदेच्या सभा आवश्यकतेप्रमाणे अनेकदा होतील परंतु प्रत्येक तिमाहीत किमान एकदा होईल.

(दोन) नियामक परिषदेची सभा, अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे, नियामक परिषदेच्या सदस्यांना दोन आठवड्याची नोटीस देऊन आयोजित करण्यात येईल.

(तीन) अशा सभेकरिता गणपूर्ति (कोरम), नियामक परिषदेच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील, जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व नंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी पुनः आयोजित करण्यात येईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

## प्रकरण––चार

## व्यवस्थापन समिती

८. **व्यवस्थापन समिति.**––(एक) प्रन्यासचा दैनंदिन व्यवहार व्यवस्थापन समिती द्वारे चालविण्यात येईल.

(दोन) फक्त पदसिद्ध सदस्यांना मतदानाचा हक्क राहील.

(तीन) नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा कोणताही हक्क राहणार नाही.

(चार) जिल्ह्यातील खाणकाम यंत्रणा किंवा खनिपट्टाधारक व अशासकीय संस्था यांचे प्रतिनिधी यांची नेमणूक, नियामक परिषदांवर नामनिर्देशित केलेल्या त्या श्रेणीतील (वर्गातील) प्रतिनिधीमधून व्यवस्थापन समिती करेल.

९. **व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये.**––व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे आहे ते असे,––

(एक) प्रन्यासच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी कर्तव्ये पार पाडण्यामध्ये योग्य त्या कार्यसक्तीचा वापर करणे ;

(दोन) अधिनियमाच्या तरतुदीनुसार व राज्यशासनाने ठरवून दिलेल्या पद्धतीने संबंधित खनिपट्टा धारकाकडून अंशदानाची रक्कम वेळेवर जमा होईल याची खात्री करणे ;

(तीन) ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील शहरी स्थानिक संस्था, शासकीय विभाग, मंडळे, महामंडळे व राज्य व केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांचेकडून प्रस्ताव व प्रकल्प स्वीकार करणे. तथापि, अनुसूचित क्षेत्रात व्यवस्थापन समिती बाधित क्षेत्राच्या ग्रामसभांकडून प्रस्ताव किंवा प्रकल्प प्राप्त करू शकेल ;

(चार) प्रन्यासाच्या वार्षिक योजनेचा व प्रन्यासाचे वार्षिक अंदाजपत्रकाचा, प्रस्तावित योजना व प्रकल्पांसह समन्वय साधणे, संघटित करणे व मंजूर योजना व प्रकल्पांचेवर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(पाच) वार्षिक योजना व मंजूर योजना व प्रकल्पांचे वर देखरेख करणे व अंमलबजावणीची खात्री करणे ;

(सहा) प्रकल्पांना मान्यता देणे आणि मंजुरी आदेश निर्गमित करणे, त्याकरिता प्रन्यास निधी देणे व संवितरण करणे ;

(सात) प्रन्यास निधीची व्यवस्था पाहणे व त्याची कार्यसक्ती पद्धतीने गुंतवणूक करणे आणि भारतीय रिझर्व बँकेकडून मान्यता प्राप्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत प्रन्यासच्या नावाने खाते उघडणे व असे खाते व गुंतवणुकीचे व्यवहार पाहणे ;

(आठ) प्रन्यास निधीचे उपयोगितेचे प्रगतीवर लक्ष ठेवणे ;

(नऊ) लेखापरिक्षण झालेले लेखे, वार्षिक अहवालासह नियामक परिषदेसमोर, मागील वर्षाचे समाप्ती नंतर साठ दिवसांचे कालावधीच्या आत, त्यांचे मान्यतेकरिता ठेवणे ;

(दहा) प्रन्यासचे कामकाजाकरिता कार्यपद्धती तयार करणे व मंजूर करणे ;

(अकरा) राज्य शासनाच्या दिशा-निर्देशानुसार कर्मचाऱ्यांची व लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे, तथापि या नियुक्तांना नियामक परिषदेच्या मंजुरीची आवश्यकता राहील ;

(बारा) वेबसाईट तयार करून ती सुस्थितीत ठेवणे, ज्यावर खालील माहिती टाकून अद्यावत ठेवणे,––

(क) प्रन्यासच्या रचनेची व प्रन्यास वर असलेल्या व्यक्तींची सविस्तर माहिती.

(ख) खाणकामामुळे बाधित क्षेत्र व लोकांची यादी.

(ग) खनिपट्टाधारक व इतरांकडून प्राप्त अंशदानाची तिमाही सविस्तर माहिती.

(घ) प्रन्यासच्या सर्व सभांची विषय सूची, इतिवृत्त व कार्यवाही अहवाल.

(च) वार्षिक योजना, अंदाज पत्रक, कार्य आदेश व वार्षिक अहवाल.

(छ) सध्या सुरू असलेल्या कामांची ऑनलाईन स्थिती, हाती घेण्यात आलेल्या सर्व प्रकल्प व कार्यक्रमांची कार्यान्वयन स्थिती व प्रगती वेबसाइट वर उपलब्ध करून द्यावी, यात कामाचे वर्णन, लाभार्थींचा तपशील, अंदाजित किंमत, कार्यान्वयन यंत्रणेचे नाव, काम सुरू करण्याची व पूर्ण करण्याची अपेक्षित तारीख, मागील तिमाहीपर्यंतची वित्तीय व भौतिक (प्रत्यक्ष) प्रगती इत्यादी माहितीचा समावेश करावा.

(ज) विविध कल्याण योजनांतर्गत लाभार्थींची यादी.

(झ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) अंतर्गत ऐच्छिक प्रकटीकरण ; आणि

(तेरा) प्रन्यासच्या सुरळीत कामकाज आणि व्यवस्थापनाकरिता आवश्यक इतर सर्व गोष्टी करणे.

१०. **व्यवस्थापन समितीच्या सभा :**—(एक) व्यवस्थापन समितीच्या सभा एका वित्तीय वर्षात किमान चार वेळा घेण्यात येतील व त्या अध्यक्षांनी ठरविल्याप्रमाणे आयोजित केल्या जातील.

(दोन) या सभांसाठी गणपूर्ति (कोरम), व्यवस्थापन समितीच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश राहील जर गणपूर्ति झाली नाही तर सभा अर्ध्या तासासाठी पुढे ढकलण्यात येईल व ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी आयोजित केली जाईल, ज्याकरिता गणपूर्तिची अट लागू होणार नाही.

(तीन) व्यवस्थापन समितीची सभा अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली होईल, त्यांच्या अनुपस्थितीमध्ये, पदसिद्ध सदस्य आपल्यातून स्थानापन्न अध्यक्षाची निवड करू शकतील.

प्रकरण—पाच

## प्रन्यास निधिचे व्यवस्थापन

११. **प्रन्यास अंतर्गत निधिची घडण.**—(एक) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचे नियामक परिषद प्रन्यास अंतर्गत एक निधी स्थापित करेल ज्याला जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यास निधी असे संबोधण्यात येईल, ज्याचे व्यवस्थापन प्रन्यासच्या व्यवस्थापन समितीद्वारे करण्यात येईल.

(दोन) जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासचा प्रन्यास निधी, खालील रकमांचा स्वीकार करेल.

(क) राज्य शासनाकडून दिलेली प्रारंभिक जमा ;

(ख) राज्य शासनाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे राज्य शासनाकडून किंवा कोणतीही इतर यंत्रणा, संस्था किंवा व्यक्ती यांचेकडून प्राप्त कोणतेही अनुदान, अंशदान किंवा इतर भांडवली सहाय्य ;

(ग) नियम २ चा उप-नियम (१) चे उपवाक्य (जी) मध्ये व्याख्या केलेले अंशदान ;

(घ) गुंतवणूक व इतर जमा आणि त्यावर जमा झालेले व्याज व त्यापासून प्राप्त झालेले इतर कोणतेही उत्पन्न ;

(च) प्रन्यासच्या इतर सर्व मालमत्ता व त्यापासून प्राप्त झालेले उत्पन्न किंवा त्याचे झालेले अधिमूल्यन ; आणि

(छ) राज्य स्तरिय संनियंत्रण समितीने ठरविल्याप्रमाणे इतर जिल्ह्यांच्या अंशदान निधीतून प्राप्त झालेला निधी.

१२. **प्रन्यास निधीचे प्रवर्तन.**—प्रन्यास निधी, भारतीय रिझर्व बँकेने मान्यता दिलेल्या एक किंवा जास्त अनुसूचित, व्यावसायिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत फक्त प्रन्यासच्या नावाने अशा सार्वजनिक निधी ठेवण्यात येईल व सर्व खाते हे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व व्यवस्थापन समितीचे सदस्य-सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्य करतील. या निधीचे खाते पुस्तके प्रन्यासची व्यवस्थापन समिती सांभाळेल. हे खाते अंशदान निधीपासून स्वतंत्र ठेवण्यात (सांभाळण्यात) यावे.

१३. **प्रन्यास निधीमधून खर्च.**—या न्यासमध्ये उपलब्ध निधी हा भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पी एम के के के वाय) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील उद्देश अंमलात आणण्याकरिता उपयोगात आणण्यात येईल :—

(एक) खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी निगडीत कार्यामुळे बाधित क्षेत्रांच्या सर्वांगीण विकासाकरिता, व्यवस्थापन समितीने तयार केलेल्या व नियामक परिषदेने मान्यता दिलेल्या प्रन्यासच्या वार्षिक कार्यक्रम योजनेच्या उद्देशाकरिता ;

(दोन) किमान २/३ रक्कम प्रत्यक्ष बाधित क्षेत्रांमध्ये वापरण्यात येईल व उर्वरित कमाल १/३ रक्कम अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रांकरिता वापरण्यात येईल (प्रत्यक्ष बाधित खाणकाम क्षेत्र हे खाण/डंपपासून २० कि.मी. च्या त्रिज्येच्या आत राहील).

(तीन) प्रन्यासकडे उपलब्ध निधीपैकी किमान साठ टक्के उच्च प्राथमिकता क्षेत्रांकरिता उपयोगात आणल्या जाईल जसे.—

(क) पेयजल पुरवठा केंद्रीभूत जलशुद्धीकरण यंत्रणा, जल प्रक्रिया केंद्र, शाश्वत किंवा तात्पुरती जलवितरण जाळे (नेटवर्क), ज्यामध्ये एकल पाणीपुरवठा सुविधेचा समावेश आहे. जलवितरण पाईपलाईन टाकणे.

(ख) पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.—सांडपाणी प्रक्रिया केंद्र, जलप्रवाह, तलाव, तळे, भू-जल, क्षेत्रातील अन्य जलस्त्रोत यांचे प्रदूषण प्रतिबंध, खनिकर्म काम व डंपस्‌मुळे होणारे वायू व धुळ प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता उपाययोजना, खाणीतील पाणी निचरा व्यवस्था, खाण प्रदूषण प्रतिबंध तंत्रज्ञान आणि पर्यावरण-सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता आवश्यक इतर वायू, जल व भू-पृष्ठ प्रदूषण नियंत्रण यंत्रणा.

(ग) आरोग्यसेवा.—बाधित क्षेत्रामध्ये प्राथमिक किंवा दुय्यम आरोग्य सेवा सुविधा निर्मिती करणे व या कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यामध्ये फक्त आरोग्य सेवा पायाभूत सुविधा निर्मिती वावर भर नसावा तर त्यासोबत अशा सुविधा प्रभावी करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे व पुरवठा यांच्या तरतुदीवर सुद्धा भर असावा. हे प्रयत्न सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य सेवा पायाभूत सुविधा यांना पूरक व यांचे बरोबर काम करणे अशा असाव्या. याकरिता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ मायनर्स हेल्थ यांचेकडे उपलब्ध असलेले कौशल्य (विशेष ज्ञान) हे सुद्धा विचारात घेऊन खनिकर्म कामाशी निगडीत आजार व रोग यांची काळजी घेण्याकरिता आवश्यक विशेष पायाभूत सुविधा आराखडा तयार करण्यात यावा. खनिकर्म कामामुळे बाधित व्यक्तिकरिता त्यांच्या आरोग्य सेवेसाठी गट विमा योजना राबविता येईल.

(घ) शिक्षण.—शिक्षण संस्था व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र यांचे बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वाचनालये, कला व हस्त कौशल्य वर्ग, स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची तरतूद, दुर्गम भागातील विद्यार्थी किंवा शिक्षक यांचेकरिता निवासी वसतीगृह, क्रिडा पायाभूत सुविधा, शिक्षक किंवा इतर मदतनिस कर्मचारी, इ. शिक्षा मांडणी (इ-लर्निंग सेट अप), विद्यार्थ्यांकरिता इतर वाहतुकीची व्यवस्था (बस, व्हॅन, सायकल, रिक्षा इत्यादी) आणि पौष्टिक अन्न यासंबंधी कार्यक्रम.

(च) कृषी व तत्सम उपक्रम.—कृषी व तत्सम उपक्रम आणि वनशेती यांच्याशी संबंधित उपक्रमांचा विकास, बियाणे, उपकरणांचा लहान संच, कृषी उपकरणांना आर्थिक सहाय्य व सूक्ष्म सिंचन सुविधा ठिबक सिंचनासह, बोर वेल व पंपा करिता आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांना शेतीच्या तत्सम उपक्रमांकरिता सहाय्य जसे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वनशेती इत्यादी. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन रहिवासी (रिकग्नीशन ऑफ फॉरेस्ट राइटस्) ॲक्ट, २००६ (२००७ चा २) अंतर्गत वन हक्क धारक या सहाय्याकरिता पात्र ठरतील.

(छ) महिला व बालकल्याण.—माता व बाल आरोग्य, कुपोषण, संसर्गजन्य रोग इत्यादी समस्यांवर उपाय योजनांकरिता विशेष कार्यक्रम

(ज) वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्ती कल्याण,—वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तिकरिता विशेष कार्यक्रम.

(झ) कौशल्य विकास व रोजगार.—उदरनिर्वाहासाठी सहाय्याकरिता कौशल्य विकास, स्थानिक पात्र व्यक्तिकरिता उत्पन्न निर्माण व आर्थिक उपक्रम या प्रकल्प/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्रांचा विकास, स्वंयरोजगार योजना, स्वंयसहाय्यता गटांना सहाय्य व अशा स्वंयरोजगार आर्थिक उपक्रमांकरिता पुढे व मागे संबंध जोडण्याची तरतूद नाविन्यपूर्णतेला, प्रवर्धन उपक्रम परिचालकता व उबवणी केंद्रांना सहाय्य.

(ट) स्वच्छता.—कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, योग्य निचऱ्याची तरतूद व सांडपाणी प्रक्रिया केंद्र, मलविषयक गाळाच्या विल्हेवाटीची तरतूद, स्वच्छता गृहांची तरतूद आणि इतर संबंधित उपक्रम.

(तीन) न्यास विधिचा चाळीस टक्केपर्यंत इतर प्राथमिकता क्षेत्रावर खर्च करता येईल, जसे

(क) भौतिक पायाभूत सुविधा : आवश्यक भौतिक पायाभूत सुविधा जसे रस्ते, पूल, रेल्वे, जलवाहतूक, विमानतळ, औद्योगिक उद्यान किंवा समूह व इतर औद्योगिक पायाभूत सुविधा प्रदान करणे.

(ख) सिंचन : सिंचनाचे पर्यायी स्त्रोत विकसित करणे, सुयोग्य व आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

(ग) ऊर्जा व पाणलोट विकास क्षेत्र : पारंपरिक विद्युत व उर्जाचे अक्षयस्त्रोतापासून घरगुती विद्युतीकरण व विद्युत पायाभूत सुविधांचे मजबुतीकरण, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा (मायको हायडलसह) व पावसाच्या पाण्याची साठवण, यंत्रणांचा विकास, फळबागा, एकात्मिक शेती व आर्थिक वनीकरण व पाणलोट क्षेत्रांची पुनःस्थापना. राज्य शासनाने वेळोवेळी निर्देशीत कोणतेही इतर पायाभूत सुविधांचे कार्य.

(घ) पर्यावरणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याकरिता इतर कोणत्याही उपाययोजना.

(चार) शासकीय विभाग, महामंडळ व मंडळामार्फत थेट निधि पद्धतीने सार्वजनिक, खाजगी भागीदारीच्या (पब्लिक, प्रायव्हेट पार्टनरशीप) माध्यमातून, विविध विकास व पायाभूत सुविधेसंबंधी प्रकल्प.

(पाच) पात्र मानवी संसाधनाची भरपाई करणाऱ्या व्यवस्था जसे डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, शिक्षक इत्यादी.

(सहा) उप-नियम (दोन) व (तीन) मध्ये नमूद क्षेत्रासंबंधी शासकीय योजना किंवा कार्यक्रमांची पूर्तता करणे.

(सात) प्रन्यासनिधि अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकासाच्या योजनांचे नियोजन व संनियंत्रण करण्याकरिता ग्राम सभांना प्रशिक्षण देणे व त्याची क्षमता बांधणी करणे.

(आठ) प्रन्यासने जिल्ह्यात वित्तीय वर्षात प्रन्यासनिधिमध्ये प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या रकमेच्या पाच टक्के पेक्षा जास्त नाही अशी रक्कम (किमान रु. २५ लक्ष ते कमाल रु. २ कोटी) प्रन्यास त्याचा प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याकरिता खर्च करू शकेल.

परंतु, प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्याची कमाल मर्यादा राज्य शासन वेळोवेळी वाढवू शकेल.

(नऊ) वार्षिक जमेची वाजवी रक्कम स्थायीदान म्हणून ठेवता येईल.

(दहा) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (प्र. म. ख. क्षे. क. यो.) अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे इतर कोणतेही कार्य घेण्यात येईल.

१४. **खर्चाची आकारणी.**—विश्वस्तांना खालील खर्च प्रन्यासनिधि व आकारण्याचा हक्क राहील —

(एक) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये — योग्यरित्या केलेला खर्च व गुंतवणुकीच्या परिपूर्ती, जतन किंवा फायद्यासाठी व प्रन्यास निधिचा समावेश असलेली मालमत्ता व प्रन्यासचे हितसंबंधाचे संरक्षण करण्याकरिता केलेला सर्व खर्च.

(दोन) अंशदान व कोणतेही इतर संसाधन ज्यात वाढ होईल ते प्राप्त करण्याकरिता विश्वस्तांना आलेला सर्व खर्च (यात कोणताही करार किंवा इतर लेखी करारनाम्याच्या निष्पादन व नोंदणीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा समावेश आहे.)

(तीन) कोणत्याही न्यायीक कार्यवाही संबंधित किंवा प्रन्यासच्या संबंधी विश्वस्ताच्या विरुद्ध कामकाजाशी झालेला सर्व खर्च यात व्यावसायिक शुल्क व न्यायिक सल्लागारावर झालेल्या खर्चाचा समावेश आहे.

(चार) प्रन्यासचे कार्य किंवा अंमलबजावणीमध्ये झालेला सर्व कायदेशीर व वैधानिक खर्च यात प्रन्यासच्या कामासंबंधात देय होणारी किंवा प्रदान केलेला कर, शुल्क व इतर आकारणीचा समावेश आहे.

(पाच) सभा आयोजित करण्यात व इतर कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि कार्यवाही संबंधात आलेला सर्व खर्च आणि नियोजन, अंमलबजावणी, तपासणी, आढावा व प्रकल्प अहवाल तयार करणे, सल्लागाराचे शुल्क, तृतीय पक्ष तपासणी लेखा परीक्षक व असे त्याच्या अनुषंगिक इतर खर्च.

१५. **लेखा व लेखापरीक्षण**

(एक) प्रन्यासचे कामकाजाचे सत्य स्वच्छ चित्र सादर करण्याकरिता व्यवस्थापन समिती प्रन्यासनिधि संबंधित खाते पुस्तके, दस्तऐवज व अभिलेख सुयोग्यरित्या सांभाळेल किंवा ठेवेल.

(दोन) प्रन्यासच्या लेख्यांचे किमान वर्ष संपल्यानंतर पात्र लेखापरीक्षकाकडून लेखापरिक्षण करण्यात येईल.

(तीन) प्रन्यासच्या लेखा परीक्षकाची नेमणूक नियामक परिषदेकडून, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे पॅनेलवर असलेल्या सनदी लेखापालच्या यादी मधून नियामक परिषदेने ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.

(चार) नियामक परिषद लेखापाल यांना काढून टाकू शकते किंवा बदलू शकते.

(पाच) राज्यशासन, विशिष्ट वर्षाचे किंवा अशा काही कालावधीचे लेखापरिक्षण करण्याकरिता राज्यशासनाने ठरविलेल्या अटी व शर्तीवर लेखापालाची किंवा लेखापालाची नेमणूक करू शकेल किंवा राज्याचे लेखापाल यांना विनंती करू शकेल.

(सहा) प्रन्यास त्याचे पुढील वित्तीय वर्षाकरिता मंजूर अंदाजपत्रक व वार्षिक योजना त्याच्या मंजूर योजना व प्रकल्पासह, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन व राज्य शासनास त्यांचे संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्याकरिता पाठवील.

(सात) प्रन्यास, तिमाही संपल्यानंतर पंचेचाळीस दिवसाच्या आत, मंजूर योजना व प्रकल्पांच्या भौतिक व वित्तीय संबंधात तिमाही प्रगती अहवाल तयार करेल व त्याला जिल्हा परिषद व जिल्हा प्रशासनाकडे त्यांच्या संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्याकरिता तात्काळ पाठवेल.

(आठ) प्रत्येक वर्षी वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रन्यास त्या संबंधित वित्तीय वर्षाच्या त्याच्या उपक्रमांवर वार्षिक अहवाल तयार करेल व त्याला नियामक परिषदेपुढे ठेवेल.

(नऊ) वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आत नियामक परिषदेकडून मंजूर वार्षिक अहवाल व मंजूर लेखा अहवाल त्यांची मान्यता मिळाल्यानंतर तावडतोब जिल्हा परिषद व राज्य शासनाकडे संबंधित वेबसाईटवर प्रकाशित करण्यासाठी पाठवेल.

(दहा) वार्षिक अहवाल मान्यता मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत शासनास सादर करण्यात येईल व प्रन्यासच्या वेबसाईटवर सुद्धा प्रकाशित करण्यात येईल.

(अकरा) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रन्यासच्या वार्षिक अहवाल नियामक परिषदेसमोर सादर केला जाईल.

प्रकरण सहा

**संकिर्ण**

**१६. कामाची अंमलबजावणी**

(एक) कामे किंवा साहित्य, प्रन्यासकडून, राज्य शासनाने अशा खरेदीकरिता विनिर्दिष्ट केलेल्या योग्य पद्धतीचा अवलंब करून खरेदी (संपादन) करू शकेल.

(दोन) प्रन्यासने हाती घेतलेली कामे शक्यतो फक्त शासकीय विभाग यंत्रणा, सार्वजनिक उपक्रम यांचे मार्फत कार्यन्वयीन करेल. ज्या साधारणपणे अशी कामे, संबंधित नियमांना अनुसरून करतात, आणि त्याची अंमलबजावणी करतांना किंवा कंत्राट मंजूर करतांना त्या संस्थेला अशा पद्धती लागू होतात.

(तीन) तांत्रिक मान्यता व कामाची देखरेख संबंधित विभागाला लागू होणाऱ्या प्रशासकीय प्रदान केलेल्या शक्ती अंतर्गत सदर काम करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(चार) जी कामे शासकीय विभाग यंत्रणा किंवा सार्वजनिक उपक्रमामार्फत कार्यन्वयीन करणे शक्य नसेल अशा कामांचे संबंधात व्यवस्थापन समिती ते काम, कोणत्याही इतर सक्षम व सुयोग्य यंत्रणेला, पारदर्शक पद्धतीचा अवलंब करून, नियामक परिषदेची पूर्व परवानगी प्राप्त करून, मंजूर करू शकेल.

(पाच) सर्व यंत्रणा व लाभार्थींना विधिचे हस्तांतरण त्यांचे बँक खात्यात करण्यात येईल.

**१७. अनुसूचित क्षेत्रांसाठी विशेष तरतूद**

(एक) भारतीय संविधानाच्या अनुसूची ५ व ६ सह वाचल्या जाणाऱ्या अनुच्छेद २४४ ला ध्यानात ठेवून, जे अनुसूचित जाती व जमाती क्षेत्राला व अशा पंचायतीच्या (ज्या अनुसूचित क्षेत्राचा विस्तार आहेत) तरतुदी असलेल्या अधिनियम, १९९६ ला आणि अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत येणारी गावे ती अनुसूचित क्षेत्रात चालणाऱ्या खनन व खनन विषयक कार्यांनी बाधित झाली आहे अशांना ग्रामसभेची मंजुरी खालीलप्रमाणे घेणे आवश्यक आहे :—

(अ) अशा सर्व योजना, कार्यक्रम, प्रकल्प जे प्रधानमंत्री खनीज क्षेत्र कल्याण योजने (PMKKKY) अंतर्गत घ्यावयाचे आहे आणि

(ब) शासनाच्या लागू मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे लाभार्थी चिन्हित करणे.

(दोन) संबंधित गावात घेतलेल्या कार्याचा अहवाल वित्तीय वर्ष पूर्ण झाल्यावर ग्रामसभेला सादर केला जाईल.

१८. **प्रन्यास रद्द करणे.**—राज्य स्तरीय संनियंत्रण समितिच्या शिफारशीवरून प्रन्यास रद्द करण्याचा राज्य शासनाला विवेकाधिकार वापरता येईल. राज्य शासन जो अवधी निश्चित करेल तो पर्यंत प्रन्यास विद्यमान राहील. प्रन्यासाच्या निर्वापणकाळी प्रन्यासाची सर्व मालमत्ता व दायित्व राज्य शासनाकडे हस्तांतरित होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अपूर्व चंद्रा,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

टीप.—सदर अधिसूचना दिनांक १ सप्टेंबर २०१६ च्या मूळ इंग्रजी अधिसूचनेचे मराठी भाषेतील भाषांतरित प्रारुप आहे. सदरील भाषांतरित अधिसूचनेमधील एखाद्या अर्थाबाबत प्रश्न उद्भवल्यास मूळ इंग्रजी अधिसूचना पहावी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**आश्वासन क्रमांक ६१४**

६१४

प्रारुप सुधारित पुनर्प्रसिध्द विकास योजना
बृहन्मुंबई (तिसरी सुधारित)
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६
चे कलम ३० नुसार विकास योजना सादर
करणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत.

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**-: आदेश :-**

दि. २१ .३.२०१७.

**क्रमांक** :- प्रा.वि.यो. बृहन्मुंबई (ति.सु.)/कलम ३०/मुदतवाढ/प्र.क्र.५७८/१६/टिपीव्ही-३/ १४४०

**संदर्भ** :- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. एमसीपी/७९६४, दि.१८.३.२०१७

ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने (यापुढे "उक्त महानगरपालिका" असे उल्लेखिलेली) बृहन्मुंबई शहराची तिसरी सुधारित प्रारुप विकास योजनेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) कलम १५४ अन्वये दि.२३.४.२०१५ रोजी दिलेल्या निर्देशास अनुसरून उक्त महानगरपालिकेने उक्त अधिनियमाच्या **कलम २६(१) अन्वये दि.२७.५.२०१६** रोजीच्या शासन राजपत्रात पुनर्प्रसिद्ध केली आहे (यापुढे "उक्त पुनर्प्रसिध्द विकास योजना" असे उल्लेखिलेली);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील **कलम ३० पोटकलम (१)** च्या तरतुदीनुसार, उक्त महानगरपालिकेने उक्त पुनर्प्रसिध्द विकास योजना उक्त अधिनियमाचे **कलम २६** पोटकलम (१) नुसार सूचना, शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून **सहा** महिन्याचे आत किंवा त्यापुढे शासनाने वाढवून दिलेल्या मुदतीच्या आत पण कोणत्याही परिस्थितीत अशी वाढीव मुदत २४ महिन्यांपेक्षा जास्त नाही, अशा वाढीव मुदतीच्या आत कलम २८ च्या पोटकलम (४) अन्वये, विकास योजनेच्या मसुद्यात करण्यात आलेल्या फेरबदलाच्या किंवा बदलांच्या सूचीसह, विकास योजनेचा मसुदा राज्य शासनास उक्त अधिनियमातील कलम ३० अन्वये मंजुरीकरिता सादर करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा यापूर्वीचा दिनांक ३.१.२०१७ प्रस्ताव विचारात घेऊन, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.२४.१.२०१७ च्या आदेशान्वये दि.२०.३.२०१७ पर्यंत कलम ३० अन्वये मुदतवाढ मंजूर केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने ठराव क्र.१९२२, दि.१७.३.२०१७ अन्वये उक्त पुनर्प्रसिध्द विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये सादर करण्यासाठी आणखी दोन महिन्यांकरीता म्हणजेच दि.१९.५.२०१७ पर्यंत मुदतवाढ मागण्याबाबत मंजुरी दिली असून त्यास अनुसरुन महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पत्र क्र.७९६४, दि.१८.३.२०१७ अन्वये, दि.१९.५.२०१७ पर्यंत मुदतवाढ मंजुरीबाबत विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने नमूद केलेली कारणे विचारात घेऊन त्यांनी मागितलेली मुदतवाढ दि.१९.५.२०१७ पर्यंत मंजूर करणे आवश्यक असल्याबाबत **संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे** यांची खात्री पटली आहे;

त्याअर्थी, शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये प्रदत्त केलेल्या शक्तीचा वापर करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे उक्त अधिनियमाच्या कलम ३० पोटकलम (१) नुसार उक्त पुनर्प्रसिध्द विकास योजना शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्याकरिताची मुदत **दि.१९.५.२०१७** हा दिवस धरुन त्या दिवसापर्यंत वाढवित आहेत.

मध्यवर्ती कार्यालये,
पुणे-४११ ००१.

( नो.र.शेन्डे )
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

सत्य प्रत
प्र. कार्यालय अधिकारी

**आश्वासन क्रमांक ४३**

# महाराष्ट्र शासन

क्रमांक: इएसटी-५०१५/प्र.क्र.१४०/राऊशु-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २७ नोव्हेंबर, २०१९.

वाचा:

१) शासनाचे समक्रमांकित दि.२२.०३.२०१७ चे दोषारोपांचे ज्ञापन.
२) आयुक्त, राउशु यांचे पत्र क्र.डीपीई ११२०१५/मालवणी दुर्घटना/प्रदक-१०, दि.१२.०९.२०१७
३) शासनाचे समक्रमांकित दि.१७.०३.२०१८ चे आदेश.
४) प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई यांचा दि.१२.०३.२०१९ रोजीचा चौकशी अहवाल.
५) शासनाची समक्रमांकित दि.०५.०४.२०१९ रोजीची पहिली कारणे दाखवा नोटीस.
६) पहिल्या कारणे दाखवा नोटीशीच्या अनुषंगाने सर्व अपचाऱ्यांचे दि.२८.०५.२०१९ रोजीचे बचावाचे अभिवेदन.
७) शासनाची समक्रमांकित दि.०४.०९.२०१९ रोजीची दुसरी कारणे दाखवा नोटीस.
८) दुसऱ्या कारणे दाखवा नोटीशीच्या अनुषंगाने सर्व अपचाऱ्यांचे दि.०६.०९.२०१९ रोजीचे बचावाचे अभिवेदन.

## आदेश

दि.१८.०६.२०१५ रोजी मुंबई उपनगर जिल्ह्यातील ज्युरासिक पार्क जवळील झोपडपट्टी, खारोडी, गांवदेवी मंदिर रोड, मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई या भागात विषारी रासायनिक द्रव्य मिश्रित गावठी दारू प्राशन केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर विषबाधा होउन सुमारे १०६ व्यक्तींचा मृत्यू झाला होता. सदर परिसर यु विभाग, मुंबई उपनगर या कार्यक्षेत्रात येत असल्यामुळे संबंधित खालील अधिकारी/कर्मचारी यांचेविरूद्ध दि.२२.०३.२०१७ रोजी दोषारोपपत्रांचे ज्ञापन बजावून, म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली.

१) श्री. जे. अे. देशमुख, निरीक्षक, राउशु,
२) श्री. आर. एस. साळुंखे, दुय्यम निरीक्षक, राउशु,
३) श्री. डी. एन. दळवी, जवान, राउशु,
४) श्रीमती व्ही. यु. वेंगुर्लेकर, जवान, राउशु,

२. उक्त अधिकारी/कर्मचारी यांना शासन स्तरावरून दोषारोपपत्राच्या अनुषंगाने अपचाऱ्यांचे बचावाचे अभिवेदन आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, म.रा., मुंबई यांचेमार्फत दि.१२.०९.२०१७ च्या पत्रान्वये प्राप्त झाले. अभिवेदनामध्ये अपचाऱ्यांनी दोषारोप नाकबूल केलेले होते. त्यामुळे,

त्यांचेविरूद्ध म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ अन्वये सविस्तर विभागीय चौकशीच्या पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई यांची दि.१७.०३.२०१८ च्या आदेशान्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच अपचाऱ्यांविरूद्ध दोषारोपांच्या बाबींच्या पुष्ट्यर्थ प्रकरण सादर करण्यासाठी सादरकर्ता अधिकारी म्हणून श्री.युवराज राठोड, उप अधीक्षक (गट-ब), राउशु यांची दि.१७.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली होती. सर्व अपचारी एकाच प्रकरणाशी संबंधित असल्यामुळे म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम १२ अन्वये सामायीक विभागीय चौकशी करण्याबाबत दि.१७.०३.२०१८ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले होते.

३. प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांनी त्यांचा अहवाल दि.१२.०३.२०१९ च्या पत्रान्वये शासनास सादर केला. चौकशी अहवालामध्ये, उक्त अपचाऱ्यांविरूद्ध ठेवण्यात आलेला एकमेव दोषारोप सिद्ध होत असल्याचा निष्कर्ष चौकशी अधिकाऱ्यांनी काढला आहे. अपचाऱ्यांना दि.०५.०४.२०१९ रोजीच्या ज्ञापनन्वये चौकशी अहवालाची प्रत पुरविण्यात आली होती. अहवालातील निष्कर्षांच्या अनुषंगाने सर्व अपचाऱ्यांनी दि.२८.०५.२०१९ रोजी त्यांचे बचावाचे अभिवेदन सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी अहवालातील निष्कर्ष अमान्य केलेले आहेत.

४. प्रकरणी दोषरोपांचे गांभीर्य, अपचाऱ्यांविरूद्ध केलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने चौकशी अहवाल, चौकशी अधिकाऱ्यांचे निष्कर्ष व त्यावरील अपचाऱ्यांचे अभिवेदन विचारात घेता, सर्व अपचारी अधिकारी/कर्मचारी यांची पुढील वेतनवाढ भविष्यातील परिणांमासह एक वर्ष कालावधीकरिता रोखण्यात यावी या अंतरिम शिक्षेस शासनाने मान्यता दिली आहे.

५. उक्त शिक्षेविरूद्ध अभिवेदन सादर करण्यासाठी, सर्व अपचाऱ्यांना दि.०४.०९.२०१९ रोजी दुसरी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. त्यानुषंगाने सर्व अपचाऱ्यांनी दि.०६.०९.२०१९ रोजी बचावाचे अभिवेदन सादर केलेले आहे. सदर अभिवेदनामध्ये त्यांनी शिक्षा अमान्य केलेली असून शिक्षेसंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करणेबाबत विनंती केलेली आहे.

६. या प्रकरणी उक्त अपचाऱ्यांचे दि.०६.०९.२०१९ चे अभिवेदन व वस्तुस्थितीचा सर्वंकष विचार करून, सर्व अपचारी अधिकारी/कर्मचारी यांची पुढील वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात एक वर्ष कालावधीकरिता रोखण्यात यावी, ही शिक्षा करण्याचा आणि त्यांचा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ समजण्यात यावा, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

७. म्हणून आता, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, मधील नियम ६ मधील अधिकारांचा वापर करून प्रस्तुत प्रकरणी विभागीय चौकशीअंती उक्त सर्व अपचारी अधिकारी/कर्मचारी यांची पुढील वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात एक वर्ष कालावधीकरिता

**(भविष्यातील वेतनवाढीवरील परिणामाशिवाय) रोखण्यात यावी, ही शिक्षा** देत आहे. त्यांचा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ समजण्यात यावा.

८. उपरोक्त शिक्षेविरूद्ध अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, मधील नियम १८ नुसार अपचारी यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत मा. राज्यपाल महोदयांकडे सादर करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गृह विभाग
निर्गमित केले
दिनांक २८/११/१९
संख्या ०५

**(यु. ब. अजेटराव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत कार्यवाहीकरिता :**

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरहू आदेशाची प्रत सर्व अपचारी अधिकारी/कर्मचारी यांना बजावून त्यांची दुय्यम प्रतीवर स्वाक्षरी/पोच घेउन ती शासनास तात्काळ सादर करावी.

**प्रत माहितीस्तव:**

१) महालेखापाल-१/२(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२) सर्व अपचारी अधिकारी/कर्मचारी. (द्वारा आयुक्त, राउशु)
३) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) निवडनस्ती, राउशु-१.

***********

**आश्वासन क्रमांक ४४**

<u>राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधीत गुन्हे उघडकीस आणण्यासाठी गुप्त माहिती देणाऱ्या खबऱ्यांना व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गुन्हा अन्वेषण कामी प्रोत्साहन मिळावे यासाठी बक्षीस देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक : बीजीटी-१०१६/प्र.क्र.३९/राऊशु-१,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ०९ ऑक्टोबर, २०१७.

<u>वाचा</u> :१) शासन पत्र गृह विभाग क्र. एमआयएस ०१७४/४७ (२३५)-XXX-PR, दि. २०.०५.१९७६.

**<u>प्रस्तावना:-</u>**

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत शासनास मिळणाऱ्या महसुलात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून महसुलाचे संवर्धन करणे व वाढ करणे ही मुख्य जबाबदारी या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची आहे. या विभागाशी संबंधित गुन्ह्यांना आळा बसावा याकरिता, गुन्हे उघडकीस आणण्यासाठी गुप्त माहिती देणाऱ्या खबऱ्यांना, त्याचप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गुन्हा अन्वेषण कामी प्रोत्साहन मिळावे यासाठी या विभागाच्या संदर्भाधीन दि.२०.५.१९७६ च्या आदेशानुसार बक्षीस धोरणाविषयक तरतूदी ठरविण्यात आल्या आहेत. सदर तरतूदींमध्ये गेली ४० वर्षे कोणतीही सुधारणा/ वाढ झालेली नाही. तथापि, अलिकडच्या काळात उत्पादन शुल्क दर, गुन्ह्यांचे स्वरुप, गुन्हेगारांची कार्यप्रणाली व संपर्काची साधने यामध्ये आमुलाग्र बदल झालेला आहे. त्यामुळे या विभागाच्या दि. २०.५.१९७६ च्या आदेशामध्ये कालानुरूप आवश्यक त्या सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधीत गुन्हे उघडकीस आणण्यासाठी गुप्त माहिती देणाऱ्या खबऱ्यांना, त्याचप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गुन्हा अन्वेषण कामी प्रोत्साहन मिळावे यासाठी देण्यात येणाऱ्या बक्षीसाच्या रकमेला मंजूरी देण्यासाठी सक्षम असलेले प्राधिकारी, सक्षम प्राधिकाऱ्यांना बक्षिसाची रक्कम मंजुर करण्यासाठीचे अधिकार तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांना या प्रकरणी शिफारस करण्यासाठी शिफारस समितीचे गठन करणे याबाबत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येत आहे.

| अ.क्र | बक्षिस मंजूरी प्राधिकारी | बक्षिसाची रक्कम मंजुर करावयाची मर्यादा | शिफारस समिती |
|---|---|---|---|
| १ | अ.मु.स / प्रधान सचिव (राउशु) | रुपये १० लाखापेक्षा जास्त | अध्यक्ष: आयुक्त, राउशु<br>सदस्य :- १. सहसचिव / उपसचिव (राउशु)<br>२. अप्पर आयुक्त, राउशु<br>३. सहआयुक्त (म. व म.)<br>४. संचालक (अं. व द.)<br>सदस्य सचिव : सहआयुक्त (प्रशासन), |
| २ | **आयुक्त, राउशु** | रुपये १० लाख पर्यत | अध्यक्ष- सह आयुक्त (प्रशासन) राउशु<br>सदस्य - सर्व विभागीय उपआयुक्त, राउशु<br>सदस्य सचिव- संचालक (अं. व द.), राउशु |
| ३ | **संचालक (अं. व द.), राउशु** | रुपये २ लाख पर्यत | अध्यक्ष- ज्येष्ठतम विभागीय उप आयुक्त, राउशु<br>सदस्य - सर्व विभागीय उपआयुक्त, राउशु<br>सदस्य सचिव- कार्यालय अधीक्षक (कार्यासन क्र. ९) |
| ४ | **विभागीय उपआयुक्त, राउशु** | रुपये १ लाख पर्यत | अध्यक्ष- विभागातील सेवाज्येष्ठ अधीक्षक , राउशु<br>सदस्य - संबंधित विभागातील सर्व अधीक्षक<br>सदस्य सचिव- कार्यालय अधीक्षक |
| ५ | **अधीक्षक** | रुपये ५० हजार पर्यत | अध्यक्ष- विभागातील लगतच्या जिल्हयाचे अधीक्षक<br>सदस्य - त्याच विभागातील लगतच्या दोन जिल्हयाचे अधीक्षक<br>सदस्य सचिव- उपअधीक्षक मुख्यालय/ (नसल्यास कार्यालय अधीक्षक) |

उपरोक्त अनु. क्र. ५ मधील अधीक्षक, राउशु यांना शिफारस करणाऱ्या समितीच्या अध्यक्षांबाबतचा निर्णय संबंधित कार्यक्षेत्राचे विभागीय उप आयुक्त यांनी वेळोवेळी घ्यावा. शक्यतो सदर अध्यक्ष हा इतर अधीक्षकांना ज्येष्ठतम असावा.

**बक्षीस रक्कम मंजूरी बाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील:-**

१) राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी / कर्मचारी, यांनी राज्य शासनाच्या महसुलाची हानी रोखण्यासाठी व बेकायदेशीर धंद्यावर खालील कायदा व नियमांतर्गत कारवाई केलेली असावी.

I) महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ व त्या अंतर्गतचे नियम

II) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९५५ व त्या अंतर्गतचे नियम

III) महाराष्ट्र मळी नियंत्रण कायदा १९५६ व त्या अंतर्गतचे नियम

२) राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान संवर्ग ते उपआयुक्त (वरिष्ठश्रेणी) दर्जाच्या अधिकाऱ्यांना गुन्हा अन्वेषण व तद्अनुषंगिक बाबींकरिता बक्षीस मंजुर केले जाईल. लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांनी विशिष्ट व गुणवत्तापुर्ण कामगिरी केली असल्यास ते सुध्दा बक्षीसासाठी पात्र असतील.

३) बक्षीस रक्कम मंजुर करण्यास सक्षम असलेले अधिकारी, संबंधित शिफारस समितीच्या शिफारशीवरुन अधिकारी/ कर्मचारी व खबरी यांना द्यावयाच्या रकमेबाबतचा निर्णय घेतील व तसे आदेश निर्गमित करतील. त्या आदेशात अधिकारी व कर्मचारी यांची नावे, पदनाम, उल्लेखनीय कामगिरीची थोडक्यात माहिती, सदर कारवाईमुळे शासनाच्या महसुलाची टळलेली हानी व त्यांना देण्यात येणारी बक्षीस रक्कम, इ. बाबी नमूद केलेल्या असतील.

४) बक्षीसाची मंजूर होणारी रक्कम ही त्या गुन्ह्याचा तपास करणारे व मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिली जाईल. तथापि, मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांना द्यावयाची बक्षीसाची रक्कम संबंधित प्रकरणाचा न्यायनिर्णय शासनाच्या बाजूने लागल्यानंतरच देण्यात येईल. त्यांचे वाटप कसे असावे याबाबत सहभागी तपासी अधिकारी/ कर्मचारी आणि न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणारे व मा. न्यायालयात साक्ष देणारे अधिकारी/ कर्मचारी यांची कामगिरी विचारात घेउन, शिफारस समिती त्याबाबत बक्षीस मंजूरी प्राधिकारी यांचेकडे शिफारस करील.

५) बक्षीस मंजुरी प्राधिकारी, समितीच्या शिफारशी वरून बक्षीस रकमेच्या वाटपाबाबत एक महिन्याच्या आत निर्णय घेईल. जर अधिकारी/ कर्मचारी तसेच खबऱ्यांना मंजूर केलेल्या/ दिलेल्या रकमेबाबत वाद निर्माण झाल्यास, बक्षीस मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या वरिष्ठ बक्षीस मंजुरी प्राधिकारी, त्याबाबत एक महिन्याच्या आत त्या प्रकरणामध्ये निर्णय घेतील व तो निर्णय संबंधितांवर बंधनकारक असेल.

६) अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीत जास्तीत जास्त रुपये २५ लाखा पर्यंत बक्षीस दिले जाईल. परंतु सदर बक्षीस रक्कमेची मर्यादा प्रकरणपरत्वे विशेष बाब म्हणून शिथिल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

७) खबऱ्यांना द्यावयाच्या बक्षीसाची रक्कम मंजुर करताना जे आदेश निर्गमित केले जातील त्यामध्ये खबऱ्यांचे नाव नसेल. त्याला देण्यात येणारी रक्कम ही "Rewards to Informers" (खबऱ्यांसाठीची रक्कम) असे नमुद केले जाईल. सदरची रक्कम खबऱ्याने ज्या अधिकाऱ्याला माहिती दिली त्या अधिकाऱ्यामार्फत त्याला दिली जाईल तसेच संबंधीत अधिकाऱ्यावर सदर रक्कम खबऱ्यास देण्याची जबाबदारी राहील. खबऱ्यांनी लेखी स्वरूपात दिलेली माहिती तसेच खबऱ्यांना देण्यात आलेल्या बक्षीसाची रक्कम त्यांना मिळाल्याबाबतची पोहोच संबंधीत अधिकारी हे संबंधित विभागीय उप आयुक्त/ संचालक (अं. व द.)/ अधीक्षक यांचेकडे सादर करतील व ती त्यांच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिस्वाक्षरीनंतर ठेवण्यात येईल. लेखा तपासणीवेळी, लेखा तपासणी अधिकाऱ्यांनी सदर पोहोचबाबत मागणी केल्यास संबंधित विभागीय उप आयुक्त/ संचालक (अं. व द.)/ अधीक्षक यांनी ती सादर करणे बंधनकारक राहील.

८) खबऱ्याने/ खाजगी इसमाने अचुक माहिती दिल्यास त्याला महत्तम रक्कम मिळेल अन्यथा त्याने दिलेली माहिती अपुरी असल्यास त्याला किती प्रमाणात रक्कम द्यावयाची याबाबतचा निर्णय शिफारस समितीच्या शिफारशीवरून संबंधीत बक्षीस मंजूर करणारे प्राधिकारी घेतील.

९) बक्षीसाची रक्कम संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्यांना RTGS/ NEFT व्दारे त्याच्या नावे बँक खात्यात जमा करणे आवश्यक राहील. परंतु, खबऱ्यांना, त्यांची इच्छा असल्यास, RTGS/ NEFT व्दारे अन्यथा रोख स्वरूपात बक्षीसाची रक्कम दिली जाईल.

१०) जर एखादा इसम या विभागांतर्गत अथवा इतर विभागांतर्गत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या कायद्यान्वये गुन्हेगार म्हणून शाबित झालेला असल्यास त्यास बक्षीस दिले जाणार नाही.

**राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना बक्षीसपात्र ठरविण्यासाठी आवश्यक कामगिरीचे निकष:-**

खालील पैकी कोणतीही कामगिरी करताना धैर्य, कौशल्य किंवा धडाडी तसेच तत्परता, प्रामाणिकपणा आणि बुद्धीकौशल्य वापरणे, तपासणी कार्यात महत्वाची मदत करणे, इत्यादी बाबी बक्षीसपात्र उमेदवार ठरविण्यासाठी आवश्यक असतील. तसेच नोंदविलेला गुन्हा शक्यतो वारस असावा. तथापि, बेवारस गुन्हयात अतिउत्कृष्ठ कामगिरी केली असल्यास त्या प्रकरणीसुद्धा बक्षीस देता येईल.

१. जप्त करण्यात आलेले मद्य बनावटरित्या तयार केलेले असावे.
२. मद्य निर्माण्यात तयार केलेले मद्य कर चुकवून बाहेर काढलेले व ते जप्त केलेले असावे.
३. बनावट / डयुटी फ्री स्कॉच जप्त केलेले असावी.
४. परराज्यातून अवैधरीत्या आणलेले मद्य/मद्यार्क जप्त केलेले असावे.
५. मळी/ काळा गुळ/ मोहा फुले इत्यादी जप्त केलेले असावे.
६. हातभट्टी दारुची वाहतुक करणारी वाहने जप्त केलेली असावीत.
७. हातभट्टी दारू निर्मिती केंद्रावर वारस गुन्हा नोंद केलेला असावा.
८. कार्यक्षेत्रातील सर्व ढाबे व हातभटटी निर्मिती / विक्री पूर्णपणे बंद केलेली असावी.
९. गुन्ह्यातील आरोपींना कायद्यातील तरतुदीप्रमाणे किमान शिक्षा झाली असावी.
१०. भेसळयुक्त ताडीचा/ क्लोरल हायड्रेटचा साठा जप्त केलेला असावा.
११. सराईत गुन्हेगारावर MPDA कायद्यान्वये प्रतिबंधात्मक स्थानबध्दतेची कारवाई व्हावी.
१२. सराईत गुन्हेगारावर MPA १९४९, तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा मधील कलम ९१ व ९३ अन्वये कार्यवाही झाल्यानंतर सदर गुन्हेगारावर पुन्हा गुन्हा नोंद करुन बंधपत्रा मधील रक्कम संबंधित अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करून शासन जमा करुन घेतलेली असावी.
१३. आसवनी /मद्य व बीअर निर्माण्यामध्ये विहित मात्रेपेक्षा जास्त हानी उघडकीस आणून त्यावरील कर वसूल केलेला असावा अथवा अनुज्ञप्ती निलंबित / रद्द केलेली असावी.
१४. बनावट मद्यनिर्मितीचा कारखना, लेबल, कॅप, रिकाम्या बाटल्या, इ. जप्त केलेले असावे.

बक्षीसपात्र गुन्हयाकरिता जप्त मुद्येमालाची किंमत किमान रु.२५,०००/- इतकी असावी. बक्षीस रक्कम शिफारस करणारी समिती एखाद्या प्रकरणात जप्त मुद्देमालाची किंमत रु. २५,०००/- पेक्षा कमी असल्यास परंतु अधिकारी व कर्मचारी यांची कामगिरी उत्कृष्ट असल्यास सदर मर्यादा शिथील करणेबाबत बक्षीस मंजूरी प्राधिकाऱ्याला शिफारस करू शकेल. तथापि, बक्षीस मंजूर करणाऱ्या प्राधिकरणाने त्या प्रकरणी घेतलेला निर्णय अंतिम राहील.

बक्षीसपात्र कामगिरीच्या उपरोक्त निकषामध्ये आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क हे आवश्यक ते बदल करू शकतील.

**खाजगी इसम/ खबरी (Informer) याबाबतचे निकष :-**

i) ज्या इसमाला खालील अ.क्र.(ii) मधील (अ), (ब), (क) मध्ये नमूद केलेल्या कायदा व तरतुदीचे उल्लंघन होणारी बाब ज्ञात आहे, त्या इसमाला खबरी असे संबोधण्यात येईल.

कोणताही इसम (राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्या खेरीज) ज्याला बेकायदेशीर मद्य तयार करणे, विक्री, वाहतुक बाळगण्याबाबत अथवा मद्य निर्माण्या व आसवनीमधून मद्यार्क इ. शासनाचा महसुल चुकवून बाहेर काढले जाते, मळी / मोहा फुलाची बेकायदेशीर वाहतुक व विक्री इत्यादी स्वरुपाची माहिती आहे, त्यास खबरी संबोधण्यात येईल.

ii) खाजगी इसम अथवा खबरी यांनी दिलेल्या निश्चित माहितीच्या आधारे राज्य शासनाच्या महसुलाची हानी रोखण्यासाठी व बेकायदेशीर धंद्यावर खालील कायदा व नियमांतर्गत राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गुन्हा अन्वेषणाची कारवाई केलेली असावी.

अ) महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ व त्याअंतर्गतचे नियम

ब) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९५५ व त्याअंतर्गतचे नियम

क) महाराष्ट्र मळी नियंत्रण कायदा १९५६ व त्याअंतर्गतचे नियम

iii) खबरी त्याच्याकडे असलेली माहिती लेखी स्वरुपात केवळ स्वाक्षरी करून, नावाचा उल्लेख न करता व त्यावर त्याच्या डाव्या हाताचा अंगठयाचा ठसा उमटवून राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना देईल. खबऱ्याने तोंडी/ दूरध्वनी/ भ्रमणध्वनीद्वारे माहिति दिल्यास व त्या माहितीच्या आधारे कारवाई झाल्यास तद्नंतर त्या खबऱ्याकडून अशी माहिती लेखी स्वरुपात केवळ स्वाक्षरी करून, नावाचा उल्लेख न करता व त्यावर त्याच्या डाव्या हाताचा अंगठयाचा ठसा उमटवून घेता येईल.

iv) खबऱ्याने दिलेल्या माहितीमध्ये घटकाचे अथवा इसमाचे नाव व पत्ता, गुन्हयाची कार्यपध्दती, त्यामध्ये गुंतलेल्या इसमांची माहिती, वाहतुक असल्यास वाहनाचा क्रमांक, गुन्हयाच्या ठिकाणी अंदाजे किती मद्य, मद्यार्क, मळी, मोहा फुले, स्कॉच व इतर माहिती सविस्तरपणे नमुद केलेली असावी.

v) विभागातील अधिकारी/ कर्मचारी खबऱ्याने दिलेल्या माहितीबाबत त्याला पोहच देतील व त्याचे नाव व पत्ता गोपनीय ठेवतील.

vi) खबऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारे कारवाई झाल्यास व त्यातून शासनाच्या महसुलाची हानी रोखली गेल्याचे निष्पन्न झाल्यास तो बक्षीस रक्कमेस पात्र असेल.

**प्रस्तुत प्रकरणी मंजुर करावयाच्या बक्षीसाच्या रकमेचे निकष प्रकरणनिहाय खालीलप्रमाणे :**

| अ.क्र. | प्रकार | राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना द्यावयाची बक्षीस रक्कम | खबरी व खाजगी इसम |
|---|---|---|---|
| १ | जप्त मद्य /बीअर/ काळा गुळ / मळी / बनावट स्कॉच / मोहाफुले / ताडी व इतर | जप्त मुद्येमालाची (वाहनाखेरीज) एफ.आय.आर. मधील रक्कम अथवा राज्यातील उत्पादनशुल्क / विशेष शुल्काच्या दराने येणारी रक्कम यापैकी कमी असलेली रक्कम ही जप्त मुद्देमालाची बक्षीसाकरिता रक्कम समजण्यात येईल. i) जप्त केल्यानंतर सदर रकमेच्या किमान ५% वजास्तीत जास्त ७% पर्यंत ii) कोर्टात गुन्हा शाबित झाल्यास तपासी अंमलदार व सहभागी कर्मचाऱ्यांना किमान ५% व जास्तीत जास्त ७% पर्यंत बक्षीस रक्कम देण्यात यावी. | जप्त मुद्येमालाची (वाहनाखेरीज) एफ.आय.आर. मधील रक्कम अथवा राज्यातील उत्पादनशुल्क / विशेष शुल्काच्या दराने येणारी रक्कम यापैकी कमी असलेली रक्कम ही जप्त मुद्देमालाची बक्षीसाकरितारक्कम समजण्यात येईल त्या रकमेच्या जास्तीत जास्त ५% पर्यंत. |
| २ | जप्त मद्यार्क | जप्त मद्यार्कावर प्रचलित दराने येणाऱ्या उत्पादन शुल्काची रक्कम काढली जाईल व ती रक्कम बक्षीसासाठी मुद्देमालाची रक्कम समजण्यात येईल i)जप्त केल्यानंतर सदर रकमेच्या किमान ५% व जास्तीत जास्त ७% पर्यंत रक्कम बक्षीस म्हणून देण्यात यावी. ii) कोर्टात गुन्हा शाबित झाल्यास तपासी अंमलदारांस किमान ५% व जास्तीत जास्त ७% पर्यंत रक्कम बक्षीस म्हणून देण्यात यावी. | जप्त मुद्येमालाची (वाहनाखेरीज) एफ.आय.आर. मधील रक्कम अथवा राज्यातील उत्पादनशुल्क / विशेष शुल्काच्या दराने येणारी रक्कम यापैकी कमी असलेली रक्कम ही जप्त मुद्देमालाची बक्षीसाकरितारक्कम समजण्यात येईल त्या रकमेच्या जास्तीत जास्त ५% पर्यंत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | आसवनी / मद्यनिर्माण्यातून विहित मात्रेपेक्षा जास्त हानी उघडकीस आणल्यास | वसूल झालेल्या रकमेच्या ५% पर्यंत | लागू नाही. |
| ५ | MPDA /MPA नुसार /CrPC, MPA मधील कलम ९३ नुसार बंधपत्र घेतल्यानंतर कारवाई करुन बंधपत्रातील रक्कम शासन जमा झाल्यास | i) बंधपत्र घेतल्यानंतर पुन्हा कारवाई केल्यामुळे बंधपत्रातील रक्कम शासन जमा झाल्यास त्या रक्कमेच्या ५%<br>ii) MPDA/MPA/Externment अन्वये कारवाई झाल्यास जास्तीत जास्त रु.१०,०००/- पर्यंत. | लागू नाही. |

बक्षीस शिफारस समित्या प्रकरणनिहाय जप्त मुद्येमालाची (वाहनाखेरीज) एफ.आय.आर. मधील रक्कम, राज्यातील उत्पादन शुल्क / विशेष शुल्काच्या दराने येणारी रक्कम तसेच जप्त मद्यार्कावर प्रचलित दराने येणाऱ्या उत्पादन शुल्काची रक्कम याची परिगणना करून त्याप्रमाणे बक्षीस मंजूरी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांना शिफारस करतील. तथापि, सदर परिगणनेमध्ये बक्षीस शिफारस समितीला काही अडचणी उद्भवल्यास त्यामध्ये आयुक्त, राउशु यांचा निर्णय अंतिम राहील.

ज्या अधिकाऱ्यांनी उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे त्यांनी बक्षीस मिळणेबाबत संबंधित कार्यालय प्रमुखाकडे प्रस्ताव सादर करावे. सदर प्रस्ताव सादर करताना त्याला यापूर्वी किती बक्षीसाची रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे त्याबाबत माहिती नमूद करावी. कार्यालय प्रमुख यांनी सदरचे प्रस्ताव सक्षम शिफारस समितीकडे पाठवावेत.

बक्षीस शिफारस समितीने, शिफारस करतेवेळी, सदर कर्मचारी व अधिकारी यांना यापूर्वी किती बक्षीस मंजूर करून अदा करण्यात आले आहे याचा तपशीलसुद्धा बक्षीस मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांपुढे सादर करावा.

बक्षीस शिफारस समितीचे सदस्य सचिव, सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या आणि बक्षीस प्राप्त झालेल्या कर्मचारी व अधिकारी आणि त्यांना देण्यात आलेले बक्षीस याबाबतचा अभिलेख कमीतकमी ३० वर्षे जतन करून ठेवील. तसेच वर्षनिहाय व अधिकारी/ कर्मचारी निहाय मंजूर करण्यात आलेल्या बक्षीसाची माहिती आयुक्त, राउशु कार्यालयात जतन करण्यात यावी.

बक्षीसप्राप्त अधिकारी व कर्मचारी यांचेविरुद्ध भावी सेवाकाळात शिस्तभंगविषयक अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई सुरु झाल्यास त्या प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वी प्राप्त बक्षीसाचा/ त्यांच्या विभागासाठी भरीव कामगिरीचा आधार घेता येणार नाही.

सदर बक्षीसाची रक्कम प्रोत्साहनात्मक म्हणून देण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी देण्यात येणारे बक्षीस हक्क म्हणून मागता येणार नाही. सदर बक्षीसाच्या रक्कमेच्या व कामगिरीच्या आधारे अधिकारी व कर्मचाऱ्यास त्याच्या सोईचे / पसंतीच्या ठिकाणी बदली देण्यास किंवा इतर सेवाविषयक लाभ मिळण्यास तो पात्र होईल असा दावा करता येणार नाही.

गुन्हा अन्वेषणात जप्त केलेल्या मुद्देमालाची वाहतुक, मजुरी, इत्यादी खर्चासाठी येणाऱ्या रकमेचा समावेश अनुषंगिक खर्चात करण्यात येईल.

मंजूर बक्षीसाच्या रकमेचे वितरण, जे प्राधिकारी सदर रक्कम मंजूर करण्यास सक्षम आहेत, त्यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी अथवा संबंधित विभागीय उप आयुक्तांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी शक्यतो तीन महिन्यातून एकदा कार्यक्रम आयोजित करून करण्यात येईल. तसेच राज्यस्तरावर वर्षातून किमान एकदा कार्यक्रम आयोजित केला जाईल.

अधिकारी/ कर्मचारी यांचे शौर्य आणि त्यांची गुणवत्ता यांची तुलना बक्षीसांच्या रकमेशी करण्यात येवू नये. बक्षीसाची रक्कम ही गुणवत्तेचे प्रतीक समजण्यात यावी.

बक्षीस समिती सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये बक्षीसासाठी अद्यापपर्यंत प्रलंबित प्रकरणांबाबत सदर शासन निर्णयाच्या आधारे निर्णय घेईल. तथापि, यापूर्वी मंजूरी दिलेल्या बक्षीसांबाबत पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त बक्षीसासाठी तसेच तद्अनुषंगिक बाबींसाठी येणारा खर्च आयुक्त कार्यालयाशी संबंधित असल्यास तो मुख्य लेखाशिर्ष २०३९- राज्य उत्पादन शुल्क, (००)(००१) संचालक व प्रशासन, (०१)आयुक्तांचे कार्यालय, (०१)(०१)आयुक्त आस्थापना, दत्तमत (२०३५००१४) -४१, गुप्तसेवा खर्च या शिर्षाखाली मंजूर करण्यात येईल. तथापि, विभागीय कार्यालय व अधीक्षक कार्यालयाशी संबंधित असणारा खर्च २०३९ राज्य उत्पादन शुल्क, (०२)आस्थापना व प्रतिबंध, (०२)(०१) आस्थापना निरीक्षण व प्रतिबंध, दत्तमत (२०३९००३२)-४१, गुप्तसेवा खर्च या लेखाशीर्षाअंतर्गत दर्शवून त्या त्या वर्षाच्या मंजूर अनूदानातून भागविण्यात येईल.

वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २१/ १७/ व्यय-८, दि.०३/०२/२०१७ अन्वये प्राप्त सहमतीने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

